# बारा भाषणें

श्रीपाद अमृत डांगे

म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. क्र. २०६६

REFBK-0015970

१०७४९
६५४७३
१८।३।६९
२०६६

सूचना :— खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करा, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

23 JAN 1977

[क्र. मा. प.] /07

१९७०

# बारा भाषणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत
अनुक्रम ६५८७३ वि: निबंध
क्रमांक २०६६५ नों: दि: १८।३।६७

भाई श्रीपाद अमृत डांगे

REFBK-0015970

दा: क्र. १५८००

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

किंमत पांच रुपये

# बारा भाषणें

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलक्रम
REFBK-0015970

भाई श्रीपाद अमृत डांगे

अभिनव प्रकाशन, मुंबई १२.

किंमत पांच रुपये

प्रकाशक : वामन विष्णु भट,
अभिनव प्रकाशन
७ अंबा सदन, जेरबाई वाडिया रोड
परळ, मुंबई १२.

प्रथमावृत्ति : जानेवारी १९६७.

मुखपृष्ठ : बाळ ठाकूर

मुद्रक : स. कृ. जोशी, मॅनेजर,
विमा मुद्रक आणि प्रकाशक लि.,
सातारा, यांचा विमा छापखाना.

# बंडखोरीचे अध्वर्यू कॉ. डांगे !

……… श्री. डांगे यांची बंडखोरी विद्यार्थिदशेंत असतांनाच विल्सन कॉलेजांत बायबलविरोधी मोहिमेच्या रूपानें विकसित स्वरूपांत प्रकट झाली आणि तेव्हापासून बंडखोरीचे अध्वर्यू म्हणूनच त्यांची आजतागायत महाराष्ट्रानें व भारतानें ओळख धरली आहे.

१९२० सालच्या असहकार चळवळींत त्यानीं कॉलेज सोडलें व ते असहकारी काँग्रेसचे अनुयायी झाले आणि बंडखोरीच्या त्याच झुंजार वृत्तीनें त्यानीं भारतीय कम्युनिस्ट पक्ष आपल्या हातांनीं घडविला असें म्हणण्यांत अतिशयोक्ति नाहीं. कारखान्यांमध्यें गोगलगायीसारखा वागणारा कामगारवर्ग संपाच्या शास्त्र-विद्येंत व शस्त्रांत त्यानीं इतका तरबेज केला कीं श्रमिक कामगाराला त्यानीं जणूं कांहीं सशस्त्र बनवून एक शस्त्रागार निर्माण केले. त्यांच्या कर्तृत्वशक्तीची जराशी अटकळ येतांच तिशी उलटण्यापूर्वीच तुरुंग त्यांच्या मागें लागला. त्यांच्यावर व त्यांच्या सहकाऱ्यांवर झालेला कानपूर कटाचा व मीरत कटाचा खटला सुविख्यात आहे.आणि नंतरहि अनेक खटल्या–खोकल्यांतून त्यांना जावें लागलें. पण त्यांच्या वाढत्या कर्तृत्वाला तुरुंग खच्ची करूं शकला नाहीं, किंवा खंडित करूं शकला नाहीं.उलटपक्षीं या सक्तीच्या तपश्चर्येंत त्यांच्या कर्तृत्वाला नवे कोंब सतत फुटत राहिले. कर्दनकाळासारखी ब्रिटिशसत्ता ज्याप्रमाणें त्यांच्या कर्तृत्वाचा दरारा बाळगीत होती, त्याचप्रमाणें काँग्रेसच्या सिंहासनाला जर कोणाचा धाक व दडपण वाटत असेल तर तें कॉ. डांगे यांची झडफ, तडफ व झुंजारवृत्ति यांचेच होय. इतक्या असामान्य कर्तृत्वाचा व कर्यादीचा नेता महाराष्ट्रांतच नव्हे, तर भारतांतहि क्वचितच सांपडेल.

कॉ. डांगे यांच्या असामान्य कर्तृत्वाला तशाच अलौकिक वक्तृत्वाची जोड लाभलेली आहे. कॉ. डांगे हे व्यासपीठावर उभे राहिले कीं सर्व रंगढंग, रस व

कलाकुसर त्यांच्यासमोर हजर असतात आणि एकाद्या चित्रकाराप्रमाणें माफक व प्रमाणबद्ध असा या साऱ्या वैशिष्ट्यांचा वापर करून आपणांस पाहिजे तसें चित्र श्रोत्यांच्या मनावर उठविल्याशिवाय ते राहात नाहींत. भाषण करतांना त्यांच्या चेहेऱ्यावरचें आर्जवी पण मिस्किल हास्य कधीं ढळत नाहीं. अफाट हातवाऱ्यांची जरूर त्यांना लागत नाहीं. टिपेच्या आवाजांत कधीं ते बोलत नाहींत आणि राणाभीमदेवी संचार, संताप किंवा आवाहनें त्यांच्या वक्तृत्वांत नसतात. कै. शिवरामपंत यांच्या वक्तृत्वांतील वक्रोक्ति व उपहास, कै. तात्यासाहेब केळकर यांच्या वक्तृत्वांतील खोंच व खुबी, बंदुकीच्या गोळीप्रमाणें हृदयाचा ठाव घेण्याची लो. टिळकांच्या वक्तृत्वाची निशाणबाजी, कै. अच्युतराव कोल्हटकर यांचा खोडकरपणा, कै. खाडिलकरांची तन्मयता यांनीं महाराष्ट्राचें व्यासपीठ यथाकाल गाजविलें आहे. त्या सर्वांचें समन्वयी इन्द्रधनुष्य जर दृष्टिगोचर झालें नाहीं तर ती कॉ. डांगे यांची सभाच नव्हे असें समजावें. त्यांना टाळ्या घ्याव्या लागत नाहींत, त्या दणक्यासरशी पडतात. हंशासाठीं विदुषकी करावी न लागतां तो खदखदून प्रकट होतो. चिथावणी न देतांच त्यांचा शब्द हा हुकुमाप्रमाणें अंमलांत येतो. ते जेवढे बोलतात त्यापेक्षां त्यांचें वक्तृत्व इतकें अधिक सूचक असतें कीं सूचकता हा त्यांच्या वक्तृत्वाचा प्रधानधर्म म्हणावा लागतो. श्रीकृष्णानें एक काडी उभी चिरून आणि मांडीवर थाप मारून जरासंधाच्या व दुर्योधनाच्या वधाची युक्ति शब्द न बोलतां सांगितली. कॉ. डांगे यांच्या वक्तृत्वाची रीत तीच आहे. ‘ केरळ कायदेमंडळांतील आमचें दोन सभासदांचें बहुमत कधीं ढळणार नाहीं ’ या एका सूचक सूत्रानें जेवढें सूचित होतें तेवढें हिंसाशास्त्र उभे–आडवे प्रतिपादन करूनहि होईल काय ? ‘ मुंबईचा कामगार केव्हां काय करावयाचें तें बरोबर जाणतो ’, या एका वाक्यांतील सूचकता विरोधी शक्तींचा थरकांप उडविल्याशिवाय राहात नाहीं. ‘ चूप बसा, संप, हरताळ केव्हां करावयाचा हें मला जास्त कळतें ! ’ अशा एकेक वाक्यांचा अंकुश शिस्तीची कर्याद निर्माण करून हवेंत सोंड उडविणारांचा अचुक मर्मभेद करण्यास कमी करीत नाहीं. वक्तृत्वानें नेतृत्व व नेतृत्वानें वक्तृत्व यांचा तोल साधणारा कॉ. डांग्यांसारखा सव्यसाची भारतांतहि क्वचितच सांपडेल.

कम्युनिस्ट पक्षाची भारतांत ज्यांनीं उभारणी व धारणपोषण केले ते कॉ. डांगे कम्युनिस्ट आहेत हें सांगायला नको. पण जग निर्माण करूनहि

त्यापासून अलिप्त व निराळे राहाणाऱ्या आदिशक्तीप्रमाणेंच कॉ. डांगे हे कम्युनिस्ट पक्षांत विरघळून गेले नाहींत आणि आपलें व्यक्तित्व त्यानीं कधीं गमावलें नाहीं. कॉ. डांगे हे पक्षीय तर खरेच, पण पक्षाच्या प्रवाहांत स्वतःचे वैशिष्ट्य गमावून वहात जाण्याइतके पक्षपतित ऊर्फ पक्षपाती ते कधीं ठरू शकले नाहींत. मीठ पाण्यांत विरघळतें, साखरही विरघळते, पोलादाचा बारकासा कणही पाण्यापेक्षां निराळाच राहातो !

... कॉ. डांगे कम्युनिस्ट असले तरी त्यांची चण मराठी माणसाची आहे. अन्याय कोठेंहि दिसला कीं ताड्कन तेथून उठून जाण्याचा व बेगुमान धडक देण्याचा कॉ. डांग्यांचा चेव मराठी माणसाचा आहे. त्याचप्रमाणें पक्षीय असूनहि पक्षपतित्व मानसन्मानापायीं न स्वीकारणारा कॉ. डांग्यांचा रगेलपणाहि मराठी माणसाचा आहे ! त्यानीं स्वतःच सांगितल्याप्रमाणें ते प्रथम महाराष्ट्रीय व नंतर कम्युनिस्ट असून या सर्वांवर त्यांचे स्वतःचे असे व्यक्तिमत्व आरूढ आहे. अशा कर्तृत्वाचे, वक्तृत्वाचे व वैशिष्ट्याचे कॉ. डांगे यांना पक्षभिन्नता, मत-भिन्नता व तत्त्वभिन्नता कमीअधिक असली तरी महाराष्ट्राचा प्रेमादरच सतत लाभलेला आहे.

('**नवाकाळ**' अग्रलेख ता. ११ ऑक्टोबर १९५९.)

## अनुक्रम:


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १. | वाङ्मय आणि जनता | ९ ते ४६ |
| २. | अमळनेरच्या हत्याकांडाची चौकशी करा | ४७ ते ६० |
| ३. | लोकशाहीची पायमल्ली करणारे गुंडा बील | ६१ ते ६९ |
| ४. | काळा कायदा रद्द करा ! | ७० ते ८१ |
| ५. | माझी मराठी | ८२ ते ९४ |
| ६. | लोकशाही क्रांतीचा मार्ग | ९५ ते १०९ |
| ७. | शिवाजी–त्यांचा आणि आमचा | ११० ते १२३ |
| ८. | धर्मराजाचा रथ ढळला ! | १२४ ते १४० |
| ९. | आमची परंपरा | १४१ ते १५१ |
| १०. | समाजवाद-काँग्रेसचा आणि समितीचा ! | १५२ ते १६९ |
| ११. | बुद्धानें काय सांगितलें ! | १७० ते १७६ |
| १२. | मातृभूमीच्या रक्षणासाठीं पुढें व्हा ! | १७७ ते २११ |

# बारा भाषणें

# वाङ्मय आणि जनता

*अखिल भारतीय पुरोगामी लेखक परिषदेच्या चौथ्या अधिवेशनांत मुंबई येथे ता. २२ मे १९४३ रोजीं मराठी विभागाचे अध्यक्ष या नात्यानें कॉ. श्री. अ. डांगे यांनीं केलेल्या इंग्रजी भाषणाचा अनुवाद*

आपली परिषद आज अतिशय आणिबाणीच्या प्रसंगीं भरत आहे. सारी मानवजात एका अत्यंत विध्वंसक अशा जागतिक महायुद्धाच्या कचाटींत सांपडलेली आहे. आपण अग्राडीवर असलों काय, अगर पिछाडीकडे असलों काय, या प्रचंड जगड्व्याळ महायुद्धाचा परिणाम आपणापैकीं प्रत्येक पुरुषाच्या, स्त्रीच्या व मुलाच्या जीवनावर होतोच; तो टाळूं म्हटल्या टळत नाहीं. आपण लेखक आहोंत. आपल्या जनतेचे व मानवजातीचे विचार व भावना यांना स्फूर्ति देणें, त्यांना वळण लावणें, व त्यांचें चित्रण करणें हें आपलें काम आहे. अर्थात् आपण या युद्धाबद्दल बेफिकीर राहूंच शकत नाहीं. मानवी इतिहासाचें कोणतेंहि युग घ्या; कोणतेंहि राष्ट्र घ्या; यांतले जे जे कोणी लेखक व विचारवन्त आपापल्या जनतेच्या जीवनाशीं व भावनांशीं समरस झालेले होते, ते आपल्या राष्ट्रांना तारक अगर मारक होणाऱ्या अशा युद्धांपासून कधींहि अलग राहिलेले आढळत नाहींत. युद्धाच्या काळांत त्यांच्यापैकीं उत्तमोत्तम लेखक युद्धाबद्दल विचार करीत, युद्धांत भाग घेत, युद्धाबद्दल लिहीत, युद्धाचीं गीतें गात. आपल्या थोर पूर्वजांनीं हेंच केलें; आपले समकालीन आज हेंच करीत आहेत; आपणहि हेंच करणार.

आपली बहुसंख्य जनता व तिचे पुढारी—मग ते राजकारणाच्या

क्षेत्रांत असोत, अर्थशास्त्राच्या क्षेत्रांत असोत, अगर कलेच्या क्षेत्रांत असोत,- या युद्धांत तटस्थ नाहींत. आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं गेलीं पंधरा वर्षें आपल्याला फॅसिझम–नाझीझमविरोधी शिकवण दिली. नाझीझम ही इतिहासांतील एक अत्यंत दुष्ट घटना आहे; जागतिक साम्राज्यशाहीचें हें एक अत्यंत पाशवी, क्रूर, दहशतवादी व राक्षसी स्वरूप आहे; हा मानवजातीचा सर्वांत दुष्ट शत्रु आहे; अवघ्या प्रगतीचा व संस्कृतीचा हा वैरी आहे—असेंच त्यांनीं सांगितलें. अशा प्रकारें आपल्या राष्ट्रीय पुढाऱ्यांनीं आपल्याला आंतरराष्ट्रीय बंधुभावाची शिकवण दिली. म्हणूनच आपण चिनी जनतेला पाठिंबा दिला व जपानी फॅसिझमला विरोध केला; आपण स्पॅनिश जनतेला पाठिंबा दिला व इटलो-जर्मन फॅसिझमला विरोध केला; आणि आपण जागतिक जनतेच्या स्वातंत्र्याचें रक्षण करणाऱ्या महान् सोवियत यूनियनचा पाठपुरावा केला. आपण कोणत्या बाजूनें लढावयाचें हें हिंदी जनतेनें आधींच ठरवून ठेवलें आहे—अवघ्या जगाला गुलाम करूं पाहणाऱ्या व सगळ्या राष्ट्रीय संस्कृतींचा नाश करावयाला उद्युक्त झालेल्या फॅसिझमचा पराभव करून त्याचा नायनाट करावयाचा, असेंच हिंदी जनतेनें ठरविलें आहे. म्हणूनच आपल्या जगविख्यात कविवर्य टागोरांनीं जपानी फॅसिस्ट कविश्रुव नोगुची याच्यांशीं बंधुत्वाचें नातें ठेवण्याचें नाकारलें. असें असता आपण तटस्थ राहूं शकतों का? आपण फॅसिझमला विरोध करणार नाहीं हें कसें शक्य आहे? आपली सगळी पूर्वपरंपरा, आपला सर्वांत मोठा कवि, आपले सगळे राष्ट्रीय पुढारी—या सर्वांना आपण खोटे ठरवूं, हें कसें शक्य आहे?

आपण फॅसिझमच्या विरुद्ध आहोंत आणि या युद्धांत आपण त्याचा संपूर्ण नायनाट केल्याखेरीज राहणार नाहीं. आपण फॅसिझमविरोधी भूमिका घेतलेली आहे आणि जगांतील सर्व राष्ट्रांच्या व जगांतील त्यांच्या जनतेच्या स्वातंत्र्याला आपला पाठिंबा आहे.

आज अनेक वर्षें जनतेचें रक्षण, जागतिक स्वातंत्र्याचें रक्षण, व फॅसिझमला विरोध, सर्वांत जास्त प्रमाणावर व सर्वांत जास्त कसोशीनें कोणी केला? महान् सोवियत युनियननें; महान् लाल फौजेनें; दुर्दम्य चिनी लढवय्यांनीं; जे जे कोणीं लढतां लढतां मेले, पण नाझी दंडुक्यापुढें ज्यांनी मान वांकविली नाहीं, त्या सर्वांनीं; या देशोंदेशींच्या महान् लेखकांनीं व लोकांनीं; या

देशोदेशींच्या कादंबरीकारांनीं, नाटककारांनीं, कवींनीं व इतिहासकारानीं; त्याचप्रमाणें ज्यांनीं आपल्या स्वतःच्या देशांतल्या फॅसिस्ट गुंडांना विरोध केला अशा परागंदा झालेल्या, फांशी गेलेल्या व तुरुंगात पडलेल्या जर्मन, इटालियन व जपानी लेखकांनीं. म्हणून फॅसिझम–विरोधी आघाडीवरील या शूर वीरांचें अभिनंदन करणें हें आपलें पहिलें कर्तव्य आहे.

आपल्या सगळ्या देशी भाषांतील आधुनिक भारतीय वाङ्मयाला परकीय देशांकडून बरीचशी स्फूर्ति व मार्गदर्शन मिळालेलें आहे. ज्याच्यामधून आपले बहुतेक सगळे लेखक निर्माण झालेले आहेत, त्या आपल्या बुद्धिजीवी वर्गाला तुर्गेनेव, टॉल्स्टॉय, चेकोव, गोर्की व शोलोखोव यांच्या महान कलाकृति वाचल्या-बद्दल विनम्र अभिमान वाटतो व या कलावंतांचें वाङ्मय आत्मसात केल्यामुळें आपली उन्नति झाली असें वाटतें. असें जर आहे, तर मग ज्यांनीं टॉल्स्टॉयचें जन्मस्थान यास्नाया पोल्याना जाणूनबुजून उद्ध्वस्त केलें, त्या नीच हिटलरी जर्मन फौजांचा आपण धिक्कार नाहीं करणार ? या हिटलरी फौजांना आपण विरोध नाहीं करणार ? चेकोव, गोर्की व शोलोखोव यांचीं घरें व स्मारकचिन्हें उद्ध्वस्त करणाऱ्या या फॅसिस्टांविरुद्ध आपण लेखण्या नाहीं सरसावणार ? अर्थात् सरसावूं. या फॅसिस्ट फौजांचा नायनाट करणाऱ्या लाल फौजेलाच आपला पाठिंबा आहे. या विश्वसंहारक फॅसिस्ट टोळधाडीचा नाश करण्यासाठीं लाल फौजेला स्फूर्ति देणारे शोलोखोव, पोल्याकोव प्रभृति जे असंख्य लेखक आहेत, त्यांच्या खांद्याला खांदा भिडवून आपण उभे आहोंत. हिटलरी जर्मनींतून हद्दपार झालेले फ्रेडरिक मॅन्न, टोलर, फॉईख्टवॉंग्लर, झ्वाइग, या लेखकांशीं सहभागी व्हायला कुणाला अभिमान नाहीं वाटणार ? रोमां रोलां, स्टाइनबेक व पर्ल बक यांच्या बरोबरीनें फॅसिझमला विरोध करण्यांत व जागतिक जनतेच्या स्वातंत्र्यविजयाला पाठिंबा देण्यांत कुणाला अभिमान नाहीं वाटणार ? अवघ्या जगांतल्या सगळ्या जनता आपली पिळणूक करणाऱ्यांविरुद्ध व आपल्याला गुलाम करणाऱ्यांविरुद्ध एकजुटीनें उठाव करून राहिलेल्या आहेत. अर्थात् आपापल्या जनतेशी समरस झालेले जगांतले सगळे लेखक आपापल्या राष्ट्रीय भाषांच्या व संस्कृतींच्या द्वारा एकाच आंतरराष्ट्रीय बंधुभावानें प्रेरित झाले पाहिजेत, याच भावनेनें काम करीत राहिले पाहिजेत. ते निरनिराळ्या भाषांतून बोलत असले तरी त्यांचा विचार एकच, त्यांची भावना एकच—फॅसिझमचा नायनाट,

गुलामगिरीचा नाश, स्वातंत्र्याचा विजय, प्रत्येक देशांतील जनतेचा स्वातंत्र्य उदय !

या फॅसिझमविरोधी लढ्याशीं बंधुभावाची हातमिळवणी करण्यासाठीं आपला हात पुढें करतांना आपण आपल्या देशांतील परिस्थितीकडे डोळेझांक करीत नाहीं. परकीय नोकरशाहीनें आपल्याला गुलामगिरींत डांबून ठेविलें आहे, फॅसिस्ट स्वारीवाल्यांविरुद्ध हिंदुस्थानच्या जबरदस्त शक्तीचा उपयोग पूर्णपणें करावयाला नोकरशाही नकार देते, या वस्तुस्थितीकडे आम्ही डोळेझांक करीत नाहीं. नोकरशाहीला अशी भीति वाटते कीं फॅसिझमचा मुकाबला करण्यासाठीं तयार केलेली हिंदुस्थानची ही शक्ति नुसता येवढा मुकाबला करूनच थांबणार नाहीं. वसाहतींतल्या जनतांवरील आपली पकड सुटत आहे असें वाटूं लागल्यामुळें नोकरशाही पिसाळली आहे व ती जनतेवर प्रहार करीत आहे, जनतेच्या पुढाऱ्यांना तुरुंगांत डांबून ठेवीत आहे. हिंदुस्थानच्या प्रचंड आर्थिक कारभाराची व्यवस्था करावयाची ताकद तिच्या अंगांत नाहीं असें तिचें तिलाच वाटूं लागलें आहे. देशांत अन्न आहे, पण तें भुकेलेल्या जनतेपर्यंत पोंचत नाहीं; देशांत कापड आहे, पण तें निर्वस्त्र व थंडीनें कुडकुडणाऱ्या जनतेची लाज झांकत नाहीं. अन्नचोर व नफेबाज व्यापारी व नालायक नोकरशाही यांनीं आमच्या देशाला दुष्काळाची अवकळा आणली आहे. त्यामुळें तो फॅसिस्ट राक्षसाच्या सहज भक्ष्यस्थानीं पडावा अशी परिस्थिति निर्माण झालेली आहे.

अशा या परिस्थितीनें अनेक कवींचीं हृदयें बधिर झालीं आहेत, अनेक प्रतिभांचे झरे गोठून गेले आहेत. ज्या लेखकांनीं जनतेला वाचा फोडावयाचें कार्य मिशन म्हणून पतकरलें पाहिजे, ज्यांनीं जनतेला राष्ट्ररक्षणासाठीं व राष्ट्रीय स्वातंत्र्यासाठीं स्फूर्ति द्यावयाला पाहिजे, ते स्वतःच उदासीन, निराश व असहाय होऊन बसले आहेत. 'आम्हांला कांहींच करूं देत नाहींत, मग आम्ही तरी जनतेसाठीं, स्वातंत्र्यासाठीं राष्ट्ररक्षणासाठीं काय करूं शकणार ?—' असा सवाल हे लेखक विचारतात आणि गूढ रडगाण्यांत अगर वास्तवतेकडे पाठ फिरविणाऱ्या कादंबऱ्यांच्या कर्दमांत स्वतःला बुडवून घेतात.

या तडफडणाऱ्या जीवांना आपण असें विचारलें पाहिजे कीं तुम्ही जनतेच्या बाजूचे आहांत कीं जनतेच्या विरुद्ध आहांत ? आज आपला प्रचंड बहुजनसमाज जीवनाला आवश्यक अशा वस्तूंच्या दुष्काळानें ग्रासला गेलेला

आहे. आपण जर जनतेच्या बाजूचे असूं व तिच्याविरुद्ध नसूं, तर जनतेच्या या गांजणुकीला आपण कलेच्या द्वारा वाचा फोडली पाहिजे व कलेच्या द्वारा आपण जनतेची संघटना केली पाहिजे. नोकरशाही अनुकूल असो वा प्रतिकूल असो, आपली जनता आपण उपाशी मरूं देणार नाहीं. उपासमारीचा प्रतिकार करावयाची स्फूर्ति जनतेमध्यें निर्माण करणें, ही कामगिरी कलावंताची आहे व त्यानें ती पार पाडली पाहिजे.

या चिंतातुर जीवांना आपण सांगूं कीं तुम्ही जर असेच हात बांधून तटस्थ राहणार असाल, सोवियत युनियनच्या नेतृत्वाखालीं लढणाऱ्या संयुक्त राष्ट्रांच्या विजयाशीं आपल्याला कांहींएक कर्तव्य नाहीं असें म्हणत स्वस्थ बसणार असाल, तर तुमच्या राष्ट्राला गुलाम करणाऱ्या साम्राज्यशाहीच्या तावडींतून राष्ट्र स्वतंत्र करावयाचा मार्ग अशा वागण्यानें मोकळा तर होणार नाहींच; उलट अशा वागण्यानें सध्यांच्या गुलामगिरीपेक्षांहि जास्त भीषण गुलामगिरी आपल्या देशावर लादून घ्यावयाला तुम्ही मदत करीत आहांत. अशा वागण्यानें तुम्हीं स्वतःचा नाश करावयाला मदत करीत आहांत इतकेंच नव्हे, तर तुमच्याबरोबर अवघ्या जगांतील जनतांचा, अवघ्या संस्कृतीचा घात करावयाला हातभार लावीत आहांत. हिन्दुस्थानचें संरक्षण करणें हें आपलें काम आहे. ह्या किंवा त्या सरकारला वांचविण्यासाठीं नव्हे तर आपला स्वतःचा बचाव करण्यासाठीं, आपल्या जनतेचें संरक्षण करण्यासाठीं आणि स्वातंत्र्य मिळविण्यासाठीं, आपण हिंदुस्थानचें संरक्षण केलें पाहिजे. म्हणून राष्ट्ररक्षणासाठीं, राष्ट्रीय सरकार मिळविण्यासाठीं, तुरुंगांत डांबून पडलेल्या हजारों देशभक्तांना सोडविण्यासाठीं, दुष्काळाला व पंचमदळयांच्या मोडतोडीला तोंड देण्यासाठीं—या सगळ्या गोष्टी करण्यासाठीं आपल्या कलेनें जनतेला स्फूर्ति देऊन तिची एकजूट केली पाहिजे. जनतेंतल्या एका गटाला दुसऱ्याविरुद्ध चिथावणें, जातीय व धार्मिक गटांच्या बुरसट मूल्यांचें नांव पुढें करून जनतेंत बेदिली माजविणें, हें उदात्त कलेचें कार्य होऊंच शकत नाहीं. जेथें प्रत्येक राष्ट्र-गटाला पूर्ण स्वातंत्र्य आहे व आपखुशीनें न पतकरलेल्या व लोकशाहीच्या तत्वाला धरून नसलेल्या एकूणएक निर्बंधांपासून पूर्ण मोकळीक आहे, अशी पार्श्वभूमि असेल तरच तींत; संस्कृतीचा फुलोरा निर्माण व्हावयाला वाव मिळतो. कलावंत हा वस्तुतः स्वतःच्या विचारप्रदर्शनाच्या बाबतींत कमालीच्या स्वयंनिर्णयाचा भोक्ता असतो.

आपल्या जनतेची भाषा, संस्कृति, विचारसरणी व भावना यांचा प्रतिनिधी या नात्याने आपल्या कलामय व्यक्तित्वाचा विकास व्हावयाला पूर्ण वाव मिळाला पाहिजे अशी कलावंताची मागणी असते. मराठा, कर्नाटकी, बंगाली, या नात्याने आपल्या कलाव्यक्तित्वाचा विकास व्हावयाला निर्बंधरहित स्वातंत्र्य पाहिजे असा त्याचा आग्रह असतो. अर्थात् हाच कलावंत इतरांवर आपली संस्कृति जबरदस्तीनें लादूं इच्छील अशी कल्पनासुद्धां करतां येणें शक्य नाहीं. **जबरदस्तीनें अखंड ठेवलेला अखंड हिंदुस्तान नव्हे— तर अनेक स्वायत्त व स्वतंत्र राष्ट्रगटांनीं स्वयंस्फूर्तीनें एकजूट करून एकसंघ केलेला संयुक्त हिंदुस्थान हाच जनतेच्या कलावंताचा खरा आदर्श असला पाहिजे.**

हें ऐकून माझ्या अनेक कलावंत मित्रांच्या डोक्यांत कितीतरी प्रश्न उभे राहिलेले मला दिसत आहेत. कलेचा उद्देश काय या सगळ्या गोष्टी करणें हा असतो ? आम्ही कलावंतांनीं काय राजकीय कार्यक्रमांच्या झगड्यासाठीं शब्दांची कवाईत करावयाची ? मतप्रचार वा पार्टीबाजीसाठीं उभारलेल्या शब्दांची कवाईत करणारांचा आम्ही तांडा कीं काय ? कला ही प्रचारासाठीं असते का निर्भेळ आनंदासाठीं ? कला ही शाश्वत सत्याचा व नीतीचा आविष्कार करण्यासाठीं का तेल्यातांबोळ्यांच्या क्षणिक मूल्यांची सेवा करण्यासाठीं ? टागोर अगर शेली यांची सुंदर प्रतिभा पार्टी-प्रोग्रामच्या पोलादी चौकटींत कोंबून बसवायसाठीं ती तासायची खटपट करण्यापैकींच नव्हे का हा प्रकार ? कला म्हणजे कला आहे ! ती कलेसाठींच असते ! वगैरे वगैरे. या प्रश्नांवर वादांची रणें माजलेलीं आहेत व माजत आहेत. हे वाद कधीं संपायचेच नाहींत. पण वाद चाललेले असतांनाच कवि, कादंबरीकार, नाटककार, संगीततज्ञ, चित्रकार, इतिहासकार, आपापल्या कलाकृती निर्माण करीतच आहेत, आणि जनतेची निर्मळ उपजत रसिकता या कलाकृतींवर आपलें अनुकूल-प्रतिकूल मत देतच आहे. जनता कारणें देत बसत नाहीं—ती सरळ एकेका कलावंताला उचलून तरी धरते, नाहीं तर एकेकाला तुच्छतेनें व तिरस्कारानें भिरकावून तरी देते. शरदबाबूंची ‘ बिंदूर छेले ’ ही गोष्ट कुठल्या तरी आडबाजूच्या मासिकांत मुकाट्यानें प्रसिद्ध झाली तरी सुद्धां तिनें बंगाली वाङ्मयांत खळबळ उडवून दिली; ही घटना घडून येण्यासाठीं जनतेला कलेच्या

कार्याबद्दल कसल्याहि चर्चेची जरूरी लागली का ? रविबाबूंनीं काव्यरचना केली तेव्हां हा आपला कवि आहे याची ओळख पटवून घ्यायला बंगालमधील गांजलेल्या व पिळल्या जाणाऱ्या जनतेला कलाविषय हा 'सत्यम् शिवम् सुंदरम्' असला पाहिजे असे सिद्धांत आडवे आले नाहींत.

मराठींतली मध्यमवर्गीय मानवता—आधुनिक पति-पत्नी संबंधाच्या तिच्या नव्या भावना—सासू—सासऱ्यांच्या सत्तेवर आधारलेल्या जुन्या सरंजामी कौटुंबिक पाशांतून व कोंडमाऱ्यांतून सुटका करून घेण्यासाठीं धडपड करीत राहिलेली ही मानवता—हिनें हरिभाऊ आपटे यांच्या "पण लक्ष्यांत कोण घेतो ?" या कादंबरीला एकदम मान्यता दिली. हेंच "सत्य", हीच "वास्तवता", हीच आपल्या हिरमोड झालेल्या पण युयुत्सु हृदयाचा उकल करणारी कथा—या दृष्टीनें या कादंबरीला आपल्या मध्यम वर्गानें एकदम मान्यता दिली. पीडित स्त्री-हृद्याचा आविष्कार इतक्या उत्कृष्ट रीतीनें मराठी वाङ्मयांत पुन्हां कधींहि झालेला आढळत नाहीं. अशा रीतीनें जी उत्कृष्ट कलाकृति पीडित व पिळल्या जाणाऱ्यांशीं समरस होते, जी अन्यायाशीं व रानटी प्रवृत्तीशीं दोन हात करते, आणि अशा प्रकारें जी "वास्तवा"चें चित्रण करून जुन्या नष्टप्राय झालेल्या मूल्यांच्या जागीं नव्या मूल्यांची स्थापना करते, ती कलाकृति लपून राहूं शकत नाहीं—तिला मान्यता मिळाल्या-खेरीज राहात नाहीं.

पण जीवनासंबंधींच्या जुन्या व नव्या मूल्यांमधील फरक कसा ओळखावयाचा ? त्यांची व्याख्या कशी करावयाची ? प्रगतिशील व प्रतिगामी, सत्य व असत्य-यांतला फरक कलेच्या क्षेत्रांत कसा ओळखावयाचा ? या बाबतींत पहिली गोष्ट ही कीं जीवनांत अनादि, अचल, अशीं मूल्यें मुळींच नसतात; कारण खुद्द जीवन हेंच अनादि अचल नसतें. आजपावेतों मानवी जीवनानें जर सर्वांत मोठा ध्यास कशाचा घेतलेला असेल तर तो भौतिक वस्तू मिळविण्यासाठीं झगडण्याचा; जीवन शक्य करण्यासाठीं—जीवन जगवून तें वाढीस लावण्यासाठीं—झगडण्याचा. या भौतिक वस्तू, हीं भौतिक मूल्यें, निर्माण करायचीं व वांटून घ्यायचीं यासाठीं युगांयुगांतील स्त्री-पुरुषांनी एकमेकांशीं सामाजिक नातीं जोडलीं; आणि तीं अशा रीतीनें जोडलीं कीं जेणें करून आपल्या भौतिक सुखसोईची वाढ व्हावयाला मदत व्हावी. या सामाजिक नात्यांतूनच दरेक युगामध्यें स्त्री-पुरुषांच्या

नैतिक, नीतिशास्त्रीय, भावनात्मक स्वभावविशेषांची जोपासना झाली. प्राथमिक गण समाज, गुलाम समाज, सरंजामी समाज, भांडवलशाही समाज व व सोवियत समाज—असे समाज स्त्री-पुरुषांनीं मानवी इतिहासाच्या वेगवेगळ्या युगांत स्थापन केले. या समाजांतील सामाजिक नातीं—वर्गीय नातीं—हीं आपापल्यापरी वेगवेगळ्या नैतिक व भावनात्मक स्वभावविशेषांनीं युक्त अशीं आहेत. जेव्हां एकंदर समाजाच्या भौतिक सुखाची वाढ प्रचलित सामाजिक नात्यांपायीं अडून राहते—मग हीं नातीं गुलाम व मालक अशीं असोत, भूदास व जमीनदार अशीं असोत, कामगार व कारखानदार अशीं असोत—आणि जेव्हां दलित व पिळली जाणारी जनता या अडचणींतून बाहेर पडायचा मार्ग शोधूं लागते, तेव्हां ती नवीं मूल्यें, नव्या भावना, नवीं सत्यें, नवी वास्तवता, निर्माण करते. जुन्या नात्यांना उचलून धरणारे हे प्रतिगामी ठरतात; बदललेल्या अगर बदलणाऱ्या नात्यांचे पवाडे गाणारे हे प्रगतिशील—पुरोगामी—ठरतात. सामाजिक इतिहासाचा हा एकच एक शास्त्रीय सिद्धांत आहे; खरें जीवन-दर्शन तें हेंच, आणि म्हणून खऱ्या कलेचें मोजमाप करायचा मानदंड हा एकच.

मात्र त्या त्या युगांतल्या कलाकृतीनें आपापल्या काळांतल्या दलितांचे व पिळल्या जाणाऱ्यांचे राजकीय व आर्थिक कार्यक्रमांचे जाहिरनामे फडकावले तरच ती कलाकृति प्रगतिशील व त्या युगाची खरी प्रातिनिधिक होऊं शकते असा याचा अर्थ नव्हे. जी कलाकृति आपापल्या युगांतल्या ‘सत्याशीं’, ‘वास्तवतेशीं’, ‘मानवतेशीं’, खरोखरी समरस होते, ती आपला आविष्कार करण्यासाठी आपली स्वतःची स्वतंत्र रीत शोधून काढते, आपापल्या परी स्वतंत्र रूप धारण करते, आपली कामगिरी करण्यासाठीं आपलें स्वतःचें एक वेगळेंच जग निर्माण करते. जी कलाकृति अशी समरस होत नाहीं, जीवनाच्या वास्तवतेपासून स्वतःची फारकत करून घेते, तिला उतरती कळा लागते, ती पोकळ ठरते.

आमचे एक मराठी कवि माधवराव पटवर्धन यांनीं एका मराठी कवि-संमेलनप्रसंगीं ( १६-९-१९३३ ) केलेल्या भाषणांत अशी तक्रार केली की, लोक आधुनिक मराठी कवींचें कौतुक करीत नाहींत, आणि म्हणून कवितेची भरभराट होत नाहीं. लोकांविरुद्ध आपल्या बहुतेक कवींची हीच सर्वसाधारण

तक्रार आहे. पण याचें कारण मात्र त्यांना सांपडलेलें नाहीं. आपल्यांतील जुलमानें गांजलेल्या वर्गांच्या भावनामय प्रस्फोटांशीं आधुनिक मराठी कविता समरस झाली नाहीं. आपले कवि इंग्रजी कवितेकडे बोट दाखवून सांगतात कीं, इंग्रजी कविता भरभराटीला आली, कारण इंग्रज कवींना जनतेनें आश्रय दिला. पण हें सांगतांना ते एक गोष्ट सांगायला विसरतात ती ही कीं, इंग्रज कवींनीं इंग्रज जनतेची बाजू घेतली म्हणून इंग्रज जनतेनें त्यांना आश्रय दिला. शेलीनें फ्रेंच राज्य-क्रांतीच्या ध्येयासाठीं व सन १८१२ च्या इंग्लंडमधील दुष्काळपीडित कामगारांसाठीं गर्जना चालविली होती. तसाच रंगेल लंगड्या लॉर्ड बायरननें आपल्या स्वतःच्या वर्गाचा धिःकार केला आणि दुष्काळांत आपल्या मालकांशीं लढून राहिलेल्या नॉटिंग हॅमच्या कामगारांची बाजू हिरीरीनें घेतली. इकडे आपल्या जनतेनें चालविलेल्या लढ्यासंबंधांत आमच्या कवींची भूमिका कोणती आहे बरें? आपल्या शौर्यशाली लढ्यांच्या बाबतींत आमच्या बुद्धिजीवी वर्गांतले मराठी कवि सपशेल कोरडे ठणठणीत राहिले. आतां ही गोष्ट खरी कीं, इंग्रजांनीं आपल्याला जिंकल्यानंतर आपल्या देशावर जी अवकळा पसरली तिची जाणीव यांतल्या कांहीं कवींना झाली; अगदींच नाहीं असें नाहीं. पण शेतांतून व कारखान्यांतून जनतेचे जे नवे उठाव उफाळले त्यांच्याकडे मात्र या कवींनीं अजीबात लक्ष दिले नाहीं. यांच्यापैकीं बहुतेकांनीं गडकऱ्यांच्या "ओसाड आडांतील एक फुलाची" भूमिका पतकरली आहे. अशा या कवींच्या हिरमुसल्या व पळपुट्या मनोवृत्तीचें कौतुक करायला जनता कबूल होत नाहीं यांत नवल कसचें?

आपल्या दलित जनतेनें आपल्या कैवाऱ्यांशीं कधींहि बेइमानी केलेली नाहीं; जनतेच्या हृदयाचा व भवितव्याचा आविष्कार करणाऱ्या कलावंतांना आपल्या दलीत जनतेनें कधींहि डावललेलें नाहीं. या बाबतींत मराठी साहित्याची परंपरा फार थोर आहे. भावी काळांतील मार्गदर्शनासाठीं स्फूर्ति मिळावी म्हणून या भूतकाळाकडे आपण जरा नजर फिरवूं.

## मराठी साहित्याची बंडखोर परंपरा

आपल्या भाषेचा व वाङ्मयाचा मूळ जन्मच मुळीं दलित जनतेनें आपल्या पिळवणुकीविरुद्ध उभारलेल्या बंडांतून झालेला आहे. सरंजामी भूदास-पद्धति, तिचा ब्राह्मणी कायदा व तिची ब्राह्मणी विचारसरणी, यांचीं मारक

लुटारू बंधनें तोडणाऱ्या लोकांच्या हातूनच आपल्या भाषेंतलें पहिलें वाङ्मय जन्माला आलें. धार्मिक व्रतें व कर्मकांड यांच्या रूपानें दलित जनतेवर असह्य निर्बंधांची व करांची ओझीं लादणाऱ्या जमीनदारांनीं व राजांनीं शेंकडों लोकांना बंडाचा उठाव करण्यास भाग पाडलें. त्यांच्या बंडाचा वैचारिक अविष्कार राज्यकर्त्या लुटारूंचा कायदा न मानणाऱ्या ' पाखंडी पंथांच्या ' स्थापनेचें रूप धारण करून राहिला. त्यांच्यावर मारक हल्ले झाले. कत्तली झाल्या, लढे झाले; पण जनता हटली नाहीं; तिनें आपल्या आकांक्षा जाहीर केल्या; भविष्यकाळाचीं दिव्य दृश्यें ती रंगवीत राहिली; जो जुना जमाना नष्ट झाला पाहिजे त्यावर तिनें टीकेची झोड चालू ठेवली; जो नवा जमाना यायला पाहिजे, त्याचें वर्णन तिनें चालू ठेवलें. राज्यसंस्थेनें व लुटारू वर्गांनीं या बंडखोर पंथांचा छळ चालविला. चालू वर्गीय चौकटींतून फुटून निघालेल्या या बंडखोर पंथांना असें वाटत होतें कीं आपण एक नवा पंथ स्थापन केला कीं तेवढ्यानेच आमच्यावरील जुलमाचा निरास होईल. या पंथांमुळें तात्पुरतें तेवढ्यापुरतें दुःख हलकें होत असलें तरी सर्वस्वीं नव्या समाजरचनेची भौतिक पार्श्वभूमि अजून निर्माण झालेली नव्हती. या बंडखोरांनीं आपले विचार महानुभाव, नाथ, लिंगायत इत्यादि पंथांच्या वाङ्मयांतून व्यक्त केले. इसवी सनाच्या आठव्या शतकापासूनची हिंदु सरंजामी जुलमशाही व तिच्याविरुद्ध जनतेनें केलेलें बंड यांतूनच अव्वल मराठी वाङ्मयाचा उगम झाला. त्यावेळच्या सरंजामी ब्राह्मणशाहीचे रक्तशोषक पुरस्कर्ते व त्यांची राज्यसंस्था यांनीं त्यावेळीं ' चतुर्वर्ग-चिंतामणि ' सारखे प्रचंड विधिग्रंथ तयार करायचें काम चालविलें होतें. या ग्रंथांत हिंदु गृहस्थ, हिंदु शेतकरी, जमीनदार, इत्यादींनीं करायच्या २००० व्रतांचें वर्णन आहे. वर्षाच्या ३६५ दिवसांवर या दोन हजार व्रतांच्या निमित्तानें दक्षिणादानाचें व ब्राह्मणभोजनाचें ओझें चढविण्यांत आलें. हीं भोजनें म्हणजे परभृत वर्गाची चैनबाजी; दक्षिणा म्हणजे त्यांच्या दलालांची फी व पिळल्या जाणाऱ्या लोकांवर कराची लादणूक. आतां हा ' चतुर्वर्ग-चिंतामणि ' विस्मृतीच्या उदरांत गडप झाला आहे. पण या परिस्थितींतच ज्ञानेश्वरानें जनतेच्या हक्कांसाठीं लढा केला; पिळणाऱ्यांच्या व्रतबद्ध मार्गानें न जातां जनतेनें स्वतःच्या जोरावर स्वतंत्रपणें मोक्षाचा मार्ग शोधण्याचा जनतेचा हक्क प्रस्थापित करण्यासाठीं ज्ञानेश्वरानें लढा केला. दलित मानवतेचा सर्वांत मोठा भाग म्हणजे स्त्रिया, शूद्र व वैश्य यांना ज्या परमेश्वरी

स्वर्गांत श्रीकृष्णाच्या वचनानुसार स्वातंत्र्य मिळणार होतें त्या स्वर्गाची किल्ली ज्ञानेश्वरानें लोकांना स्वतःच्या भाषेंतून, म्हणजे मराठींतून, स्वाधीन करून दिली. याबद्दल ज्ञानदेवाला छळ सोसावा लागला. पण त्याची ज्ञानेश्वरी हा युगप्रवर्तक ग्रंथ ठरला, जनतेच्या हातीं आलेला बहुमोल ठेवा ठरला. कारण ज्यावेळीं आइतखाऊ लुटारू २००० व्रतांचीं नुसतीं भोजनें झोडीत होते, त्यावेळीं ज्ञानेश्वरीनें दलितांच्या स्वातंत्र्यलालसेचा अविष्कार केला. **अशा प्रकारें दलितांनीं उभारलेल्या बंडांतून आमच्या वाङ्मयाचा जन्म झाला.**

अशा प्रकारच्या अंतर्गत वर्गविग्रहांनीं व जातिभेदाच्या भेगांनीं चिराळलेला असा तत्कालीन हिंदु समाज होता. आणि या समाजावर मुसलमानी स्वारीचा हल्ला झाला. हिंदु समाजांतील अवनत होत चाललेली धर्मसत्ता अंतर्गत बंडखोरींतून सुधारून निघायच्या अगोदरच इस्लाममताच्या अत्यंत सुसंघटित लष्करी लोकशाहीनें तिला भिरकावून दिलें. जनतेचा कैवार घेऊन राहिलेल्या मराठी लेखकांपुढें आतां या परकीय स्वारीला तोंड देण्याचा नवा प्रश्न उभा राहिला. थोड्याच वर्षांच्या अवधींत हिंदु सरदारांनीं मुसलमानी राज्यसंस्थेशीं समेट केला. स्वारी करून आलेल्या मूठभर मुसलमानांना हिंदुस्थानसारख्या अफाट देशाचा कारभार स्वतःच्या हिंमतीवर उरकणें शक्यच नव्हतें; शिवाय हिंदुस्थानच्या मानानें मागासलेल्या अर्थव्यवस्थेंत हे मुसलमान वाढलेले होते. म्हणून हिंदुस्थानच्या विशिष्ट परिस्थितींत मुसलमानी राज्यसंस्थेनें लवकरच आपल्या सत्तेंत हिंदूंना वांटा दिला. हिंदु समाजानें लष्करी पुढारीपण व लढाया करण्याचें काम एका क्षत्रिय जातीकडे राखून ठेवलेलें होतें; आतां हीच जात जहागिरी व मनसबदाऱ्यांत वांटणी मिळवायसाठीं इस्लामी राज्यसंस्थेला जाऊन मिळाली. कालांतरानें खेड्यांतल्या व शहरांतल्या दलित जनतेला आपली पिळणूक करणारे अमुक जातीचे व अमुक धर्माचे असा फरक करतांच येईनासा झाला. जनतेविरुद्ध ब्राह्मणांनीं, क्षत्रियांनीं व मुसलमान सरदारांनी एकजूट केली व या सर्वांनींच तिला भूदास करून तिची असंख्य रीतींनीं पिळणूक चालविली. इस्लाम पंथाला प्रथम प्रथम ज्या काय चांगल्या गोष्टी करतां आल्या तेवढ्या करून संपल्या. इस्लामच्या उदयकाळीं त्यांच्या तत्त्व प्रचारानें अगदीं आरंभीं सावकारीविरुद्ध धर्मयुद्ध केलें. त्यांनीं जमिनीवरील खासगी मालकीहक्काच्या नीच पद्धतीला विरोध केला. त्यांची जमाबंदीची पद्धत साधी

व झेंपण्याजोगी होती. युद्धांत मिळालेल्या मिळकतींतून विधवांसाठीं, अनाथांसाठीं व शिक्षणासाठीं ते पहिल्या प्रथम तरतूद करीत असत. ते लोकशाहीचे पुरस्कर्ते असल्यामुळें सरकारी अधिकारी अगर मालदार लोक यांना शिरजोर होऊं द्यायला त्यांचा विरोध होता. सुरवातीसुरवातीला तरी सर्व मुसलमानांमध्यें समतेची सखोल भावना आपापसांत खरोखरीच नांदत होती. या सर्व गोष्टींचा ठळक ठसा हिंदुसमाजावर उमटलाच. पण पुढें इस्लामचा प्रसार साऱ्या जगभर जेव्हां झाला तेव्हां सरंजामशाहीच्या सर्व दोषांनीं इस्लामला पछाडलें. इस्लामची प्रगतिशील भूमिका संपली. इस्लामची लोकशाही व समता ही निव्वळ नांवापुरतीं शिल्लक राहिलीं.

## संतकवितेची भूमिका

या परिस्थितीला तोंड देत देत संतकवींनीं दोनशें वर्षेंपर्यंत आपलें लेखन चालविलें. वाळींत टाकलेले ब्राह्मण, कुंभार, कोष्टी, दलित स्त्रिया, शिंपी, चांभार, धंद्यांत बुडालेले व्यापारी, या सर्वांनीं हिंदुस्थानच्या सगळ्या कोनाकोपऱ्यांतून पिळणुकीविरुद्ध व जुल्माविरुद्ध एका आवाजानें कंठशोष चालविला. या लेखकांत मुसलमानहि होते व हिंदुहि होते. कबीर व मृत्युंजय (हें नांव एका मुसलमान कवीचें आहे), एकनाथ व तुकाराम, जनाबाई व चांगदेव, इत्यादि कवींची आठवण तुम्हांला आहेच. इस्लामी मंडळींतील वैचारिक बंडखोरी सूफी कवितेच्या रूपानें प्रगट झाली; आणि हिंदूंमधील वैचारिक बंडखोरी भागवत व वैष्णव कवितेच्या रूपानें प्रगट झाली. इकडे बंगालचे खान हिंदु सरदार वर्गाबरोबरचा आपला समेट दृढ करण्यासाठीं पंडित मंडळीकडून रामायणाचें व महाभारताचें बंगाली भाषांतर करून घेण्यांत गुंतलेले होते. आणि याच काळांत छळ सोसून राहिलेले 'सहजीवीपंथी' लोक आपल्या हृदयाची व्यथा व आपली निर्मळ प्रेमभावना चंडिदासापासून चैतन्यापर्यंत अनेक कवींच्या कवितेंतून व्यक्त करीत होते. मराठींतले भागवतपंथी कवि देखील केवळ ईशस्तवन, धर्मसुधारणा अगर आपली वैयक्तिक रडगाणीं येवढ्याच विषयांवर काव्यरचना करीत होते अशांतला मुळींच प्रकार नव्हता. भागवत कवितेचा प्रचंड लोंढा म्हणजे तत्कालीन बहुजन समाजाच्या तक्रारींचा व मागण्यांचा महापूर होता. व्यापारी, सावकार, राजेलोक, सरदार व जमीनदार यांच्या लढाया; लुटारू

करवसुली व भूदास पद्धतीची गुलामगिरी; या सगळ्या गोष्टींचा परिणाम ग्राम-संस्थेवर होऊन तिला भेगा पडत होत्या व त्यामुळें त्यावेळच्या समाजाचें जीवन अस्थिर होऊन राहिलें होतें. या काळांतली सगळी कविता व सगळं वाङ्मय मुख्यतः दोन मागण्यांवर केंद्रित झालेलें होतें. देशाच्या आर्थिक जीवनावर ओढवलेलें भयंकर अरिष्ट निवारणें भागच होतें. या कवींच्या मतें चातुर्वर्ण्याच्या सरंजामी चौकटीला दुसरा पर्याय उपलब्धच नव्हता. कारण वेगळ्या प्रकारचे सामाजिक वर्ग असलेली दुसरी कोणतीच आर्थिक पद्धति अजून निर्माणच झालेली नव्हती. म्हणून चातुर्वर्ण्यांतले जे उत्तमोत्तम गुण लुप्त झालेले होते त्यांचें पुनरुज्जीवन झालें पाहिजे अशी या कवींनीं मागणी केली. त्या काळांत या कवींनीं सामाजिक क्रांति अगर जातींचा उच्छेद वगैरेंचा पुरस्कार केला अशी समजूत करून घेणें चुकीचें आहे. त्यांचें मागणें येवढेंच होतें कीं, 'भागवत धर्मात सांगितल्याप्रमाणें योग्य प्रकारचें चातुर्वर्ण्य' चालू करावें आणि दुसरें म्हणजे हें कार्य पार पाडण्यासाठीं व अरिष्ट निवारण्यासाठीं परमेश्वरानें अवतार घ्यावा. भागवती चातुर्वर्ण्य व अवताराची मागणी म्हणजेच राजकीय कृतीच्या योगानें आर्थिक पुनरुज्जीवनाचें कार्य पार पाडण्याचा कार्यक्रम.

या संत कवींनीं बहुजन समाजाला काय सांगितलें? सरकारनें जेव्हां धान्य दाबून ठेवलें व उपाशी जनतेला धान्य देण्यांत कुचराई केली तेव्हां दामाजीनें स्वतःच्या जबाबदारीवर सरकारी धान्याचें कोठार जनतेला खुलें करून दिलें. सरकारनें जेव्हां या धान्याची भरपाई करून मागितली तेव्हां हिंदु समाजांतल्या सर्वांत जास्त दलित अशा महार जातींतला एक महार दामाजीच्या मदतीला धांवला व त्यानें हे पैसे भरले. संतकवींनीं या महाराला आपल्या भागवत पंथांतल्या भगवान श्रीकृष्णाचा अवतार ठरविला; कारण श्रीकृष्ण हा सात्वत–वृष्णींच्या गण–लोकशाहींतला असल्यामुळे असल्या गोष्टी करण्यास तोच तेवढा समर्थ होता. जनीजनार्दन हा विजापूर दरबारचा नोकर; यानेंहि दुष्काळग्रस्त जनतेला धान्य वांटून दिलें व याबद्दल त्याला देहान्ताच्या शिक्षेचा धाक घालण्यांत आला होता. दासोपंत हा स्वतःच दुष्काळच्या तावडींत सांपडला होता; त्याला आपल्या जमिनीचा शेतसारा भरतां येईना; त्याला अटक करून धर्मांतराचा धाक घालण्यांत आला; मग त्यानें आपली कशीबशी सुटका करून घेतली व लेखनव्यवसाय आरंभला. अशा प्रकारचे शेकडों लेखक व कवि

जनतेच्या भावनांशीं समरस झाले, त्यांनीं जनतेच्या बरोबरीनें हाल सोसले आणि म्हणून त्यांनीं जनतेबद्दलच काव्यरचना व ग्रंथरचना केली. त्यांच्या व जनतेच्या मतें परमेश्वर अवतार घेऊन जुन्या सडलेल्या राज्यसंस्थेचा नायनाट करणार होता व तिच्या जागीं नव्या उदारमतवादी राज्यसंस्थेची प्रतिष्ठापना करणार होता.

त्यांच्या मतें खरें चातुर्वर्ण्य म्हणजे अशी समाजरचना कीं जीमध्यें गांवची बहुतेक सगळी पैदास गांवच्या स्वतःच्याच उपयोगासाठीं लावली जात आहे; या पैदाशीची देवघेव करणाऱ्या वेगवेगळ्या जातींमध्यें ठरावीक नियमांनुसार केली जात आहे; या पैदाशीचा सहावा हिस्सा कराच्या रूपानें राज्यसंस्थेला दिला जात आहे; या पैदाशीचा कांहीं अंश गांवच्या सार्वजनिक खर्चासाठीं व अडीअडचणीसाठीं राखून ठेवण्यांत येत आहे. त्यांच्या चातुर्वर्ण्यांतला ब्राह्मण हा सालिना दोन हजार भोजनें झोडणारा, शेंकडों गुरें बाळगणारा, अनेक एकर जमिनीचा गुंड धनी असा नव्हे; तर त्यांच्या नवचातुर्वर्ण्यांतला ब्राह्मण म्हणजे अर्थिक दृष्ट्या गरीब, जनतेला शिक्षण देणारा, दुष्ट माणसें व अनिष्ट ग्रह यांपासून जनतेला सावध करणारा, असा होता. त्यांच्या चातुर्वर्ण्यांतला क्षत्रिय हा सदासर्वदा दारूच्या धुंदींत बायकांच्या घोळक्यांत पडून राहिलेला असा नव्हता; तर क्षत्रिय म्हणजे गांवाचें, राज्यसंस्थेचें संरक्षण, शौर्य व न्याय्य कर-पद्धति या सर्वांचें प्रतिक असा होता. त्यांच्या चातुर्वर्ण्यांतला वैश्य हा व्यापारांत फसवाफसवी करून श्रममूल्याची चोरी करणारा असा नव्हता; तर वैश्य म्हणजे जें नको आहे त्याच्या मोबदल्यांत जें हवें आहे तें देणारा व याबद्दल योग्य मोल घेऊन प्रामाणिकपणें चरितार्थ चालविणारा असा होता. संतकवींच्या मतें एकदां असें चातुर्वर्ण्य पुन्हा प्रस्थापित झालें कीं, मग ग्रामसंस्था व एकंदर समाज यांना दुष्काळ, सांथींचे रोग, युद्धें व परकीय शत्रूंच्या स्वाऱ्या यांच्या भक्ष्यस्थानीं पडावें लागणार नाहीं; संकट निवारणाची ही उपाययोजना तात्पुरती असली तरी विशिष्ट मर्यादेपर्यंत ती खरीखुरी उपाययोजना होती. प्रचलित वर्ण-वर्ग समाज पद्धतीची चौकट तशीच राहायची, फक्त तिच्यामधें जो वेतालपणा आला होता तो सुधारल्यास हा समाज टिकवून ठेवतां येईल व समाजाच्या तीव्र दुःखांचा परिहार होईल, अशी संतकवींची भावना होती. संतांच्या महान् कवितेनें आपल्या सर्व वाङ्मयांत दलित जनतेच्या या मर्मभेदक आक्रोशाचाच आविष्कार

केलेला आहे; कारण सर्वांत जास्त हालअपेष्टा लक्षावधि श्रमिकांनाच सोसाव्या लागत होत्या. आपल्या वाङ्मयाची प्राचीन परंपरा ही अशी आहे. ही परंपरा घेऊन आपण जन्मलों आहोंत.

पण जनतेचें राजकीय मार्गदर्शन करण्याचे बाबतींत तिला स्फूर्ति देणें, तिला संघटित करून आशा देणें व दिशा दाखविणें, या बाबतींत संतांची कविता अपेशी ठरली. या कवितेनें पंढरपूरच्या यात्रांच्या निरर्थक निदर्शनांचा रस्ता काढला व कधीं कधीं तर सतत अश्रुधारांचीं कवनें गाऊन श्रोतृगणांची मनोवृत्ति तिनें विकृत करून ठेवली. तरीसुद्धां तिनें एक मोठी सामाजिक गरज पुरविली; दलित जनतेला तिनें वाचा फोडली आणि तत्कालीन समाजांतील घोर मूलभूत अन्याय तिनें चव्हाठ्यावर आणले. संतकवितेनें अरिष्टनिवारणाचा असंदिग्ध मार्ग दाखविला; जनतेची मागणी तिनें ठासून मांडली; तिच्यांतले ‘ सहजीवी ’ सारखे कांहीं कांहीं गट तर लोकशाहीप्रधान विचारसरणीचे पुरस्कर्ते होते. तरी पण संतकवींनीं जुलमी राज्यकर्त्यांना राजकीयदृष्ट्या उलथून पाडायची मागणी ठामपणें कधींहि मांडली नाहीं. मात्र अवताराच्या मागणींत ती फक्त सूचित केलेली होती. संतकवितेच्या या उणीवेमुळेंच जनतेंत पराजित मनोवृत्ति पसरविण्याचा, जनतेचा हिरमोड करून तिला भेकड करून ठेवण्याचा आरोप संतकवींवर करायला टीकाकारांना वाव मिळतो. संतांनीं आपल्या वाङ्मयाच्या द्वारें जनतेला संघटित करून कार्यप्रवण केलें नाहीं असा आरोप त्यांच्यावर करायला वाव सांपडतो तो याचमुळें.

शेवटीं जनतेला जागृति आली. तिला आलेला अनुभव व तिनें सोसलेले हाल यांतून राजकीय संघटनेची प्रेरणा निर्माण झाली. एक राजकीय उद्दिष्ट कल्पून व निश्चित कार्यक्रम आंखून जनतेची चळवळ सुरू झाली. दलित मानवतेच्या तर्फे मुळुमुळू तक्रारी करीत बसायचें, भविष्यकाळच्या ध्येयांचा नुसता उच्चार करीत राहायचें, चालू काळांतील दुःखांचें नुसतें वर्णन करीत बसायचें, येवढ्यावर यापुढें भागण्याजोगें नव्हतें. भागवतपंथाची सद्दी संपली. मराठा शेतकरीवर्गाची कुलदैवतें म्हणजे लढाऊ स्त्रीदेवता अंबा भवानी व खंडोबा हीं आतां पुढें सरसावलीं. रामदासांचा दासबोध खेड्यांतील गरीब ब्राह्मणांमध्यें लोकप्रिय झाला. भागवतांतल्या उदारमतवादी चातुर्वर्ण्याऐवजीं कडक चातुर्वर्ण्य, आणि अवतार म्हणजेच लढाऊ वृत्ति, तसेंच न्यायी राजा व न्यायाचे राज्य, या

सर्व गोष्टींचें प्रतीक रामावताराच्या कल्पनेंत सांपडतें. म्हणून रामदासानें आपल्या पूर्वीच्या संतांचा मार्ग सोडून देऊन रामाला आपलें दैवत ठरविलें. जनतेच्या ध्यासांतला आदर्श राजा शिवाजीच्या रूपानें अवतरला. शिवाजीनें तडकाफडकीं जुनीं वतनें खालसा केलीं. जुन्या करपद्धती रद्द केल्या. भूदासांवरील अमर्याद हुकुमत नष्ट केली आणि जमीनमहसुलाचे मक्ते द्यायची पद्धत बंद केली. प्रत्येकाला कसायला जमीन, कुळाला स्थिरता, प्रत्यक्ष पैदा केलेल्या पिकांवरच कराची आकारणी, शेतकऱ्याच्या उत्पन्नावर वतनदाराचा हक्क नाहीं —ह्या शिवाजीनें केलेल्या अत्यंत मूलभूत स्वरूपाच्या आर्थिक सुधारणा होत.

या काळीं जनतेनें स्वतःचे लष्करी पुढारी निर्माण केले. जुने धंदेवाईक सेनानायक परकीय सरदारशाहीला जाऊन मिळाले होते. या काळांतला उठाव हा जनतेचा उठाव होता. म्हणूनच या उठावांतून अत्यंत यशस्वी अशी गनिमी युद्ध-पद्धति निर्माण झाली; कारण लढवय्ये राजकीय दृष्ट्या जाग्रत असतील, जनतेशीं इमान राखणारे असतील, व न्याय्य युद्ध लढत असतील तरच गनिमी युद्ध शक्य असतें. आणि म्हणूनच मोंगलाच्या व दक्षिणेंतील राज्यांच्या मातबर फौजांचे पराभव झाले.

या लढ्याच्या काळांत आमचे लेखक कोठें होते बरें? संतांच्या परंपरेंतल्या लेखकांना हा नवीन घडून आलेला पालट आकळला नाहीं. या वेळचा लढा गनिमी काव्यानें लढणाऱ्या शेतकरीवर्गाच्या व त्याच्या तरुण सेनानायकांच्या हातींच सर्वस्वीं होता. या लढ्याचा रोंख रक्तपिपासु वतनदार व त्यांची राज्यसंस्था यांच्या उघड उघड विरुद्ध होता. या काळांतल्या मातबर ब्राह्मणांना हा लढा मुळींच आवडला नाहीं; कारण मराठे विजयी झाले म्हणजे भरपूर दक्षिणा घेणाऱ्या काजीला पदच्युत करून त्याची जागा या ब्राह्मणांना पूर्ववत घ्यायला हवी होती. हा लढा जुन्या सरंजामी हिंदु-मुस्लिम सरदारांना तर अर्थातच आवडला नाहीं; त्यानीं ही नवी शेतकरी-शिवाजी एकजूट चिरडून टाकण्यासाठीं एकदिलानें हरप्रकारचे उपाय केले. त्या काळचे ब्राह्मण लेखक व कवि, मुकुंद, वामन, वगैरे, यांनीं या महान् लढ्याबद्दल, त्यांच्या पुढाऱ्यांबद्दल अगर लढ्याच्या ध्येयाबद्दल एक ओळखसुद्धां लिहिली नाहीं. पण ज्या लढाऊ जनतेच्या अंगीं युद्ध करायचें सामर्थ्य होतें, ती स्वतःचे सेनानायक स्वतःमधून निर्माण करूं लागली, तिनें स्वतःचे कवि व लेखक निर्मिले.

 अनुक्रम ६४८९३ दि: ... वर्ग २०६५ नों दि: २५३१६९ 

संत वाङ्मय लुप्त झालें, इतर लेखक प्रतिष्ठितांच्या दरबारीं गेले; आणि लक्षावधि लढाऊ लोकांच्या पुढें आमचे शाहीर व पोवाडे गायक येऊन उभे राहिले—कवितेच्या रंगभूमीवर पोवाड्यानें आपलें वर्चस्व स्थापन केलें; पोवाडा हें लढाऊ व विजयी जनतेचें कवन झालें.

आमचे हे शाहीर आपल्या खेड्यांतल्या फडाबरोबर कूच करीत; गनिमी सैनिकांच्या जोडीनें पायीं किंवा घोड्यावर लढत. आमचे शाहीर लढाई चालू असेतों स्वतः लढत असत; आणि संध्याकाळीं आपले सैनिक सवंगडी छावणीवर जमले कीं त्यांच्यापुढें दिवसा केलेल्या पराक्रमाचे पवाडे गाऊन शूर सैनिकांना आणखी पराक्रम करण्यासाठीं स्फूर्ति देत असत. अशा प्रकारचे शेंकडों पोवाडे त्यावेळीं खेडोंपाडीं, गांवोंगांवीं, किल्ल्यांकिल्ल्यांतून, पसरून राहिले होते. या पोवाड्यांतून लढ्यांत भाग घेत असलेल्या दलित जनतेचें वर्णन असे. या शाहिरांपैकीं सर्वांत श्रेष्ठ शाहिरानें "अज्ञानदास" हें नम्र नांव घेतलें होतें. हे शाहीर जनतेशीं समरस झालेले असत; जनतेच्या पुढाऱ्यांशीं त्यांचा निकट संबंध येई; त्यांना वास्तवाची जाणीव असे; त्यांनीं जागृतपणें अनुभव घेतलेला असे; या सर्वांचा आविष्कार ते थोडक्या शब्दांत सुंदर रीतीनें करीत असत; या शब्द-सौंदर्याची बरोबरी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिणाऱ्या आपल्या लेखकांना शेंकडों शब्द योजूनहि करतां आली नाहीं. या शाहीरांचा थोर वीर राजा शिवाजी हा त्यांना राजा असा मुळीं वाटतच नाहीं. अंबारींत बसून प्रजाजनांकडून मुजरे घेणारा व सदासर्वदा कमरेला लटकावलेल्या तरवारीच्या मुठीवर हात ठेवून दरबारी थाटांत उभा राहणारा व कधींच साध्या माणसासारखा न वावरणारा शिवाजी या शाहिरांच्या कवितेंत मुळींच आढळत नाहीं. (आमच्या कांहीं कादंबऱ्यांत व नाटकांत तर खुद्द स्वतःची आई जिजाबाई हिच्यापुढेंसुद्धा शिवाजी वरील पावित्र्यांत उभा असतो!) शाहिरी कवितेंतला शिवाजी हा जनतेंतलाच एक आहे; तो लढाईवर निघाला म्हणजे आपल्या जनतेला सांगतो : "माझा रामराम दादानु." आणि आपल्या राज्याची व्यवस्था केल्यानंतर तो आपल्या प्रजेचा निरोप घेतांना म्हणतो : "निरवानिरव दादानु—विनंति सकळिकाला." अज्ञानदासाला फार्सी शब्दांचें वावडें मुळींच वाटत नाहीं; त्याचा शिवाजी म्हणतो : "पहिला सलाम माझा भवानी शंकराला." या काळांतले सैनिकहि पोटभरू भाडोत्री नव्हते; अवघी शस्त्रसिद्ध

जनता म्हणजेच फौज असे. या काळची फौज म्हणजे पेशवाईच्या काळांतल्याप्रमाणें प्रांतोप्रांतींच्या लोकांची खिचडी नसे. शिवाजीचे सैनिक हत्यारें कशीं मिळवायचीं या विवंचनेंत बसून चर्चा करतात. कारण हें युद्ध त्यांचें स्वतःचें, साऱ्या जनतेचें होतें. लष्करी नोकऱ्या आणि वतनें मिळवण्याचें तें एक साधन आहे असें या युद्धाला लोक समजत नव्हते. शेतकरी विचारीत,

" विन हत्यारी लोक;
कसं जाऊं महाराजांचे भेटीला ?
आंकड्या कोयत्या कमरेला. "

पण पुढें ही स्वातंत्र्याची लढाई संपल्यावर पेशवाईच्या काळांत जेव्हां दुसऱ्यांना लुटण्यासाठीं व दुसऱ्यांवर जुलूम करण्यासाठीं पेशवे लढाया करूं लागले तेव्हां सैन्याचें रूप पालटलें. कवींनीं पेशव्यांच्या फौजेचें वर्णन असें केलें आहे :

" तीस हजारी अब्दागिरी बरोबर चाले ढिगारा;
संगें झडती चौघडे शिंगें तुतारा "

[ पानपत — सगनभाऊ ]

पोवाडेवाङ्मय जुन्या समाजकंटकांचा उच्छेद व संतकवींनीं मागणी केलेल्या नव्या सुधारणांची उभारणी दर्शवितें. पोवाडेवाङ्मय हें अगोदरच्या संतवाङ्मयाची परंपरा तर्कशुद्ध रीतीनें पुढें चालवितें. हें वाङ्मय निर्माण होऊं शकलें याचें कारण या वाङ्मयाचे लेखक जनतेच्या खांद्याला खांदा लावून लढणाऱ्या वर्गांतून निर्माण झालेले होते; हे लेखक जनतेचें जीवन जगत होते; जनतेबद्दल त्यांना जिव्हाळा वाटत होता; या लेखकांच्या भावना अत्यंत प्रखर होत्या; त्यांची अतिशय तीव्र राजकीय जाणीव अशा प्रकारचें लढाऊ व स्फूर्तिदायक काव्य निर्माण करायला त्यांना भाग पाडीत होती. अशा प्रकारें शेतकरी वर्ग, कारागीर व इतर दलित जनता यांच्या वर्गलढ्यांनीं तंत्र व अर्थ या दोन्ही बाबतींत वैशिष्ट्यपूर्ण असें स्वतःचें स्वतंत्र काव्य निर्माण केलें.

आपल्या वाङ्मयांतला हा अशा प्रकारचा परंपरेचा वारसा घेऊन आपण सध्यांच्या देशरक्षणाच्या युद्धांत पडलेले आहोंत. या फॅसिझमविरोधी युद्धांत, स्वातंत्र्याच्या युद्धांत—जनतेला दुष्काळाच्या, धान्यदडव्यांच्या, नफेबाजांच्या व नोकरशाहीच्या तावडींतून सोडविण्याच्या युद्धांत—आपण पडलेले आहोंत. या युद्धांत आपले लेखक आहेत कोठें ?

## अधःपात व पराजय

चालू काळांतल्या वाङ्मयाकडे वळण्यापूर्वी आपल्या वारसदारींतला एक शेवटचा टप्पा आपण पाहून घेतला पाहिजे. लढा यशस्वी करून मराठेशाही प्रस्थापित होऊन पन्नास वर्षें लोटलीं नाहींत तोंच शेतकरी जनतेच्या मानगुटीवर जुन्या संघटित सरंजामदारीचें जोखड बसलें. विखुरलेल्या शेतीच्या व्यक्तिगत उत्पादनपद्धतीचें स्वरूपच असें असतें कीं तींत कालांतरानें शेतकरीवर्गाची आर्थिक व राजकीय सत्ता संघटित सरंजामी जमीनदारांच्या-सरदारांच्या हातीं एकवटते. राजारामानंतर मराठशाहीचे जुने नवे सगळे सरंजामी जमीनदार एक होऊन त्यांनीं नव्या राज्यसंस्थेच्या शिवशाही झेंड्याखालींच उभें राहून जुन्या जुलमांचीं सगळीं ओझीं शेतकऱ्यांच्या मानगुटीवर पुन्हां बसविलीं. जुने कर, वतनी हक्क व वसूल पुन्हां चालू झाले. नव्या राजवटींतल्या वरिष्ठ पुढाऱ्यांनीं पूर्वीच्या धोरणाच्या नेमकें उलट धोरण तर स्वीकारलेलेंच होतें. या धोरणाविरुद्ध जनतेंत असंतोष निर्माण होईल व जुन्या परंपरेंतलें लढाईचें शिक्षण दिलेलें खडें लष्कर त्या असंतोषाला मदत करील ही त्यांना धास्ती होती. स्वतःच्या जनतेची तसेंच परक्या प्रांतांची लूटमार करायची हांव या नव्या जुन्या सरदारांना होतीच. म्हणून त्यांनीं घरचा असंतोष टाळणें व बाहेरची लूट आणणें अशा दुहेरी हेतूनें या लष्कराला नव्या वैभवाचा मोह दाखवून व नव्या पराक्रमांचें क्षेत्र सैनिकांपुढें उभें करून नजीकच्या प्रांतांवर मोहिमा चालू केल्या. महाराष्ट्राभिमानी मराठी लष्करांत इतर प्रांतांतून भरती केलेल्या भाडोत्री फौजांची भर पडली. तोफखाना हें नवें युद्धसाधन मुद्दाम राजकीयभावना–शून्य, शेतकरीहितदक्षता–शून्य अशा पगारी पठाण गार्द्यांच्या हातीं खास राखून ठेवण्यांत आलें. गनिमी सैनिक—राजकीयदृष्ट्या जागृत जनतेचे प्रतिनिधी आतां मागें पडले. मराठा हिंदु वतनदारांचा राजकीय व आर्थिक सरंजामी जुलूम वरचढ होऊन राज्यारूढ झाला. ज्या जुलमाविरुद्ध जनतेनें उठाव केला, जो जुलूम जनतेनें लढून हाणून पाडला, तोच जुलूम पुन्हां जनतेच्या बोकांडीं बसला. अर्थात्च या काळांत पूर्वीचें स्वतंत्रताप्रिय पोवाडे-वाङ्मय लुप्त झालें. पोवाड्याचा एक प्रकार शिल्लक राहिला खरा, पण तो पूर्वीच्या जुन्या पोवाड्यांहून अगदीं वेगळा होता. आतांचे हे नवे पोवाडे लढायांचेंच वर्णन करणारे होते; पण हें वर्णन सरंजामी सरदारांच्या लढायांचेंच

वर्णन करणारे होते; पण हें वर्णन सरंजामी सरदारांच्या लढायांचें होतें; हें नवें कवन अशा सरदारांपुढें व त्यांचे दरबारी पाटील व मामलतदार यांच्यापुढें गाण्यासाठीं तयार केलेलें होतें. म्हणून या नव्या पोवाड्यांना "राग, सूर व ताल" अशा बैठकी सरंजामाची गरज लागे. त्यांचें तंत्र व अर्थ हीं जुन्या पोवाड्यांहून न्यारीं झालीं.

या आयतोबांच्या पोवाड्यांच्या जोडीला आणखी एक नवीनच प्रकारचें काव्य निर्माण झालें. तें म्हणजे लावणी. राजांचें शौर्य जसें लोपलें तसें कवींचें कवित्वहि विलयाला गेलें. सरंजामी मोहिमांच्या संतत क्षोभानें जीवनाला अस्थिरता आली. राजधानींत व मोठ्या गांवांत सैनिक, व्यापारी, सरदार व प्रांतोप्रांतींचे उपव्यापी लोक यांचा सुळसुळाट होऊन राहिला. स्त्रीला तिचा मोहिमाग्रस्त पति वर्षांतून एकदां भेटायचीहि मुष्किल होऊं लागली. शहरवासी स्त्रीला एकीकडे प्रेममय आयुष्याची जबरदस्त ओढ लागून राही; तर दुसरीकडे विवाहदत्त पतीच्या अभावीं लष्करी छावण्यांतील प्रांतोप्रांतींचे तरुण प्रेमदान करायला तिला घेरून बसलेले. राजेलोकांचे व त्यांच्या वरिष्ठ सरदारांचे दरबार व महाल म्हणजे प्रांतोप्रांतींच्या स्त्रियांना व तरुणांना घेऊन विलास करायचे अड्डे बनून राहिले. असल्या जमावाला सच्च्या कवींची काय गरज ? त्यांना पाहिजे होते वारांगनापूरक दलाल. दलाल पुढें सरसावले व उत्तानशृंगारमय गणिका-काव्यें रचूं लागले. हेंच तें लावणीवाङ्मय.

लावणी-वाङ्मयानें जुन्या वैष्णव कवितेची परंपरा पुढें चालविण्याची बतावणी करून पाहिली; पण हें सोंग सुद्धा अपेशीच ठरलें. या सोंगापायीं लावणीनें जुन्या भागवतपंथीयांच्या मानवतावादी श्रीकृष्णाला नुसताच शृंगारराजा बनविलें आणि भागवत कवितेंतील निर्मळ निष्पाप गोपींना तिनें सरदारांच्या रखेल्यांची अवकळा आणली. लावणीच्या जोडीला पंडिती वळणाच्या कवितेचा उदय झाला. ही पंडिती कविता स्वरूप व अर्थ या दोन्ही बाबतींत जुन्या कविपरंपरेहून अगर समकालीनांहून सर्वस्वीं वेगळीच राहिली. पंडित कवि हे जुन्या पारंपारिक चातुर्वर्ण्याचे पुरस्कर्ते; त्यांनीं संत कवींची शैली व विचारसरणी या दोहोंनाहि मान्यता दिली नाहीं. त्यांनीं सरंजामी राजेरजवाडयांची बाजू घेऊन बंडखोर शेतकऱ्यांना विरोध केला; स्वातंत्र्यासाठीं लढणाऱ्या गनिमी शेतकरी वीरांनाहि त्यांनीं विरोध केला; त्यांनीं पोवाडे वाङ्मयाला धुडकावून लावलें. पण

हे पंडित म्हणजे सरंजामशाहीचे शुद्ध बुद्धिजीवी प्रतिनिधी होते. त्यांनीं सरंजामी लुटींत भागीदारी तर पतकरलेलीच होती; तरीसुद्धां अधोगतीला लागलेल्या राजेरजवाड्यांहून आपण कुणी तरी वेगळे आहोंत, हेंहि त्यांना दर्शवायाला पाहिजे होते, आणि म्हणून या पंडितांनीं लावणी वाङ्मय देखील अमान्यच केलें. राहतां राहिली जुनी संस्कृत कविता; तिचीच मराठी नक्कल उठविण्या-खेरीज त्यांना दुसरा मार्गच नव्हता. शैली व काव्यविषय या दोन्ही बाबतींत त्यांनीं ही नक्कल उठविली. या दृष्टीने पंडित कवींचा सर्वांत प्रसिद्ध प्रतिनिधी म्हणजे मोरोपंत. अर्थात् पंडित कवि स्वाभाविकपणेंच जनतेपासून अलग राहिले व यामुळें त्यांच्या हातून जुन्या सरंजामी समाजरचनेला मदतच झाली.

दलित जनतेनें पुन्हां कष्टमय जीवनाला हलकें करण्यासाठीं जुनी भजनें व जुने पोवाडे यांच्याकडे तोंड फिरविलें. दरिद्री ब्राह्मणांना व बुद्धिवादी लोकांना जुनीं भजनें व पोवाडेहि रुचेनात आणि नवी लावणीहि पटेना; म्हणून त्यांनीं पंडित कवींचा धिम्मा खडखडाट चालू केला. जनतेच्या वाङ्मयाचा लोप झाला. संतवाङ्मयाचें स्वप्न खरें व्हायचा योग आला होता तो पुन्हां नष्ट झाला. लुटारू वर्गाच्या २००० भोजनांना इतिहासानें एकदां ज्ञानेश्वरीचा व मुसलमानी स्वारीचा टोला दिला होता. आतां लावणीला इतिहासानें ब्रिटिश सत्तेचा टोला दिला. ज्ञानेश्वराच्या काळीं जनता जागृत व्हायच्या आधींच जसा तो टोला बसला तसा हा टोला देखील जनता जागृत व्हायच्या अधींच बसला. आणि हा टोला म्हणजे एका सर्वव्यापी वरचढ संस्कृतीचा टोला होता. या टोल्यानें मराठी वाङ्मय खलासच होणार असा रंग दिसूं लागला. वाङ्मयक्षेत्रांत जनतेचा पराभव होऊं दिल्याबद्दल हें शासन होतें.

## ब्रिटिश सत्तेचीं पहिलीं फळें

आज शेंकडों वर्षे होऊन गेलीं तरी आपली जनता या संतकवींची आठवण ठेवते; कारण या कवींनीं जनतेच्या हृदयांतील अगदीं सखोल तळमळ व्यक्त करून दाखविली. हे जनहृदयाचे चित्रकार काय कुणी सत्तीनें कामाला लावले होते ? त्यांना काय कुणी चाबकाचे फटकारे मारले होते म्हणून त्यांनीं आपला विशिष्ट राजकीय, आर्थिक वा धार्मिक दृष्टिकोण जनतेपुढें मांडला ? जुलमानें गांजलेल्या दलित जनतेशीं ते समरस झाले होते म्हणूनच त्यांना ही काव्यस्फूर्ति

झाली. ज्यांना जनतेच्या अंतःकरणाचा खराखुरा ठाव लागला नाहीं, त्यांनीं स्वतःला स्फूर्तीचा स्पर्शच होऊं दिला नाहीं. अशांनीं निर्माण केलें तें काव्य नव्हतें, ती होती नुसती वरिष्ठ वर्गीयांची दरबारी 'भटाइति.'

या संतकवींपैकीं कितीतरी लेखक दलित वर्गातूनच जन्माला आले; त्यांनीं दलितांच्या बरोबरीनें हाल सोसले. म्हणूत दलितांचीं दुःखें व दलितांचे लढे यांचें वर्णन आपल्या कलेच्या द्वारा करण्यांत त्यांना कमीपणा वाटला नाहीं. तसें म्हटलें तर हीं दुःखें व हे लढे, प्रत्यक्षतः अगर लक्षणेनें, त्यांच्या कलेचा अनन्य आधार होते.

या संतकवींचें बहुतेक वाङ्मय जाणूनबुजून उघड उघड प्रचारकीच होतें. नव्या युगाच्या जन्मासाठीं लढणें ही जनहृदयाची तळमळ होती आणि जनतेची कला व जनतेचें वाङ्मय यांत देखील हीच तळमळ व्यक्त होत होती.

या कलानिर्मात्यांनीं उघड उघड जनतेच्या भौतिक सुखाला पाठिंबा दिला व हें बिरुद त्यांनीं जनतेच्या निशाणावर ढळढळीत लिहून ठेवलें. त्याला त्यांनीं 'आध्यात्मिक' अगर धार्मिक रंग दिला असला तरी त्याची मूळ प्रेरणा भौतिकच होती. त्यांनीं जुलमानें गांजलेल्या दलित वर्गाचा कैवार पतकरला आणि अशा रीतीनें मराठी वाङ्मयाचा भूतकाळ उज्ज्वल करून ठेवला.

ही भूतकाळाची पार्श्वभूमी लक्षांत घेतां आतां आपण कुठें उभे आहोंत? यादव घराणें नष्ट झाल्यानंतर ज्ञानेश्वराच्या मागाहून १५० वर्षांत निपजलेलें मराठी वाङ्मय घ्या व पेशवाई नष्ट झाल्यानंतर लावणीवाङ्मयाच्या मागाहून गेल्या १५० वर्षांत निपजलेलें मराठी वाङ्मय घ्या, आणि या दोहोंची तुलना करा. आपण नव्या परंपरा कोणकोणत्या निर्माण केल्या? जुन्या कोणत्या चालविल्या? ज्ञानेश्वराच्या मागाहून कुंभार, कोष्टी, शिंपी, कारागीर, स्त्री–पुरुष, हिंदु–मुसलमान या सर्वांनी वाङ्मयनिर्मितीची झोड उठविली; बंडखोरीचा दिव्य आविष्कार केला; स्वातंत्र्याच्या अविरत मागणीला वाचा फोडली. याच्या उलट आधुनिक मराठी वाङ्मय पहा; यांतल्या बहुतेक वाङ्मयानें, विशेषतः १९२० नंतरच्या वाङ्मयानें या कार्यांत कसूर केली हें आपल्याला कबूल करणें भाग पडतें, लक्षावधि गांजलेल्या दलित जनतेच्या हृदयांतील तळमळीला आधुनिक मराठी वाङ्मयानें दगा दिला.

१८५७ सालपर्यंत पराभूत सरंजामी संस्थानिकांना आपलें गमावलेलें

साम्राज्य परत मिळवावयाचीं स्वप्नें दिसत होतीं. त्याच्यासाठीं त्यांना जनतेच्या स्वातंत्र्याची चळवळ करायची जरूर मुळींच वाटली नाहीं. त्याच्यासाठीं त्यांनी साधनें कोणतीं उपयोगांत आणलीं ? राज्यकर्त्या संस्थानिकांची आपसांत गट्टी कर, ब्रिटिशांच्या ताब्यांतील शिपाई फौजांना कसल्याहि अवाच्यासव्वा थापा मारून फितवावयाचे कट कर—असल्या साधनांचा त्यांनीं अवलंब केला. लोकांना नुकती कोठें शांततेची उसंत मिळालेली होती; एकसारख्या लढाया करून त्यांना थकवा आलेला होता; नव्या राज्यसंस्थेनें जरी लोकांचें रक्तशोषण चालूच ठेवलें असलें तरी तिनें लोकांना अंतर्गत अस्थिरतेंतून व अराजकतेंतून सोडविलें, तिनें हिंदी लोकांना शेतीची व कारागिरीची वाढ करायला अवसर दिला; तिच्या अमदानींत त्यांना कांहींना कांहींतरी सवड मिळाली. या काळांत पंडित कवींनीं व लेखकांनीं राज्यकर्त्या जातीची व वर्गाची सेवा चालू ठेवली. खरो-खरीचें जनतेचें वाङ्मय या काळांत मुळींच निपजलें नाहीं.

पण प्रचंड फेरफार हळुहळू परिपक्व होऊं लागलेले होते. यावेळीं स्वारी करून आलेला परकीय राज्यकर्ता हा आमची जुनी आर्थिक घडी तशीच राहूं देऊन तिच्यावरची मलईच तेवढी काढून घेण्यावर संतुष्ट होणार नव्हता. समाजाची अवघी रचना, भौतिक वस्तूंची पैदास करायची पद्धति, वर्गावर्गांतील परस्पर संबंध—या सर्वांत फेरबदल होत होते. जुने वर्ग नष्ट होणें अपरिहार्य होतें आणि आजवर कुणाला ठाऊक नसलेले नवे वर्ग व नव्या उत्पादन प्रेरणा निर्माण व्हायच्या होत्या. आगगाडी, तारायंत्र, आगबोटी, गिरण्या, कारखाने निघूं लागले होते. ग्रामसंस्थेचा उच्छेद झाला. सावकार, सरंजामी खंड-उकळे व मळेवाले यांनीं जमिनी बळकावल्या; त्यांनीं पैशाच्या रूपानें जबर खंड बसविल्यामुळें शेतकऱ्याची शेतावरून हकालपट्टी झाली व तो कारखान्याकडे पिटाळला गेला. ब्रिटिश व हिंदी भांडवलानें कारखाने उभारले व त्यांमध्यें नव्या मनूचे नवीन लोक—कामगार लोक—ही नवोदित यांत्रिक उत्पादन-साधनें चालवूं लागले. जुना हिंदु समाज, जुना मुसलमान समाज, यांची आमूलाग्र चीरफाड होऊं लागली. भांडवलशाही व सरंजामी जमीनदारशाही यांच्या ओझ्याखालीं लक्षावधि शेतकरी भरडून निघूं लागले. कामगार वर्ग अजूनहि जमिनीवर विसंबून होता; त्याची वृत्ति अर्धवट शेतकरी व अर्धवट कामगार अशी होती; नव्या स्वतंत्र लोकशाहीप्रधान हिंदुस्थानचा झेंडा अजून त्यानें उभारला नव्हता; बुद्धिजीवी वर्गाची वाढ मात्र सरकारी नोकऱ्यांना व

उद्योगधंद्यांतील नोकऱ्यांना पुरून उरेल इतकी होत होती; आणि हा बुद्धिजीवी वर्गच तेवढा चालू काळांतील मूलभूत गरज व्यक्त करूं शकला — ही गरज म्हणजे राजकीय स्वातंत्र्य. परकीय सत्ता व तिचा साथीदार म्हणजे हिंदी सरंजामी घराणीं, यांचें निरुपयोगी ओझें भिरकावून देण्यासाठीं आवश्यक असलेलें राजकीय स्वातंत्र्य—ही मूलभूत गरज प्रस्फुट झाली.

मध्यमवर्गाला, उदयोन्मुख भांडवलदारांना, शेतकरीवर्गाला, राष्ट्रवादाची विचारजागृति कोणी आणून दिली ? हिंदुस्थान हें राष्ट्र आहे, आपल्यावर राजकीय व सामाजिक जुलूम करणाऱ्यांजवळ आपण लोकशाही हक्कांची व स्वातंत्र्याची मागणी केली पाहिजे, हे विचार आपल्या मनांत कोणी जागृत केले ? चिपळूणकर, आगरकर, टिळक, रानडे प्रभृति थोर निबंधकारांनीं आपल्याला ही जागृति आणून दिली. या लेखकांनीं युरोपांतील व विशेषतः इंग्लंडमधील भांडवलदारी वाङ्मयांतून लोकशाहीच्या कल्पना घेतल्या व हिंदी जनतेला एक नवी दृष्टि मिळवून दिली. जनतेला जागृत करण्यासाठीं वर्तमानपत्रांचा त्यांनीं उपयोग केला; त्यांनीं जनतेला टीकेची वाचा दिली, संघटनेचा सूर शिकविला. ज्या वर्गाला उद्देशून त्यांनीं हें लेखन केलें त्या वर्गाच्या अनुरोधानें या लेखनाचें स्वरूप व अर्थ ठरले. टिळकांनीं कितीतरी काळपर्यंत मुख्यतः शेतकरी व मध्यमवर्गीय तरुण यांना उद्देशूनच लेखन केलें. जंगलें, विहिरी, शेती, करपट्टी याबद्दल त्यांनीं विवेचन केलें. तिखट, खोंचदार, खंजीरवजा वाक्यांची त्यांची शैली सर्वत्र गाजली; मात्र प्रतिगामी ब्राह्मण सरदारशाहीपुढें टिळक डगमगले हें खरें; त्यांनीं सरकारविरुद्ध संयुक्त राष्ट्रीय फळी उभारण्याच्या नांवाखालीं सामाजिक सुधारणेला पाठिंबा देण्याचें नाकारलें, आणि प्रतिगामी दृष्टिकोनांनासुद्धां उचलून धरलें. राजकारणांत पुरोगामित्व व समाजकारणांत प्रतिगामित्व अशा जोडीच्या सांच्यांत टिळकांची घडण होती. असें असूनहि टिळकांनींच राष्ट्रवादाचा पहिला आवाज उठविला आणि निर्भयपणें मध्यमवर्गामध्यें प्रचंड जागृति केली. जनतेला वाङ्मयाच्या द्वारा जागृत करणाऱ्या राजकीय निबंधकारांमध्यें टिळक हेच पहिले व शेवटचे ठरले. पुढें पन्नास वर्षांनीं कम्युनिस्टांनीं ही साधन-पद्धति घेईपर्यंत दरम्यानच्या कालांत त्यांच्या तोडीचा निबंधकार झालाच नाहीं.

जुनी समाजरचना कोसळून पडल्यामुळें आजपर्यंत ज्ञात असलेलें प्रत्येक

जीवनविषयक मूल्य निरर्थक ठरूं लागलें. रोजच्या जीवनप्रवाहाशीं जातीचा व धर्माचा कांहींएक संबंध राहिला नाहीं. कांहींना तर धर्मांतरानें बौद्धिक समाधान मिळवून दिलें, कांहींना दुष्काळांच्या उपासमारींतून वाचविलें आणि कांहींना नोकऱ्या मिळवून दिल्या. या सगळ्या प्रश्नांची चर्चा वाङ्मयांतून होत राहिली. समाजसुधारक पंथाच्या निबंधकारांनीं आगरकर, जोतिबा फुले इत्यादिकांच्या नेतृत्वाखालीं स्वतःचा स्वतंत्र वृत्तपत्रांचा फड या कामासाठीं निर्माण केला.

पण या काळांतील दोन अत्यंत ठळक अशा कलाकृती वरील लेखकांच्या लेखणींतून नाहीं उतरल्या. या कलाकृती दोन प्रांतांतील दोघा कादंबरीकारांच्या लेखणींतून उतरल्या. माझ्या मतें या दोन कलाकृतींनीं या संबंध शतकाचें प्रतिनिधित्व फार चांगल्या प्रकारें साधलें. यांतली एक हरी नारायण आपटे यांच्या लेखणींतून उतरली व दुसरी बंकिमचंद्राच्या लेखणींतून. आपट्यांची कलाकृति " काळ तर कठीण आला " ही एक लघुकथा आहे. या कथेंत देशोधडीला लागलेल्या अफाट शेतकरीवर्गाची स्थिति, त्यांची नागवणूक व त्यांचें मालमत्ताविहीन कामगारवर्गात परिवर्तन, अत्यंत वास्तवपूर्ण रीतीनें चित्रित केलें आहे. मग ही कलाकृति लवकरच जप्त झाली यांत नवल कसचें ? बंगालचे बंकिमचंद्र यांनीं " आनंदमठ " ही कादंबरी लिहिली. दुष्काळ व नागवणूक यांच्या योगानें बंगालमधील शेतकरीवर्ग देखील अगदीं असाच देशोधडीला लागला होता व त्याचें दर्शन या कादंबरींत आपल्याला घडतें. देशोधडीला लागलेला मध्यमवर्ग व शेतकरीवर्ग हे ' गुप्तपणें ' बैरागी म्हणून आपली संघटना करतात व ब्रिटिश राजसत्तेशीं लढतात, पण या लढ्यांत त्यांचा पराभव होतो, असें या कादंबरीचें कथानक आहे. आजच्या दृष्टीनें पाहतां या कादंबरींत मुसलमानविरोधी वृत्ति दिसत असली तरी तिला बरीच कीर्ति लाभली; कारण तिच्यामुळें बंगालमधील क्रांतिकारकांच्या पहिल्या पिढीला स्फूर्ति मिळाली; या कादंबरींतूनच आपल्याला ' वन्दे मातरम् ' हें गीत मिळालें. यावरूनहि हेंच दिसतें कीं, वाङ्मय हें जनतेला सोडून जात नव्हतें; कला ही जनतेच्या सेवेला हजर होऊं लागली होती. जुन्या समाजरचनेच्या उच्छेदांतून निर्माण झालेले विग्रह, नव्यानें उदयास येत असलेल्या मध्यमवर्गीय कुटुंबाच्या परिस्थितींतील विग्रह, यांचें सटीक चित्रण करून हरीभाऊंनीं मराठी वाङ्मय समृद्ध केलें. अजून कामगारवर्गाला मात्र कुणीच पुरस्कर्ता मिळालेला नव्हता. कारण नव्या समाजाच्या

जीवनपटावर एक स्वतंत्र वर्ग या नात्यानें कामगारवर्गानें अद्याप आपला शिक्का उमटविलेला नव्हता. म्हणून वाङ्मयाच्या रंगभूमीवर त्याला स्थान मिळालें नव्हतें.

## स्वातंत्र्य भावनेचा कातर अविष्कार

हिंदुस्थानांतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा उदय, जागतिक भांडवलशाहीवरील अरिष्टांची वाढ व तिनें हिंदी राष्ट्रवादावर केलेला हल्ला, दडपशाहीचें सत्र व जनतेनें तिला बहिष्कार व संप वगैरेंच्या रूपानें दिलेलें उत्तर—इत्यादि ज्या महान् घटना पहिल्या जागतिक महायुद्धाच्या अखेरीपर्यंत घडत राहिलेल्या होत्या, त्या वाङ्मयांत प्रकट होणें अपरिहार्य होतें. दडपशाहीमुळें हें काम अवघड होऊन राहिलें होतें. शंकरमामंजीच्या जुलमाचें चित्र रंगविणाऱ्या लेखकाला फार तर सनातन्यांच्या हातचे चार धोंडे खावे लागले, पण कर्झनशाहीच्या जुलमाचें चित्र रंगविणाऱ्याला जन्मठेपेची कैद भोगावी लागली असती. म्हणून आमच्या लेखकांनीं क्लृप्त्या लढविल्या. त्यांनीं चालू काळांतल्या विषयांना पौराणिक वीरांचे व पौराणिक घटनांचे पेहेराव चढविले. त्यांनीं ऐतिहासिक घटना व पात्रें रंगवून त्यांच्या तोंडून प्रचलित आकांक्षा व व्यथा वदविल्या. खाडिलकरांच्या 'कांचनगडच्या मोहनें'तील प्रतापराव म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून राष्ट्रवादी देशभक्ताचा भावनोद्रेकच होता. त्यांचा 'कीचकवध' म्हणजे अगदीं मोघम व जवळ जवळ अदृश्य स्वरूपांत कर्झनशाहीला अनुलक्षून लिहिलेला होता. तरी त्यांत गुलाम स्त्रीवरील जुलमाचें वर्णन होतेंच; ही गुलाम-स्त्री एका काळची स्वतंत्र राणी ( द्रौपदी ) होती; राज्यसंस्थेचे दुष्ट राज्यकर्ते ( कीचक ) तिचा छळ करीत होते; आणि या दुष्टांची कत्तल गुलाम स्त्रीच्या बलशाली पतीनें ( भीमानें ) केली. या नाटकांत जुलमाचा नुसता उच्चार केलेला होता; तेवढें निमित्त घाबरट नोकरशाहीला पुरलें व तिनें हें नाटक जप्त केलें. ऐतिहासिक कादंबरीनें इतिहासांतील मराठे–मुसलमान झगड्याच्या द्वारा स्वातंत्र्याच्या झगड्याचें चित्रण करण्याचा प्रयत्न केला. पण या बाबतींत हा ऐतिहासिक दाखला वाचकांना प्रचलित स्वातंत्र्यलढ्याची जाणीव करून देण्याऐवजीं त्यांच्या जातीय भावना चेतवायला कारणीभूत झाला. म्हणून ऐतिहासिक कादंबरी ही जनतेची खरी गरज भागविण्याच्या बाबतींत अपेशी ठरली. अशा

प्रकारें युद्धजन्य अरिष्टाच्या काळांत व स्वातंत्र्याची चळवळ वाढीस लागावयाच्या काळांत आमचे नाटककार, कादंबरीकार व कवि यांनीं जनतेच्या वतीनें आपला आवाज उठवायचा प्रयत्न जरूर केला. मात्र हा आवाज अगदींच कोता होता; कारण या काळीं जनतेच्या चळवळीनें प्रचंड बहुजनसमाजाला अजून आपल्या कक्षेंत ओढलेलें नव्हतें आणि म्हणूनच तिला आपलें सटीक चित्रण करणारे कलावंत अजून निर्माण करतां आले नव्हते. जे या क्षेत्रांत अगोदरपासूनच होते त्यांनीं, एक दोन अपवाद वगळल्यास, राजकारणाकडे अगदींच अल्प लक्ष दिलें. त्यांना राजकीय लढे व तुरुंगाच्या वेड्या यांच्या धकाधकीपेक्षां सामाजिक कादंबरी, नाटक व काव्य यांतच जास्त गोडी वाटली. टिळकांना जेव्हां शिक्षा झाली तेव्हां मुंबईच्या कामगारांनीं तीन दिवसांचा राजकीय संप केला व नोकरशाहीच्या ताकदीला आव्हान दिलें. या जबरदस्त घटनेची दखल, एक अत्यंत आशादायक लक्षण, या नात्यानें लेनिननें घेतली. त्यानें लिहिलें कीं " हिंदुस्थानांतील कामगार वर्ग हा वर्गजागृत राजकीय सामुदायिक लढा चालवायला समर्थ होण्याइतका प्रौढ झाला हें अत्यंत आशादायक लक्षण होय...आशिया खंडांतील जनतेला लोकशाही जागृति आलेली आहे." पण ही महान् घटना व तिच्यांतून निघणारे निष्कर्ष यांचा आविष्कार त्या काळांतील एकाहि नांव घेण्याजोग्या वाङ्मयीन कृतींतून झाला नाहीं. मध्यमवर्गीय साहित्यिकांना श्रमजीवी जनतेच्या भावना-स्वरूपाचें दर्शन होऊं शकलें नाहीं.

## युद्धोत्तर कुचंबणा

चालू शतकाच्या सुरुवातीच्या काळांतील अरिष्टानें निर्माण केलेल्या परिस्थितीला अनुलक्षून वाङ्मयनिर्मिती करण्याच्या बाबतींत आपल्या लेखकांनीं कुचराई केली आणि ही कुचराई अजूनहि तशीच-किंबहुना पूर्वीपेक्षां जास्त वाईट स्वरूपांत- चालू आहे. महायुद्धोत्तर जगानें हिंदुस्थानला १९१८-२० व १९३०-३२ अशीं दोन अरिष्टें व दोन चळवळी यांचा अनुभव मिळवून दिला. श्रमजीवी जनता, कामगार, शेतकरी, मध्यम वर्ग हे करोडोंच्या संख्येनें या लढ्यांत सामील झाले, राजकीय दृष्ट्या जागृत झाले, आपल्या देशासाठीं व आपल्या वर्गासाठीं संघटना करूं लागले. पण हें महान् खळबळीचे कालखंड व यांतील घटना आपल्या वाङ्मयांत कुठें आहेत ? या घटनांचा आपल्या

वाङ्मयावर परिणाम येवढाच झालेला आहे कीं सामाजिक कादंबरींतील मध्यमवर्गाचे प्रश्न, रंग, व पवित्रा बदलला आहे. पण ही लक्षावधि जनता, हिचे विचार, हिच्या भावना, हिची हृदयव्यथा, यांचे प्रातिनिधिक असे स्वभावचित्रांचे नमुने मराठी वाङ्मयांत कुठें सांपडतात ? कुठेंच नाहींत. गडकऱ्यांनीं आपल्याला ज्या नायिका बहाल केल्या त्या आज्ञाधारक गृहदासींच्या पुतळ्या आहेत. खाडिलकरांचें गद्य सुधारलें, पण त्यांची प्रतिभा लोपली. कोल्हटकरांनीं नव्या ( भांडवलदारी ) समाजाच्या चष्म्यांतून हिंदु समाजावर तीच ती जुनी टीका चालू ठेवली. असहकारितेच्या चळवळीनें एका कादंबरीकाराला जन्म दिला. हा कादंबरीकार म्हणजे फडके. हे स्वतः एक असहकारवादी प्रोफेसर होते. फडक्यांनीं हें जाणलें कीं आतां ' वधू परीक्षा ' व ' पण लक्ष्यांत कोण घेतो ? 'चे दिवस राहिले नाहींत, आतां स्त्री ही पुढारलेली असून तिला नवीन दर्जा प्राप्त झालेला आहे. हरिभाऊंच्या काळाप्रमाणें मध्यमवर्गीय तरुण्यासमोर आपल्या बायकोशीं बोलण्याचा हक्क मिळविण्याचा प्रश्न नव्हता. आता तरुणांपुढें प्रीतिविवाहाचा नवा प्रश्न उभा राहिला; आणि हा प्रीतिविवाह केवळ कॉलेजमैत्रीच्या मार्गानेंच होऊं शकतो. म्हणून वयांत आलेली कॉलेज–कन्यका, गोड व नखरेल, फॅशनेबल व निर्व्याज, धिटुकली व लाजाळू, अशा स्वरूपांत फडक्यांच्या मार्फत कादंबरी-वाङ्मयांत आली. तिच्याच बरोबर कॉलेजकुमारहि आला. हा विषय तर नक्कीच नवीन व चांगला होता. पण फडके या मुलींना घेऊन जिथें बसले तिथेंच मुक्काम करून राहिले. फडक्यांच्या हिशेबीं या तरुणींमधें बदल अगर वाढ झालेलीच नाहीं. आजच्या जीवनांतील खऱ्याखुऱ्या कॉलेजकन्यकेला एका वेगळ्याच जागृतीची जाणीव आलेली आहे. पण आमच्या फडक्यांना त्याचें काय ! ते फक्त या पक्षांतून त्या पक्षांत, या शहरांतून त्या शहरांत, अशा खेपा टाकतात, त्याच त्या मुलीला निरनिराळ्या ठिकाणीं व निरनिराळ्या पक्षांतून वेगवेगळ्या नांवानीं नाचवितात आणि एकाचएक जुन्या ढंगाला नव्या नव्या प्रकारचे नमुने म्हणून लोकांपुढें ठेवतात. फडक्यांना आतां बदलत्या काळांतील खुद्द स्वतःच्या मध्यम वर्गांतल्या नवोदित मुलींचा स्वभाव देखील कळेनासा झाला आहे. अर्थनिर्मितीच्या बाबतींत आतां फडक्यांची उमेद खलास झाली; मात्र त्यांच्या सुंदर लेखनशैलीचें स्वरूप अजूनहि आपला आकर्षकपणा टिकवून राहिलें आहे. ही शैली–नव्या नमून्या प्रेमविषयाच्या साध्या सुटसुटीत

पाल्हाळरहित चित्रणाला अनुरूप अशी त्यांची नवथर शैली—त्यांची स्वतःची स्वतंत्र निर्मित आहे. दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं आतांशा फडके हे आपल्या शैलीचा उपयोग कसलाहि सडका माल साहित्याच्या बाजारांत खपविण्यासाठीं करूं लागलेसे दिसतात.

या अरिष्टांच्या काळांत आर्थिक व राजकीय लढ्याच्या रंगभूमीवर नव्या शक्ती उदयास आल्या. आपट्यांच्या 'काळ तर कठीण आला' या कथेंतला देशोधडीला लागलेला शेतकरी हा आतां लढाऊ कामगार होऊन पुढें आला, त्यानें आपल्या संघटनांची स्थापना केली, प्रचंड संपलढे चालविले व आपल्या स्वतःच्या राजकीय पक्षाची उभारणी केली. शेतकरी वर्गहि एक स्वतंत्र शक्ति या नात्यानें आगेकूच करून राहिला. या दलित व पिळल्या जाणाऱ्या वर्गापैकीं एकालाहि कलेच्या क्षेत्रांत जागा मिळाली नाहीं. सोळाव्या शतकाच्या उज्वल परंपरेकडे आपल्या लेखकानीं पाठ फिरविली.

येवढ्यावरच भागलें नाहीं, जनजागृतीच्या वाढत्या लाटेनें सर्वांच्याच मनांत राष्ट्राभिमानाची भावना निर्माण केली. जरी समाजाच्या कांहीं मागासलेल्या थरांमध्यें या जागृतीला संकुचित जातीय स्वरूप आलें, तरी सर्व प्रवृत्तींची एकजूट करून स्वातंत्र्यासाठीं एक प्रचंड राष्ट्रीय लोंढा निर्माण करण्याऐवजीं आमचे कांहीं लेखक प्रतिगामी प्रवृत्तींच्या आहारीं गेले व त्यांनीं जनतेची पिळणूक करणाऱ्या व सत्तारूढ वर्गाच्या जातिनिष्ठेची उघड उघड अगर प्रच्छन्न बाजू घेतली.

इंग्रजांनीं हिंदुस्थान जिंकल्यामुळें व भांडवलशाहीनें जागतिक बाजारपेठ स्थापन केल्यामुळें हिंदुस्थानचा सवत्यासुभ्याचा संसार नष्ट झाला व अवघ्या जगांतील जनतांशीं हिंदुस्थानचा संबंध जोडला गेला. आपल्या भोंवतीं सेन्सॉर-शिपची भिंत उभारलेली असली तरी सुद्धां दरेक देशांतील जनता आपल्या स्वातंत्र्यासाठीं कशी तळमळत आहे याची जाणीव आम्हांला होतेच होते. या अनेक देशांतील श्रमजीवी लोक हे आपले नैसर्गिक दोस्त आहेत; कारण त्यांचा व आपला दुःखकर्ता सत्ताधारी वर्ग एकच आहे. पण आमच्या लेखकांवर या बंधुभावाचा कांहींच परिणाम झालेला नाहीं; हा बंधुभाव त्यांना जाणवलेला नाहीं, जागतिक स्वातंत्र्यासाठीं जनतेची सक्रिय एकजूट करण्याचा मार्ग सुकर करण्याच्या दृष्टीनें त्यांनीं या बंधुभावाचा पुनःप्रत्यय आमच्या जनतेला आणून

दिला नाहीं. चिनी आत्म्याचें पुनर्दर्शन पर्ल बक अमेरिकन लोकांना करून देते. आपली व चिनी संस्कृति या दोन्ही एक असतांही आपण मात्र चिनी संस्कृतीचा परिचय भाषांतरांच्या द्वारा सुद्धा आमच्या जनतेला करून देऊं शकत नाहीं. आपल्याला जर स्वतंत्र व्हायचें असेल तर आपला हा अलगपणा गेलाच पाहिजे.

गेल्या महायुद्धांतली सर्वांत जबरदस्त घटना म्हणजे रशियन राज्यक्रांति, तद्भूत सोवियत युनियनची वाढ, तिथे उदयास आलेलें एक नवें सांस्कृतिक जग—या बाबतींत आपले लेखक अगदीं थंडगार व अज्ञानीच राहिले आहेत; आणि म्हणून समाजवादाच्या व जागतिक स्वातंत्र्याच्या या बालेकिल्ल्याकडे नाझी दृष्टीनें पाहणाऱ्यांच्या ते सहज आहारीं जात आहेत.

यावरून असें दिसून येतें कीं मराठींत आरंभीं आरंभीं जनतेच्या जीवनाशीं समरस अशी वाङ्मयनिर्मिति झाली; आणि पुढें पुढें इकडचे तिकडचे बारीक सारीक अपवाद वगळल्यास मराठी वाङ्मयानें जीवनाशीं व वास्तवतेशीं काडीमोडच केली. राजकारणाला आपलें वाङ्मय घाबरलें. शौर्यशाली लढ्यांकडे आमच्या वाङ्मयानें दुर्लक्षच केलें. आणि पुढें जेव्हां एकेक घटना भराभर घडूं लागल्या व अरिष्ट तीव्रतर व जास्त गुंतागुंतीचें होत गेलें तेव्हां आपलें वाङ्मय कुजलेल्या डबक्यांत जिथल्या तिथें अडकून बसलें.

## ‘ नवमतवाद ’

आतां पौराणिक अगर ऐतिहासिक क्लृप्त्यांची मदत मुळींच होण्याजोगी नव्हती. एकंदर चळवळ व जनता या क्लृप्त्यांच्या कितीतरी पुढें गेलेली होती. म्हणून नव्या वाङ्मयाला आपले विचार उघडपणें मांडणें भाग होतें. या नव्या वाङ्मयानें ‘ नवमतवाद ’ हें नांव देखील स्वतःला लावून घेतलें. हें नांव म्हणजे विचाराच्या व कलेच्या क्षेत्रांतील अराजकतेचें व कुजलेल्या डावाचें समर्थन करण्यासाठीं म्हणून धारण केलेलें एक नुसतें लेबल होतें. या नव्या वाङ्मयाचा असा दावा होता कीं हें जनतेला अभिमुख होऊन लिहिलेलें आहे, कामगारांना व शेतकऱ्यांना अभिमुख होऊन लिहिलेलें आहे, नवमतवाद्यांनीं कल्पिलेल्या समाजवादाच्या तत्वज्ञानाला अभिमुख होऊन लिहिलेलें आहे. जुन्या पिढींतल्या लेखकांना आपल्या विद्वत्तेचा अभिमान असे. या नव्या लेखकांना आपण कसल्याहि विद्वत्तेपासून पूर्ण अलिप्त आहोंत याचाच अभिमान वाटूं लागला.

यांच्या ह्या " कामगारवर्गाला व समाजवादाला अभिमुख होण्याचे " एकेक दाखले लवकरच आपल्याला मिळूं लागले. सवंग शृंगार, अलल्डूरची भाषणबाजी, दारिद्र्य व पिळवणूक यांबद्दल कांहींतरी बाष्कळ बकवा, पोलिसांचें थोडेंसें प्रदर्शन, जराशी दगडफेक, आणि " सोशालिस्ट अगर कम्युनिस्ट नायकाचा " एक लहानसा प्रेमगोंधळ—हेंच काय तें या नवमतवाद्यांचें भांडवल. फडके, खांडेकर, माडखोलकर, वरेरकर, हडप व इतरहि अनेक लेखकांनीं नव्या वळणानें जाण्यासाठीं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. हा नवा वर्ग, ही नवी शक्ति, या वर्गाच्या भावना, या वर्गाचे लढे—हे समजून घेण्यासाठीं या लेखकांनीं जंगजंग पछाडले. पण नुसत्या प्रामाणिक इच्छेच्या जोरावर आपल्याला जीवनाची वास्तवता दिसूं शकतेच असें नाहीं. या लेखकांनीं आपले मध्यमवर्गीय नमुनेच आपल्याबरोबर कामगारवर्गात आणले आणि त्यांनीं या नमुन्यांना नुसतीं कामगारांचीं नावें चिकटविलीं. स्वतःच्या कलेला नवी कलाटणी देण्याऐवजीं त्यांनीं कामगार वर्गालाच स्वतःच्या कलेची सोय जुळेल अशी कलाटणी दिली. हें नवें वाङ्मय अर्थातच हास्यास्पद व अपेशी ठरलें. नव्या वाङ्मयाला कुजलेल्या डबक्यांतून बाहेर पडतां आलें नाहीं.

याचें कारण उघड आहे. या लेखकांनीं जेव्हां आपल्या जीवनाला सुरवात केली तेव्हां व्यक्तिस्वातंत्र्यवादी दृष्टीनें जगाकडे पाहणारा अत्यंत कर्तबगार व जागृत असा मध्यमवर्ग हा एकटाच त्यांच्यावर छाप पाडायला होता. पुढें अरिष्ट आलें; प्रत्येक वर्गाला प्रत्यक्ष कृतीच्या द्वारा आपल्या भूमिकेबद्दल वाढती जागृति व स्पष्ट जाणीव होऊं लागली; नवे वर्ग, नव्या शक्ति, नवे पक्ष, नव्या कल्पना पुढें आल्या. आमच्या लेखकांना या नव्या क्षेत्रांत नवी निवड करतां येईना. त्यांचे ऋणानुबंध, त्यांचा अनुभव व त्यांचीं सामाजिक बंधनें यांच्या योगानें ते जुन्या जगाशींच समरस होऊन राहिले; पण त्यांचा हेतु मात्र एकटाच नव्या जगांत मुशाफरी करायला गेला. वर्धिष्णु इतिहासाकडे न पाहतां केवळ कल्पनेच्या जोरावर त्यांना नव्या जगाची सोबत करायला हवी होती. हें करायचें म्हणजे त्यांना जुनें जीवन परत नव्यानें जगावें लागणार होतें. हें त्यांच्या हातून झालें नाहीं. म्हणून ते नव्या वाङ्मयाच्या बाबतींत अपेशी ठरले. नव्या जनतेनें येवढे शौर्यशाली लढे केले; पण या लेखकांनीं आपल्या वाङ्मयांतील क्षुद्र प्रणयी युग्मांना आपल्या प्रेमाची परिपूर्ति करण्याचें केवळ एक निमित्त या दृष्टीनेंच

या सगळ्या लढ्यांचा विचार केला. पूर्वी यांचीं प्रणयी युग्में बंड गार्डनमध्यें अगर मलबारहिलवर आपलें प्रेमकूजन करीत असत. नव्या वाङ्मयानें आतां फक्त भौगोलिक फरक केला व आपल्या प्रणयी युग्मांना जसेंच्या तसें तेथून उचलून परळ अगर मुळशीमध्यें कूजनासाठीं नेऊन उभें केलें. बस्स, दुसरें तिसरें यांनीं कांहींएक केलें नाहीं. दलित जनतेवर जुलूम होतो तो केवळ आपल्या कवितांमध्यें व कादंबऱ्यांमध्यें भडक रंग भरण्यासाठींच होतो अशी यांची भावना. लक्षावधि जनतेची ताकद, तिच्यांतली एकजूट, तिचा उदात्तपणा, तिचें शौर्य, तिची कर्तबगारी, तिचा आशावादीपणा, तिची निष्ठा, विजय मिळवायचा तिचा निर्धार—या एकूणएक गुणांची आपल्या कलावंतांना दादसुद्धां नाहीं. वाङ्मयांत प्रेम-कथेला स्थान हें असलेंच पाहिजे आणि तें राहणारच. पण तिचाच व्याप वरचढ होतां कामा नये. माझ्या म्हणण्याचा भावार्थ काय आहे हें जर प्रत्यक्ष पाहायचें असेल तर गोर्की, शोलोकोव वगैरेंपैकीं कुणाचेंहि वाङ्मय चाळून पहा.

मात्र त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट येवढीच कीं यांतल्या बहुतेक प्रामाणिक लेखकांना आपल्यांतल्या या उणीवेची जाणीव आहे. पण यांतले जे अप्रामाणिक लेखक आपली ही उणीव कबूल करायला तयार नाहींत ते आपल्या दगलबाजीचें समर्थन करण्यासाठीं भलत्याच सबबी शोधून काढतात. एक म्हणतो कीं समाजवाद हा कलाविलासाला स्फूर्तिदायक विषय होऊं शकत नाहीं. कारण काय? तर म्हणे सोवियत युनियनमध्यें देशद्रोही घातवाल्यांना देहान्त शिक्षा देण्यांत आल्या व समाजवाद्यांमध्यें अनेक पक्षभेद आहेत! जणूं काय या दगलबाजांच्या वर्गांत गोळ्या घातल्याचे प्रकार कमीच घडतात! आणि घडतात ते सुद्धां खासगी सूड घेण्यासाठीं घडतात आणि ते उजेडांत नव्हेत, तर अंधारांत! आणि समाजवाद हाच तेवढा कलेचा विषय झाला पाहिजे, असा आग्रह कोण करीत आहे? आमचें म्हणणें एवढेंच आहे कीं, या लक्षावधि जनतेकडे जरा डोळे उघडून बघा. ही जनता कशी राबते? हिच्या भावना काय आहेत? ही लढते कशी? आपली ताकद वाढवून स्वातंत्र्यासाठीं झगडते कशी? पिळवणुकीनें व गांजवणुकीनें नाडली जात असतांना सुद्धां हिच्या अंगीं इतकी तडफ येते कशी? हें सगळें बघा आणि तुम्हांला शक्य झालें तर हिच्याबद्दल लिहा. आणि तुम्हीं जर आपल्या कलेच्या द्वारा या जनतेचें खरेंखुरें सजीव चित्रण

केलें तर तुम्हीं आपल्या वाङ्मयांत कुणाच्या तोंडून कम्युनिस्ट जाहीरनामा बिनचूक वदविला कीं नाहीं याबद्दल आम्हीं तुम्हांला एका शब्दानेंहि विचारणार नाही. आमचें म्हणणें येवढेंच कीं तुम्हीं जनतेच्या अनुरोधानें आपलें चित्रण बनवा. तुमच्या चित्रणाच्या अनुरोधानें जनतेचा मुखवटा चिदारूं नका. म्हणजेच ही कुचंबणा संपेल. हें जर तुम्हाला साधत नसेल तर शरदबाबूंच्या शब्दांत सांगायचें म्हणजे, तुम्ही श्रमिकांच्या वाटेलाच जाऊं नका, श्रमिकांचे स्वतःचे स्वतंत्र कलावंत आतां पुढें येत आहेत, ते या जनतेचें वाङ्मय निर्माण करतीलच, तुम्ही नका या फंदांत पडूं !

## मराठी साहित्यांतील अरिष्ट

आमच्या वाङ्मयांतलें अरिष्ट हें नात्सीवादाच्या उदयानंतर व जागतिक महायुद्ध सुरू झाल्यावर तर भलत्याच थराला जाऊन पोचलें आहे. नात्सीवाद हा ब्रिटीश साम्राज्यविरोधी आहे अशी चुकीची समजूत करून घेऊन आमच्यांतल्या कांहीं लेखकांनीं या विचारसरणीचें प्रच्छन्न कौतुक केलें. केसरीगटासारख्या कांहींनीं तर आपल्या संस्थापकाचा राजकीय जहालपणा सोडून दिला व त्याचा सामाजिक प्रतिगामीपणाच तेवढा उचलून धरला; आणि ' धर्माला धोका आला आहे ' अशी हांकाटी करून आपण जनतेला आपल्याकडे ओढून घेऊं अशा अपेक्षेनें त्यांनीं उघडउघड प्रतिगामी जातिनिष्ठेचा पुरस्कार चालविला.

या अवाढव्य जागतिक लढ्याच्या सर्व स्वरूपाचें आकलन आपल्या लेखकांना अजीबात झालेलें नाहीं. यांच्यांतल्या एका गटानें मात्र राष्ट्रवादाचा पुरस्कार आपल्या वाङ्मयात उघड उघड केला आहे. या बाबतींत या गटानें जीर्ण साहित्यिकांच्या मानानें प्रगतीच केली आहे असें म्हणावें लागतें. कारण जीर्ण साहित्यिक आपल्या साहित्यपरिषदांतून राजकारणाला मज्जावच करूं लागले व कलेची प्रचारकी भूमिका अमान्य करीत राहिले.

राजकारणाचा व जनतेच्या जीवनाचा अविष्कार कलेच्या द्वारा करायचा म्हणजे तो कलेच्या नियमांना धरूनच व्हायला पाहिजे हें निःसंशय. अविष्कृतीच्या क्षेत्रांत कलावंत हा पूर्ण स्वतंत्रच असतो; या बाबतींतले नियम त्याचे त्यानेंच बसवायाचे असतात, ते त्याचा तोच प्रत्यक्ष लेखनाच्या द्वारें तयार करीत असतो. पण या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून त्यानें आमच्या राजकारणाचे हाल

करतां कामा नयेत; आमच्या राजकारणाला ओंगळ स्वरूप द्यायचें, अगर त्याचें होत्याचें नव्हतें करायचें अगर तें विकृत स्वरूपांत वर्णन करायचें–असलें कांहीं करतां कामा नये. असें करणें म्हणजे कला नव्हे–तर कलेची अधोगती. जातिनिष्ठ व बिनपुरोगामी लेखकांनीं हा अधोगतीचा गुन्हा केलेला आहे.

आमच्यांतले पुरोगामी लेखक सुद्धां अरिष्टाच्या कचाटींत सांपडले आहेत. यांतले कांहींजण ९ ऑगस्ट नंतरच्या घटनांतील 'राष्ट्रवादाचा' पुरस्कार करतात. ही भूमिका घेऊन हे लेखक कुणावर हल्ला चढवितात? तर ज्यांनीं जनतेला सर्वनाशांतून वांचवायची खटपट चालविली आहे, ज्यांनीं राष्ट्राला नात्सीवादाच्या तावडींतून सोडविण्याची खटपट चालविली आहे, उपासमारी व आर्थिक अंदाधुंदी यांपायीं ओढवणाऱ्या मरणांतून जनतेचा बचाव करायचें काम चालविलें आहे, त्यांच्यावर हे लेखक हल्ला चढवितात. खरें म्हटलें तर यांतले कांहीं तथाकथित 'राष्ट्रवादी' लेखक डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्टखालीं स्वतःचें वांझोटेपण लपविण्यासाठीं केवळ एक बुरखा म्हणून राष्ट्रवादाचा उपयोग करीत आहेत; अगर ज्या लक्षावधि जनतेच्या भावना यांना आकलन झाल्या नाहींत, तिच्यावरच अगर सोवियत युनियनवर आणि जागतिक जनतेवरच हे राष्ट्रवादाच्या नांवानें हल्ला चढवीत आहेत. खऱ्या राष्ट्रवादाच्या बाबतींत हे लेखक पूर्वींप्रमाणेंच बधिर राहिले आहेत हें प्रत्यक्ष वस्तुस्थितीवरूनच उघड दिसत आहे; त्यांच्या "ऑगस्ट क्रांती"नें एकाहि स्फूर्तिदायक कवितेला जन्म दिला नाहीं, राष्ट्राच्या प्रसववेदनांचें एकहि प्रभावशाली चित्रण या क्रांतीनें जन्मास घातलें नाहीं. या लेखकांच्या गद्यलेखनांत अगर युद्धविरोधी वाङ्मयांत जनतेला स्फूर्ति देणाऱ्या, जनतेला मार्ग दाखवून धीर देणाऱ्या, खऱ्या कलेचा, खऱ्या भावनेचा, अल्पांशसुद्धां नाहीं. आमचे हे कुजलेल्या डावाचे कलावंत कलेच्या क्षेत्रांत मूक झाले आहेत, पण हीन अभिरुचीची टीका करण्यांत व कम्युनिस्टविरोधी जाहीरनामे रचण्यांत मात्र अतिवाचाळ बनले आहेत.

## जनतेचे नवे कलावंत

जे हिंदुस्थानांतील व जगांतील जनतेच्या जीवनाशीं समरस झाले

आहेत त्यांच्याकडे कलेनें आतां धांव घेतली आहे. अत्यंत स्फूर्तिदायक नाटिका, कविता व लघुकथा ह्या आतां कामगारवर्गीय लेखकांच्या लेखणींतून उतरूं लागल्या आहेत. अठराव्या शतकांत लुप्त झालेला शौर्यशाली पोवाडा हा आतां आमचे कामगार-शाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या 'स्टालिनग्राड'च्या पोवाड्याच्या रूपानें एकाएकीं पुन्हां अवतरला आहे. स्टालिनग्राडचा लढा हा कामगारवर्गाच्या जीवनाचा व रक्ताचा लढा आहे. म्हणूनच कामगारवर्गाच्या एका पुत्राला तो खरी काव्यस्फूर्ति देऊं शकला. फॅसिस्ट जपान्यांचे अत्याचार हे बंगालमधील व दक्षिण हिंदुस्थानांतील लक्षावधि जनतेला खरेखुरे जाणवतात. म्हणूनच या प्रांतांतील जनतेचा राष्ट्ररक्षणाचा व विजय मिळवायचा निर्धार काव्य, नृत्य, लघुकथा इत्यादींच्या रूपानें जनतेचा कलावंतांच्या हातून प्रस्फुरित झाला आहे. हा प्रवाह अद्याप लहानच आहे; अजून तो राष्ट्रव्यापी झालेला नाहीं. पण जनतेची कला व जनतेचें वाङ्मय यांचा पत्ता कुठें लागेल व तो तिथेंच कां लागेल हें यावरून दिसून येतें. इतिहासाच्या जबरदस्त झाडूनें पूर्वी जसें जीर्ण पंडितांना भिरकावून दिलें तसें या झाडूनें आपण भिरकावले जाण्यापूर्वी आपण वेळींच आपली चूक कशी दुरुस्त करायला पाहिजे, हें या नवोदित कलाकृति सुचवितात.

आपल्या वाङ्मयाच्या सर्व शाखांचा व त्यांतील सर्व विचारप्रवाहांचा तपशीलवार परामर्ष घेणें मला येथें शक्य नाहीं. आजच्या घटकेला काय करायला पाहिजे, जनतेची गरज काय आहे, कलावंतांकडून आज जनता कशाची मागणी करते, तेवढेंच मी सांगत आहें. फॅसिस्ट पंचमदळी, धान्यदडवे नफेबाज व दुष्काळ यांचा प्रतिकार करून जनतेचें रक्षण करणें, जनतेची एकजूट करणें, प्रत्येक राष्ट्रगटाला आपापल्या परीनें ही एकजूट घडवून आणण्यासाठीं पूर्ण स्वातंत्र्य देणें, आणि अशा रीतीनें आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मोर्चा लावणें—हीं आजचीं कामें आहेत. जनता आपल्या कलावंतांपुढें अशी मागणी करीत आहे कीं या कार्याचें चित्रण कलेच्या वेगवेगळ्या स्वरूपांत करून दाखवा, जनतेच्या या पवित्र भावनांचें चित्रण लेखणीनें व कुंचल्यानें करून तिला स्फूर्ति द्या, जनतेची एकजूट करा, जनतेला युद्धोन्मुख करा. असें आपण करूं तरच आपण आपल्या मराठी वाङ्मयाची थोर परंपरा चालवायला लायक ठरूं.

## पुरोगामी साहित्यिकांचें कर्तव्य

माझ्या म्हणण्याचा आशय मी चार दोन उदाहरणें देऊन स्पष्ट करून दाखवितों. आम्हांला जी ऐतिहासिक कादंबरी पाहिजे ती खऱ्या इतिहासाला धरून असणारी पाहिजेः तिच्यांत जनता व जनतेचे नायक हे एकजुटीनें जुलमाविरुद्ध लढत असले पाहिजेत; तींत नायक हाच काय तो इतिहासाचा कर्ताकरविता असतां कामा नये. अमेरिकन स्वातंत्र्ययुद्धाचें चित्रण खऱ्या रीतीनें करणाऱ्या "रॅबल इन आर्म्स" ("हत्यारबंद बाजारबुणगे") या कादंबरीसारखी ऐतिहासिक कादंबरी असली पाहिजे. तसेंच आमचे राहुल सांकृत्यायन यांनीं आपल्या "वोल्गा से गंगा" या ग्रंथांत ज्या प्रकारें कलामय कथांच्या द्वारें युगांयुगांतील सामाजिक फेरफारांचें वर्णन केलें आहे. तशा प्रकारचें वर्णन आम्हांला पाहिजे; हा ग्रंथ म्हणजे आजच्या काळांतील अत्यंत प्रभावशाली असा वाङ्मयप्रकार आहे. कोणत्याहि देशी भाषेंत या ग्रंथांच्या तोडीचा ग्रंथ निर्माणच झालेला नाहीं. या ग्रंथाचे लेखक राहुलजी हे महापंडित, इतिहासकार, बौद्ध वाङ्मयाचे थोर विद्वान् असे कम्युनिस्ट आहेत आणि ते या ग्रंथांत एका कलावंताचें रूप घेऊन आपल्यापुढें आले असून त्यांत; त्यांनीं युगांयुगांतील दलित व पिळल्या जाणाऱ्या जनतेचें भावजीवन विशद करून दाखविलें आहे. राजकीय कादंबरी म्हणाल तर ती कशी पाहिजे याचा दाखला म्हणून स्टाइनबेक या अमेरिकन लेखकाच्या "दि मून इज डाऊन" ( चंद्र मावळला ) या कादंबरीचा निर्देश केला म्हणजे माझें काम झालें. मराठी वाङ्मयांतील राजकीय कादंबरीला मध्यमवर्गीय दहशतवाद्याचें चित्रण करण्याच्या बाबतींत सुद्धां शरदबाबूंच्या "पथेर दाबी"चें उच्च शिखर कधींच गांठतां आलेलें नाहीं. आमच्यांतल्या कांहीं लेखकांनीं गुप्तपोलिसांच्या चातुर्य-कथांतले व स्टंट बोलपटांतले देखावे उचलून घेऊन त्यापासून आपली राजकीय कादंबरी बनविलेली दिसते. अर्थात् या लेखकांचा खुद्द स्वतःचा मध्यम वर्गदेखील असलें वाङ्मय आपलेंच चित्र आहे असें म्हणायला स्वाभाविकपणेंच कबूल नसतो. दलित मानवतेंतला जो सगळ्यांत मोठा समूह म्हणजे स्त्री ( मग ती कोणत्याही वयाची असो ) तिला बोलती करण्याच्या बाबतींत आपल्या मराठींतील आजची सामाजिक कादंबरी, कविता व नाट्यकृति हीं सगळीं सपशेल अपेशीं ठरलेलीं आहेत. विजोड विवाह, प्रेमभंग, घरगुती तंटे इत्यादि घटनांचा उपयोग कलेचे

विषय म्हणून करण्यांत आलेला आहे, नाहीं असें नाहीं. पण एखाद दुसरा अपवाद वगळल्यास या कृतींतल्या एकींतून देखील खऱ्या स्त्रीहृदयाचें दर्शन जनतेला घडलेलें नाहीं. या बाबतींत कादंबरीकारांनीं कलानिर्मिति या नात्यानें काम करण्याऐवजी निबंधकार अगर डॉक्टरी धाटीनें काम केलें आहे. या बाबतींत बंगाली कादंबरीच्या मानानें आपण कित्येक मैल मागे पडलेले आहोंत. आपल्या पुरोगामी लेखकांना शरद्बाबूंच्या "शेष प्रश्न" या कादंबरीसारखी कलाकृति निर्माण करण्याची लायकी अंगीं आणण्यापूर्वी स्वतःच्या वृत्तींत आमूलाग्र बदल करून घ्यावा लागेल. आमच्या कलावंतांना शौर्यशाली कामगार स्त्रीच्या अस्तित्वाची अजिबात दखलसुद्धां नाहीं. शेतांतून व कारखान्यांतून चाललेल्या आपल्या राजकीय व आर्थिक लढ्यांमध्यें शेकडों स्त्रियांनीं मर्दुमकी गाजविलेली आहे; पण आमच्या लेखकांनीं उभारलेल्या निर्विकारतेच्या व कल्पनाशून्यतेच्या दगडी भिंतीनें या स्त्रियांना जनतेच्या नजरेसमोर येऊंच दिलेलें नाहीं. आपल्याला जर स्वातंत्र्ययुद्ध जिंकायचें असेल तर आपण या स्त्रियांना कलासृष्टींत ताबडतोब आणलें पाहिजे. "योजनाबद्ध आर्थिक पद्धतींतल्या भावी हिंदुस्थानची" कल्पनागम्य चित्रें सादर करण्याचें काम तुम्ही कांहीं काळ केलें नाहीं तरी चालेल.

जागतिक वाङ्मयानें आपल्यापुढें कलानिर्मितीचे येवढे उत्तुंग नमुने उभे करून ठेवले आहेत कीं त्यांची आपल्या भाषेंत आपल्या जनतेच्या सेवेप्रीत्यर्थ प्रतिनिर्मिति करण्यासाठीं आपल्याला फार कसून मेहनत करावी लागेल. यासाठीं आपण लेखकांची एक शिस्तनिष्ठ संघटना तयार केली पाहिजे. आपणांपैकीं अनेकांना ज्ञानाबद्दल जो तिरस्कार वाटतो तो त्यांनीं सोडून दिला पाहिजे; कला ही भावजीवनाच्या पोकळींतून सहजगत्या निर्माण होते ही कल्पना आपण टाकून दिली पाहिजे. कलावंत हे अलग अलग असे परमाणु आहेत, ते एकमेकांपासून व सर्वांपासून अलग असतात, ही कल्पना आपण आपल्या डोक्यांतून काढून टाकली पाहिजे. आपण सुस्पष्ट ध्येये पुढें ठेवलीं पाहिजेत. व हीं ध्येयें कलानिर्मितीच्या मार्फत जनतेला सादर करण्यासाठीं आपली एक संघटना असली पाहिजे. तरच आपल्याला जुलमांचा व हालअपेष्टांचा "अचलायतन" छिन्नभिन्न करण्याचें कविवर्य टागोरांचें स्वप्न खरें करून दाखवितां येईल, आणि स्तालिनग्राडच्या शौर्याचें पोवाडे गायला आपण लायक होऊं. हीं कार्यें आपल्याला पार पाडतां येतील व

तीं आपण पार पाडलीं पाहिजेत. तरच लेखक व कलावंत हे "मानवतेच्या भावजीवनाचे इंजिनिअर्स (कारागीर)" असतात, या कॉ. स्तालिनच्या व्याख्येंत बसायला आपण लायक ठरूं.

• • •

# अमळनेरच्या हत्याकांडाची चौकशी करा !

*मुंबई प्रांतिक असेंब्लींत ता. ५-९-४६ रोजीं सभा तहकुबीच्या ठरावावर कॉ. डांगे यांनीं केलेलीं भाषणें*

[१]

**अध्यक्ष (श्री. फिरोदिया)**: तहकुबीच्या ठरावावर आतां चर्चा होईल. सभासदांनीं कृपा करून लक्ष्यांत ठेवावें कीं अशा ठरावांवरील भाषणांना वेळेची मर्यादा असते. कोणतेंहि भाषण १५ मिनिटांपेक्षां जास्त लांबतां कामा नये. हें लक्ष्यांत ठेवून सभासदांनी आपलीं भाषणें करावीं.

**कॉ. डांगे** (मुंबई व उपनगर गिरणी कामगार यूनियन्सचे प्रतिनिधि): अध्यक्षमहाराज, मी मांडलेला ठराव सभासदांना यापूर्वीच कळला आहे. या ठरावाच्या द्वारें मी सध्यां अधिकारारूढ असलेल्या सरकारविरुद्ध कांहीं स्पष्ट आरोप करणार आहे.

**डॉ. अंत्रोळीकर**: सभागृहाचा असा रिवाज आहे कीं सभागृहाच्या माहितीसाठीं ठराव प्रथम वाचण्यांत यावा.

**कॉ. डांगे**: याची आठवण करून दिल्याबद्दल मी डॉ. अंत्रोळीकरांचे आभार मानतों. मला वाटलें कीं अध्यक्षांनीं ठराव वाचला असल्यामुळें सभासदांना तो कळला आहे! तरीहि जे सभासद तो विसरून गेले असतील त्यांची आठवण ताजी करण्यासाठीं मी तो पुनः वाचून दाखवितों.

"अमळनेर येथें संपावर असलेल्या कामगारांवर ता. २७ ऑगस्ट १९४६ रोजीं पोलिसांनीं असमर्थनीय, बेछूट व सूडबुद्धीचा गोळीबार केला व त्यामुळें ९ कामगार मृत्यु पावले आणि कित्येक कामगारांना गंभीर दुखापती झाल्या, ह्या निकडीच्या सार्वजनिक महत्त्वाच्या विशिष्ट प्रश्नावर चर्चा करण्या-साठीं ह्या सभागृहाचें काम तहकूब करण्यांत यावें."

या प्रकरणाचा खरा इतिहास मी सभागृहापुढें मांडूं इच्छितों. अमळनेरमध्यें एकाच मालकाच्या दोन गिरण्या आहेत. त्यांपैकीं एका गिरणींत संप झाला. या गिरणीमालकाची कीर्ति अशी आहे कीं तो दानशूर गृहस्थ आहे, एवढेंच नव्हे तर तो तत्त्ववेत्ताहि आहे! त्याचे सत्पुत्र श्री. बाबूशेट सध्यां या गिरण्यांची व्यवस्था पाहात असतात! या दोन गिरण्यांपैकीं एका गिरणींतील कामगार संपावर होते व ता. २७ ऑगस्ट रोजीं त्यांच्यावर गोळीबार करण्यांत आला. मी म्हणतो कीं हा गोळीबार असमर्थनीय, बेछूट व सूडबुद्धीचा होता. 'सूडबुद्धीचा' हा शब्द मुद्दाम वापरला आहे व त्याला विशेष अर्थ आहे.

या ठरावाची वासलात काय लागणार हें काँग्रेस पक्षाच्या सभासदांवर अवलंबून असल्यामुळें त्या पक्षाच्याच तत्त्वांच्या आधारें मी या ठरावाचें विवरण करीन. मी प्रथम असा प्रश्न विचारतों कीं, तो संप कायदेशीर होता का? काँग्रेस सरकारनें मजूरविषयक धोरणासंबंधी केलेल्या एका निवेदनांत असें म्हटलें आहे कीं कायदेशीर संपांना संरक्षण मिळेल. हा संप कायदेशीर असल्यामुळें त्याला संरक्षण मिळावयास हवें होतें. कन्सीलिएशनचें कामकाज अयशस्वी झाल्यानंतर संपाची नोटीस देण्यांत आली. ता. २३ जुलै रोजीं संपाची नोटीस बजावण्यांत आली, आणि नोटिशीची मुदत संपण्याच्या एक ताससुद्धां अगोदर संप झाला नाहीं. ता. ७ ऑगस्ट रोजीं संप झाला. ह्या कायदेशीर संपाला मिळालेलें संरक्षण म्हणजे गृहमंत्र्यांचा १४४ कलमाखालील हुकूम! मंत्रिमंडळानें कायदेशीर संपाला दिलेलें संरक्षण हेंच!

**श्री. मुरारजी देसाई** : (गृहमंत्री) हा हुकुम गृहमंत्र्यांनीं काढला नव्हता, डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें काढला होता.

**कॉ. डांगे** : गृहमंत्री स्वतःच्या डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें काढलेल्या हुकुमाबद्दल जबाबदार नसतात ही गोष्ट आतां आम्हांला कळली! आनंद झाला! छान! [ हंशा. ]

मी सांगत होतों कीं कायदेशीर संपाला जें संरक्षण देण्यांत आलें तें हेंच होय.

आतां काँग्रेस सरकारच्या धोरणाच्याच आधारें दुसरा प्रश्न विचारतां येईल तो असा कीं, कामगारांनीं संपाचा अवलंब करण्यापूर्वी आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं पुरेशी सहनशीलता दाखविली होती का?

हो, कामगारांनीं आपल्या गाऱ्हाण्याची दाद लावून घेण्यासाठीं पुरेशी सहनशीलता दाखविली होती. अमळनेरच्या गिरणींतील रोव्हींग खात्यांतल्या एका कामगाराला काढून टाकण्यांत आलें व त्यामुळें भानगड सुरू झाली. त्या कामगाराला ता. २ फेब्रुवारी १९४६ रोजीं काढून टाकलें. त्याला काढून टाकण्याची नोटिस दिली नव्हती. आपणाला परत कामावर घ्यावें अशी त्यानें मागणी केली. ता. १५ फेब्रुवारीपर्यंत सतत १२ दिवस तो गिरणींत जात असे व काम मागत असे, पण त्याला काम देण्यांत आलें नाहीं. मग यूनियननें नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें नोटिस दिली. लेबर ऑफिसर तेथें गेला व त्यानें सुचविलें कीं त्या कामगारानें माफी मागावी. माफी कशाबद्दल? त्या कामगाराला काढून टाकल्याची नोटिस मिळाली नव्हती, त्याला कायदेशीर रीत्या काढून टाकलें नव्हतें. त्याला काढून टाकण्याच्या कारवाईमागें अनेक कारणें होतीं. आपणांला येथें त्यांची चर्चा करण्याची जरूरी नाहीं. आपण लक्ष्यांत घेतला पाहिजे तो मुद्दा हाच कीं त्या कामगाराला कायदेशीर रीत्या काढून टाकलें नव्हतें, त्याच्यावर नोटिस बजावली नव्हती, आणि अशा परिस्थितींतच लेबर ऑफिसर तेथें गेला व त्यानें मागणी केली कीं या कामगारानें मालकाची माफी मागितली पाहिजे. लेबर ऑफिसर म्हणाला कीं या कामगारानें आपण होऊन काम सोडलें होतें व आतां त्यानें विचार बदलला असेल तर त्याला परत कामावर ठेवण्यांत येईल. तथापि ता. २ फेब्रुवारीपासून थेट ता. १४ फेब्रुवारीपर्यंत या कामगाराची हजिरी मांडण्यांत आली असल्याचें आढळून आलें आहे. मिल अधिकाऱ्यांना ठाऊक होतें कीं या कामगाराला बेकायदेशीर रीत्या काढून टाकले आहे व त्यामुळें भानगड उपस्थित होईल. म्हणून त्यानीं चोरटेपणानें त्याची हजिरी मांडून ठेवली. तरीसुद्धां युनियनला असें सांगण्यांत आलें कीं हा कामगार ता. २ फेब्रुवारी रोजीं आपण होऊन काम सोडून गेला होता!

या प्रकरणांतील एक हकीकत अशी आहे.

तेव्हां, सद्गृहस्थहो, लक्ष्यांत ठेवा कीं हा तंटा ता. २ फेब्रुवारी रोजीं सुरू झाला. तो लेबर ऑफिसरकडे गेला. कन्सीलिएशनचा विधि पार पाडण्यांत आला. कन्सीलिएशनच्या वेळीं मालकानें पूर्वीप्रमाणेंच ताठरपणा दाखविला व कन्सीलिएशन अयशस्वी झालें. कन्सीलिएनचा रिपोर्ट ता. १३ जून १९४६ च्या

सरकारी गॅझेटांत प्रसिद्ध झाला आहे. ता. २ फेब्रुवारीपासून ता. १३ जून १९४६ पर्यंत माझ्या मतें पुरेशी सहनशीलता दाखविण्यांत आली होती. येथील सभासद त्यांचें या असेंब्लींतलें किंवा बाहेरचें काम गेल्यामुळें बेकार झाले तर त्यांच्यापैकीं फारच थोड्यांना एवढी सहनशीलता दाखवितां येईल. कन्सीलिएशन अयशस्वी होईपर्यंत कामगारांनीं विलक्षण सहनशीलता दाखविली.

ता. १३ जून रोजीं कन्सीलिएशन अयशस्वी झाल्यानंतरसुद्धां कामगारांनीं विसाडघाईनें संप पुकारला का ? नाहीं, कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वाखालीं संघटित झालेल्या या कामगारांनीं त्यानंतरसुद्धां सहनशीलता दाखविली. तरीसुद्धां मला खात्री आहे कीं याला उत्तर देतांना कम्युनिस्टांवर व लाल बावट्यावरच दोषाचें सगळें खापर फोडण्यांत येईल. लाल बावट्याखालीं असलेले हे कामगार घाईघाईनें संपावर आले नाहींत. युनियननें वाट पाहिली व ता. १३ जून रोजीं कन्सीलिएशन संपल्यापासून १ महिना व १० दिवस एवढा काळ लोटल्यानंतरचा—म्हणजे ता. २४ जुलै रोजीं—संपाची नोटिस दिली. याहून कोणत्या जास्त सहनशीलतेची तुम्ही अपेक्षा करतां ? गाऱ्हाण्यांची दाद लावून घेण्यासाठीं कायदेशीर उपाय, बी. आय. डी. ॲक्टांतील ( काळ्या कायद्यांतील ) अजब कार्यपद्धति, लेबर ऑफिसरची भेट, कन्सीलिएन, सर्व कांहीं करून पाहिलें व तें फोल ठरलें.

त्यानंतर एकाएकीं पोलिसांकडून हालचाल सुरू झाली. कामगारांवर खुनी हल्ले करण्याची व ९ निरपराध कामगारांचा खून करण्याची जबाबदारी ज्याच्या शिरावर आहे त्याच पोलिस अधिकाऱ्यानें युनियनच्या प्रमुख सभासदांना आपल्या कचेरीवर बोलावलें व गिरणीच्या कांहीं खात्यांत मारामारी कां झाली असा त्यांना सवाल केला. हा पोलिस अधिकारी खुर्चीवर बसला होता, पण त्यानें युनियनच्या सभासदांना बसण्यास खुर्ची दिली नाहीं. त्यांच्याशीं अपमानकारक वर्तणूक करून त्यानें त्यांना हांकून लावलें. याबाबत गृहमंत्र्यांकडे तक्रार करण्यांत आली आहे. पोलिस अधिकाऱ्यांनीं जनतेशीं सभ्यतेनें वागावें असें जें सर्क्युलर कॉंग्रेस मंत्रिमंडळानें काढलें आहे, त्याचा परिणाम झाला आहे तो हाच ! अमळनेर मधील युनियनच्या सन्मान्य सभासदांशीं जुन्या नोकरशाहींतील या अधिकाऱ्यानें ज्या प्रकारची वर्तणूक केली ती या सर्क्युलरबरहुकुम होती काय ? असला नोकरशहा या देशांतून लाथ मारून हांकून लावण्याच्याच लायकीचा आहे.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे. क्रमांक ५५२७३ दि: ... २०६६५ नों: दि: ९८।३।६९

**श्री. मुरारजी देसाई** : त्या पत्राला उत्तर पाठविलें होतें.

**कॉ. डांगे** : हो, उत्तर पाठविलें होतें, पोस्टाच्या संपामुळें दिरंगाई होऊन तें ता. ६ ऑगस्टच्या सुमारास मिळालें. आम्ही त्याबद्दल तक्रार करीत नाहीं. पण या उत्तरांत फक्त पत्राची पोंचच होती व तक्रारीबाबत कांहीं तरी करण्यांत येत आहे एवढेंच लिहिलें होतें.

ता. २५ जुलै रोजीं डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिटेंडंटनें व डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटनें फेरी मारली व कामगारांना धमकावलें कीं गोळीबार करण्यांत येईल, मशीनगन्सचा उपयोग करण्यांत येईल. या प्रकरणाच्या इतिहासांतील नवा टप्पा येथून सुरू होतो.

त्यानंतर मालकानें चिथावणीला सुरवात केली, कारण त्याला पक्कें ठाऊक होतें कीं संप घडून येणारच. दुसऱ्या गिरणींत मालकानें जाणूनबुजून एक यंत्र नादुरुस्त करून ठेवलें, त्यानें स्वतःच मोडतोडवाल्याची भूमिका घेतली, उत्पादन अजिबात थांबविलें, व सबंध गिरणीला टाळें ठोकलें ! असंतोष कोणी निर्माण केला आहे ? मालकानें जाणूनबुजून इंजिनांत बिघाड केला हें आम्हांला ठाऊक होतें, आमच्याजवळ त्याचा स्पष्ट पुरावा होता, व म्हणून आम्ही फॅक्टरी इन्स्पेक्टरला याची नोटिस दिली. फॅक्टरी इन्स्पेक्टर मजूरमंत्र्यांच्या हाताखालीं आहे. या फॅक्टरी इन्स्पेक्टरनें पुरावा नाहीं असें सांगून अपघाताची चौकशी करण्यास नकार दिला. जाणूनबुजून केलेल्या या मोडतोडीचा परिणाम असा झाला कीं २००० किंवा अधिक कामगार बेकार झाले. दुसऱ्या गिरणींत संप घडून येणार आहे हें पक्कें ठाऊक असतांना ही गोष्ट करण्यांत आली. या गोष्टीचा छडा लावण्यासाठीं जर स्वतंत्र चौकशी कमिटी नेमण्यांत आली तर तिच्यापुढें भक्कम पुरावा मांडण्यास आम्ही तयार आहोंत.

या कामगारांच्या गाऱ्हाण्यांची कोणीच चौकशी केली नाहीं. मजूर-मंत्र्यांनीं किंवा दुसऱ्या कोणत्याहि मंत्र्यानें या प्रकरणांत लक्ष घातलें नाहीं. तरीसुद्धां आम्ही स्वस्थ बसलो नव्हतों. आम्ही मजूर-मंत्र्यांकडे अर्ज केले. त्यांनीं या गोष्टीची नोंद घेतली, पण हालचाल मात्र बिलकूल केली नाहीं. त्यांनीं कोणताहि उपाय योजला नाहीं. संप सुरू होण्यापूर्वीं देखील आम्ही एकंदर परिस्थितीकडे सरकारी लेबर कमिशनरचें लक्ष वेधलें होतें, पण कोणताहि उपाय योजण्यांत आला नाहीं. मग आम्ही गृहमंत्र्यांकडे गेलों व १४४ कलमाखालील

हुकुम मागें घेण्यास त्यांना सांगितलें. गृहमंत्र्यांनीं उत्तर दिलें, तो हुकुम मागें घेण्याची कांहीं गरज नाहीं. आम्ही सांगितलें कीं "हा कायदेशीर संप आहे, कामगारांचें गाऱ्हाणें रास्त आहे, म्हणून सभा भरवून व मिरवणुका काढून एकंदर समाजाचा पाठिंबा मिळवणें त्यांना आवश्यक आहे." कदाचित् जनतेचा पाठिंबा मिळविण्याची गृहमंत्र्यांना सध्यां कांहीं गरज वाटत नसावी, कारण आतां त्यांना अधिकाराची गादी मिळून चुकली आहे व यापुढें जनतेच्या पाठिंब्याची कांहीं गरज उरलेली नाहीं ! पण कामगारांच्या हातीं अजून सत्ता आलेली नसल्यामुळें त्यांना स्वतःच्या कार्यासाठीं जनतेचा पाठिंबा मिळविणें अर्थातच जरूरीचें वाटतें.

अशा रीतीनें ता. २ फेब्रुवारीपासून ता. २७ ऑगस्टपर्यंत कामगारांच्या सहनशीलतेची कसोटी पाहण्यांत आली, व कन्सीलिएशन अयशस्वी होऊन कायदेशीर संप घडून आला. कामगारांना सरकारकडून संरक्षण मिळण्याऐवजीं १४४ कलम व नागरिक-स्वातंत्र्याचा खून याच गोष्टी मिळाल्या. कामगारांनीं सरकारकडून संरक्षण मागितलें व सरकारनें त्यांना हें उत्तर दिलें.

सरकारचें म्हणणें असें आहे कीं यापूर्वी माऱ्यामाऱ्या झाल्या होत्या व शांततेला धोका येण्याची परिस्थिति निर्माण झाली होती. मी विचारतों, मारामारीचा पुरावा कोठें आहे ? ता. २४ जुलै पूर्वी, किंवा ता. ७ ऑगस्टपूर्वी, सरकारनें किती जणांना पकडलें ? किती जणांवर खटले भरले ? डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला १४४ कलम पुकारावें लागलें व आमच्या प्रतिनिधींनीं गृहमंत्र्यांची गाठ घेतली त्यावेळीं त्यांनीं हा हुकुम मागें घेण्यास नकार दिला, याला कारण हिंसेचें वातावरण अस्तित्वांत होतें असें सांगण्यांत येतें, तर तें सिद्ध करण्यासाठीं किती जणांचीं डोकीं फुटलेलीं आढळलीं ? वातावरण हिंसेचें होतें किंवा शांततेला धोका होता असें सिद्ध करण्यास काडी इतकाहि पुरावा नाहीं.

तरीसुद्धां १४४ कलमाचा अंमल चालू राहिला. गिरणी कामगार युनियनच्या 'दुष्ट' कम्युनिस्टांनीं सुद्धां हें १४४ कलम मोडलें नाही. ता. ८ ऑगस्ट पासून ता. २७ ऑगस्ट पर्यंत आम्ही शक्य तेवढ्या मंत्र्यांकडे विनवण्या केल्या, अर्ज केले, पण कोणीहि हालचाल करीना ! यासंबंधींचे सर्व कागदपत्र माझ्याजवळ आहेत. सरकारनें या प्रकरणांत हात घालावा म्हणून दर दिवसाला, दर घडीला पाठविलेल्या पत्रांची व तारांची फाईल माझ्याजवळ आहे.

मंत्रिमंडळानें सांगितलें, "पाहूं या तुमच्यासाठीं आम्हाला काय करतां येईल तें!"

त्यांना रक्ताचे पाट वहावावयाचे होते. खुद्द बी. आय. डी. ॲक्टखालीं ( काळ्या कायद्याखाली ) रजिस्टर झालेल्या व कायदेशीर संप घडवून आणणाऱ्या यूनियनला धडा शिकवायची त्यांची इच्छा होती. ही यूनियन गेलीं सहा वर्षें काम करीत आहे. तेथें दुसरा प्रतिस्पर्धी संघ अस्तित्वांत आहे व त्याला मजूर-मंत्र्यांचा आशीर्वाद मिळत आहे, पण तो संघ या यूनियनची एकजूट मोडूं शकला नाहीं. कामगारांची ही एकजूट चिरडून टाकली पाहिजे,–मग त्यामुळें लोकशाहीच्या तत्वांची पायमल्ली होवो किंवा नागरिक स्वातंत्र्याचा खून पडो, असें मंत्रिमंडळाचें धोरण होतें.

कामगारांना जबरदस्तीनें चिरडून टाकण्याची धमकी देण्यांत आली होती, तरी सुद्धां सरकारनें कांहीच हालचाल केली नाहीं. सरकारनें कामगारांना संरक्षण देण्याचें नाकारलें, एवढेंच नव्हे तर मि. डेव्हिड नांवाच्या इंग्रज अधिकाऱ्याने आपल्या सगळ्या पिढीजात संतापाचा कामगारांवर प्रयोग केला. लोकशाहीच्या तत्वांप्रमाणें नाहीं तर निदान 'चले जाव' ठरावाच्या आधारें तरी डेव्हिडला हिंदुस्थानांतून लाथ मारून हांकून लावणेंच योग्य होईल.

सरकारचा पाठिंबा मिळविण्याचे आमचे सारे प्रयत्न फोल ठरल्यानंतर शेवटीं आम्हीं म्हटलें कीं "आपण जनतेचा पाठिंबा व सहानुभूति मिळवूं, जनतेच्या पाठिंब्यावर आधारलेल्या जनतेच्या मंत्रिमंडळानें कायदेशीर संप चिरडण्यासाठीं १४४ कलमाचा उपयोग करू नये अशी व्यवस्था करूं." म्हणून आम्ही सभा भरविण्याचे व मिरवणूक काढण्याचें ठरविलें. मिरवणूक काढण्याच्या सबंध काळांत हिंसेचा मागमूसहि आढळला नाहीं, मिरवणुकींत शेवटपर्यंत मुळींच मारामारी झाली नाहीं. मिरवणुक चालू असतांना डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिटेंडंटनें आपला रिव्हॉल्व्हर काढला नव्हता. कां? कारण त्याची अशी इच्छा होती कीं कामगारांनीं एकत्र येऊन बसावें, म्हणजे त्यांच्यावर थेट जनरल डायरच्या पद्धतीनें गोळीबार करतां येईल. कामगारांवर बंदुका रोखलेल्या असतांहि एक कामगार भाषण करण्यास उठला. त्याला भाषण न करण्यास सांगण्यांत आलें, पण त्यानें भाषण केलेंच व लोकांना शांत राहण्यास सांगितलें. पोलिसांनीं त्याला ओढून खालीं खेचलें व त्याच्या थोबाडींत मारलें. सद्‌गृहस्थहो, मी तुम्हांला बजावून सांगतों

कीं थोबाडींत मारणें वगैरे गोष्टी या देशांत सहन केल्या जाणार नाहींत, मग त्या गोष्टी करणारा इसम कॉंग्रेस सरकारच्या आशीर्वादानें अधिकार गाजविणारा डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिंटेंडंट कां असेना !

गोळीबार झाला तेव्हां एका पोलिसानें युनियनच्या सेक्रेटरीला (कॉ.श्रीपत पाटील यांना ) धरून ठेवलें, व पोलिस सुपरिंटेंडंटनें त्याच्यावर गोळी झाडली. त्यानें पुनः दुसरी गोळी झाडली व तिनें सेक्रेटरीचा बळी घेतला.

गोळीबार बेछूटपणानें करण्यांत आला. सहा जण जागच्या जागीं ठार झाले व आणखी तीन जण हॉस्पिटलमध्यें मृत्यु पावले. कित्येक जण जखमी झाले. जखमी लोकांची नक्की संख्या ३८, ६५ कीं १०० होती त्याची येथें चर्चा करण्याची मला गरज नाहीं. गोळीबार झालेला पाहिल्यानंतरसुद्धां गृहमंत्र्यांनीं १४४ कलम मागें घेण्यास नकार दिला, गोळीबाराची निःपक्षपाती चौकशी करण्यास नकार दिला, या सर्व दुःखदायक घटनांबद्दल खेद व्यक्त करण्याचेंहि मंत्र्यांनीं नाकारलें, आणि असला प्रकार घडल्याबद्दल त्यांना लाजहि वाटत नाहीं. अर्थात जखमी लोकांना खात्री वाटते कीं आपणाला मंत्र्यांकडून सहानुभूति तर मिळणार नाहींच, उलट आपल्यावर खटलेच भरण्यांत येतील. म्हणून हे जखमी लोक पुढें येण्यास तयार नाहींत. पोलिस सुपरिंटेंडंटला आपण आपलीं नांवें कळवावीं व मग आपणांला पुनः गोळ्या घालण्यांत याव्या किंवा नव्या सरकारच्या दयाळू कायद्याखालीं आपणांवर खटले भरण्यांत यावे, ही गोष्ट त्यांना स्वाभाविकपणेंच पसंत नाहीं ! म्हणून नक्की किती लोक जखमी झाले हें आपणांला खात्रीनें सांगतां येत नाहीं.

युनियनच्या जनरल सेक्रेटरीला गोळ्या घालून ठार करण्यांत आलें, एवढेंच नव्हे तर सौ. भागवत ह्या स्त्रीवरहि गोळीचा नेम धरण्यांत आला, पण दुसरा एक कामगार आडवा आला व तो स्वतः ठार झाला. बेछूटपणानें गोळीबार केला तो असा. एका परीनें हा गोळीबार बेछूटपणाचा होता, तर दुसऱ्या परीनें तो पद्धतशीरहि होता. युनियनची संघटना करणारे सर्वांत उत्कृष्ट कार्यकर्ते व लढाऊ कामगार मुद्दाम वेचून काढण्यांत आले व नेमक्या त्यांच्या-वर गोळ्या झाडण्यांत आल्या. उगाच्च कोणीकडे तरी गोळ्या झाडण्यांत आल्या नाहींत. विशिष्ट लोकांना निवडून काढलें, त्यांच्यावर नेम धरला व मग त्यांच्यावर

गोळ्या झाडल्या. उदाहरणार्थ, युनियनच्या जनरल सेक्रेटरीला ठार करण्यांत आलें, उपाध्यक्षाला ठार करण्यांत आलें, मॅनेजिंग कमिटीच्या दोन सभासदांनाहि ठार करण्यांत आलें. यावरून दिसून येतें कीं हा गोळीबार पद्धतशीरपणें करण्यांत आला होता.

**श्री. बाळासाहेब खेर :** श्री. डांगे म्हणाले होते कीं गोळीबार बेछूट होता. आतां ते म्हणतात कीं विशिष्ट माणसांना वेंचून काढून त्यांच्यावर गोळ्या झाडल्या व अशा रीतीनें गोळीबार पद्धतशीर होता. या दोन विधानांपैकीं कोणतें विधान त्यांना सिद्ध करावयाचें आहे ?

**अध्यक्ष :** श्री. डांगे यांनीं भाषण पुढें चालू करावें.

**कॉ. डांगे :** मी म्हटलेल्या वाक्याचा अर्धा भागच मुख्य मंत्र्यांना ऐकूं गेला याबद्दल मला वाईट वाटतें. मी म्हणालों होतों कीं गोळीबार एका परीनें बेछूट होता व दुसऱ्या परीनें पद्धतशीरहि होता. माझें म्हणणें अगदी स्पष्ट आहे असें वाटतें. उत्कृष्ट लढाऊ कामगारांना व कार्यकर्त्यांना वेंचून काढून गोळ्या घालण्यांत आल्या, या अर्थानें गोळीबार पद्धतशीर होता. गोळीबार सूडबुद्धीनेंहि करण्यांत आला होता. सूडबुद्धीनें गोळीबार केला तर तो पद्धतशीर असणारच, कारण कोणावर सूड उगवावयाचा हें अगोदर ठरवावें लागतें. गोळीबार बेछूटपणानें करण्यांत आला होता, तरी तो सूडबुद्धीनेंहि करण्यांत आला हें तितकेंच खरें आहे.

**अध्यक्ष :** तुमची वेळेची मर्यादा संपून गेली आहे. कृपा करून थोड्या वेळांत भाषण संपवावें.

**कॉ. डांगे :** मला सांगावयाचें आहे तें हेंच कीं या प्रकरणाची इत्थंभूत माहिती आपणांला मिळाली पाहिजे.

माझी अशी मागणी आहे कीं सत्य चवाठ्यावर येण्याची सरकारला जर भीति वाटत नसेल तर त्यानें या गोळीबाराची चौकशी करण्याचा हुकुम काढावा.

दुसरी गोष्ट म्हणजे गोळीबाराला बळी पडलेल्यांना सरकारनें नुकसान-भरपाई द्यावी. गोळीबार झाला तो समर्थनीय असो किंवा नसो, तो प्रश्न बाजूला ठेवला तरी एक गोष्ट उघड आहे व ती म्हणजे पोलिस सुपरिंटेंडंट डेव्हिडच्या हस्तें ९ कामगार ठार झाले, कन्सीलिएशन अयशस्वी झाल्यानंतर सुरू झालेला

कायदेशीर संप ते चालवीत असतांना त्यांना मृत्यु आला. हिंसेचें वातावरण नसतांहि या कामगारांना सभा भरविण्याचा साधा हक्क नाकारण्यांत आला होता. त्यांना नुकसानभरपाई देणें योग्यच ठरतें.

मी अशी मागणी करतों कीं पोलिस सुपरिटेंडंटला सस्पेंड करावें, त्याच्यावर खटला भरावा व त्याला जबर शिक्षा द्यावी.

मी मांडलेल्या साध्या मागण्या या आहेत. या मागण्या मी ब्रिटिश सरकारपुढें मांडत नाहीं. ब्रिटिश सरकार असतें तर मी या मागण्या मांडल्या नसत्या, मी दुसरेंच कांहीं तरी केलें असतें.

मी जो वस्तुस्थितीचा इतिहास मांडला आहे त्यावरून तुम्हांला दिसून येईल कीं मजूर मंत्र्यांनीं जाहिर केलेल्या धोरणास अनुसरून जेवढी सहनशीलता दाखवावयाची तेवढी सर्व आम्ही दाखविली आहे. युनियनच्या कांहीं सभासदांचीं तत्त्वें व मतें सरकारला पसंत नाहींत व एवढ्याच कारणास्तव सरकारनें युनियनची व कामगारांची एकजूट चिरडून टाकण्याचा विचार केला व म्हणून आमच्यावर या पोलिसांना छूः करण्यांत आलें. पोलिसांनीं केलेल्या प्रत्येक गोष्टीचें मंत्र्यांना समर्थन करतां येईल असें मला वाटत नाहीं. म्हणून मला खात्री आहे कीं गोळीबाराची चौकशी करण्यास ते हरकत घेणार नाहींत. पण जर त्यानीं चौकशीला नकार दिला, जर त्यांनीं नेहमींच्या नोकरशाही पद्धतीचाच अवलंब केला व सरकारी नोकरांच्या प्रत्येक कृत्याचें समर्थन केलें, तर त्यावरून एकंदर देश जें अनुमान काढील तें या मंत्रीमंडळालाच अत्यंत घातुक होणार आहे. मी त्यांना जनतेचें मंत्रीमंडळ म्हणतों व लोकशाहीला पाठिंबा देण्यास ते बांधलेले आहेत असें माझें मत आहे. पण जर ते लोकशाहीचे मारेकरी बनले तर मी त्यांना इशारा देऊन ठेवतों कीं मारेकऱ्यांचेंसुद्धां मरण टळत नसतें.

[ २ ]

[ मजूरमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा व पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर यांनी कॉ. डांगे यांच्या ठरावाला विरोध करणारीं भाषणें केलीं. चर्चेच्या शेवटीं कॉ. डांगे यांनीं पुढील उत्तर दिलें. ]

**कॉ. डांगे:** आमच्याविरुद्ध करण्यांत आलेल्या टीकेला माझें उत्तर अगदीं साधें आहे, अमुक अमुक गोष्टी घडल्या, असें विधान माझ्या तोंडावर फेकण्यांत

आलें आहे. पण मी म्हणतो कीं त्या गोष्टी निःपक्षपाती चौकशी कमिटीपुढें मांडा. असल्या गोष्टी मांडणारांचें म्हणणें चुकीचें आहे व आमचें म्हणणें बरोबर आहे, हें आम्ही सिद्ध करूं. गृहमंत्र्यांना किंवा मजूरमंत्र्यांना उत्तर देण्यासाठीं माझ्याजवळ पोलिस खात्याच्या गुप्त फाइली नाहींत व म्हणून त्यांच्या युक्तिवादाविषयी मला या क्षणीं कांहीं बोलता येणार नाहीं. पण एकाद्या कामगारानें ' आपणाला काम करण्याचा हक्क आहे, म्हणून आपण मिलच्या दरवाज्यावर तुटून पडूं ' असें भाषण केलें होतें असें आपण गृहीत धरलें तरी, त्या भाषणांत गैर काय आहे? मला वाटतें कीं या प्रांतांत सध्यां अधिकारारूढ असलेल्या पक्षाला " आम्ही साम्राज्यशाहीच्या दरवाज्यावर तुटून पडूं, चलो दिल्ली!" असलीं भाषणें करण्याचा सराव आहे! असलीं भाषणें करणाऱ्या लोकांवर गोळीबार करणें समर्थनीय होईल का? अशा घोषणा केल्याबद्दल कॉंग्रेस पक्षाच्या सभासदांवर बेछूट गोळीबार करण्याचा ब्रिटिश सरकारनें हुकुम सोडला तर कोणत्याहि रीतीनें त्याचें समर्थन करतां येईल का? अशाच घोषणा कामगारांनीं केल्या तर तें चुकीचें कसें होऊं शकेल? कामगारांनीं एवढेच म्हटलें कीं "आमचा काम करण्याचा हक्क गिरणीनें हिरावून घेतला आहे, म्हणून त्या गिरणीच्या दरवाज्यावर आम्ही तुटून पडूं. काम करणाचा आम्हांला खात्रीनें हक्क आहे. आम्ही गिरणींत जाऊं व काम मागूं." यांत कांहीं गैर आहे असें मला वाटत नाहीं, अशा भाषणामुळें १४४ कलम पुकारणें व नागरिकांचे हक्क हिरावून घेणें मुळींच समर्थनीय ठरत नाहीं.

पंतप्रधानांनीं अत्यंत आवेशपूर्ण भाषण केलें व त्यांत वस्तुस्थितीचा विपर्यास करण्याचा प्रयत्न केला. त्यांनीं एका सभेचें उदाहरण दिलें व त्या सभेंत कुणाला तरी भोसकण्यांत आल्याचें सांगितलें. सध्यां जातीय भोसकाभोसकीचा धुमाकुळ चालू आहे त्याच्याशीं या प्रकरणाचा त्यांना संबंध जोडावयाचा असेल!

एकूण काय, " या लोकांवर गोळीबार करणें योग्यच आहे, " असें म्हणण्याला वृत्तपत्रांचा पाठिंबा मिळविण्याचा त्यांनीं अशा रीतीनें प्रयत्न केला आहे. सवंग प्रचार म्हणतात तो हाच. कारण प्रत्येकाला ठाऊक आहे कीं कम्युनिस्ट पक्षाचा एक विशिष्ट दृष्टिकोण आहे आणि मुस्लिम लीगला महत्त्वाच्या वाटणाऱ्या प्रश्नांवर व त्यांना आज मिळणाऱ्या स्वरूपावर कम्युनिस्ट

पक्षानें मुस्लिम लीगशीं किंवा हिंदुमहासभेशीं गट्टी केलेली नाहीं. आम्ही आपलें म्हणणें मोकळेपणानें व सरळ सरळ मांडतों. म्हणून मुस्लिम लीगचे व कम्युनिस्ट पक्षाचे कांहीं विशिष्ट दृष्टिकोण आहेत किंवा त्यांचीं कांहीं विशिष्ट मतें आहेत एवढयाच कारणावरून या ठरावाची बदनामी करून चालणार नाहीं. थोर सरकारच्या पंतप्रधानाला हें शोभत नाहीं. सवंग आरोप करावयाचे तर ते दोन्ही बाजूंनीं करतां येतील. मला वाटतें कीं कम्युनिस्टांना हाणून पाडण्यासाठीं व हिंदु महासभेच्या आणि अकाली पक्षाच्या सभासदांना जागा करून देण्यासाठीं आपले उमेदवार मागें घेतले ते कॉंग्रेसनेंच !

**अध्यक्ष :** कृपा करून वक्त्यांनीं सभेपुढें असलेल्या ठरावावरच बोलावे.

**कॉ. डांगे:** पंतप्रधानांनीं हिंदु महासभा, मुस्लिम लीग व कम्युनिस्ट पक्ष यांच्या गट्टीविषयीं जीं विधानें केलीं त्यांनाच मी उत्तर देत होतों.

मजूरमंत्र्यांनीं डिस्ट्रिक्ट पोलिस सुपरिंटेंडंची पाठ अत्यंत काळजीपूर्वक तपासली याबद्दल मजूर मंत्र्यांचा मी अत्यंत आभारी आहे ! सबंध शहर गोळीबाराचें समर्थन करत आहे अशी माहिती दिल्याबद्दलहि मी त्यांचे फार आभार मानतों ! पण निराळी मतें असलेल्या इतर कांहीं लोकांच्या सुद्धां पाठी तपासल्या असत्या तर बरें झालें असतें.

या गोळीबाराच्या समर्थनार्थ आणखी एक कारण सांगण्यांत आलें व तें म्हणजे आम्ही सरकारचा कारभार अशक्य करीत आहोत ! आम्हांला सरकारचा कारभार अशक्य करण्याची इच्छा नाहीं व आम्ही तें करीतहि नाहीं. संपाची लाट उसळत आहे ती आमच्या चिथावणीमुळें नव्हे. कम्युनिस्ट विरुद्ध कॉंग्रेस अशा स्वरूपाचा हा प्रश्न नाहीं. एका अत्यंत हेकेखोर मालकाला ताळ्यावर आणण्याचा हा प्रश्न आहे. हा मालक कोणत्या लायकीचा आहें हें कदाचित पुष्कळांना ठाऊक असेल. तरीसुद्धां तेथील कामगारांना दडपून टाकण्यांत येत आहे. कामगार फक्त आपले हक्कच मागत आहे. या बाबतींत राजकीय प्रश्न घुसडून देणें चुकीचें होईल.

आम्हीं संपांना चिथावणी देत नाहीं. पोस्टाचा संप आम्ही घडवून आणला नव्हता. रेल्वेचा संप आम्हीं केला नव्हता. पोस्टाच्या संपाचा बंदोबस्त स्वतः पंतप्रधान करीत होते व त्यांना ठाऊक आहे कीं त्या संपाला कॉंग्रेस सोशालिस्टांचासुद्धां पाठिंबा होता. या सभागृहांत कॉंग्रेस सभासदांना जर

थोडेसें स्वातंत्र्य दिलें तर या ठरावाला बऱ्याचशा काँग्रेस सभासदांचा पाठिंबा असलेला आढळून येईल. तरीहि काँग्रेस सभासद येथें जी शिस्त दाखवितात ती मला खरोखरच पसंत आहे. पण मला आशा आहे कीं काँग्रेस सभासद स्वतःच्या पक्षाच्या सभेंत आपलें खरें मत स्पष्टपणें मांडतील व या प्रकरणाबाबत जबाबदार असलेल्या मंत्र्यांचे कान उपटतील.

**श्री. खेर :** मग लवकरच कम्युनिस्ट पक्षांत त्यांची भरती होईल.

**डॉ. अंत्रोळीकर :** मॉस्कोहून मिळणारे हुकुम अमलांत आणण्यासाठीं !

**कॉ. डांगे :** लंडनहून हुकूम येण्यापेक्षां तें बरें !

मजूर-मंत्र्यांनीं सांगितलें कीं (अमळनेरच्या) दुकानदारांना घाबरवून सोडण्यांत आलें होतें. त्यांनीं याबाबत मांडलेल्या पुराव्याविषयीं मला एवढेंच म्हणावयाचें आहे कीं ज्या गिरणींत संप चालू आहे त्याच गिरणीच्या मालकाचे दलाल या नात्यानें हे दुकानदार शहरांत मोठा काळा बाजार चालवीत आहेत व खरोखरी याच कारणास्तव ते घाबरून गेले आहेत. त्यांना गिरणी-मालकाकडून कापड मिळतें व हें कापड ते काळ्या बाजारांत विकतात. त्यांनीं धास्ती खावी हें स्वाभाविकच होय. पण एकंदर जनतेला धास्ती वाटत नव्हती, कारण त्या शहरांतील बहुसंख्य जनता गिरणी कामगारच आहे. दुकानदारांनी माजविलेल्या काळ्या बाजाराला या कामगार कुटुंबांचा व भोंवतालच्या शेतकऱ्यांचा विरोध आहे, त्यामुळे दुकानदारांनी मन मानेल तसा काळा बाजार चालविणें शक्य होत नाहीं. परंतु गिरणी कामगार युनियननें या दुकानदारांची कत्तल सुरू केली होती व म्हणून—बहुधा गृहमंत्र्यांच्या हुकुमावरून—गोळीबार करणें आवश्यक झालें, असें म्हणण्याला काडीइतकाहि पुरावा नाहीं. गोळीबाराचा हुकुम गृहमंत्र्यांनींच दिला काय, हें मला ठाऊक नाहीं.

**एक सभासद :** कांहीं कम्युनिस्टांवर काळा बाजार केल्याचा आरोप करण्यांत आला होता हें श्री. डांगे यांना ठाऊक आहे का ?

**अध्यक्ष :** आपण येथें काळ्या बाजाराच्या प्रश्नाची चौकशी चालविलेली नाहीं.

**कॉ. डांगे :** काळ्या बाजारवाल्यांवर मी हल्ला केला म्हणून हे सभासद चिडले आहेत ! मला त्याबद्दल खेद होतो !

सरकारला माझी अशी विनंती आहे कीं त्यांनीं या प्रश्नाकडे

पक्ष-विशिष्ट राजकारणाच्या दृष्टीनें पाहूं नये. माझी त्यांना अशी विनंती आहे कीं त्यांनीं या प्रश्नाकडे फक्त एकाच वर्गाच्या दृष्टीनें – मालकांच्या दृष्टीनें–पाहूं नये. या कामगारांना संपावर जाण्यावांचून गत्यंतर उरलें नव्हतें. त्यांना नाइलाजास्तव संप पुकारावा लागला. त्यांचे हक्क हिरावून घेण्यांत आले. ते न्याय मागत आहेत. सरकारनें या बाबतींत जें केलें तें स्पष्टपणें फक्त मालकाला व नोकरशाही पोलिस खात्याला पाठिंबा देणारें होतें. म्हणून हा कम्युनिझमचा, पाकिस्तानचा, किंवा हिंदु महासभेचा प्रश्न नाहीं. सरकारला मी विनंती करतों कीं त्यांनीं असलीं गैरसमज उत्पन्न करणारीं विधानें करूं नयेत. तीं विधानें वृत्तपत्रांत मोठे मथळे देऊन छापण्यांत येतील, कारण हीं वृत्तपत्रें स्वतंत्र नाहींत, तीं 'ठेवलेलीं' वृत्तपत्रें आहेत. मी त्यांना विनंती करतों कीं त्यांनीं या प्रश्नाकडे निर्विकार दृष्टीनें पहावें व गुन्हेगार अधिकाऱ्यांना शिक्षा करण्याची व्यवस्था करावी.

● ● ●

# लोकशाहीची पायमल्ली करणारे 'गुंडा' बिल

*मुंबई असेंब्लींत गृहमंत्री श्री. मुरारजी देसाई यांनीं डिस्ट्रिक्ट पोलिस ॲक्टांत दुरुस्ती करणारें 'गुंडा बिल' मांडले, त्याला विरोध करतांना कॉ. डांगे यांनीं केलेल्या भाषणाचा 'समर्पक युक्तिवादाचा एक नमुना' म्हणून 'लोकमान्य' पत्राच्या खास प्रतिनिधीनेंहि स्तुति केली. असेंब्लींतिल कामकाजाचें साप्ताहिक समालोचन करतांना या प्रतिनिधीनें लिहिलें होतें, "डांगे यांच्या युक्तिवादास सरकारतर्फे निदान आतांपर्यंत तरी कोणी रोखठोक उत्तर दिले नाहीं. युक्तिवादामागून युक्तिवाद करण्याची त्यांची हातोटी विलक्षण असल्यामुळें आणि सवालजबाबांत ते पुरे मुरलेले वक्ते असल्यामुळें त्यांचें भाषण चांगलेंच वठलें यांत शंका नाहीं. डॉ. अंत्रोळीकर, श्री. मोरोपंत जोशी प्रभृति आमदारांनीं त्यांच्या-वर प्रश्नांचा भडिमार करून त्यांना जेरीस आणण्याचा प्रयत्न करून पाहिला, पण व्यर्थ!"*

*('लोकमान्य' ता. १९-९-४६)*

*कॉ. डांगे यांच्या या महत्त्वाच्या भाषणाचा आशय*

: १ :

गृहमंत्र्यांनीं सांगितलें, कीं भारत संरक्षण कायद्याच्या नियमांची मुदत लौकरच संपणार आहे व म्हणून ते नव्या स्वरूपांत पुन्हां पास करून घेतले पाहिजेत. माझ्या मतें बिलाचा निषेध करण्यास हाच एक मुद्दा पुरेसा आहे. भारत संरक्षण नियमांनीं लोकशाहीच्या प्रत्येक हक्काची पायमल्ली केली होती व देशांतील प्रत्येक पक्षानें त्याचा निषेध केला होता. ब्रिटिश सरकारनें हा कायदा पास केला, कारण त्या सरकारला देशांतील जनतेचा पाठिंबा नव्हता. जनतेचा पाठिंबा नसलेली राजवट चालू ठेवण्यासाठींच हा कायदा त्यानें पास केला होता. पण सध्यांचे सरकार जनतेच्या मतानें – मर्यादित मतानें कां

होईना – निवडून आलेलें आहे व तें जनतेच्या पाठिंब्यावर आधारलेलें आहे. अशा सरकारला या जनताविरोधी कायद्याची कांहीं जरूरी भासता कामा नये. आणि भासलीच तर त्या सरकारचें कुठें तरी चुकत असलें पाहिजे.

गृहमंत्र्यांनी सांगितलें कीं कायदा व सुव्यवस्था राखण्याचें कर्तव्य सर्वच सरकारांना पार पाडावें लागतें. पण सुव्यवस्था ही कांहीं हवेंतली गोष्ट नाहीं. विशिष्ट सरकारला उलथून पाडूं पाहणाऱ्या विशिष्ट शक्तींविरुद्ध सुव्यवस्थेची अंमलबजावणी करण्यांत येत असते. मागच्या सरकारनें त्याला उलथून पाडूं पाहणाऱ्या जनतेविरुद्ध या कायद्याचे आधारें लष्कराच्या साहाय्यानें सुव्यवस्था अमलांत आणण्याचा प्रयत्न केला. ज्या जनतेविरुद्ध पूर्वीच्या सरकारनें हा कायदा केला होता, त्याच जनतेविरुद्ध सध्यांचे सरकार या कायद्याचा उपयोग करून सुव्यवस्था अंमलांत आणणार, असें समजावयाचें काय ?

सरकार जर समाजाच्या हिताविरुद्ध असेल, तर समाजांत ‘ बंडाळी ’ निर्माण करण्याचा आपणाला हक्क आहे, असें मी बजावून सांगतों. हा हक्कच प्रत्येक देशांतील राष्ट्रीय चळवळींचा पाया आहे. आपल्या देशांतील राष्ट्रीय चळवळसुद्धां याच तत्त्वावर चालविण्यांत आली. म्हणून समाजांत बंडाळी निर्माण करतां कामा नये हा सर्वसाधारण सिद्धान्त मला मान्य नाहीं. परंतु सध्यांचे सरकार संपूर्णपणें लोकहिताविरुद्ध आहे व तें उलथून पाडलें पाहिजे, असें कोणीच म्हणत नाहीं व म्हणून भारत संरक्षण कायद्याचे नियम पुनः पास करून घेण्याची कांहीं जरुरी नाहीं.

कदाचित असें सांगण्यांत येईल कीं नवें सरकार आल्यामुळें बंडाळी करणाऱ्या नव्या शक्ती अस्तित्वांत आल्या आहेत व त्यांच्याविरुद्ध या कायद्याची जरूरी आहे. या बिलाच्या प्रस्तावनेंत म्हटलें आहे कीं अलिकडे कांहीं वर्षांत ज्या दंगली झाल्या त्यामुळें मॅजिस्ट्रेट्सचे अधिकार वाढविण्याची इष्टता दिसून येते. पण अलिकडे झालेल्या दंगलींची एकदोन उदाहरणें पाहूं या. आझाद हिंदी सेनेसंबंधींच्या चळवळींतील दंगल, आरमारी खलाशांचें बंड, यांवरून भारत संरक्षण कायद्याचे नियम पुन्हा पास करण्याची जरूरी सिद्ध होते काय ?

( गृहमंत्री मोरारजी देसाई मध्येंच उठून ‘ होय. ’ असें म्हणाले. कॉ. डांगे यांनीं त्यांना ताबडतोब उत्तर दिलें, ‘ असें असेल तर खरोखरी तुम्हांला उलथून पाडणेंच योग्य होईल. ’ )

मी म्हणतों, कीं या दंगली पवित्र होत्या, प्रत्येक राजकीय तत्त्वाच्या दृष्टीनें त्या न्याय्य होत्या. तसेंच १९४२ च्या दंगलींचें उदाहरण घ्या. असल्या दंगली चिरडण्याचा डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला अधिकार देण्यास माझा विरोध आहे, कारण या दंगलींचा उद्देश जुलूमशाही उलथून पाडणें हाच असतो.

( डॉ. अंत्रोळीकरांनीं मधेंच प्रश्न विचारला, '१९४२ सालीं ज्यांनीं भारत संरक्षण कायद्याविरुद्ध आवाज उठविला त्यांत डांगे होते काय ?' कॉ. डांगे यांनीं उत्तर दिलें, 'त्यावेळीं मी येरवडा जेलमध्यें अंत्रोळीकरांच्या शेजारींच होतों. त्यांना तें आठवत नसेल, तर त्यांची स्मरणशक्ति कोती असली पाहिजे.' )

बिलाच्या प्रस्तावनेंत सांगितल्याप्रमाणें जर जनतेचीं निदर्शनें चिरडून टाकण्यासाठीं मंत्रिमंडळानें या कायद्याचा उपयोग केला तर तें लोकविरोधी कृत्य होईल.

जातीय दंगे मोडण्यासाठीं हा कायदा आहे असें मुख्यमंत्र्यांनीं सांगितलें व बरेच जण याच कारणास्तव त्याला पाठिंबा देतील. पण मी बजावून सांगतों, कीं जातीय दंगे थांबविण्यास हा कायदा असमर्थ आहे. आपल्या देशांतील जातीय दंग्यांना आज यादवी युद्धाचें स्वरूप येत आहे, आणि मूठभर लोकांना तडीपार करून यादवी युद्ध थांबणार नाहीं.

कोणी असें म्हणेल, कीं सध्यांचे सरकार जनतेनें निवडून दिलेलें असल्यामुळें आतां जनतेनें कसलींही निदर्शनें करण्याची जरूरी नाहीं. पण याला माझें उत्तर असें कीं आर्थिक किंवा राजकीय क्षेत्रांत जुना जमाना पूर्ण नष्ट झाला आहे अशी कल्पना करून घेतां कामा नये. जुनी नोकरशाही नष्ट झालेली नाहीं. जुनी अर्थव्यवस्था नष्ट झालेली नाहीं. अर्थात् जुना सामाजिक असंतोष अजून कायम आहे व त्यामुळें जनतेचीं निदर्शनें होणारच. खोत-जमिनदार व प्रतिगामी मालक लोकशाही हक्क मिळविण्यासाठीं जनतेनें केलेले प्रयत्न हाणून पाडण्याची खटपट करतील. अशा वेळीं मंत्रिमंडळाच्या सद्भावनेवर अवलंबून राहा असें जनतेला सांगणें चुकीचें होईल. जुनी नोकरशाही नव्या सरकारला मोडता घालण्यास चुकणार नाहीं व म्हणून जनतेला लोकशाही हक्क मिळवून देण्यासाठीं जनतेच्या सरकारनेंसुद्धां जनतेच्या निदर्शनांचा उपयोग करून घेतला पाहिजे.

मंत्रिमंडळानें निदर्शनांना घाबरतां कामा नये. उलट असलीं निदर्शनें करण्यास जनतेला त्यांनीं स्वतःच सांगितलें पाहिजे व अशा रीतीनें नोकरशाहीच्या कारवाया हाणून पाडल्या पाहिजेत.

बिलाच्या कलम ४६ ब मध्यें ‘ टोळया व गट ’ असा शब्दप्रयोग आहे. एखाद्या गांवांत एक शेतकऱ्यांचा व एक जमीनदारांचा असे दोन गट जर असतील; शेतकरी जर कालव्याचें पाणी मागत असतील व जमीनदार त्याला विरोध करीत असतील, तर या बिलांतील अधिकार कोणत्या गटाच्या बाजूनें वापरणार ? शेतकऱ्यांना पाण्याची घाई असल्यामुळें त्यांनीं जर पाणी घेतलें तर तो गुन्हा समजला जाईल व पोलिसांच्या रिपोर्टावरून या शेतकऱ्यांना—म्हणजे जनतेच्या बहुसंख्य विभागाला—या कायद्यान्वयें गुंड म्हणून तडीपार करण्यांत येईल आणि जमीनदार सहीसलामत सुटतील. बहुसंख्य जनतेच्या हिताच्या दृष्टीनें समाजाची पुनर्रचना करण्याच्या प्रत्येक प्रयत्नाविरुद्ध या कायद्याचा उपयोग करण्यांत येईल, म्हणून या बिलाला माझा मूलभूत विरोध आहे. कॉंग्रेस सरकार अस्तित्वांत आलें असलें तरी अजून धनिकशाहीची सत्ता कायम आहे, व तिच्याविरुद्ध स्वतःच्या हक्कांसाठीं लढणाऱ्या बहुसंख्य जनतेविरुद्ध हा कायदा वापरण्यांत येण्याचा संभव आहे. म्हणून पोलिसांना व मॅजिस्ट्रेट्सना या बिलांतले अधिकार देण्यास मूलभूत तत्त्वांच्या दृष्टीनें मी विरोध करतों.

● ● ●

: २ :

*मुंबई असेंब्लीमध्यें जिल्हा पोलीसांचे अधिकार वाढवून घेतल्यानंतर त्याच धर्तीवर मुंबई शहर पोलिस ॲक्टांत दुरुस्ती करणारें बिल पुढें मांडण्यांत आलें. या बिलाच्या पहिल्या वाचनाला विरोध करतांना कॉ. डांगे यांनीं २१ सप्टेंबर १९४६ रोजीं केलेल्या भाषणांतील महत्त्वाचा भाग.*

फक्त गुंडांविरुद्ध इलाज करण्यासाठींच हा कायदा करण्यांत येत आहे असें भासविण्याचे प्रयत्न होत असले, तरी पूर्वीच्या बिलाप्रमाणेंच ( जिल्हा पोलिस अधिकारी व मॅजिस्ट्रेट यांचे अधिकार वाढविणारें बिल ) हें बिल सुद्धां सर्व प्रकारच्या बंडाळीच्या बंदोबस्तासाठींच आहे, हें उघड आहे. आज दंगे चालू नसते तर गुंडांचा इलाज करण्यासाठींच हें बिल मांडण्यांत आलें आहे असें भासविण्याचे प्रयत्न यशस्वी झाले नसते. परंतु गुंडांचें पारिपत्य करण्याला हा कायदा असमर्थ आहे.

या पद्धतीनें गुंडांचें उच्चाटन करतां येईल हा भ्रम आपण सोडून दिला पाहिजे, वर्गभेदावर आधारलेल्या समाजव्यवस्थेंतच ‘ गुंड ’ निर्माण होतात. त्यांना निरनिराळीं नांवें आहेत. आपण त्यांना मवाली म्हणतों. ...

समाजांतील प्रत्येक व्यक्तीला काम मिळण्याची व सुखाची शाश्वती होत नाहीं तोंवर ‘ गुंड ’ हे राहाणारच.

या गुंडांपैकीं कांहींच्या अंगीं धडाडी असते व त्यांना योग्य मार्गदर्शन करून चांगल्या ध्येयाची जोड दिली तर तेच शूर वीर होऊं शकतील. विशिष्ट ध्येय व कार्यक्रमासाठीं लढणारा माणूस म्हणजेच वीर पुरुष.

केवळ कॉंग्रेसच्या हातीं सत्ता आली असल्यामुळें पोलिसांना जादा अधिकार दिले कीं गुंडगिरीचें उच्चाटन होईल असा समज करून घेणें चुकीचें होईल. कॉंग्रेस अधिकारावर आल्यानंतर अधिकार वाढले पाहिजेत, पण ते जनतेचे, पोलिसांचे नव्हेत. लोकशाहीच्या तत्त्वांवर चाललेल्या संघटनेच्या हातीं सत्ता आली असतांना पोलिसांना हुकूमशाही गाजविण्याचे अधिकार देण्याची कां गरज भासावी ? गुंडगिरीचा नायनाट करण्याची कामगिरी जनतेच्या लोकशाही संघटनांच्या साहाय्यानेंच पार पाडली पाहिजे.

पोलिसांना दिल्या जाणाऱ्या जादा अधिकारांचा ते दुरुपयोग करणार नाहींत याची हमी काय ? या खात्याचे प्रमुख आतां मुडी नसून मुरारजी आहेत हीच याबाबतची हमी असल्याचें सांगण्यांत येतें. हमी काय ती हीच. पण हे सर्व नियम अमलांत आणण्याचें काम कांहीं मुरारजी देसाई जातीनें करणार नाहींत. जुलुमशाहीच्या परंपरेत वाढलेले पोलिस खात्याचे अधिकार आपल्या जागीं कायम आहेत तोंवर मंत्रिमंडळांत कसलाही बदल झाला तरी परिस्थितींत फरक पडणार नाहीं. मंत्रीमंडळाची इच्छा असली तरी त्यांना अमळनेरसारखे प्रकार टाळतां येत नाहींत. हल्लींच्या सरकारनें पोलिसांना चांगल्या, नव्या पद्धतीच्या बंदुका दिल्या आहेत. हीं शस्त्रास्त्रें त्यांनीं जनतेच्या हातीं द्यायला पाहिजे होतीं.

या बिलामध्यें केसेसची फेरतपासणी व्हावी अशी तरतूद करण्यांत आली आहे. ही हमी पुरेशी असल्याचें सांगण्यात आलें आहे.

फाइलींतील केसेसची पुनः चौकशी करतां येईल, पण मेलेले लोक परत जिवंत होऊं शकणार नाहींत.

'सोवियत युनियनमध्यें कसल्याच प्रकारचे लोकशाही किंवा नागरिक हक्क नाहींत, म्हणून निदान मी तरी लोकशाहीचा अथवा नागरिक हक्काचा दावा सांगणें योग्य नाहीं. ' असें सांगण्यांत आलें. परंतु माझें म्हणणें खोडून काढण्यासाठीं हें विधान कां करण्यांत आलें, हेंच मला कळत नाहीं. सोवियत युनियनमध्यें पोलिसांना पुष्कळ अधिकार दिले आहेत; स्टालिन प्रत्येकाला गोळी घालून ठार करीत सुटला आहे आणि म्हणूनच आपणहि पोलिसांचे अधिकार वाढवीत आहों, असें सरकारचें म्हणणें आहे काय ? तसें असेल तर तें ' हुकूमशाहीचें ' अनुकरण आहे.

परंतु सरकार पक्षाचे सभासद विद्वान असले तरी त्यांनीं गुन्हेगारांना शासन करण्याच्या बाबतींत सोवियत कायद्याचा कित्ता गिरविलेला नाहीं असें म्हणणें भाग आहे. सोवियत युनियनच्या कोणत्या कायद्यांत पोलिसांना इतके अधिकार देण्यात आले आहेत ? या बाबतींत मला माहिती मिळाली तर त्यामुळें माझ्या ज्ञानांत भर पडेल, कारण सोवियत युनियनच्या विषयींचे माझें ज्ञान फारच तुटपुंजे आहे !

सोवियतमध्यें जाऊन तेथील परिस्थिति प्रत्यक्ष पाहून आलेले कांहीं

लोक आमच्या पक्षाचे सभासद आहेत ही गोष्ट खरी आहे. पण आपण सध्यां असें धरून चालू या कीं आपणांपैकीं कोणालाच सोवियत युनियनविषयीं कांहीं माहिती नाहीं. अशा स्थितींत एक वजनदार शिष्टमंडळ सोविएत युनियनमध्यें पाठविणें हाच त्या देशांत खरोखर काय परिस्थिति आहे हें शोधून काढण्याचा मार्ग आहे.

गेल्या कॉंग्रेस मंत्रिमंडळानें सोलापूरच्या तुरुंगांतील राजबंद्यांना फटक्यांची शिक्षा दिली. सोवियत युनियनमध्यें अशा गोष्टी होत नाहींत.

माझ्या पक्षाचा गुंडांना पूर्ण विरोध आहे. पण हें बिल मात्र गुंडांच्या विरुद्ध नसून बंडाळींच्या विरुद्ध आहे. आज शेतकऱ्यांचे व कामगारांचे लढे चालू असून त्यांतूनच ' बंडाळी ' निर्माण होत आहे. हातमाग-कामगारांना सूत मिळत नाहीं. कारण सूत काळ्या बाजारांत गडप झालें आहे. कापडाचा काळा बाजार चालू आहे, अशी टेक्स्टाईल बोर्डानेंहि कबुली दिली आहे. या परिस्थितीमुळें ' बंडाळी ' झाली तर माझ्यामतें मंत्रिमंडळानें काळाबाजार-वाल्यांनाच शासन करणें योग्य होईल. कम्युनिस्टांना दडपून टाकायचेंच, असाच त्यांचा अट्टाहास असेल तर त्यांनीं निदान असें तरी जाहीर केलें पाहिजे कीं, ' आम्हीं प्रथम दहा काळाबाजारवाल्यांना गोळ्या घालू आणि मग दहा कम्यु-निस्टांवर गोळ्या झाडूं. ' परंतु काळाबाजारवाल्यांना फटक्यांची शिक्षा झाल्याचें किंवा जमीनदाराला तुरुंगांत डांबल्याचें मी ऐकलेलें नाहीं. कामगारांवर मात्र गोळीबार करण्यांत येत आहे.

या बंडाळ्या म्हणजे जनतेचा अत्यंत मोठा विभाग असलेल्या वर्गाच्या बंडाळ्या आहेत. लोकांची परिस्थितीच अशी आहे कीं त्यांना अशी ' बंडाळी ' करणें भाग पडतें. सरकार कधींकधीं तीन आण्याच्या पेन्सिली पांच आण्याला विकण्यासारखा किरकोळ काळा बाजार करणाऱ्या लहान व्यापाऱ्यांना शिक्षा करतें. मी म्हणतों, अगोदर मोठ्या प्रमाणावर काळा बाजार करणाऱ्या बड्या धेंडांना गोळ्या घाला, आणि मग सोवियत युनियनचें अनुकरण करण्याच्या गोष्टी करा. सोवियत युनियननें फार पूर्वींच काळाबाजारवाल्यांना गोळ्या घालून त्यांचें उच्चाटन केलें आणि नंतर त्यांनीं कामगार शेतकऱ्यांच्या नव्या राज्या-विरुद्ध बंडाळी करणारांना शासन केलें. सोवियत सरकारनें जनतेसाठीं जें कांहीं केलें तें सर्व केल्यानंतर तुम्ही हे जादा अधिकार मागितलेत, तर माझा तुम्हांला पूर्ण पाठिंबा मिळेल.

परंतु गृहमंत्र्यांची लोकशाहीची कल्पनाच कांहीं निराळी आहे. त्यांच्या लोकशाहींत काळाबाजारवाले आणि जुलमी जमीनदार यांना इतर सर्वांच्या बरोबरीचे हक्क आहेत. माझी लोकशाहीची कल्पना या कल्पनेपेक्षा वेगळी आहे. जमीन शेतकऱ्यांना मिळाली पाहिजे अशी मी मागणी करीन, आणि त्याकरितां ' बंडाळी ' माजवीन. लोकशाहीच्या नांवाखालीं ही बंडाळी चिरडून टाकण्याचा प्रयत्न करण्यांत आला, तर नफेबाजांच्या लोकशाहीचें रक्षण करण्यासाठीं जनतेच्या लोकशाहीला चिरडून टाकण्यांत आलें असाच त्याचा अर्थ होईल.

माझ्या पक्षांत लोकशाही नाहीं असें आपल्याला सांगण्यात आलें. माझ्या पक्षाच्या घटनेची प्रत सर्वसामान्य सभासदांना देण्याची माझी तयारी आहे. गृहमंत्र्यांनीं खरोखरच जर निरनिराळ्या पक्षांमधील लोकशाहीसंबंधीं प्रश्न उपस्थित केला आणि प्रत्येक पक्षांत कितपत लोकशाही आहे याची चौकशी करण्यासाठीं एखादें कमिशन नेमण्यांत आलें; तर ती गोष्ट गृहमंत्र्यांना अतिशय गैरसोयीची होईल.

हुकूमशाही स्थापन करण्याची माझ्या पक्षाची स्वप्नें आपण चिरडून टाकल्याशिवाय राहणार नाहीं असें सरकारतर्फे सांगण्यांत आलें, परंतु कम्युनिस्टांना स्वप्नें पाहण्याचा रोग जडलेला नाहीं. हुकूमशाही स्थापन करणें हें आमचें स्वप्न नाहीं, त्याबाबतची निश्चित योजना आमच्याजवळ आहे. माझ्या तत्त्वज्ञानांत आणि कार्यक्रमांत ' हुकूमशाही ' हा शब्द जरूर येतो. माझ्या विरुद्धबाजूचे माझे दोस्त आमचें हें वाङ्मय वाचतात आणि आमच्यावर निरनिराळ्या हेतूचे आरोप करतात. परंतु त्याच वाङ्मयांत उपयोगांत येत असलेला एक लहानसा शब्द मात्र ते विसरतात. तो शब्द म्हणजे ' लोकशाहीप्रधान हुकूमशाही. '

यावर कदाचित असें विचारण्यांत येईल कीं हुकूमशाही लोकशाहीप्रधान कशी असूं शकते ? लोकांनीं निवडून दिलेल्या मंत्र्यांनीं एखादें हुकूमशाही पद्धतीचें बिल आणणें ही अर्थातच लोकशाहीप्रधान हुकूमशाही नव्हे. लोकशाही म्हणजे बहुसंख्य लोकांचें राज्य आणि लोकशाहीप्रधान हुकूमशाही म्हणजे बहुसंख्य लोकांच्या हितासाठीं पिळणूक करणाऱ्या अल्पसंख्य लोकांविरुद्ध अमलांत येणारी हुकूमशाही. त्याचा अर्थ असा, कीं पिळणाऱ्या मूठभर लोकांची सत्ता एकदां उलथून पाडल्यानंतर त्या लोकांना नवीन राजवटींत, ती

राजवट सामर्थ्यशाली होईपर्यंत मतदानाचा हक्क राहणार नाहीं. सरकार जर अशा प्रकारचा कार्यक्रम अमलांत आणून जमीनदारविरोधी हुकूमशाही स्थापना करणार असेल, कसलाहि मोबदला न देतां जमीनदारांच्या जमिनी जप्त करणार असेल, तर मी त्यांना संपूर्ण पाठिंबा देईन.

परंतु हें बिल अशा प्रकारच्या खऱ्याखुऱ्या लोकशाहीसाठीं नाहीं. तें फक्त हुकूमशाही स्थापन करण्यासाठीं आहे.

आणि म्हणूनच या बिलाला माझा विरोध आहे.

● ● ●

# काळा कायदा रद्द करा

कामगारांच्या संपाचा हक्क पूर्णपणें हिरावून घेणारा नवा काळा कायदा घाईघाईनें पास करून घेण्याचें मुंबईच्या काँग्रेस मंत्रिमंडळानें ठरविलें. या नव्या काळ्या कायद्यावर पुणें येथील मुंबई प्रांतिक असेंब्लीच्या अधिवेशनांत ता. २६ सप्टेंबर १९४६ रोजीं चर्चा सुरू झाली.

१९३८ च्या जुन्या काळ्या कायद्यांतील सर्व मुख्य तत्त्वें नव्या कायद्यांत जशींच्या तशीं ठेविलीं होती. शिवाय आणखीं नवीं कामगार विरोधी तत्त्वेंही घुसडून देण्यांत आली होती. उदाहरणार्थ, या नव्या कायद्यांत कामगारांवर ' सक्तीचा लवाद ' लादण्यांत आला व जुन्या कायद्यांत संपाचें हत्यार वापरण्याची थोडीशी तरी जी सोय होती तीसुद्धां काढून घेण्यांत आली. शिवाय ' सरकार-मान्य युनियन 'चा एक नवा वर्ग निर्माण करून ट्रेड युनियन चळवळीवर संकट आणण्यांत आलें व कामगारांच्या माना मालकांच्या हातीं देण्याची पक्की सोय करून ठेवण्यांत आली.

असा महत्त्वाचा कायदा पास करण्यापूर्वी त्याचा मसुदा लोकमत अजमावण्यासाठीं निरनिराळ्या संस्थांकडे पाठविण्याचा सर्वसाधारण प्रघात आहे. पण त्यावेळचे मजूरमंत्री श्री. नंदा यांनीं ही लोकशाहीची प्रथा धाब्यावर बसवून हा कायदा तडकाफडकीं पास करून घेण्याचें कारस्थान रचलें.

हें कारस्थान हाणून पाडण्याची व काळ्या कायद्याविरुद्ध कामगारवर्गाचा जोरदार आवाज असेंब्लींत उठविण्याची जबाबदारी असेंब्लींतील एकमेव कम्युनिस्ट सभासद कॉ. डांगे यांचेवर पडली व ती त्यांनीं उत्कृष्ट रीतीनें पार पाडली. त्यांनीं सुमारें सव्वासहा तास भाषण करून या बिलाचें काळेकुट्ट स्वरूप स्पष्टपणें चव्हाट्यावर

*आणलें. त्यांच्या भाषणांत व्यत्यय आणण्याचा प्रयत्न श्री. नंदा यांनीं व डॉ. अंत्रोळीकरांसारख्यांनीं करून केला पण कॉ. डांगे यांच्या झणझणीत उत्तरांमुळें या विरोधकांची भंबेरी उडाली. कॉ. डांगे यांनीं बिलाच्या पहिल्या वाचनाच्या वेळीं केलेल्या भाषणाचा हा सारांश*

पूर्वीच्या कायद्यांत ( १९३८ च्या काळ्या कायद्यांत ) महत्त्वाच्या अशा ज्या ज्या घातुक गोष्टी आहेत त्या सर्व या नव्या बिलांत कायम ठेवल्या आहेत. या बिलांतल्या एकाच कलमाला मी मनःपूर्वक पाठिंबा देतों व तें म्हणजे १९३८ **चा काळा कायदा रद्द करणारें कलम.**

१९३८ चा काळा कायदा पूर्णपणें अयशस्वी ठरला आहे. स्वतः श्री. नंदा यांनीं ता. २५ एप्रील १९४६ रोजीं केलेल्या जाहीर निवेदनांत याची स्पष्ट कबुली दिली आहे. मुंबईच्या गिरणी कामगारांनीं मांडलेल्या मागण्यांचा प्रश्न सोडविण्यास १९३८ च्या कायद्यानें ठरविलेला मार्ग मुळींच उपयोगी पडत नाहीं, असें त्या निवेदनांत म्हटलें आहे. म्हणजे लाखों कामगारांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नाच्या बाबतींत हा कायदा कुचकामाचा आहे. तसेंच किरकोळ तक्रारी मिटविण्याच्या बाबतींत सुद्धां १९३८ चा काळा कायदा निरुपयोगी असल्याची लेखी कबुली श्री. नंदा यांनीं या नव्या बिलाच्या प्रस्तावनेंतच दिली आहे.

हा कायदा महत्त्वाचे प्रश्न सोडवूं शकत नाहीं आणि लहानसहान प्रश्न सुद्धां सोडवूं शकत नाहीं. मग त्याचा उपयोग काय ? त्याचा उपयोग एकच, तो म्हणजे संप चिरडून टाकणें ! त्यासाठींच कन्सीलिएटर, नोटिस, एल् फॉर्म, एम. फॉर्म वगैरे जंजाळ निर्माण केलें आहे. आणि हें सर्व पुरें पडलें नाहीं तर मोरारजींचें पोलीसखातें तयार आहेच !

एखादा फेरबदल घडवून आणण्यासाठीं जर मालकांनीं नोटीस दिली असेल तर लेबर ऑफिसरनें तीन दिवसांच्या आंत सभा भरवून कामगारांचे प्रतिनिधी निवडून घेतले पाहिजेत; पण जर कामगारांनी नोटीस दिली असेल, तर लेबर ऑफिसरनें मनास वाटेल तेव्हां सभा भरवावी. काळ्या कायद्यांत असा स्पष्ट कामगार विरोधी नियम आहे. १९४१ सालीं कामगारांनीं दिलेल्या

कित्येक नोटिसांवर आजपर्यंतसुद्धां लेबर ऑफिसरनें निवडणूक घेतलेली नाहीं! ( असा प्रकार १७ गिरण्यांत झाल्याचें कॉ. डांगे यांनीं या ठिकाणीं दाखवून दिलें तेव्हां हा घाव वर्मीं लागल्यामुळें श्री. नंदांचा चेहरा गोरामोरा झाला. ते मध्येंच उठून म्हणाले, " हा नियम मी केला नव्हता, कॉंग्रेस मंत्रिमंडळानें राजिनामा दिल्यानंतर हा नियम झाला असेल. " पण कॉ. डांगे यानीं ताबडतोब जबाब दिला, " नियमांचें पुस्तक माझ्या हातांत आहे. त्याच्यावर तारीख २९ मे १९३९ आहे. तुम्ही राजिनामा दिला ऑक्टोबर १९३९ मधें! हें पुस्तक सरकारी छापखान्यांत छापलें आहे व सरकारनें प्रसिद्ध केलें आहे; कम्युनिस्ट पक्षाच्या लोक प्रकाशनगृहानें नव्हे. "! यावर श्री. नंदा मुकाट्याने खालीं मान घालून बसले. )

याच काळ्या कायद्याच्या पायावर तुम्हीं हें नवें बिल उभारलें आहे. पाया जर कामगारविरोधी, तर वरची इमारतसुद्धां कामगारविरोधीच असणार.

मुंबई प्रांताच्या कॉंग्रेस मंत्रिमंडळानें आपलें कामगारविषयक धोरण जाहीर करणारें जें पत्रक प्रसिद्ध केलें आहे त्या पत्रकांत पुष्कळ गोडगोड वचनें दिलीं आहेत; पगारवाढ देऊं, आरोग्याची सोय करूं, यंव करूं आणि त्यंव करूं! छान! माझें म्हणणें एवढेंच, कीं अगोदर तीं वचनें पुरीं करा आणि मगच संपावर नियंत्रण घालण्याची भाषा बोला. श्री. नंदा जर कामगारांना सांगतील कीं हें पहा तुमची परिस्थिति मी सुधारून दिली आहे, आतां यापुढें संप कराल तर खबरदार तर, तें मला समजूं शकेल. पण परिस्थितींत सुधारणा काडीइतकीसुद्धां नाहीं आणि संपाविरुद्ध बडगा मात्र ताबडतोब! कॉंग्रेस वर्किंग कमिटीच्या ठरावांतसुद्धां कबूल केलें आहे कीं अलीकडे जी संपाची लाट उसळली आहे तिचें मुख्य कारण म्हणजे महागाईमुळें कामगारवर्गाचे होणारे भयंकर हाल हेंच होय. अर्थात् कॉंग्रेस मंत्र्यांचें पहिलें कर्तव्य या महागाईइतकी पगारवाढ मिळवून देणें व कामगारांच्या परिस्थितींत सुधारणा करणें हेंच ठरतें. पण श्री. नंदा यांचें धोरण 'कसेंही करून संपांना बंदी करावयाची' हेंच आहे. '**अगोदर परिस्थिति सुधारा**' या घोषणेऐवजी '**अगोदर संप चिरडून टाका**' हीच त्यांची घोषणा आहे.

श्री. नंदा सांगतात, १९३८ च्या काळ्या कायद्यामुळें ट्रेड युनियन चळवळीच्या वाढीला फार मोठी मदत झाली! याला पुरावा काय, तर म्हणे या कायद्याप्रमाणे एकंदर नऊ युनियन्स गेल्या आठ वर्षांत रजिस्टर झाल्या.

या प्रातिनिधिक युनियनपैकीं एक खुद्द नंदासाहेबांची अहमदाबादची मजूर महाजन आहे. या मजूर महाजनच्या सभासदांची संख्या १९३८ च्या काळ्या कायद्यामुळेंच वाढली काय ? कीं अगोदरच ती संख्या मोठी होती ? तसेंच अमळनेर, धुळें, जळगांव इथल्या प्रातिनिधीक युनियन्स घ्या. काळा कायदा पास होण्यापूर्वींच या युनियन्स जोरदार झाल्या होत्या. काळ्या कायद्यानें त्यांना ' प्रातिनिधिक युनियन ' एवढें फक्त लेबल चिकटवून दिलें, दुसरें कांहीं केलें नाहीं.

उलट मुंबई आणि सोलापूर या गिरण्यांच्या मुख्य केंद्रांकडे पहा. या दोन शहरांत काळ्या कायद्याप्रमाणें प्रातिनिधिक युनियन मुळींच अस्तित्वांत येऊं शकली नाहीं. याचें कारण काय ?

मुंबईचे गिरणी कामगार अत्यंत लढाऊ आहेत. ते सबंध हिंदुस्थानांतील कामगार चळवळीच्या आघाडीवर आहेत. गिरणी मालकांना पहिल्यांदा कोणी नरम केलें असेल तर तें मुंबईच्या गिरणी कामगारांनींच. पंतप्रधान बाळासाहेब खेरांना मुंबईचा नागरिक म्हणवून घेण्याचा मोठा अभिमान वाटतो. मलासुद्धां मुंबईचा फार अभिमान आहे. गिरणी कामगारांच्या मुंबईचा मला मोठा अभिमान वाटतो. मुंबईच्या गिरणी कामगारांनीं मालकांशीं झुंज देऊन अनेक सवलती मिळविल्या. मालक इतके घाबरून गेले कीं त्यांच्यापैकीं कांहींजण ' नको ही मुंबई ' म्हणून कुणी ग्वाल्हेरला, कुणी इंदूरला, कुणी रतलामला असे धूम ठोकूं लागले. पण मुंबईचा कामगार तिथेंसुद्धां त्यांच्यापुढें दत्त म्हणून उभा होताच ! मुंबईच्या कामगारानें या मालकांचा पिच्छा पुरविला !

अशा मुंबईच्या गिरणी कामगारांची प्रातिनिधिक युनियन अस्तित्वांत आणणें १९३८ च्या काळ्या कायद्याला कां शक्य झालें नाहीं ?

१९२८ सालीं मुंबईत गिरणी कामगारांची एकूण संख्या १,१८,००० होती व त्यावेळीं मुंबई गिरणी कामगार युनियनचे ८०००० सभासद होते. त्यावेळीं काळा कायदा नव्हता. तरीसुद्धां एवढी प्रचंड युनियन अस्तित्वांत येऊं शकली. पण सरकारनें धरपकड करून मीरत कटाचा खटला सुरू केला आणि त्यानंतर युनियनच्या सभासदांची संख्या खालीं गेली. पुन्हां १९४० सालीं युनियनच्या सभासदांच्या संख्येत वाढ झाली, पण ती प्रातिनिधिक युनियन बनणार, इतक्यांत सरकारनें पुन्हां आमची धरपकड केली व त्यानंतर सभासदांची संख्या पुन्हां घटली.

सरकारच्या दडपशाहीमुळें आमच्या युनियन्स चिरडल्या गेल्या हें स्पष्ट दिसत असतांना आमचे विरोधक निर्लज्जपणें आम्हांलाच दोष देतात.

सोलापूरचा इतिहास हाच आहे. आणि अमळनेरला प्रातिनिधिक युनियन अस्तित्वांत असतांना तिला चिरडण्यासाठीं कशी दडपशाही करण्यांत येत आहे याचा इतिहास तर ताजाच आहे. मात्र इथल्या कांहीं आमदारांना इतिहासाचा चटकन विसर पडतो असें दिसतें.

तेव्हां काळ्या कायद्यामुळें युनियन्सच्या वाढीला मदत झाली असें कसें म्हणतां येईल ? इतर प्रांतांत काळा कायदा मुळींच नव्हता, आणि मुंबई प्रांतांत सुद्धां गिरण्यांखेरीज इतर धंद्यांत काळा कायदा लागू नव्हता. पण युनियन्सची वाढ सर्व देशभर व सर्व धंद्यांत झाली आहे. १९२८–२९ सालीं सबंध हिंदुस्थानांतील एकंदर ट्रेड युनियन सभासदांची संख्या १८१००० होती, ती १९२९–३० सालीं २,४२,००० झाली. एका वर्षांत एवढी प्रचंड वाढ झाली ती काळ्या कायद्यामुळें खास नव्हे! १९३९–४० सालीं ही संख्या ३,९०,००० झाली व १९४२–४३ सालीं ६, ८५,००० झाली.

देशभर ट्रेड युनियन चळवळीचा जोर एकसारखा वाढत होता. कामगार–वर्गानें संघटित होण्याचा निर्धार केला होता. ट्रेड युनियन्सची जी वाढ झाली ती यामुळेंच. काळ्या कायद्यानें नव्हे! उलट १९३८ च्या काळ्या कायद्यानें या वाढीला अडथळाच केला.

नामदार नंदानीं बेकायदेशीर संपांबद्दल उल्लेख केला. पण १९३८ सालापूर्वी बेकायदेशीर संप होत नव्हते, कारण संप बेकायदेशीर करणारा काळा कायदा त्यावेळीं नव्हता! त्यावेळीं मालकांनीं कामगारांवर हल्ला केला कीं कामगार लगेच ठोशास ठोसा देऊन त्याचा प्रतिकार करीत असत. त्यावेळीं लेबर ऑफिसरच्या कचेरीचे उंबरठे झिजविण्याची गरज पडत नसे. पण १९३८ नंतर काळ्या कायद्यानें साधे संपसुद्धां बेकायदेशीर ठरवून टाकले. मालकांनीं कितीहि लाथा मारल्या तरी प्रतिकार करू नका, महात्म्याची सहनशीलता दाखवा आणि एल्. फॉर्म, एम. फार्म भरीत बसा, असें सांगण्यांत आलें, आणि हें सर्व केलें नाही तर संप बेकायदा म्हणून ठोकून काढणार !

मी म्हणतों, बेकायदेशीरपणाचा एवढा बाऊ कशाला ? आपल्या देशांत तर बेकायदेशीर लढा ही मोठी पवित्र गोष्ट समजण्यांत येते. कायदेभंगाच्या

चळवळीपासून बेकायदेशीर लढा हे आपल्या राष्ट्रीय चळवळीचें मूलभूत अंग बनलें आहे. हीच परंपरा कामगारांनीं पुढें चालविली तर त्यांचें अभिनंदन करावयास नको का ?

मुंबईतच बेकायदेशीर संपांचें फार पीक माजलें आहे असें श्री. नंदा म्हणतात, पण आजकाल संपाची लाट सबंध देशभर उसळली आहे हें त्यांना नाकारतां येणार नाहीं. सगळेच कामगार संपावर येत आहेत. त्यांची परिस्थितीच भयंकर झाली आहे आणि संपावर येण्यावांचून त्यांना गत्यंतर उरलें नाही. यावर उपाय परिस्थिति सुधारणें हाच आहे, कामगारांना दडपणें हा नव्हे.

संप बेकायदेशीर ठरवून चिरडून टाकल्यानें तंटे लवकर मिटतील किंवा ट्रेड युनियन चळवळीची वाढ होईल असें श्री. नंदा म्हणतात. ' चिरडणें ' या शब्दाऐवजी ' नियंत्रण घालणें ' हा नवा शब्द त्यांनीं वापरला आहे. पण भाषा बदलली तरी अर्थ तोच कायम आहे. संप चिरडण्यासाठीं त्यांनीं आतां नवी युक्ति योजली आहे व ती म्हणजे बिलांतले कलम ७३. या कलमान्वयें सरकारला कामगारांवर सक्तीचा लवाद नेमण्याचा अधिकार दिला आहे. लेबर ऑफिसरकडून किंवा ' अन्य रीतीनें ' सरकारकडे विशिष्ट प्रकारचा रिपोर्ट आल्यास सरकार या कलमाप्रमाणें सक्तीचा लवाद नेमील, व त्यानंतर कोणी संप केला तर तो बेकायदेशीर ठरेल. याचें नांव ' लोकशाही पद्धतीनें ' संप चिरडणें.

ज्या लेबर ऑफिसरच्या रिपोर्टाचा सरकार आधार घेणार, तो इसम कोण आहे ?

लेबर ऑफिसर हा प्राणी ब्रिटिश सरकारनें १९३४ सालीं निर्माण केला. दडपशाहीचें नवें हत्यार म्हणूनच तो अस्तित्वांत आला. ब्रिटिश सरकार आतां निघून गेलें आहे असें म्हणतात ! पण ब्रिटिश सरकारनें निर्माण केलेला हा लेबर ऑफिसर मात्र काँग्रेस सरकारच्या राजवटींत कायम आहे.

त्याच्याकडून किंवा ' अन्य रीतीनें ' रिपोर्ट आला कीं सरकार तो प्रमाण धरणार ! ' अन्य रीतीनें ' म्हणजे अर्थात सी. आय. डी. खात्याकडून ! याला म्हणतात लोकशाही !

आणि लेबर ऑफिसर किंवा सी. आय. डी. खातें आपल्या रिपोर्टांत

मंत्र्यांना काय कळवणार ? 'सार्वजनिक शांततेला धोका आहे काय ?' यावर ते रिपोर्ट करणार. पण मागें व्हाईटवे या ब्रिटिश कंपनीवर देशसेविका पिकेटिंग करीत होत्या, तेव्हां 'सार्वजनिक शांततेला धोका उत्पन्न झाला आहे' असाच रिपोर्ट करण्यांत आला ! कुणी म्हणेल, त्यावेळचे गृहमंत्री निराळे होते, आतां आमचे मुरारजी आहेत. पण अमळनेरच्या अनुभवानंतर असल्या वातांवर मला विश्वास ठेवतां येत नाहीं.

तसेंच 'समाजाला दीर्घकाळ हाल सोसावे लागतील काय ?' यावर ते रिपोर्ट करणार. ही भाषा हिंदुस्थान सरकारच्या १९२९ च्या कायद्यांतून जशीच्या तशी उचलली आहे. त्या वर्षी देशभर संपाची लाट उसळली होती व तिनें राष्ट्रीय चळवळीला फार मदत केली. ही लाट चिरडण्यासाठींच सरकारनें १९२९ चा कायदा केला होता.

रिपोर्टाचा तिसरा मुद्दा 'धंद्याला बरेंच नुकसान पोंचेल काय ?' हा असणार. गिरणी-मालकांचे प्रतिनिधी सकलातवाला इथें बसले आहेत. त्यांना विचारा. ते म्हणतील कीं प्रत्येक संपानें धंद्याला नुकसान पोचतें ! मालकांनीं प्रसिद्ध केलेल्या हिशेबांत नेहमीं नुकसान दाखविलेलें असतें. १९३८ सालीं त्यांनीं दिवाटिया कमिटीला सांगितलें कीं आम्हांला फक्त आठ लाख रुपये फायदा झाला आहे. पण खरोखरी झाला होता ९७ लाख. आणि असल्या हिशेबांच्या आधारें लेबर ऑफिसर रिपोर्ट करणार कीं या संपामुळें धंदा रसातळाला जाणार आहे, म्हणून नेमा सक्तीचा लवाद.

या कलमान्वयें सरकारला जे भरमसाट अधिकार दिले आहेत ते मुळींच देतां कामा नये. सार्वजनिक शांततेच्या नांवाखालीं या कलमान्वयें सरकारला कोणताही संप चिरडतां येईल. बराच वेळ चालणाऱ्या संपांत शांतता राहूं शकत नाहीं हें खरें, पण त्याचें कारण हेंच कीं मालक संपफोड्यांचा उपयोग करूं पाहतात. संपफोडेगिरी हा ट्रेड युनियन चळवळीच्या दृष्टीनें गुन्हा आहे ! पण तो कायद्यानें गुन्हा ठरविलेला नाहीं, उलट मालकांचा मूलभूत हक्क समजला जातो ! आम्हीं वाटेल त्याला कामावर ठेवूं आणि वाटेल त्याला काढून टाकूं, आमच्या या हक्कांत कोणी ढवळाढवळ करतां कामा नये, हें मालकांचें म्हणणें आहे. याचेंच नांव 'उद्योगधंद्यांतील झारशाही !'

समाजाच्या बाबतींत कामगारांवर जबाबदारी आहे व ती त्यांना

शिकवण्यासाठींच संपांवर नियंत्रण घातलें आहे असें श्री. नंदा म्हणतात पण कामगारांना सामाजिक जबाबदारीचे धडे देण्यापूर्वीं त्यांच्या परिस्थितींत सुधारणा कराना ! त्यांना माणसांसारखें राहातां येईल अशी व्यवस्था अगोदर कराना ! शिवाय ' समाज ' म्हणजे तरी काय ? कामगार, शेतकरी वगळले तर समाजांत कोण उरतात ? मालक आणि सरकार हेच ! कलकत्त्याच्या चाळीसलाख समाजापैकीं ४० लाखांनीं संप करून पोस्ट कामगारांना पाठिंबा दिला. मुंबईच्या सबंध समाजानें पोस्टाच्या संपाला पाठिंबा दिला. पण लेबर ऑफिसरनें किंवा सी. आय. डी. नें जर रिपोर्ट केला कीं या संपामुळें समाजाचें नुकसान होत आहे तर सरकार हे संप बेकायदेशीर ठरविणार ! तुम्ही या संप करणाऱ्या समाजापासूनच समाजाचें रक्षण करणार काय ?

विशेष गोष्ट म्हणजे सक्तीचा लवाद नेमतांना लेबर ऑफिसरच्या व सी. आय. डी. च्या रिपोर्टांवर अवलंबून राहाणारें सरकार युनियनचा सल्ला मात्र मुळींच घेणार नाहीं. या कलमांत त्याची कांहीं सोय केलेली नाहीं. स्वतःला ' ट्रेड युनियन पुढारी ' म्हणविणाऱ्या नंदासाहेबांची करामत ही आहे !

समाजाचे खरे शत्रू असलेल्या नफेबाज मालकांना आळा घालण्याची या बिलांत कांहीं तरतूद नाहीं. कापडाच्या टंचाईला मालकच जबाबदार आहेत. कोळशाच्या टंचाईमुळें अहमदाबादमध्यें गिरण्या बंद राहून १९४५ सालीं कापडाचें उत्पादन ७ कोटी ७० लक्ष वार कमी झालें. अहमदाबादच्या गिरणी मालकांना अशी सूचना करण्यांत आली होती कीं त्यांनीं कोळशाऐवजीं तेल वापरावें. कांहीं मालक याला कबूल होते, पण मिल मालक संघानें त्यांना तसें करूं दिलें नाहीं. समाजाचें व कामगारांचें हें नुकसान झालें त्याला जबाबदार कोण ? संप चिरडण्याऐवजीं या मालकांच्या टोळक्यालाच कां चिरडत नाहीं ?

पूर्वींच्या कायद्यानें संपाचा हक्क बहुतांशी हिरावून घेतला होता आणि या नव्या कायद्यानें तर तो सर्वस्वीं हिरावून घेतला आहे.

संपाच्या हक्काला आम्हीं इतकें महत्त्व कां देतों ? कारण मालकांकडून कोणत्याहि सवलती मिळविण्यासाठीं कामगारांच्या हातांत एकच हत्यार आहे व तें म्हणजे संपाचा हक्क ! मालक आपल्या आर्थिक व राजकीय सत्तेच्या जोरावर कामगारांवर हुकूमशाही चालवतात. कामगारांना कारखान्यांत मजुरी केल्याशिवाय जगतां येत नाहीं व हे कारखाने मालकांच्या मालकीचे असतात. पण

कामगारांजवळ एकच शस्त्र असतें व तें म्हणजे त्यांची श्रमशक्ति. मालक स्वतःच्या फायद्यासाठीं कामगारांच्या श्रमशक्तीचा उपयोग करतो. कामगारांच्या श्रमशक्तींतूनच मालकांचा फायदा निर्माण होतो. तेव्हां मालकाला वठणीवर आणण्याचा एकमेव मार्ग त्याला कामगारांची श्रमशक्ति मिळूं न देणें व अशा रीतीनें त्याचा फायदा बंद पाडणें हाच आहे. कामगारांच्या हिताचे कायदे पास करून घेण्याचा मार्गसुद्धां हाच आहे.

आपल्या देशांत १८५० च्या सुमारास गिरण्या, कारखाने अस्तित्वांत येऊं लागले, तेव्हांपासून १९१८ पर्यंत कामगार संघटना नव्हती, व म्हणून कामगारांच्या पिळवणुकीला मर्यादासुद्धां नव्हती. देवानें रात्र निर्माण करून दिवसाच्या कामाचे तास मर्यादित केले, पण मालकांनीं विज निर्माण करून ही मर्यादासुद्धां धुडकावून लावली ! मालकांनीं कामगारांना आपण होऊन कोणत्याच सवलती दिल्या नाहींत. पण १९१८ नंतर संपाची लाट उसळूं लागली व कामगारांनीं एकामागून एक सवलती मिळविल्या. १९२० सालीं १० तासांचा दिवस झाला. १९२५ सालीं पगारकाट हाणून पाडली व शिवाय देशी कापडाच्या धंद्याची गळचेपी करणारा एक्साईज ड्यूटीचा कर रद्द करण्यासहि ब्रिटिश सरकारला भाग पाडलें. १९२८ सालीं कामवाढीचा हल्ला परतविला. १९३४ सालीं ९ तासांचा दिवस मिळविला. संपामुळें कामगारांना हाल भोगावे लागतात खरे, त्याला इलाज नाहीं. पण संपामुळें फक्त नुकसानच होतें हें म्हणणें खोटें आहे. संपाचा हक्क अमलांत आणल्यानेंच कामगारांना महत्वाच्या सवलती मिळवितां आल्या. हा हक्क मर्यादित करणें म्हणजे आपली परिस्थिति सुधारण्यासाठीं कामगारांच्या हातांत असलेलें एकमेव हत्यार बोथट करणेंच होय. त्याचा अर्थ मालकांच्या हातीं कामगारांच्या माना देणें हाच होतो.

आतां जनतेचें सरकार स्थापन झालें आहे व त्याला अडचणींत टाकण्यासाठींच संपांची चिथावणी देण्यांत येत आहे असें आपण म्हणतां—पण जनतेचें सरकार आल्यामुळें संपाच्या लाटेला प्रोत्साहन मिळतें हा नेहमीचाच अनुभव आहे. फ्रान्स, इंग्लंड वगैरे देशांतही हाच अनुभव आहे. जनतेचें सरकार आलें म्हणजे लोकांना वाटतें कीं पूर्वी राज्यसत्तेचा उपयोग आमच्याविरुद्ध करण्यांत येत होता तो आतां आमची पिळणूक करणाऱ्यांविरुद्ध करण्यांत येईल. म्हणूनच कामगारांच्या व शेतकऱ्यांच्या लढ्यांना जोर चढतो. अर्थात खुद्द त्या

सरकारची कल्पना जनतेच्या या कल्पनेपेक्षां वेगळी असेल! माझें म्हणणें असें कीं हे संप चिथावणीमुळें उगाच होतात असा जनतेच्या सरकारनें समज करून घेऊं नये. या संपांचें मुख्य कारण कामगारांची हलाखीची परिस्थिति हेंच आहे व तें खुद्द कॉंग्रेसनें मान्य केलें आहे. सरकारनें तें विसरूं नये.

एकदां एका गिरणींत कामगारांतर्फे श्री. बखले यांनीं मागण्या मांडल्या. मालकांनीं श्री. बखले यांच्याशीं वाटाघाटी करण्याचेंच नाकारलें. मालक ऐकेना, तेव्हां शेवटीं बखले त्याला म्हणाले, 'तुम्ही माझ्याशीं वाटाघाट केली नाहीं तर डांगे इथें येतील व त्यांच्या पुढारीपणाखालीं कामगार संप करतील!' मालक एकदम नरम आला व त्यानें श्री. बखल्यांशी वाटाघाट सुरू केली. संपाचा हक्क असेल तरच मालकाला नरम आणतां येतें याचें हें एक उदाहरण आहे.

हें झालें बिलांतील सर्वसाधारण तत्त्वांच्या बाबतींत. पण कामगार व मालक यांच्या तंट्याचा निकाल लावण्यासाठीं बिलांत जी गुंतागुंतीची व्यवस्था केली आहे तिचें काय?

लेबर ऑफिसर, कन्सिलिएटर, लेबर कोर्ट, इंडस्ट्रियल कोर्ट, वगैरे पसारा पाहिजे कशाला? भांडण आहे कामगार व मालक या दोन वर्गांचें, तेव्हां मालकांच्या शक्तीविरुद्ध कामगारांची शक्ति उभी करा कीं सर्व प्रश्न सुटेल. कामगारांच्या संघटनेची ताकद वाढविणें हाच तंटे मिटविण्याचा खरा मार्ग आहे. त्याऐवजीं कामगारांवर लेबर ऑफिसर लादणें म्हणजे ट्रेड युनियन चळवळ खच्ची करणेंच होय. लेबर ऑफिसरला कामगारांचा प्रतिनिधी म्हणून मिरविण्याचा मुळींच हक्क असतां कामा नये. मजूर मंत्र्यांना सल्लागार म्हणून एखादा लेबर ऑफिसर हवा असेल तर त्यांनीं तो खुशाल घ्यावा, पण त्याला कामगारांचा प्रतिनिधी मात्र बनवूं नये. खुद्द नंदासाहेबांची मजूर महाजन अस्तित्वांत असतांना सुद्धां अहमदाबादच्या कामगारांतर्फे उभे राहाण्याचा अधिकार या लेबर ऑफिसरला दिला आहे. असला अधिकार काढून घेतला पाहिजे. हा ऑफिसर मालकांचा हस्तक म्हणून नेहमीं वागतो. लेबर ऑफिसरच्या लुडबुडीमुळें गेलीं ८ वर्षें कामगार चळवळीला फार अडथळा आला.

कन्सिलिएशनची मुदत आणखी कमी केली पाहिजे व लवादाचे किंवा लेबर कोर्टाचे निकाल ठराविक मुदतींत आले पाहिजेत अशी आमची मागणी

आहे. लेबर कोर्टांत व इंडस्ट्रियल कोर्टांत जे जज्ज नेमावयाचे ते नुसतेच वकील असतां कामा नये अशीहि आमची सूचना आहे.

कन्सिलिएटरला तडजोड घडवून आणण्यासाठीं 'स्वतःला योग्य वाटेल तें' करण्याचा अधिकार दिला आहे. याचा अर्थ तो असा करतो कीं कामगारांना इंग्रजींत शिव्या द्याव्या, गोळीबाराची किंवा धरपकडीची धमकी द्यावी, वगैरे! आणि यावर आक्षेप घेतला तर तो म्हणतो, कीं माझें हें बोलणें अनौपचारिक स्वरुपाचें आहे! कन्सिलिएटरला असले अधिकार देतां कामा नये.

या भानगडी करण्यापेक्षां सर्व युनियन्सना मान्यता देण्यास मालकांना भाग पाडणें हाच उत्तम मार्ग होय. या कायद्याप्रमाणें प्रातिनिधीक युनियन्सच्या सभासदांचें किमान प्रमाण शेंकडा १५ ठेविलें आहे. एका युनियनचे सभासद शेंकडा १५ असतील व दुसरीचे शें. १४ असतील, तर फक्त पहिलीच रजिस्टर करण्यांत येईल. ही लोकशाही नव्हे. एकाच धंद्यांत अनेक युनियन्स रजिस्टर करण्याला कांहीं हरकत नाहीं. हिंदुस्थान सरकारच्या रेल्वे बोर्डानें बी. बी. सी. आय. रेल्वेच्या तीन युनियन्सना मान्यता दिली आहे. एक आमच्या नेतृत्वाखालील, एक कॉंग्रेसवाद्यांच्या नेतृत्वाखालील, व एक रॉयिस्टांच्या नेतृत्वाखालील—पण त्यामुळें कांहीं नुकसान झालेलें नाहीं.

'सरकारमान्य' युनियन्सचा एक नवा वर्ग या बिलांत अस्तित्वांत आणला आहे. या युनियन्सनीं आपल्या मूलभूत हक्कांवर पाणी सोडलें पाहिजे, व त्याचा मोबदला म्हणून त्यांना गिरणीच्या आवारांत नोटीस लावणें, गिरणींत वर्गणी वसूल करणें वगैरे किरकोळ सवलती देण्यांत येतील. स्वतःच्या हक्कांवर पाणी सोडणाऱ्या संस्था श्री. नंदांना विशेष पसंत आहेत असें दिसतें! गिरणींत वर्गणी वसूल करण्याचा हक्क आम्हीं १९२८ सालीं मिळविला होता. त्यासाठीं संपाचा हक्क सोडून देण्याची आम्हांला गरज पडली नाहीं. कॉलेजांतल्या विद्यार्थ्यांनासुद्धां कॉलेजच्या बोर्डावर नोटिस लावण्याचा बिनशर्त हक्क असतो. असल्या सवलती संघटनेच्या जोरावर मिळवायच्या असतात, मूलभूत हक्कांच्या मोबदल्यांत नव्हे!

१९३८ च्या काळ्या कायद्याप्रमाणें केलेल्या स्टँडिंग ऑर्डर्सचें मूलभूत तत्त्व 'मालक म्हणजे जेलर आणि कामगार म्हणजे कैदी' हें आहे. स्टँडिंग

ऑर्डर नंबर १६ प्रमाणें मालकाला वाटेल त्यावेळीं गिरण बंद ठेवतां येते, हा त्याचा 'खाजगी मालकीचा हक्क' समजण्यांत येतो. पण गिरण म्हणजे अंगांतला शर्ट नव्हे, गिरण म्हणजे जनतेसाठीं माल तयार करण्याचें साधन. अर्थात् वाटेल तेव्हां गिरण बंद ठेवण्याचा मालकाला हक्क असतां कामा नये. मालक मुद्दाम खोट्या सबबी काढून गिरण बंद ठेवतात असा अनुभव आहे. नुकताच रतलामला हा अनुभव आला. स्टँडिंग ऑर्डर १९ अ प्रमाणें मालक कामगाराला वाटेल तेव्हां काढूं शकतो. असल्या जुलमी स्टँडिंग ऑर्डर्स बदलून घेणें आतां कठीण झालें आहे. कारण बिलाच्या मूळ मसुद्यांत ६ महिन्यांची मुदत होती, ती आतां नव्या उपसूचनेप्रमाणें एक वर्ष केली आहे.

मालकानें एकादा बेकायदेशीर फेरबदल घडवून आणला तर त्यावर तावडतोब उपाय योजण्यास या कायद्यानें कामगारांना मनाई आहे. कामगाराला जास्त काम करण्यास किंवा ऊष्णता फारच वाढविलेल्या खात्यांत काम करण्यास मालकानें जर बेकायदेशीर रीतीनें भाग पाडलें, तर कामगारानें तें मुकाट्यानें सहन केलें पाहिजे. त्याबद्दल मालकाला फार तर मागाहून दंड होईल व कामगाराला नुकसान-भरपाई मिळेल. पण त्याचा उपयोग काय? मध्यंतरी कामगाराला जीव नकोसा होतो त्याचें काय? दंड भरणें मालकांना पुष्कळ वेळां फायदेशीरच होतें.

सर्व गिरण्यांत एकच तक्रार किंवा मागणी असली तरी ती या कायद्या-प्रमाणें सर्व गिरण्यांतील कामगारांना एकदम मांडतां येत नाहीं व त्यासाठीं एकदम उपाय योजतां येत नाहीं. ६० गिरण्यांनीं निरनिराळ्या नोटिसा दिल्या पाहिजेत व ६० व्या गिरणीची निवडणूक होईपर्यंत पहिल्या गिरणीच्या कन्सिलिएशनची मुदत संपून गेलेली असते. कामगारांना एकजुटीनें मालकाच्या जुलमाचा प्रतिकार करतां येऊं नये यासाठींच ही युक्ति योजली आहे.

अशा रीतीनें या कायद्याचा एकंदर रोख कामगारांच्या विरुद्ध आहे. कोणत्याही दृष्टीनें पाहिलें तरी हा कायदा प्रतिगामी स्वरुपाचा आहे. या कायद्यानें कामगारांचें संरक्षण होत नाहीं व समाजाचेंसुद्धां संरक्षण होत नाही. ह्या कायद्यांतील गुंतागुंतीची व्यवस्था ट्रेड युनियन चळवळीला मारक व कामगारवर्गाच्या हितसंबंधांवर गदा आणणारी आहे. म्हणून या बिलाला मी पूर्ण विरोध करतों.

●●●

# माझी मराठी

*कल्याण येथील ' सरस्वतीमंडळाच्या ' वार्षिकोत्सव प्रसंगीं ता. २६ ऑक्टोबर १९४७ रोजीं केलेलें भाषण.*

साधारणतः लोक आम्हांला ओळखतात ते संप करणारे म्हणून. संपाचा आणि साहित्याचा संबंध काय ? कांहीं लोक माझा साहित्याशीं संबंध जोडण्याचा प्रयत्न करतात. परंतु तसें कांहीं नाहीं. साहित्य लिहिण्याचें पाप किंवा पुण्य मीं कधीं केलेलें नाहीं. साधारणतः प्रत्येक मनुष्य आपल्या वयाच्या एका विशिष्ट अवस्थेंत एकादी कविता लिहितो, आत्महत्येचा प्रयत्न करतो किंवा प्रेम करतो. वयाच्या विशाव्या वर्षातील हे तीन प्रयोग आहेत. यांपैकीं कविता मीं केलेली नाहीं; आत्महत्येचा प्रयत्नहि कधीं केला नाहीं. प्रेम केलें किंवा नाहीं हें सांगण्याची आवश्यकता नाहीं.

मग माझा आणि मराठी साहित्याचा संबंध काय ? गोष्ट अशी आहे कीं माझी मातृभाषा मराठी आहे. आणि ज्याला थोडे लिहितां वाचतां येतें त्याला मराठी वाचल्यावांचून गत्यंतरच राहात नाहीं; आणि एकदां वाचायला लागलें म्हणजे त्या मनुष्यांत थोडासा जरी जिवंतपणा असला तरी तो त्याबद्दल विचार करूं लागतो. माझीहि गोष्ट थोडीशी तशीच आहे. इंग्रजांच्या आमदानींत मला " पगारी रजा " भरपूर मिळाली. त्या रजेच्या काळांत सर्व जरी नाहीं तरी कांहीं वेंचक मराठी वाङ्मय वाचण्याची संधि मला मिळाली. या ठिकाणीं वेंचक वाङ्मय याचा अर्थ जेल सुपरिटेंडंटच्या अकलेंतून सुटतील तीं पुस्तकें असा घ्यायचा.

हें वेंचक वाङ्मय वाचल्यावर मला विचार सुचूं लागले. आपण

' मराठी असे आमुची मायबोली ' हें गाणें ऐकलेंच असेल. या मराठी भाषेबद्दल आपल्याला अभिमान वाटावा असें या भाषेनें आपल्याला काय दिलें ? जीवनाच्या निरनिराळ्या अवस्थांत असतांना, संप चालवीत असतांना किंवा तुरुंगांत असतांना किंवा प्रेम करीत असतांना मनाला स्फूर्ति मिळेल असें या भाषेनें, या भाषेंतील कलावंतांनीं आपल्याला काय दिलें आहे ? या भाषेंत जन्माला आल्याबद्दल आपल्याला अभिमान कां वाटावा ?

या दृष्टीनें विचार करीत मी कलेमध्यें पडलों; तेव्हां पहिलाच हल्ला असा जबरदस्त झाला कीं मूर्छित पडायची वेळ आली. संपांतील लाठीमार सुद्धां यापुढें कांहींच नाहीं. हा हल्ला म्हणजे ' कला म्हणजे काय ? ' फिन्ले मिलचं तलम पातळ आणि सुंदर धोतर टोपी हे पाहून जें सुचलें आणि लिहिलें ती कला काय ? आमचे मित्र प्रो. फडके हे मोठे पटाईत कलावंत आहेत. त्यांचें म्हणणे आहे कीं कला म्हणजे मनोरंजन ! मागणी तसा पुरवठा ! मार्गदर्शन वगैरे हें कलेचें काम नव्हे. तें पुढाऱ्यांचें काम. कलेचें काम म्हणजे पुढाऱ्यानें दाखविलेला मार्ग नेमका चुकवण्याचे !

## भाषा, देश आणि लोक

असा हा कलेचा वाद सुरू झाला तेव्हां मी पाहिलें कीं हें आपल्याला कांहीं जमावयाचें नाहीं. आणि मग मीच माझा मार्ग काढला. मी आपला एक ठोकळ सिद्धांत बसविला. गेल्या शेकडों वर्षांत मराठीमध्यें टिकलें काय ? तें पहातां असें दिसलें कीं जें कायम रहावें अन् आपण पाहावें असें वाटेल तें चांगलें वाङ्मय. जी जिवंत जगाचें जीवन दाखवील ती चांगली कला. हा साधारण निष्कर्ष अनेक शतकांच्या मराठी साहित्यांतून मी कसा काढला तें सांगतों.

आपण कोण ? मराठे ! कां ? तर आज महाराष्ट्रांत राहतो म्हणून ना ? पण या देशाला महाराष्ट्र हे नांव कशामुळें पडलें ? आधीं कोण ? महाराष्ट्र कीं मराठे ? मराठे लोक येऊन त्यांनीं याला महाराष्ट्र देश ठरविले, का महाराष्ट्रांत जे, ते मराठे झाले ? पूर्वकाळीं लोक येत व देशाला नांव देत. आतां देशांत कायम जीवन जे कंठतात त्यांना त्या देशाचें नांव मिळतें. मराठे-महाराष्ट्रीय लोकांची जी भाषा ती मराठी. भाषेला नांव देशावरून पडले नाहीं तर देशाला व भाषेला दोघांनाही नांव लोकांवरून पडलें.

महाराष्ट्री-महाराष्ट्रांत जे पूर्वी महाराष्ट्रिक आले त्यांच्या भाषेंत व आपल्या भाषेंत काय साम्य आहे ? अशोककालीन शिलाखंडांची, ज्ञानेश्वरीची मराठी आज कोण बोलतो वा समजतो ? मग या भाषेचा अभिमान आपण कां धरावयाचा ? आज तर आपण म्हणतो कीं ही भाषा टिळकांची, केळकरांची, गडकऱ्यांची. परंतु ही भाषा फक्त त्यांचीच नाहीं. ती सर्वांची भाषा आहे. आपल्या जीवनाची भाषा आहे. या भाषेत बोलणारांना आपसांत दुभाषाची जरूर लागत नाहीं. भाषा हें एक मूलभूत साधन आहे. आपले विचार, विकार प्रदर्शित करण्याचें तें साधन आहे. जीवनाच्या हरघडीस या साधनाची जरूरी असते. आणि म्हणून आपण हें साधन निर्माण केलें. आज जरी आपण तिची सरस्वति म्हणून पूजा करीत असलो तरी ही सरस्वति बनविली आपणच, लोकांनीच.

महाराष्ट्री—मराठी भाषेचें साधन लोकांनीं निर्माण केलें तें कशासाठीं ? जमिनीचा कर किंवा व्याजाचा दर उच्चारण्यासाठीं ? का दलितांचे लुप्त—सुप्त विचार, विकार उफाळूं लागले असतां लोकजीवनाला जो कंठ फुटला त्याच्यासाठीं ?

या भाषेला पूर्वी ' महाराष्ट्री ' म्हणत. परंतु ही महाराष्ट्री भाषा कुणाची ? आर्यांची मूळ भाषा कांहीं ही नव्हती. हजारों वर्षांच्या इतिहासाच्या गतीमध्यें आर्यांचे जे निरनिराळे गणसंघ निर्माण झाले त्यापैकीं एका गणसंघाची म्हणून ही भाषा वाढली. महाराजिकांचा तो गणसंघ. साध्य, रुद्र इत्यादि बरोबर महाराजिकांचा गणदेवता म्हणून वर्णन केलेलें आढळते, म्हणजे महाराजिक हा गण होता. वेदांत अशी निरनिराळ्या गणांची, गणसंघांची वर्णनें आढळतात. या महाराजिकांच्या ९६ कुळ संघातले मराठे या दक्षिणा पथांत आले आणि त्यांनीं इथें वस्ती केली. याच महाराजिकांचे पुढें महाराष्ट्रिक-महाराष्ट्रिक-मऱ्हाटी नांव पडलें.

या महाराजिकांचें वर्णन गणदेवता असें केलें आहे. कां ? दुसरी साधी देवता का नाहीं ? याचें उत्तर आज तुम्हाला कुठलाहि प्रोफेसर देणार नाहीं. परंतु एका प्रोफेसरानं याचं उत्तर दिलं आहे. त्याचं नांव व्यासमुनी. चांगला विद्वान मनुष्य होता. परंतु एकच वाईट खोड होती त्याला. ती म्हणजे तो खरं बोलायचा. महाभारतांत त्यानें या ' गणानाम् गणसंघानाम् 'चें वर्णन

केलें आहे. तो म्हणतो कीं या गणांत राजा नसतो. जात्याच 'सदृष्टा सर्वे कुलेन सदृशास्तथा' असें ते वर्णन आहे. त्याचप्रमाणे या गणसंघात वर्गहि नसत. सर्व लोक 'कुलानें रक्तानुबंधी' असत. सामुदायिक रीतीनें राहात, त्यांत लोभ, मोह वगैरे नसे. कारण काय, तर सर्व दौलत सामायिक होती. खाजगी मालमत्ता नव्हती.

तुम्ही म्हणाल की इथं तुमचा 'भाई' झाला. आले तुम्ही मूळपदावर! पण तसं कांहीं नाहीं. मी महाभारतांत कम्युनिझम होता असे सांगत नाहीं, परंतु कम्युनिझमचा मूळ सिद्धांत, इतिहासाची गती कोणत्या नियमानं चालते याबद्दलची मार्क्सच्या तत्वाची व्याप्ति व्यासाच्या ग्रंथांतहि पोचते. माझं म्हणणं येवढंच कीं हा सामाजिक समाज होता व तो गण म्हणून राहात होता, म्हणून ती गणदेवता. पुढे या गणसंघांत गोधन निर्माण झालं, खाजगी मालमत्ता आली, त्याबरोबर वर्ग निर्माण झाले. गणसंघ जाऊन चातुर्वर्ण्य निर्माण झाला.

## दलित जनतेची भाषा-मराठी

शेकडों वर्षांचें यादवीयुद्ध करून धनसत्ता व राजसत्ता ब्रह्म-क्षत्र द्विजातीनें काबीज करतांच एकसंघ अशा भाषेमध्येंही वर्गभेद शिरले. ब्रह्मक्षत्र "सुसंस्कृत" बनले; इतर "अपभ्रष्ट" झाले. काबाडकष्ट करणाऱ्या या इतरेजनांची अपभ्रष्ट महाराजिती, तिच्यांतून आपली मराठी जन्मली.

संस्कृत नाटक पहा. राजा असेल किंवा सुशिक्षित ब्राह्मण असेल तर त्याच्या तोंडीं संस्कृत भाषा घातलेली असते. परंतु हुजऱ्या असेल तर ? हुजऱ्याला कुठली शुद्ध भाषा बोलतां येणार ? ब्राह्मण किंवा राजा जर 'आर्यपुत्र' म्हणत असला तर हुजऱ्या 'अय्यउत्त' म्हणणार. दलितांच्या तोंडी रांगडी भाषा घालून सुशिक्षितांचें मनरंजन करणें ही प्रथा जशी आज कांहीं लेखक वापरतात तसे तेव्हांही वापरीत. परंतु हा विनोद नाहीं. तर जगाची धारणा करणाऱ्या श्रमजीवी वर्गाची ती अवहेलना आहे.

या दलित वर्गाच्या तोंडी संस्कृत नाटकांतून जी भाषा घातली आहे ती महाराष्ट्री आहे. ब्राह्मण किंवा राजा यांची भाषा शुद्ध संस्कृत; परण, हुजऱ्या, दास, एवढेंच काय पण स्त्रीच्याही तोंडीं घातलेली भाषा महाराष्ट्रीच आहे. कारण

सामायिक गणसंघांतील स्वतंत्र स्त्री वर्गदुष्ट चातुर्वर्ण्यांत परतंत्र बनली होती. महाभारतांतील स्वतंत्र द्रौपदी ' मला विकण्याचा तुम्हाला काय हक्क ? ' असा रोख ठोक प्रश्न पांडवांपुढें टाकूं शकली, ती महाभारतांतील संततयौवना द्रौपदी पुढें संततरोदना बनली होती. कालिदासाच्या शाकुंतलांत ती स्वतंत्र स्त्री तुम्हाला सांपडणार नाहीं. आणि म्हणूनच कालिदासाची शकुंतलाहि हुजऱ्याप्रमाणें ' अय्यउत्त 'च म्हणते. शाकुंतलांत कालिदासानें नवऱ्याची व सासूची मर्जी राखण्याचा शकुंतलेला केलेला उपदेश पाहिला म्हणजे ती महाभारतातील स्वतंत्र स्त्री नव्हे हें आपल्या पटकन लक्षांत येतें.

कालिदास, भास, वगैरे सगळ्या संस्कृत नाटककारांनीं ही महाराष्ट्री भाषा दास बनलेल्या स्त्री व हुजऱ्यांच्या तोंडी घातली आहे. हीन दर्जाच्या पात्रांच्या तोंडी घातली आहे. अशा रीतीनें समाजांत निर्माण झालेल्या वर्गांतील संघर्षाचें प्रतिबिंब भाषेतही दिसतें. वर्गविहीन सामायिक गणसंघाची सर्व जनांची भाषा प्रथम वैदिक. गणराज्याचें वर्णराज्य, गणसत्तेची वर्णसत्ता होतांच, धनसत्ताधाऱ्यांची भाषा संस्कृत झाली. तर सत्ता व सत्ताहीनांची महाराष्ट्रीय बनली. महाराष्ट्रियांच्याच पंक्तीला आणखी इतर शौरसेनी पैशाची येऊन बसल्या. जुलमी राजे-पंडितांची भाषा म्हणजे संस्कृत, व पिळल्या जाणाऱ्यांची भाषा म्हणजे मराठी, अशी पांचव्या शतकांत परिस्थिति होती. तुम्ही त्या काळचे ताम्रपट पहा, हुकूमनामे बघा, शिलालेख पहा, स्मृत्या आणि दंडनीत्या पहा. सर्वत्र राजांची, सरदारसावकारांची भाषा संस्कृत. व्याजाची ' कला ', दर, कायदा सर्व कांहीं संस्कृतातून. उलट जमीन करणारे शेतकरी, शूद्र, व्यापार करणारे, अथवा बलुतेदार, चांभार, लोहार, वगैरे सर्व श्रमकरी जनतेची भाषा प्राकृत मराठी होती. सारांश, आमच्या भाषेचा उगम दलित जनताजीवनात झाला. रंगमहालींच्या रंगेल कलेंत नव्हे. म्हणून मराठीचा मला अभिमान आहे.

भासाच्या ' प्रतिमा ' नाटकांत या संघर्षाचें एक सुंदर उदाहरण आहे. राजवाड्यांत ठेवलेले पूर्वजांचे पुतळे पाहायला भरत, राम सीता वगैरे यावयाचे होते. राम वनवासांत गेल्यामुळें तो हॉल तसाच रिकामा पडला होता व तिथें धूळ वगैरे साचली होती. म्हणून राजदरबारच्या मुकादमानें एका गड्याला तो हॉल साफ करण्याचें काम सांगितलें. त्यावेळीं आजच्यासारखे कामाचे तास ठरलेले नव्हते, किंवा त्याचे हक्क मानलेले नव्हते. त्या हुजऱ्यानें नेमून दिलेलें

काम संपवलें आणि तो झोपला. तिकडून मुकादम आला. त्यानें कसलीहि चौकशी न करतां त्या हुजऱ्याला एकदम मारायला सुरुवात केली. परंतु त्या-वेळची परिस्थिती अशी होती कीं 'मारू नकोस' असें म्हणण्याची किंवा कां मारतोस ? असें विचारण्याची नव्हती. सरळ विरोध करणें शक्यच नव्हतें. म्हणून तो म्हणतो, 'ताळेहिमं ! ताळेहिमं !–मार मला, मार मला.'

परंतु भास हा कालिदासाच्या पेक्षां जनतेच्या जास्त जवळचा होता. म्हणून पुढें त्यानें त्या हुजऱ्याच्या सुप्त वर्गविरोधाला आर्ततेची वाचा दिली. 'मला जर कार्तवीर्य सहस्रार्जुनासारखें हजार हात असते, तर किती बरें झालें असते !' असें तो म्हणतो. आतां या हुजऱ्याला सहस्रनामा, चतुर्भुज कृष्ण, अष्टभुजा देवी वगैरे देव न आठवतां कार्तवीर्य सहस्रार्जुनच कां आठवला ? कारण महाभारतांत कार्तवीर्य सहस्रार्जुन हा राजद्वेष्टा, ब्रह्मसत्ताद्वेष्टा, वर्णसत्ता-विरोधी दाखविला आहे. आणि म्हणूनच महाभारतकारांनीं जरी त्याला वाईट ठरविलें, तरी त्या गांजलेल्या हुजऱ्याला तोच पुढारी म्हणून आवडतो. कालि-दासाला दुष्यंत कळला होता, परन्तु भासाला हुजऱ्या कळला होता.

## ब्राह्मणांची मक्तेदारी धुळीला मिळविणारी ज्ञानेश्वरी

या हुजऱ्याची जी भाषा ती माझी मराठी भाषा. दलितवर्गाला ज्या भाषेंत वाचा फुटली, ज्या भाषेंत त्यानं राज्यकर्त्यांविरुद्ध आवाज उठविला ती माझी भाषा. ती परंपरा जें चालवील तेंच माझें साहित्य. तेंच कायम टिकेल. बाकीचा सारा पालापाचोळा कालक्षयांत जळून खाक होईल. हाच तंटा ज्ञानेश्वरापर्यंत चालू असलेला आढळतो. संन्याशाचे पोर म्हणून सगळ्या सत्ताधारी ब्राह्मणवर्गानें ज्याची अवहेलना केली, त्यानें सांगितलें, ठीक आहे, संन्याशाचं पोर तर संन्याशाचं पोर ! तुमच्या वर्गसत्तेचा पाया कशावर ? तुम्ही मोक्षाची मक्तेदारी केली आहे, ज्ञानाची मक्तेदारी केली आहे, म्हणूनच ना ? धनीवर्ग सत्ता-धाऱ्यांच्या व्रतबद्ध हिंदुधर्मात बहुजन वैश्यशूद्रांना, स्त्रियांना मोक्षाचा सुद्धां अधिकार नाहीं काय ? दुःखी माणसाला मोक्ष देणाऱ्या धर्मग्रंथांच्या कुलुपानीं धनहीन, सत्ताहीन, वैश्य शूद्र, स्त्रिया इत्यादि लक्षावधी जनतेपासून तुम्ही मोक्षाचा मळा बंद करून ठेवला आहे. त्या मळ्यामध्यें आम्हांला सुखाचें पीक पिक-वायचे असेल, तर त्यासाठीं सुद्धां तुम्ही गुलामगिरीचा, दक्षिणेचा करभार व

खंड मागता काय ? मोक्षद्वाराची किल्ली जो गीताग्रंथ तो संस्कृतबद्ध. इतरांना अज्ञात! त्या ग्रंथाला ज्ञानेश्वरानें संस्कृतांतून मराठीत–अमृततुल्य मराठीत उतरविले. "स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्ते ऽ पि यान्ति परांगतिम्." संस्कृतमधील त्या 'अपि' चें गुह्य फोडून स्वर्गातील वर्गभेद त्यांनीं मोडून काढले. वर्ण, वर्ग, लिंगभेदरहित जर कुठचा देश, सुखी देश असेल तर तो स्वर्ग; तिथेहि सत्ताधारी वर्गानें वर्ग-सत्ता केली होती. गीता मराठीत आणून, सर्वांना देऊन, त्या सत्तेविरुद्ध ज्ञानेश्वरानें दलितांच्या भावनेमध्यें, मनःसृष्टीमध्यें तत्कालिन वैचारिक बंडाचा झेंडा उभारला.

ब्राह्मणांची मक्तेदारी पार धुळीला मिळवावी या इर्षेनें लिहिलेली, दलितांच्या आकाक्षांना वाचा फोडणारी म्हणूनच ज्ञानेश्वरी आज सातशें वर्षें टिकली.

ज्ञानेश्वरांनीं ज्ञानेश्वरी लिहिली त्याचे अगोदर तिकडे हेमाद्रि सुद्धां आपला ग्रंथ लिहित होता. वर्षांतून रोज तीन व्रते लोकांकडून करवून दक्षिणा-मार्गे किती पैसा ब्रह्मवृदांना खाता येईल हें तो सांगत होता. वरिष्ठ वर्गाचा, काळाबाजारवाल्यांचा धर्म तो सांगत होता, त्याचा चतुर्वर्गचिंतामणी लोक विसरले; ज्ञानेश्वरी मात्र पसरली.

ही माझ्या मराठी भाषेची परंपरा आहे. संत वाङ्मयाला लोक रडगाणं म्हणून हिणवतात. पण रडगाण्यांतहि बंड असूं शकतं. एक रडला तर ते रडगाणं, परंतु दहा लाख तसेच रडूं लागले तर एवढा हलकल्लोळ होतो कीं राजसत्ता उलथून पडते. तुकाराम वाणी होता आणि व्यापारांत बुडाला म्हणून त्यानं रडगाणं लिहिलं असें म्हणणारे आहेत. मग विघडलं काय त्यांत ? त्याला काळाबाजार साधला नाहीं हाच:ना त्याचा दोष ? त्याला काळाबाजार करतां आला नाहीं म्हणूनच त्याचा सक्सेरिया न बनता कवी झाला. त्याचे अभंग टिकून राहिले. या दिवाळखोर वाण्याचा अभंग टिकला पण दुसरा काळ्या-बाजारांत नफा कमावणारा वाणी भंगला, तुरुंगांत गेला. आणि हे अभंग कां टिकले ? ही समाजाची घडी बदलली नाहीं तर ती मोडून पडेल अशा भवितव्याची घोषणा त्यांनीं सांगितली म्हणून टिकले.

## संतवाङ्मयाचें सत्य स्वरुप

संतांच्या वाङ्मयाचं स्वरूप धार्मिक आहे खरें. त्यावेळची परिस्थितीच

तशी होती. समाजाचा आर्थिक, राजकीय व्यवहार, मनुष्याच्या सामाजिक जीवनाचे सर्वांगीण संबंध धर्मकायद्यांत सांगितलेले, धर्मकोशामध्यें गुंडाळलेले. जमिनीचा कर, खंड, व्याजाचा दर, शूद्राची मजुरी, व्यापाऱ्याचा नफा, राजदंड वगैरे सर्व गोष्टींची संहिता होऊन हिंदुधर्म बनला होता. आर्थिक, राजकीय वर्गसत्ता, समाजव्यवस्था, तसेच मोक्षमार्ग मिळून धर्म. तेव्हा आर्थिक, राजकीय वा समाजबंड व्हावयाचे, टीका व्हावयाची तीहि धर्मबंड, धार्मिक चळवळ अशाच रूपानें पुढें यायची. एकोणिसाव्या शतकापूर्वी जगांतील सर्व देशांतील वर्गलढे, समाजक्रांत्या धर्मरूपांतच लढल्या जात.

तीच गोष्ट संतांची. त्या सगळ्या संतांचा एकच सूर—चातुर्वर्ण्य ढळलं आहे. कुणी तरी येऊन तें नीट करा रे! हीच त्यांची विठ्ठलापाशी आळवणी आहे. त्यांची ही घोषणा हिंदुधर्माची होती हें कबूल आहे. पण त्यावेळीं ती तत्त्वतः आर्थिक—राजकीय घोषणा होती. तें वाङ्मय साऱ्यानें धार्मिक असलें तरी समाजनिष्ठ, जनतानिष्ठ होतें म्हणून आपण त्याचा अभिमान धरतो.

याचा अर्थ जर कुणी असा काढील कीं आजहि त्याच घोषणांनीं तेच दासोपंत आणि तीच मुक्ताबाई–सगळें तेंच पुन्हां उभें करावें तर ते चुकीचें ठरेल. कारण तेंच संत वाङ्मय आज उभें करावयाचें, म्हणजे तोच समाज, तीच कार्यरचना, राज्यरचना, दुर्गरचना सर्व तेंच उभे करावयाचें.

हिंदुधर्म, जातिरचना, संतवाङ्मय, दासबोध आणि शिवकालीन राज्य-रचनेचा घोष करायचा तर रायगडहि पुन्हां बांधावा लागेल! पण बाटाच्या कारखान्यापुढें जसें चांभाराचे बलुते व जातिधर्म रहात नाहीं, आगगा डीमध्यें बैलगाडीचे सोवळें टिकत नाहीं, तसेंच बॉम्बरपुढें रायगड टिकत नाहीं. पूर्वी बाण किंवा बंदुकीचा मारा पोहचायचा नाहीं इतक्या उंचावर बांधला म्हणून त्याला अजिंक्यतारा म्हणत. पण आतां वरून बॉंब पडतात तेव्हां तो कसा अजिंक्य राहणार? आणि जिथें गड गेला, तिथें ती जुनी राज्यव्यवस्था गेली. आता ती कुठल्याहि धर्माची नाहीं. कारण या राजवटीच्या चौकटींतलें जीवन, अर्थकारण, परस्पर संबंध व ते चालविणारी जनता सर्वधर्मीय झाली अथवा धर्मातीत झाली. ती कुठच्याहि पूर्वकालीन अथवा प्रचलित धर्मस्मृतीवर आधारलेली नाहीं. धर्म वाटल्यास मनःसृष्टींत पाळा. घरांत बाळगा, पण समाजाचें मूलभूत अर्थकारण, संसार यांत तो आणून चालणार नाही.

आज आपला समाज बदलला आहे. पूर्वी सकाळी उठून टिळा लावून मंत्रजप करीत बसणारा ब्राह्मण आज ११ वाजतां कारकुनी करायला बँकेंत जातो, आणि ग्रॅज्युएट शूद्राशीं वा म्लेंच्छाशी एकी करून युनियन स्थापून आपल्या जीवनाचें किमान हक्क मागूं लागतो, संप करतो, नवे लढे उभारतो. हे त्याचे नवे लढे व हक्क त्याच्या सकाळच्या मंत्रांच्या धर्मकोशांत कसे बसणार? या दोहोंची नवी संगती कशी लावायची?

## साहित्यिकांची मराठी आणि माझी मराठी

आमचे माधवराव पटवर्धन म्हणतात कीं आजकाल वाचकांना आमच्या काव्याची आवडच नाहीं. कशी असणार? तुमच्या कलेचा जनताजीवनाशी जर कांहींच संबंध नाहीं, तर मग ती आवडावी कशी? तुमची मराठी आणि माझी मराठी यांत जमीन अस्मानाचा फरक आहे. अज्ञानदासाची मराठी, लावणीकारांची मराठी ही माझी मराठी आहे. जुलमाविरुद्ध लढणाऱ्या जनतेचे जीवन त्यांत होतें म्हणून तिनें जनमनाची पकड घेतली. त्रस्त जनतेचे पुढारी-पण घेऊन लढणारे, घोड्याच्या पाठीवर बसल्या बसल्या हुरडा चोळून खाणारे ज्या लावण्यांत व पोवाड्यांत गायले गेले ते पोवाडे व लावणी टिकली. परंतु विजयानंतर त्याच जनतेच्या प्रभावावर ऐतखाऊ जगणारे सरंजामी पुढारी-पण आरसेमहालात रंगून त्यासाठीं काव्य मागू लागले त्यावेळीं दोन प्रकारच्या लावण्या जन्माला आल्या. एक जनतेची व दुसरी महालातल्या राजाची. मोहिमेवर गेलेल्या शिपायाच्या विरही प्रियेच्या भावना दाखविणारी पहिली लावणी. आणि दुसरी 'ओकासा' खाऊन प्रेम करणाऱ्या दुसऱ्या बाजीरावाची लावणी. पहिलें जिवंत काव्य आहे तर दुसरें 'ओक्साबोक्सी' काव्य. दोन्ही प्रकारच्या लावण्यात विरह–प्रेम आहे, गोपी आहेत. पण त्यात फरक आहे. धनी लढाईवर गेले तर स्वतः घरीं शेत करण्याची धमक अंगात बाळगणारी एक गोपी आहे. तिच्या भावना व्यक्त करणाऱ्या ह्या खऱ्या लावण्या. त्या टिकल्या. कर लुटणाऱ्या ऐतखाऊंच्या ज्या लावण्या होत्या त्या मेल्या, नष्ट झाल्या.

तीच गोष्ट नाटकांची, लोकांचें नाटक तो तमाशा; आणि पंडित महालांत नाचायचें तें नाटक, म्हणून आजहि कामगारवर्गात तमाशे चालू आहेत. लोक

आम्हांला म्हणतात हे आपल्या प्रहसनांना तमाशे कां म्हणतात? जरूर म्हणतो. परंतु हट्ट म्हणून नव्हे, परंपरा म्हणून नव्हे, तर तें लोकांचं नाटक आहे, लोकांना तेंच समजतं, लोकांच्या भावना त्यांतच व्यक्त होतात म्हणून. काळाबाजारवाल्याविरुद्ध, जुलमी कायदे तोडणारी आमची लढवय्यी मराठी त्या "बेकायदेशीर" तमाशांत व्यक्त होते म्हणून आम्ही तमाशे करतो. हीच आमची लढवय्यी मराठी भाषा व साहित्य आहे.

पूर्वीचा जमाना पालटला. इंग्रजांचं राज्य आलं. पण हा फरक नंदराजे जाऊन मौर्य यावे किंवा हूणानंतर गुप्त, अथवा मोगलानंतर मराठे यावे तसा नव्हता. हजारो वर्षांचे आर्थिक समाजतंत्र जाऊन नवीन यंत्रतंत्र, अत्यंत नवीन अर्थतंत्र आले. या जमान्याचे साहित्य, भाषा अर्थातच जुन्यांशी कुठेच मिळेना; या अमदानींत हरी नारायण आपटे जन्माला आले. आतां स्वर्ग वगैरे कुठल्या कुठें गेला. उदाहरणार्थ, आठव्या वर्षी विधवा झालेल्या स्त्रीनं ६० वर्षं प्रथम तें विधवेचं खडतर आयुष्य घालवावयाचं आणि त्यानंतर ६८ व्या वर्षी हाडांतून मुक्त होणाऱ्या आत्म्याला स्वर्ग मिळणार म्हणून आनंद, मानायचा अशी ती विधवा कुठे आणि 'भयंकर दिव्यां'तली पुनर्भू विधवा कुठें? तेव्हां आत्मा व त्याला मिळणारा स्वर्ग याचं काव्य तिथेंच संपलं तर त्यांत नवल नाहीं. नवा समाज, नव्या भावना, नव्या आकांक्षा निर्माण झाल्या होत्या. त्यांतून आपट्यांचं 'भयंकर दिव्य' निर्माण झालं. आज आपल्याला तें वाचणं म्हणजे भयंकर दिव्य वाटेल. पण त्यावेळीं लोकांनीं न कंटाळतां आवडीनं तें वाचलं. कारण त्यांत मध्यमवर्गीय जनतेच्या भावना, त्यांच्या आकांक्षा होत्या.

पुढें राजकीय चळवळ जोमात आली. त्यांतून 'कांचनगडची मोहना' व 'कीचकवधा'सारखी नाटके निर्माण झाली. खाडिलकरांच्या या नाटकाचा अर्थ लोकांना समजला, त्यांतली द्रौपदी कोण, कर्झन कोण, हें सगळं त्यांच्या लक्षांत आलं. कांचनगडच्या मोहनेंतील प्रतापराव म्हणजे टिळक हे लक्षांत यायला उशीर लागला नाहीं. खाडिलकरांच्या नाटकांत त्यावेळच्या देशप्रेमाच्या भावनेचं चित्रण होतं म्हणून ती नाटकें टिकलीं; लोकांना आवडली. ती जनतानिष्ठ, राष्ट्रनिष्ठ, होतीं.

या लेखकांचं व आमचं तत्त्वज्ञान एक नाहीं. परंतु त्या त्या कालखंडात उठाव करणाऱ्या जनतेचं चित्रण करणारे, बंडवाल्यांचं बंड वर्णिणारे, दलितांच्या

भावना सांगणारे, तेच आमचे खरे लढवय्ये लेखक. तीच आमची परंपरा, तीच आमची मराठी.

## नव्या महाराष्ट्राचे नवे लेखक पाहिजेत

त्यानंतरचा काळ घ्या. १९२० सालची चळवळ झाली. निरनिराळे कामगार शेतकऱ्यांचे उठाव झाले. त्यांचें चित्र नव्या मराठींत आढळतें काय ? उदाहरणार्थ, नामवन्त फडके, त्यांनी जर मराठी वाङ्मयाला काय दिलें असेल तर आधुनिक काळांतील कॉलेजांत जाणारी नवी तरुणी; तिचें सौंदर्य व माधुरी त्यांनीं मराठी वाङ्मयांत आणून सोडली. पूर्वी हरिभाऊ आपट्यांच्या वेळीं केवळ कुटुंबाच्या क्षेत्रांतच माणुसकीचे हक्क व वागणूक मिळविण्याचा स्त्रीचा लढा होता. त्या स्त्रीला नवऱ्याशीं मोकळेपणानें, स्वतंत्र व्यक्ति या नात्यानें बोलण्याचा हक्क पाहिजे होता. आतां ती कॉलेजांत जाऊं लागली होती. प्रेमाच्या योग्य नव्या कल्पना निर्माण होऊं लागल्या होत्या. त्याचें सुंदर चित्रण फडक्यांनीं केलें. परंतु फडके तिथेच थांबलें, पुढें कांहीं जाऊं शकले नाहींत. पण फडके पडले चाणाक्ष. तरुणी व तिचा समाज नेहमी बदलतो हें त्यांनी हेरले. आणि एका कादंबरींत तिच्याभोंवतीं मुळशीचा सत्याग्रह आणला, तर दुसरींत सातारचा लढा आणला. पण तरुणी तीच राहिली. काश्मिरी गुलाबाचीच नवी एडिशन. फर्ग्युसन कॉलेज कांहीं फडके विसरूं शकले नाहींत. मागणी तसा पुरवठा म्हणून त्यांनीं तीच तरुणी वेगळ्या पोषाखांत आणली. परंतु साताऱ्यांत लढणारा, ग्रामराज्य स्थापन करणारा शेतकरी कांहीं त्यांत दिसत नाहीं. निव्वळ बैल वर्णन केला किंवा मोटेचं गाणं लिहिलं म्हणजे कांहीं शेतकरी काव्य होत नाहीं. त्या मागच्या भावना समजाव्या लागतात. हा नवा संघर्ष आहे, नवा समाज आहे, नवजीवन आहे. तें वर्णन करण्याची धडपड फडके, माडखोलकर, खांडेकर, हडप, वगैरे करतात पण त्यांना अद्याप तें जसें जमायला पाहिजे तसें जमलें नाहीं. १९२० सालची तरुणी फडक्यांनीं वाङ्मयांत आणली. परंतु जनता-क्रांति, कामकरी, शेतकरी जीवन, नवा मध्यम वर्ग ते आणू शकले नाहींत. त्यांच्या घोषणा त्यानीं ऐकिल्या पण भावना जाणूं शकले नाहींत; आणि याचें कारण उघड आहे. जिथें हा जनतेचा लोंढा आहे, जिथें हा संघर्ष चालू आहे, त्याच्या आसपास तर तुम्ही

असायला पाहिजे ? क्रांतीपासून मनानें व शरीरानें दोनशें कोस दूर असल्यावर क्रांतिकारक वाङ्मय कसं निर्माण होणार ! गंगेला पूर आला, आणि तुम्हीं कन्याकुमारीला असलात तर त्याचं वर्णन कसं साधेल ? गारेच्या पावसाच्या झडीचा तरी मारा अनुभवला असला पाहिजे ना ? रेफ्रिजिरेटरच्या थंड पेटींत बोट घालून कुठें हिमालयाच्या शिखरावरील थंडीचा अनुभव काव्यांत आणता येईल का ?

## आजच्या युगांतील लेखकांच्या चार निष्ठा

आमचं म्हणणं एवढंच कीं हा क्रांतीचा ओघ वहात आहे त्याच्या जवळपास रहा, जमल्यास त्यात भाग घ्या. नवे वर्ग जन्माला आले आहेत ते समजून घ्या. म्हणजे तुमच्या हातून कला निर्माण होईल. संत वाङ्मय दिसतं धर्मनिष्ठ पण होतं समाजनिष्ठ. तसेच आजच्या युगात लेखकानं चार निष्ठा पाळल्या पाहिजेत. राष्ट्रनिष्ठा, जनतानिष्ठा, वस्तुनिष्ठा, आत्मनिष्ठा, या त्या निष्ठा होत.

रामदासानं म्हटलं आहे कीं मला एक राजा द्या म्हणजे महाराष्ट्र धर्म उदयास येईल. रामदासानं हिंदुधर्म कां म्हटलं नाहीं ? शिवाजीचं राज्य हिंदवी का ? त्याची देवी भवानी, हिंदु देवी. त्यानं तोडली मुसलमान पातशाही. तरी सुद्धां महाराष्ट्र धर्मांचेंच नांव रामदासानें कां घेतले ? कारण त्याच्या मनांत समाजनिष्ठेचा उदय होऊं लागला होता. शिवाजीनें महाराष्ट्र धर्माला अनुसरून राज्य स्थापन करतांच त्या ठिकाणीं हिंदुमुसलमानांत भेद केला नाहीं. या भूमीत जन्माला आलेले, तिला मानणारे व नव्या राज्यशासनाला मानणारे ते महाराष्ट्रीय असें शिवाजीनें ठरविलें. म्हणून अष्टप्रधानांच्या सल्ल्याला न जुमानता ५०० पठाणांना त्यानें फौजेत नोकऱ्या दिल्या. शिवाजी फक्त मराठ्यांना घेऊन लढला म्हणून जिंकला नाहीं; तर जनताभिमुख होऊन शेतकरी–मराठ्यांना बरोबर घेऊन, व देशमुख सरदेशमुखांना, जमीनदार, वतनदार मराठ्यांना सोडून लढला म्हणून जिंकला. मग तो म्हणाला कीं या राज्याला एकनिष्ठ ते सर्व मराठे, ते सर्व या राज्याचे नागरिक. असं तें समाजनिष्ठ, जनतानिष्ठ राज्य होतं. धर्मनिष्ठ नव्हे, ही महाराष्ट्रधर्माची परंपरा, जिवंतपणा व वीरश्री गाणारें काव्य तेंच टिकतें. त्याचाच अभिमान आपण धरतो. आज आपल्या नवराज्यांत

कांहीं लोकांना वीरश्री चढून ते मुसलमानांचं उच्चाटन करायला निघाले आहेत. या नव्या मनूत खरा शत्रू झाकून ठेवून जनतेला हूल देण्यासाठीच या नव्या समाजातील हिंदुमुसलमान भांडवली वतनदार ही घोषणा करीत आहेत. त्या घोषणेचे मराठी साहित्य जनतानिष्ठ नव्हे, आमचें नव्हे.

आमचे कवि कोण ? आण्णा साठे, अमरशेख, गव्हाणकर इत्यादि. एक मुसलमान शेतकऱ्याचा मुलगा असून सुंदर भजन लिहितो. जनतेची, नव्या युगाची भजनं लिहितो; तर दुसरा अस्पृश्य गिरणीकामगार पिळणूकीचें राज्य करणाऱ्यांचे वाभाडे काढणारे तमाशे सांगतो. तिसरा मध्यमवर्गीय कारकून. त्यांची कला अद्याप पूर्ण विकास पावलेली नाहीं. पुष्कळांना तिच्यांत निव्वळ रूक्ष प्रचारच दिसतो. तरीपण त्यांची कला हजारो स्त्रीपुरुषांच्या मनाची पकड घेते. नव्या हिंदुस्थानचा सुखनिर्माता पण दुःखी, धननिर्माता पण दरिद्री, तराही भवितव्यासाठीं आशेनें व शिस्तीनें लढणाऱ्या कष्टाळू दलित वर्गाच्या भावनांना ते वाचा देतात. कारण ते धर्मनिष्ठ नाहींत, तर राष्ट्रनिष्ठ, जनतानिष्ठ, वस्तुनिष्ठ, आणि आत्मनिष्ठ आहेत. या चार निष्ठा ज्यांच्या ठायीं असतील त्यांचीच कला टिकेल; इतर मरेल.

आज समाज बदलला आहे. तो नवा समाज, नवी व्यवस्था, नवीन गति, ती चालवणारा नवा कामगार, शेतकरी, दलित त्याच्या आशा आकांक्षा, त्याचा लढा, त्याचा प्रलय, हे समजावून घेणारा तो जनतानिष्ठ, राष्ट्रनिष्ठ, वस्तुनिष्ठ; व ते समजावून घेतांना कलेची दृष्टि वापरणारा तो आत्मनिष्ठ कलावंत. चंद्रमौळी घरांत चंद्राचे किरण पाहून आपल्या चंद्र वदनेचें कवन कवीनें करावें. पण तसेंच ते घर चंद्रमौळी ठेवणारा मालक व त्या घरांतून काढून टाकून मनुष्याला गृहहीन करण्याची परवानगी देणारी भांडवली सत्ता याला कवी विसरला तर तो जनतानिष्ठ नाहीं. तर त्या घरांत राहाणाराचें दुःख, गाऱ्हाणी, भावना समजून घेणारा जो भाषेचा शाहिर तोच खरा जनतानिष्ठ, त्याची कला खरी, त्याची मराठी पण खरी. असे शाहिर आणखीहि पुढें येत आहेत. त्यांचा नामनिर्देश करण्यास मला अवसर नाही. पण अशी नवी मराठी आपण वर्णन करावी व तिचें पूजन करावें एवढेंच माझें सांगणें आहे.

●●●

# लोकशाही क्रांतीचा मार्ग

*१९५२ च्या सार्वत्रिक निवडणुकींतील कम्युनिस्ट पक्षाची भूमिका विशद करणारी 'किर्लोस्कर' मासिकाला डिसेंबर १९५१ रोजीं कॉ. डांगे यांनी दिलेली मुलाखत.*

**प्रश्न**–आपल्या निवडणूक-जाहीरनाम्याची तात्त्विक बैठक कोणती ?

**उत्तर**–ब्रिटिशांचें राज्य खलास झालें आणि स्वराज्य आलें; हिंदी जनतेच्या हातीं सत्ता आली अशी घोषणा कॉंग्रेसच्या पुढाऱ्यांनी १५ ऑगस्ट १९४७ रोजीं केली. त्यावर लोकांचाहि विश्वास बसला. त्यांनी कॉंग्रेसचें सरकार आपलेंच; तें आपलें सर्वांचें कल्याण करील अशी भावना धरून वागण्याचा प्रयत्न केला. पण आपलें सरकार येतांच आपले जीवनाचे किमान प्रश्न सुटतील अशी जी सर्व वर्गांची भावना होती, ती मात्र आज निष्फळ ठरली आहे.

आपल्या देशाचें बहुतांशीं सर्व आर्थिक, सामाजिक जीवन शेतीवर-शेतकऱ्यावर-अवलंबून. ब्रिटिश आमदानींत तो खंडानें, सावकारी व्याजानें व पडत्या–चढत्या बाजार भावानें गांजला जाई. त्याचें सर्व धन, उत्पादन, मेहनत लुबाडली जाई. स्वराज्य आल्यानें हें सर्व बंद होईल, ही त्याची आकांक्षा फोल ठरली.

कामगार वर्गाच्याहि आशा फोल ठरल्या. किमान पगार, नोकरी व काम, शहरांत राहायला घरदार इत्यादींवर डोळे लावून बसलेला कामगार पूर्वींपेक्षांहि जास्त चिरडला जाऊं लागला.

तीच स्थिति मध्यमवर्गाची. सरकारशीं संपूर्ण संगनमत करणारे कांहीं भांडवलदार वगळल्यास इतर व्यावसायिकांचीहि स्थिती सुधारली नाहीं.

फक्त सावकार-जमीनदार व कांहीं मूठभर सर्वग्रासी भांडवलदार यांची बढती झाली, सरकार त्यांचेंच खेळणें बनलें व जनता जास्त दरिद्री होऊन रंजीस झाली.

हें सरकार जमीनदार–सावकारांचें, प्रतिगामी भांडवलदारांचें व ब्रिटिश भांडवलदारांच्या अनुरोधानें चालणारें आहे; त्यामुळें आपले प्रश्न सुटत नाहींत. म्हणूनच हें सरकार बदलून जनतेच्या लोकशाहीचें सरकार स्थापन केलें पाहिजे, अशी आमची भूमिका आहे.

**प्रश्न**–'नेहरू सरकार हें ब्रिटिश व अमेरिकन साम्राज्यवाद्यांच्या दावणीला बांधलेलें आहे', असा आरोप करून हिंदुस्थान देश व प्रचलित सरकार यांचे 'स्वातंत्र्य'च आपण अमान्य करतां! पण आपल्या दृष्टिकोनांतूनच पाहूं गेल्यास, अमेरिकेचा अपवाद सोडल्यास जगांतील इतर राष्ट्रंहि 'स्वतंत्र' नाहींत असें म्हणावे लागेल. कारण, बहुतेक सर्व राष्ट्रांतून ब्रिटिश व अमेरिकन भांडवल गुंतवलें गेलें आहे. परंतु केवळ त्या कारणामुळें आपण त्या राष्ट्रांचें 'स्वातंत्र्य' अमान्य करतां काय?

**उत्तर**–'स्वतंत्र' व 'परतंत्र' ह्या दोन शब्दांची रस्सीखेच करून या प्रश्नाचा निकाल लागत नाहीं. पूर्वी आपण परतंत्र होतों म्हणजे काय? पूर्वी जे ब्रिटिश अधिकारी राज्य करीत होते त्यांना काढून हिंदी अधिकारी नेमले, असाच केवळ स्वातंत्र्याचा अर्थ होत नाहीं. माउंटबॅटन जाऊन राजेंद्र प्रसाद आले म्हणजे स्वातंत्र्य असें नव्हे, तर आपल्या देशावर ब्रिटिश भांडवल लादून आपली संपत्ति लुटणें, आपली कामगारशक्ति वापरून ब्रिटनची घरभरणी करणें, आपली शेती मागासलेली ठेवून खंडापायीं घेतलेला माल अगदीं स्वस्ताईनें लुटून इंग्रजी भांडवलदारांचा कमालीचा फायदा करून देणें व त्यासाठीं हुंडणावळ, बँका, जकाती, तहनामा, धमक्या व राज्ययंत्र यांचा उपयोग करून आपल्या सर्वांच्या जीवनाची कोंडी करणें–यालाच आपण पारतंत्र्य म्हणत होतों. हल्लीच्या अर्थव्यवस्थेंत पारतंत्र्याचा असा व्यापक अर्थ करावा लागतो. पृथ्वीराज चव्हाणाला मारून घोरी आला व नुसता घोडा घेऊन जर दिल्लींत शिरला, तर त्याला मध्ययुगीन काळांत आपण 'पारतंत्र्य' म्हणत असूं. घोरीने भांडवल आणून आपल्याला लुटायला सुरवात केली काय, असें आपण विचारत नसूं. आजचा घोरी–माउंटबॅटन किंवा चर्चिल–दिल्लीवर

घोडा न घालतांहि तेथें भांडवलदारी आर्थिक पकडींत अथवा जमीनदारी एजंटांकरवीं आपल्या शेतकऱ्याची व कामगाराची लंडनमध्यें बसूनहि लूट करूं शकतो. आज प्रत्यक्ष तख्तावर अधिकारी कोण एवढ्यानेच स्वतंत्र-परतंत्रपणा ठरत नाहीं.

देशांत ब्रिटिश व अमेरिकन भांडवल येते येवढाच प्रश्न नाहीं; तर त्यायोगें आपल्या आर्थिक जीवनाचा विकास न होतां त्यांच्याच भांडवली ताकदीचा विकास होतो व आपल्या मात्र हालअपेष्टा होतात. म्हणून हें स्वातंत्र्य संपूर्ण व खरें नव्हे असें आम्ही म्हणतों. तें अर्धवट व नकली आहे.

**प्रश्न**–गेल्या चार वर्षांतील परिस्थितीचा व चुकांचा दोष आपण नेहरू-सरकारच्याच माथीं मारलेला आहे. पण या कालावधींत काँग्रेसेतर डाव्या गटांनीहि आपआपलीं धोरणें आखण्यांत व त्यांची अंमलबजावणी करण्यांत घोडचुका केलेल्या आहेत व तशी जाहीर कबुलीहि दिलेली आहे. मग आज ज्या शोचनीय परिस्थितींत देश सापडला आहे त्याला हे डावे गटहि कांहीं अंशीं जबाबदार नाहींत का ?

**उत्तर**–सत्ताधारी काँग्रेस पक्षाच्या चुका आणि त्यांना विरोध करणाऱ्या डाव्या गटांच्या चुका एकाच जातीच्या नव्हेत. कापडावरील नियंत्रण उठवून शंभर कोटींची लूट सट्टेवाल्यांना देणें किंवा साखर व गुळाच्या कंट्रोलचा गोंधळ करून लोकांची दिवाळी कडू करणें या चुकांचा परिणाम करोडों लोकांच्या हालअपेष्टांत झाला. डाव्या गटांच्या चुकांनी असें कुठें घडलें आहे ? आणि काँग्रेस सरकारच्या त्या चुकांना आम्हीं किंवा आमच्या चुका 'कांहीं अंशानें' सुद्धां कशा जबाबदार धरायच्या ? आमच्या चुका ह्या, कीं जनतेचा या सरकार-वरील विश्वास जाणतेपणानें उडायच्या आंतच आम्हीं सरकारी कृत्यांवर हल्ला चढविला— म्हणजे गोळीबार झेलून मरण्यांत किंवा फाशी जाण्यांत आम्ही घाई केली एवढेंच ! देशावर जें आर्थिक आणि राजकीय संकट आलें आहे, त्याला डावे गट मुळींच जबाबदार नाहींत.

**प्रश्न**–आपण वर्णन करतां तितका जर नेहरू सरकार व काँग्रेस यांच्या-बद्दल जनतेंत असंतोष असता, तर ती फार मोठ्या संख्येने डाव्या गटांत सामील झाली असती. परंतु आज तसे दृश्य दिसत नाहीं याचें कारण काय ?

**उत्तर**–जनतेचा काँग्रेसवरील विश्वास उडाला आहे. परंतु डाव्या गटांवर अद्याप तिचा संपूर्ण विश्वास नाहीं. शिवाय डाव्या गटांनी जनतेच्या, विशेषतः कामगार–शेतकरी वर्गाच्या जीवनलढ्याचा पुढाकार घेऊन त्याची एकी व एकमुखी पुढारीपण निर्माण केलेलें नाहीं, अचूक मार्गदर्शन केलेलें नाहीं व संघटना केलेली नाहीं—ही आजच्या परिस्थितीची उणीव आहे.

पुरोगामी शक्तीच्या संयुक्त आघाडीची आवश्यकता पूर्वींहि होती; पुढेंहि राहील हें खरें आहे.

**प्रश्न** — आज आपण सर्व पुरोगामी व लोकशाही पक्षांच्या आणि व्यक्तींच्या संयुक्त आघाडीची घोषणा करीत आहांत. तथापि, आपल्या पक्षाने जें आत्यंतिक जहालपणाचें, इतर लोकशाही पक्षांबद्दल असहिष्णुतेचें व टीकेचें धोरण स्वीकारलें त्यामुळेंच संयुक्त आघाडीच्या कल्पनेला वेळोवेळीं सुरुंग लागत आला आहे, असें आपणास वाटत नाही का ?

**उत्तर** — पुरोगामी शक्तींच्या संयुक्त आघाडीची आवश्यकता पूर्वीहि होती आणि पुढेहि राहील हें खरें आहे. त्याचप्रमाणे संयुक्त आघाडीची आमची घोषणाहि कांहीं नवीन नाही. ती अंमलांत आणतांना दोस्त पक्षांना व लोकांना सोडून अति पुढे धाव मारून कधीकधी आम्हीं एकांडेपणा केला, तसेंच कांहीं वेळीं इतरांवर विसंबून स्वत्व विसरून जाण्याची चूक केली हें खरें.

पण संयुक्त आघाडी केवळ आमच्या असहिष्णुतेने किंवा टीकेने मोडली हें खरें नव्हे. संयुक्त आघाडीमध्ये जे अनेक पक्ष येतात त्यांना एकमेकांवर टीका करण्याचा अधिकार ठेवलाच पाहिजे. पण टीका दोस्तीच्या स्वरुपाची असावी. तसेंच संयुक्त आघाडी म्हणजे पक्ष पुढाऱ्यांची दोस्ती किंवा "सभ्यांची एकसुरी बैठक" असेंहि नव्हे. आघाडी लढ्यासाठीं असते. प्रतिगामी वर्गाशीं लढून आर्थिक व राजकीय सत्ता व मागण्या मिळवण्यासाठीं ती बांधली जाते. कामगार व शेतकरी वर्ग हेच तिचे आज मुख्य आधार आहेत. लढा हें तिचे हत्यार ठरविल्यावर तो पुढें नेऊन प्रबळ करण्यासाठीं कांहीं वेळीं टीकास्त्र कांहीं अंशाने वापरावें लागतें. नाहींतर आघाडी म्हणजे 'गोडबोल्यांची पानसुपारी' होऊन बसेल. संयुक्त आघाडी म्हणजे बारभाईचें कारस्थान नव्हे. तसेंच वर्गीय तत्त्वांची शुद्धता राखण्याच्या नांवाने वितंडवाद्यांची अथवा

पक्षसुभेदारांची मजलीसहि नव्हे. संयुक्त आघाडी बांधणें फार कष्टाचें व कठीण काम असतें, हें आतां सर्वांना दिसूं लागलें आहे.

**प्रश्न** — अन्नधान्याच्या उत्पादनांतील वाढीसाठीं शेतीविषयक कोणता कार्यक्रम तातडीनें हातीं घेतला पाहिजे असें आपणांस वाटतें ?

**उत्तर**—( अ ) जमीनदारांची जमीन विनामोबदला शेतकऱ्यांच्या हातांत देणें व खास जमीनविषयक कायदा करून त्या सुधारणेला कायदेशीर स्वरूप देणें. (ब) शेतकऱ्यांना शेतीचीं अवजारें व आवश्यक बीं-बियाणें विकत घेतां यावें म्हणून व छोट्या कारागिरांना कच्चा माल वगैरे विकत घेतां यावा व आपले धंदे चालवितां यावे म्हणून दोन्ही वर्गांना लांब मुदतीचें व कमी व्याजाचें कर्ज मिळण्याची तरतूद करणें. (क) जुन्या पाटबंधाऱ्यांची दुरुस्ती करण्यासाठीं व नवे पाटबंधारे बांधण्यासाठीं शेतकऱ्यांना सरकारकडून मदत मिळण्याची तरतूद करणे. ( ड ) शेतकऱ्यांचीं व लहान कारागिरांची सावकारांना देणे असलेलीं कर्जें रद्द करणे. ( इ ) शेतमजुरांना पुरेशी मजुरी व राहणीची परिस्थितें सुधारून मिळण्याची तरतूद करणें.

वरील साहाय्य शेतकऱ्याला पुरविल्यावर व तें त्याच्याच राजकीय व आर्थिक संघटनेकरवीं मिळाल्यावर उत्पादन वाढत नाही असें होणारच नाही; परंतु अपवादास्तव कांहीं घरें तशीं निघालीं तर शेतकरी कमेट्या, संयुक्त आघाडीच्या कमेट्या, राजकीय पक्ष व लोकशाही राज्यांतील शिक्षण प्रचार वगैरे साधनें वापरून कार्यक्षमतेच्या अभावाची कारणे दूर करतां येतात.

**प्रश्न** — आपल्या शेतीविषयक कार्यक्रमांत शेतजमिनीची फेरवांटणी आणि सहकारी किंवा सामुदायिक शेती यांचा उल्लेख नाही हें कसें काय ?

**उत्तर** — शेतीची फेरवांटणी करायची का सहकारी शेती करायची; व ती कशी करायची; हे प्रश्न जनतेची लोकशाही सत्ता स्थापन होतांच जेव्हा शेतकरी बंधमुक्त, खंडमुक्त व कर्जमुक्त होईल तेव्हा त्याच्या गावचे शेतकी संघ अथवा किसान सभा आपापल्या परिस्थितीला अनुसरून सोडवतील. आजचा जमीनदार सावकारवर्ग फेरवांटणी, तुकडेबंदी व सहकारी शेती इत्यादि घोषणा पुढे करून गरीब व मध्यम शेतकऱ्यांना फस्त करून भांडवलदारांच्या अथवा श्रीमंत शेतकऱ्यांच्या पंजांत अडकवूं पाहात आहे. तेव्हा शेतकरी देशोधडीला कसा लागणार नाही, अशा चळवळीवरच आज आमचा भर

आहे व त्याचें साधन म्हणजे शेतमजुरांच्या मागण्या; तसेंच गरीब, मध्यम व सुखवस्तु शेतकऱ्यांच्या मागण्या–या सर्व एकमेकांना मारक व विरोधक न होतां त्या लढवून घेणें व त्यायोगें त्यांचें सर्वांचें रक्षण करणें, हा निकडीचा प्रश्न आम्ही लक्षांत घेतों. त्यांत जमीनदार — सावकारांच्या जमिनींची फेरवांटणी जेथे करावी लागते तेथे ती करतों. सहकारी शेतीहि आम्ही मागतों, पण जेथे ती गरीब व मध्यम शेतकऱ्यांच्या हिताविरुद्ध वापरली जाते तेथे ती घोषणा आम्ही मागे ठेवतों.

**प्रश्न**–आपल्या शेतीविषयक कार्यक्रमांपैकी विधायक स्वरूपाचा कांहीं भाग आपण यापूर्वीच कृतींत कां आणला नाहीं ?

**उत्तर**–शेतीविषयक कार्यक्रमाचा भाग कामकरी-शेतकरी वर्गाच्या राजकीय सत्तेशिवाय अंमलांत येऊं शकत नाहीं व जेथे तो आम्हीं हाती घेतला तेथें अधिष्ठित सत्तेविरुद्ध लढा करूनच तो अंमलांत आणावा लागला. उदाहरणार्थ, सावकारी कर्जें रद्द करणें, जमीनदारी खंड रद्द करून दहा लाख एकर जमीन तेलंगणामध्यें शेतकऱ्यांच्या हवालीं करणें—हीं कामें अत्यंत मोठ्या प्रमाणावर आम्हीं केलीं. त्याबरोबर जमीनदार सत्तेनें शेतकऱ्यांशीं युद्ध केलें. आम्हीं कालवे, बंधारेसुद्धां दुरुस्त करण्याचा प्रयत्न केला व दुरुस्त केलेहि. पण तेसुद्धां उध्वस्त करण्यांत आले. ज्या तेलंगणाच्या खेड्यांमध्यें आमच्या पुढारीपणाखालीं आम्हीं पिकें व उत्पादन वाढवलें, तेथेच नेहरूंच्या स्वारीनंतरच्या लष्करी अंमलांत ४८ टक्के उत्पादन घटलें. कार्यक्रमाच्या मागण्या मांडणाऱ्या क्रियाहीन मोर्च्यांना फार झालें तर लाजे-काजेस्तव सरकार विरोध करणार नाहीं; आणि तेहि जयप्रकाश वगैरेंनीं काढले तर ! पण प्रत्यक्ष खंडबंदी, व्याजबंदी केली किंवा जमीन वाटली तर "खाजगी मालमत्तेच्या हक्कांवर हल्ला झाला, कम्युनिझमचा उठाव झाला", अशा घोषणा करून शेतकऱ्यांचीं गावेंच्या गावें लष्करी बंदुकांनी व्यापलीं जाऊन बेचिराख केलीं जातात. तेव्हां शेतकरी कार्यक्रम संपूर्णपणें किंवा कांहीं अंशानेसुद्धां अंमलांत यायचा, तर सत्तेचा प्रश्न उभा राहतोच आणि तो प्रश्न कार्यक्रम प्रत्यक्ष अंमलांत आणण्याच्या लढ्यानेच सुटतो.

**प्रश्न**–प्रचलित सरकारविरुद्ध उभारावयाच्या आघाडीमध्यें व आपल्या कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यामध्यें कामगारवर्गाच्या बरोबर आपण शेतकरी वर्गास पुढारीपण दिलेलें आहे. पण आपण अपेक्षितां ते पुढारीपण यशस्वीपणें

बजावण्याइतकी विचारजागृति व संघटना हिंदी शेतकरीवर्गांत झालेली आहे, असें आपणास वाटतें का ?

उत्तर–त्यांच्या परिस्थितीनेच त्यांची भावना जागृत होत आहे. त्याला सुसंबद्ध विचारजागृतीचें स्वरूपहि आलेलें आहे. म्हणून तर जमीनदारसावकार-शाहीविरोधी घोषणा गावोगावीं उठत आहे. पण संघटना मात्र व्हावी तशी नाही. आणि ती होऊ नये म्हणूनच लोकशाही हक्कांची कत्तल व पुरोगामी पक्षांवर दडपशाही सरकार करीत आहे.

प्रश्न–आपल्या पक्षाचें औद्योगिक धोरण काय आहे ?

उत्तर–देशी उद्योगधंद्यांची वाढ मुख्यतः दोन कारणांनी अडलेली आहे; एक तर जमीनदारी सावकारी पाशामुळे शेतकरी सधन होत नाहीं म्हणून तो कारखानदारी मालाचा गिऱ्हाइक होत नाहीं. देशांत ऐशी टक्के लोकसंख्या जी शेतकऱ्यांची तीच जर बाजारपेठांचें गिऱ्हाइक होऊं शकत नाही, तर कारखानदार माल तयार करून विकणार कुठे नि कोणाला व विक्रय वाढणार कसा ? दुसरें, देशाबाहेरच्या पेठा गबर ब्रिटिश, अमेरिकन भांडवलदारांनी अडवून धरलेल्या; कारखानदारांना लागणाऱ्या यंत्रांचा पुरवठा त्यांच्याच हातीं. शिवाय देशांत शिरून हिंदी उद्योगधंद्याशीं चढाओढ करून त्यांना मारण्याची ताकद अद्याप ब्रिटिश भांडवलाच्या हातीं आहे. देशांत शेतकरी गिऱ्हाइकांचा अभाव व ब्रिटिश भांडवलाची मारक चढाओढ यांच्यामध्ये चेपलेल्या देशी उद्योगधंद्याचें रक्षण हल्लीचें सरकार करूं शकत नाही.

तसें संरक्षण त्यांना देणें हें आपलें कर्तव्य आहे. तसेंच उद्योगधंद्यांचा श्रमकर्ता व गिऱ्हाईक या दोन्ही नात्यांनी कामगारवर्गाच्या मूलभूत मागण्या पुरविणें हेंहि अवश्य आहे. धंद्यांना संरक्षण देत असतां त्यांनी जनतेला लुबाडूं नये म्हणून बहुजन समाजाला लागणाऱ्या वस्तूंवर भावनियंत्रण करणें व एकूण उद्योगधंद्यांची वाढ आणि पोषण लोकहिताच्या दृष्टीने करण्यासाठी उपाय योजणें हेंहि अवश्य आहे.

प्रश्न— ' देशाचें स्वातंत्र्य व समृद्ध जीवनाचा विकास यांविषयी कळकळ बाळगणाऱ्या राष्ट्रीय भांडवलदारांना ' आपण आपल्या लोकशाही आघाडींत दाखल करून घेण्याची तयारी व इच्छा दर्शविली आहे. परंतु आज अगदी लहान कारखानदारांपासून तों मक्तेदार–भांडवलदारांपर्यंत सर्वच चालकांना

एकाच मापाने मोजण्याच्या व एकाच धोरणाने वागविण्याच्या आपल्या पद्धतीमुळें अनेक कल्पक, धडाडीच्या व राष्ट्रीय विकासासाठी धडपडणाऱ्या मध्यम व छोट्या उद्योगचालकांना आपण नामोहरम करून टाकत नाहीं का ?

**उत्तर** — देशाचें म्हणजे जनतेचें जीवन समृद्ध करूं पाहणाऱ्या राष्ट्रीय भांडवलदारांना लोकशाही आघाडींत स्थान आहे हें खरें; परंतु लहान कारखानदारांपासून तों बड्या मक्तेदार भांडवलदारांपर्यंत सर्वांना एकाच मापाने मोजण्याची पद्धत आम्हीं अवलंबिली व त्यामुळें अनेक कल्पक व राष्ट्रविकासासाठी धडपड करणाऱ्या मध्यम व छोट्या भांडवलदारांना आमच्या धोरणानें नामोहरम केलें हें म्हणणें सत्याला धरून नाहीं.

आम्हीं कामगारांच्या किमान मागण्या लढविल्या. कामाचे तास, सुट्या, बोनस, महागाई हे सर्व प्रश्न प्रथमतः व मुख्यतः हिंदुस्थानांतील बड्या भांडवलदारांच्याच धंद्यामध्यें प्रथम लढविले गेले. उदाहरणार्थ, प्रचंड नफा कमविणाऱ्या कारखान्यांतून जी महागाई आम्हीं मिळविली तिच्या केवळ ६० ते ७५ टक्के इतर मध्यम व लहान कारखान्यांतून मिळत आहे.

शिवाय मोठ्या भांडवलदारांपेक्षां लहान व मध्यम भांडवलदार कमी पिळणूक करतात, ही जी आपल्या प्रश्नाची पूर्वग्रहीत भूमिका दिसते ती खरी नाहीं. किंबहुना मोठ्यांच्या चढाओढींत न टिकण्याची धास्ती असल्यामुळें मध्यम व लहान कारखानदार जास्त तीव्रतेनें व चिडून आपल्या मूठभर कामगारांकडून रक्त आटेतों कसोशीने काम करून घेण्याचा प्रयत्न करतो असा अनुभव आहे.

मध्यम व लहानांनी मोठ्यांच्यापेक्षां निराळें व कामगारांशीं जास्त सहानुभूतीचें धोरण पत्करलें, तर कामगार-संघटनाहि तद्वत वागणूक बदलतील. पण मोठ्यांच्या मागे लागून त्यांच्याच धोरणाने, किंबहुना जास्त वाईट रीतीने कामगारांना वागवायचें आणि मग लहान व मध्यम म्हणून सवलतहि मागायची हें दोन्हीं कसें जमणार ? म्हणून याबाबत आमचें ' नवें धोरण ' अंमलांत आणण्यासाठी कामगारांच्या युनियन्स व कारखानदारांचे संघ यांच्या संयुक्त बैठकींतच चर्चा करून धोरण प्रत्यक्षपणे कसें अंमलांत यायचें, याची रूपरेखा ढोबळपणे ठरूं शकते. अशी संयुक्त बैठकीची चर्चा राष्ट्रीय भांडवलदार करायला तयार आहेत का ?

पण देशी भांडवलदार लोकशाही आघाडींत आल्याने आघाडीचा जसा फायदा आहे तसा त्यांचाहि आहे. पण त्या फायद्याचा अर्थ कामगारांनी आपल्या मागण्या सोडून आघाडीच्या हितासाठींच काय तें काम करावें असा मात्र नव्हे. कामगार हाच आघाडीचा मुख्य पाया असल्याने त्याच्या मागण्या मिळवून त्याला सबळ करणें, हें आमचें आद्य कर्तव्य. पण त्या क्रियेमध्ये देशी भांडवलदार परकीयांच्या हातून वा प्रतिगामी सर्वग्रासी मक्तेदारांकडून उध्वस्त होणार नाही याची आम्ही दखल घेऊं.

**प्रश्न**—हिंदुस्थानांतील मध्यम व लहान उद्योगधंद्यांना परदेशी मालाच्या चढाओढीस तोंड द्यावें लागत आहे, तसेंच आज सरकारकडून त्यांना मुळीच पाठिंबा मिळत नाहीं, या गोष्टी आपणच जाहीरनाम्यांत मान्य केलेल्या आहेत. वरील अडचणींमुळें हिंदी कारखान्यांची वाढ आज खुंटलेली असतां कामगार-वर्गास नवनव्या सवलती देण्याची जबाबदारी त्यांच्या अंगावर टाकणें योग्य आहे काय ?

**उत्तर** — मागील प्रश्नाचें उत्तर लक्षांत घेऊनच या प्रश्नाचें उत्तर देतां येतें. कांहीं किमान सवलती सर्वांनाच लागू करणें अवश्य आहे. उदाहरणार्थ, कामगारांना अपघात होऊं नये म्हणून यंत्रांना कव्हर घालणें किंवा कुंपण करणें हा नियम जरी थोड्या खर्चाचा असला तरी लहान, मध्यम व मोठ्या अशा सर्व उद्योगधंद्यांना तो लावावाच लागतो. यंत्रांत ज्याचा हातपाय कापला जातो त्या कामगाराला राष्ट्रीय विकासासाठीं मध्यम व राष्ट्रवादी मालकाच्या यंत्रांत आपला पाय कापला या विचारानें काय समाधान होणार ? त्यामुळें त्याचा पाय थोडाच बरा होणार किंवा त्याला काम देणार ? पिण्याचें पाणी, संडास सफाई, दिवाबत्ती वगैरेंच्या सोयी सर्वत्र असायला नकोत का ? कुटुंबाचें पोट भरेल असा किमान पगार सगळीकडे नको का ? सर्व कारखान्यांना सरसहा लागू होतील असे किमान नियम सर्वांनीच अंमलांत आणणें सर्वांच्याच हिताचें आहे.

पुढारलेल्या देशांतील कांहीं नियम येथें लावावेच लागतात. कारण, त्यांचीच यंत्रे व कामपद्धति येथें वापरलीं जाते व तसेच आर्थिक हितसंबंध मालकवर्ग येथे राखीत आहे. त्यामुळेंच आपल्या कारखान्यांची वाढ खुंटते किंवा ती खुंटण्याचें हेंच मुख्य कारण आहे, हें म्हणणें खरें नव्हे.

**प्रश्न**—लोकशाही आघाडीवरचा आपला कार्यक्रम औद्योगिक क्षेत्रांत

यशस्वी व्हावयाचा असेल तर चालक व कामगार यांच्यामध्यें सहकार्यानें कामें करण्याची भावना वाढली पाहिजे. परंतु आज कामगार संघटनांच्या कार्याचा मुख्य रोख चालकवर्गाच्या प्रत्येक उपक्रमाकडे संशयाने पाहण्याचा व त्यांत आडकाठी आणण्याचा असतो. कामगार संघटनेच्या कार्याची ही दिशा बदलणें आवश्यक आहे असें आपणांस वाटत नाहीं काय ?

उत्तर–आपण म्हणतां तशी कामगार संघटनेची दिशा आज बदलणें चुकीचें होईल व तसें करण्याचा ज्यांनी प्रयत्न केला त्यांनी कामगारांचें नुकसान करून मालकांचीच घरभरणी केली आहे.

आज मालक आणि कामगार यांचें नातें काय ? कामगारांची मेहनत, शक्ति पिळून नफा कमविणें हें मालकांचें काम. बरें, ती पिळणूक करतांना जोपर्यंत कामगार आपल्याला संघ–शक्तीने वा संपाने मालकांना आळा घालत नाहीं, तोंपर्यंत मालकवर्ग आपले आत्यंतिक पिळवणुकीचें जुलमी मार्ग कधीच थांबवीत नाहीं. आपण होऊन मालकांनीं कामगारांना कांहीं चांगली गोष्ट दिली असे आजपर्यंत घडलें नाहीं. आजपर्यंत मालकाचा प्रत्येक उपक्रम स्वतःचा फायदा वाढविण्यासाठीं व कामगारांची पिळणूक जास्त करण्यासाठींच झालेला आहे. म्हणून कामगार मालकाकडे संशयाने पाहणार व त्या दोहोंमध्यें सह-कार्याची भावना निर्माण होणें अशक्य. जे मूलभूत नातेंच मुळीं विरोधावर आधारलेलें, तेथे सहकार्य कसें होणार ? कांहीं तात्कालिक अर्थात् मर्यादित सहकार्य मात्र इतर प्रतिगामी वर्गशक्तीविरुद्ध लढण्यासाठीं एक होऊं शकतें.

कामगार ‘बेशिस्त’ म्हणजे काय, याचा मालक एक अर्थ करतो व कामगार दुसरा करतो. जेथे कामगार आतोनात पीडित असतो, कामाचा भार वा तास जास्त व त्या मानाने झिजल्या जाणाऱ्या देहाला विश्रांति व पोषण अपुरें तेथें ‘कामचुकारपणा, म्हणजे मालकाला नकळत अथवा त्याच्या पिळवणुकीचे नियम मोडून विश्रांति मिळविणे किंवा देहाची झीज कमी करणें. पूर्वीं चौदा तास काम घेत त्यावेळी जो ‘चुकारपणा’ फॅक्टरी कमिशन्सना दिसला, तो दहा तासांचा दिवस झाल्यावर कमी दिसला व आता आठ तासांच्या दिवसांत आणखी कमी झाला आहे. म्हणून मालकांच्या तक्रारींना आमची तोड म्हणजे कामाचा भार, तास व पगार याबाबत योग्य तीं ‘स्टँडर्डस’ युनियन्स व मालक यांच्यामध्यें ठरविलीं गेलीं पाहिजेत.

**प्रश्न**–नुकत्याच जाहीर झालेल्या पंचवार्षिक योजनेबद्दल आपलें सर्व-साधारण मत काय आहे?

**उत्तर**–कॉंग्रेस सरकारच्या सर्वच योजना जनतेच्या दृष्टीने थोतांडी निघाल्या आहेत. ही नवी पंचवार्षिक योजना स्वतःच कबूल करते की, 'जमीन-दारी निकालांत काढण्याचा प्रश्न सुटणार नाहीं. कारण, त्यामुळें फार संघर्ष होतील! म्हणजे जमीनदारवर्ग नष्ट व्हावा असें करूं गेल्यास तो बंड पुकारील!' योजनाच सांगते, की कामगारांचे पगार वाढणार नाहींत; पण वस्तूंच्या किंमती वाढणारच! त्यामुळे पगारदारी लोक व इतर जनता यांना तिची 'झळ' लागेल. नफेबाजांवर कर लादणें वाईट; कारण मग भांडवल मिळणार नाहीं! सारांश, जनता तोट्यांत आणि जमीनदार नि मोठे कारखानदार तेवढे नफ्यांत. म्हणून ही योजना देशघातकी ठरते.

**प्रश्न**– हिंदुस्थानांतील ब्रिटिशांच्या मालकीचे सर्व कारखाने, बँका, मळे इत्यादि 'जप्त' करून त्यांचे 'राष्ट्रीयीकरण' केलें पाहिजे असें आपण म्हणतां, मात्र त्याचबरोबर परदेशी सरकारांच्या मदतीचेंहि स्वागत करतां. परंतु परदेशी भांडवलाला आपल्या नव्या राष्ट्रीय धोरणाच्या चौकटींत बस-ण्याची संधि न देतांच आपण तें जप्त केलें, तर परदेशी भांडवलाला तर आपणांस मुकावेंच लागेल; शिवाय परदेशी कारखानदारांकडून यंत्रसामुग्री वगैरे मिळविणेंहि आपणांस मुष्कीलीचें होईल, असें आपणांस वाटत नाहीं का?

**उत्तर**– नाहीं. आम्ही फक्त ब्रिटिश भांडवल जप्त करून त्याचें राष्ट्रीयीकरण करा असें म्हणतों. कारण त्याच भांडवलाने आजपर्यंत आमची पिळवणूक केली; आमची प्रगति रोखली. पण तें जप्त केल्यानें इतर देशांची मदत मिळणार नाही असें नाहीं. मदत करूं पाहणारा दुसरा देश एवढेंच समजेल, कीं ब्रिटिश भांडवलदारीप्रमाणे आपण या देशाशीं वागतां कामा नये. शिवाय, आमच्याप्रमाणे त्यांनाहि आमची गरज असतेच. एवढ्या प्रचंड देशाच्या गरजा पुरविण्याने त्यांचे कारखाने अनेक वर्षें चालू शकतात. त्यांना फायदा मिळूं शकतो. म्हणून त्यांच्या गुलामगिरीच्या वा अडवणुकीच्या अटी मान्य न करतां त्यांच्या भांडवलाची आयात आपण मागितल्यास व तशा धिटाईने वागल्यास ब्रिटिश भांडवल जप्त करूनहि आपल्याला यंत्रसामुग्री मिळूं शकते.

ग्रीस देशाने गेल्या शंभर वर्षांत अनेक वेळां परकीय कर्जें बुडविलीं.

जर्मनी, इंग्लंड, वगैरेंनीहि तें केलें आहे. तरीपण या देशांच्या कर्जाच्या देवघेवीचा व्यवहार बंद पडला नाहीं.

शिवाय भांडवलदारी देशांशिवाय इतरच देश आतां मदत देण्यास जास्त समर्थ व तयार आहेत. तेव्हां ब्रिटिश भांडवल जप्त केल्याने आपल्या प्रगतीचा मार्ग मोकळाच होईल. रोखला जाणार नाहीं.

**प्रश्न**—आपल्या देशांतील असंख्य जातिभेद ही आपल्या प्रगतीच्या मार्गातील एक मोठीच धोंड आहे, असें आपणास वाटत नाहीं का ? ती दूर करण्यासाठीं आपण कशा स्वरूपाचे प्रयत्न करू इच्छितां ?

**उत्तर**—जातिभेद हे एका विशिष्ट उत्पादनपद्धतींतून निर्माण झाले. धंद्यानुसार जाति आणि जातीनुसार धंदे अशी सांगड हजारों वर्षें संकुचित ग्रामीण जीवनांत बसली. व्यक्तिगत कौशल्य व अवजारें गेलीं व ती उत्पादन-पद्धति मोडली. ब्रिटिशांनी आणलेल्या कारखानदारींत व भांडवलदारींत जातिभेदाचा मुख्य पायाच ढासळूं लागला. उदाहरणार्थ, कापडाच्या गिरणींत महार, मराठा, ब्राह्मण, चांभार अशा सर्वच जाति शिरल्या. मालक–विरोधी लढ्यांत ते सर्व ‘ कामगारवर्ग ’ बनूं लागतात व त्याच लढ्यांत आपली जातहि विसरूं लागतात. पण जातीय विचारांचा अवशेष तेथेहि राहतोच. मराठा साचेवाला आपल्या साच्यावर महार ‘ हेल्पर ’ घ्यायला हरकत घेतो. पण ही भावना वर्गीय एकीनें व शिक्षणानें मोडेल.

तेलंगणाच्या खेड्यांत शेती-कामगार बहुतेक अस्पृश्य जातीचे. पूर्वी गावकऱ्यांत व त्यांच्यात तेढ असे. जमीनदार त्यांना चोपून, कमी मजुरी देऊन राबवीत. पण तेलंगणाच्या शेतीच्या लढ्यांत जेव्हा अस्पृश्य मजुराला व गरीब शेतकऱ्याला जमीन मिळाली व सर्वजण एकाच गांवकमेटीत बसून बरोबरीच्या नात्याने सत्ता वापरूं लागले तेव्हां तेथे अस्पृश्यता ढासळली. जमीन व काम यांसाठी जे वर्गीय लढे कामगार शेतकऱ्यांचे होतील, त्यांतील अनुभवाने, प्रचाराने व अखेर आर्थिक उत्पादनाची संपूर्णपणें लोकशाहीपद्धतीने पुनर्घटना झाल्यामुळें जातिभेद नष्ट होतील. समाजाने सर्वांचीच बेकारी नाहीशी केल्यावर व सर्वांनाच शिक्षण मिळाल्यावर सरकारी नोकऱ्यांमध्ये राखीव जागा मागायला कोण व कां जाईल ? जातिभेदाचा प्रश्न मूलतः व मुख्यतः आर्थिक व नंतर वैचारिक आणि धार्मिक आहे.

**प्रश्न**—हिंदी संघराज्य व पाकिस्तान यांच्यामध्ये मैत्री व सहकार्य नांदावें यासाठी हिंदुस्थान सरकार सतत झटत आहेच ना ? मग ' हिंद–पाकच्या भांडाभांडीला हिंदी सरकार आळा घालत नाहीं ' असें आपण कां म्हणता ?

**उत्तर**—हिंदुस्थान सरकार सतत तसें झटत नाहीं. शाब्दिक घोषणाच फार करतें. उदाहरणार्थ, हुंडणावळीच्या दरावर हिंदुस्थान सरकारने जें रण माजविलें तें केवळ ज्यूट--गिरणीमालकांच्या नफ्यासाठीं. पाकिस्तानने रण माजविलें ज्यूट–जमीनदारांसाठीं. परिणाम असा झाला, कीं कलकत्त्यांत शेजारून तीस मैलांवरून जी मासळी येत असे ती बंद पडली. कलकत्त्यांत मासळीचे भाव भरमसाट वाढले, तर पलिकडे कोळ्यांची मासळी विकेना म्हणून भाव कोसळले व कोळी बेकार झाले ! म्हणजे नफेखोरांच्या चुरशीला सरकारने हुंडणावळणीच्या तंट्याचा गोंडस मुलामा चढवून हिंद–पाक–विरोधाला उत्तेजन दिलें. कोरियन युद्धाचा फायदा लुटण्यासाठी दोन दलाल ज्यूटसंघानी एकी करतांच हिंदुस्थान व पाक हीं सरकारें मैत्री आणि शांततेसाठी झटूं लागलीं !

पाक–हिंदची भांडाभांड लढविण्यांत इंग्लंड--अमेरिकेचाहि हात असल्यामुळे जोंपर्यंत हें सरकार त्यांच्या दाव्याला बांधलेलें आहे तोंपर्यंत तुम्ही म्हणतां तें सतत झटणें शाब्दिक ठरतें. किंवा साम्राज्यवाद्यांचीं मोहरीं फिरतील त्याप्रमाणे फिरतें.

**प्रश्न**—पं. नेहरूंचें चालू परराष्ट्रीय धोरण आपल्या अपेक्षेप्रमाणें उघड--उघड रशियाशीं व चीनशीं सहकार्य करण्याचें नसेल; परंतु स्वातंत्र्य मिळून अवघीं चार वर्षेंहि न झालेला भारत कांहीं प्रश्नांवर तरी अँग्लो–अमेरिकनांच्या विरुद्ध उभा राहात आहे, हें कमी कौतुकास्पद आहे का ? आज पं. नेहरूंच्या धोरणाचा निषेध करून स्वतंत्र आशियाई राष्ट्रांचा आवाज उठविण्याच्या त्यांच्या प्रयत्नांना आपण अडथळा आणीत नाहीं का ?

**उत्तर**–परराष्ट्रीय धोरणांत नेहरू-सरकार मुख्यतः ब्रिटिशांच्या अनुरोधानें चालतें. शिवाय, नेहरू-सरकार ज्या वर्गाचे प्रतिनिधि आहे त्याचें हित साधण्यासाठीं ब्रिटिश व अमेरिकन भांडवलदारांच्यामधील स्पर्धाहि तें वापरते. तसेंच अँग्लो अमेरिकन एक होऊन जर कांहीं भरमसाट मागणी करूं लागले, तर त्यापासून आपल्या भांडवलदारवर्गाला वांचविण्यासाठीं पं. नेहरू रशिया-चीन

वगैरेंकडे झुकण्याची धमकी दाखवितात. आणि एवढा सर्व देखावा करून शेवटी कांहीं सवलती घेऊन ब्रिटिश-अमेरिकन गोटांतच तळ देऊन राहतात.

आर्थिक रचनेच्या कामांत नेहरू-सरकार सर्वस्वी ब्रिटिश व अमेरिकन भांडवलाची व तज्ज्ञांची पकड मान्य करून चालतें. कालवे, धरणें, कारखाने, कोळशाच्या खाणी, इलेक्ट्रिसिटी, तेल वगैरेंच्या सर्व योजना ब्रिटिश, अमेरिकनांच्याच तंत्रानें चालतात. उदाहरणार्थ, आतां तेलाच्या रिफाईनरीच्या ज्या योजना चालू आहेत त्यामुळें अमेरिकन व ब्रिटिश तेल कंपन्यांचा प्रचंड ताबा मुंबईचे ट्रॉम्बे बेट, कलकत्ता व मद्रास यावर बसणार. तेथें तळ देऊन बसणाऱ्या आरमाराविरुद्ध आशियाई राष्ट्रांचें 'स्वतंत्र' पुढारीपण नेहरू कसें करणार तें तुम्हीच ठरवा.

आमचें आरमार, सैन्य व विमानदल यांचे मुख्य कमांडर व तज्ज्ञ सर्व ब्रिटिश आहेत. स्वातंत्र्याचे मुख्य साधन देशाची फौजच असते ना? तिचीच नांगी जर इंग्रजांच्या हातीं, तर तो देश परराष्ट्रीय राजकारणांत त्याच इंग्रजांविरुद्ध धडाडी दाखविण्याची भाषा कधीमधीं बोलला तर तें सोंगच म्हणायचें नाहीं काय?

हिंदुस्थानला लागणारी यंत्रसामुग्री ब्रिटिश व अमेरिकन भांडवलदार आतां पुरवीत नाहींत; पण सोविएट, झेकोस्लावाकिया, पोलंड, हंगेरी वगैरे राष्ट्रें ती देण्यास तयार असतां नेहरू-सरकार त्यांच्याशीं व्यापारी करार करून ती सामुग्री आणीत नाही याचा अर्थ तें ब्रिटिश अमेरिकन गोटाबरोबरच राहूं इच्छिते असा नाही का? मधूनमधून इराण, इजिप्त वगैरेंशीं सहानुभूति दाखविल्याने आशियाई स्वातंत्र्याचें पुढारीपण अथवा रक्षण होत नसतें. तशी कृति करावी लागते.

ब्रम्हदेशाचें सरकार ब्रिटिश खाणी मालक व हिंदी आणि ब्रह्मी जमीनदार यांच्या रक्षणासाठी तेथील जनतेविरुद्ध लढत आहे हें स्पष्ट असतां त्याला नेहरू-सरकार दारूगोळा पुरवितें व कर्जहि देतें तें काय कौतुकास्पद म्हणायचें? का ब्रिटिश विरोधी लोकशाही-रक्षक समजायचें? नेहरू-सरकार हो-चि-मिनच्या स्वतंत्र सरकारला मान्यता न देतां, फ्रेंच-अमेरिकन बाहुलें जो बाओ दाओ त्याला आंतरराष्ट्रीय परिषदांत कां मान्यता देतें?

नेहरूंनी चीनला मान्यता दिली—चांगलें केलें. पण ब्रिटनलाहि तेंच हवे

होतें, व त्यांनीहि त्याचवेळीं मान्यता दिली हे विसरून चालणार नाहीं. चीनला मान्यता दिल्यावरहि तिबेटमध्यें ब्रिटिशांचे चीनविरोधी खेळ नेहरू-सरकारनें चालू दिले हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

जेथें नेहरू अँग्लो-अमेरिकनविरोधी भूमिका घेतील तेथें त्यांना आम्ही मदत करूं. पण ती धरसोडीची असते हें लक्षांत ठेऊन व लष्करी आणि आर्थिक रचनेमध्ये ते संपूर्णपणें अँग्लो-अमेरिकन गटाशींच संलग्न असतात हें लक्षांत ठेऊन आपण वागलें पाहिजे. म्हणजे अँग्लो-अमेरिकनविरोधी चळवळीत नेहरू सरकारवर अथवा त्यांच्या पुढारीपणावर व वचनावर विसंबून जनतेने वागूं नये एवढीच आमची सूचना.

**प्रश्न**—चीनमधील समाजवादी क्रांतीचें उदाहरण आपण वेळोवेळीं देत असतां. चीनने गेल्या दोन वर्षांत बरीच प्रगति करून दाखविलेली असली तरी त्यामागे असलेल्या गेल्या तीस वर्षांतील घडामोडींचा इतिहास जशाचा तसा गिरवितां येईल का ?

**उत्तर**—लोकशाही क्रांतीसाठी कामगार-शेतकरी वर्गाची दोस्ती व एकजूट कशी बांधावी, सरंजामी जमीनदारी आणि साम्राज्यवादी यांविरुद्ध लोकशाही आघाडींत कामगार-शेतकरी वर्गाने राष्ट्रीय भांडवलदार वर्गालाहि बरोबर कसें घ्यावें, कम्युनिस्ट पार्टीच्या पुढारीपणाखाली, पण सर्व लोकशाही पक्षांना बरोबर घेऊन क्रांतिकारक लढ्यांनी आघाडी कशी बांधावी आणि देश मुक्त व लोकशाहीयुक्त कसा करावा—या सर्व बाबतींत चीनचें उदाहरण आपणास जसेंच्या तसें गिरविणें जरूर आहे.

मूलभूत प्रश्नांत चीन व आपण भिन्न नाहीं. भिन्नता फक्त लढाईच्या डावपेचांत येईल. पण त्यामुळें चळवळीची मुख्य दिशा व साधनें भिन्न होत नाहीत. हिंदुस्थानच्या भौगोलिक व ऐतिहासिक परिस्थितीला धरून कांहीं थोडे फरक पडतील इतकेंच.

● ● ●

# शिवाजी-त्यांचा आणि आमचा

*अमर हिंद मंडळ, दादर येथें ता. ३ मे १९५१ रोजीं कॉ. डांगे यानीं केलेलें भाषण.*

: १ :

सुरुवातीस ओळख करून देणाऱ्यांनीं मी नेहमीं राजकीय विषयांवर किंवा कामगारांच्या प्रश्नांवर बोलतों व आजचा विषय हा निराळ्या स्वरूपाचा आहे, असें सांगितलें. वास्तविक आजचा विषय हा संपूर्ण राजकीयच आहे. शिवाजी हा राजकारणीच होता व त्याचें चरित्र म्हणजे सर्वस्वी राजकारणच आहे ! परंतु इतरांचा इतिहास व शिवाजीचा इतिहास यांत फरक आहे. इतरांचे इतिहास इतिहासजमा झाले, शिवाजीचा इतिहास अजून कामाला येतो ! म्हणूनच आपण अद्याप 'शिवजयंती' साजरी करतों, त्याची आठवण करतों. प्रतापगडचेंच उदाहरण घेतलें, तर शिवाजी अद्याप अनेकांना सतावतो हेंहि दिसतें ! इतरांचे इतिहास, 'इतिहासांत असें घडलें' एवढेंच सांगतात पण शिवाजीचा इतिहास 'असें घडायला पाहिजे व असें घडवा' हें सांगतो. हेंच त्याचें वैशिष्ट्य ! म्हणून शिवाजीचा इतिहास हा जिवंत राजकारणाचा विषय आहे !

भारतांत सुरुवातीस ब्रिटिश राजवट आली, त्यावेळीं जरा विचित्र परिस्थिति होती. राष्ट्रीय जागृति नव्हती. वरचा सुशिक्षित वर्ग स्वामिनिष्ठ नागरिक होता. त्यावेळीं इंग्रजांनीं जो मराठ्यांचा इतिहास लिहिला त्यांत मराठ्यांची केवळ बदनामी होती. 'कुठून तरी विस्कटलेला पालापाचोळा एकत्र आला आणि त्याला आग लागून भडका उडाला' असें मराठ्यांच्या इतिहासाचें चित्र त्यांनीं रंगवलें ! 'चार मराठे एकत्र आले, लुटालूट केली आणि राज्य घेतलें आणि आतां आमची राजवट आहे. आतां, आम्ही सर्व ठीक करतों आहोंत', हें ब्रिटिशांनीं लिहिलेल्या इतिहासाचें सार ! पण आग कशी लागली ? आणि भडका कोणाचा उडाला ?

त्यानंतर हळुहळू राष्ट्रीय जागृति झाली. लोकमान्य टिळकांनीं ' शिवजयंती उत्सव ' सुरू केला. देशामध्यें ब्रिटिशविरोधी वारें वाहूं लागलें. राजनिष्ठ लोक कमी होऊं लागले. राजाच्या विरुद्ध भावना निर्माण झाली. मग आमची कांहीं मंडळी जागृत झाली. राजवाडे, साने, पारसनीस उभे राहिले. त्यांनीं मराठ्यांचा खरा इतिहास लिहायला सुरुवात केली. पण हा इतिहास लिहितांना ' हें सर्व घडलें कसें ? ' याच्यावर आमच्यांत मतभेद निर्माण झाले. कांहीं मंडळींनीं तर ' अफझुलखानाच्या वधा 'वर निष्कारण शेंकडो पानें खर्चीं घातलीं. तो मेला कीं त्याला मारला ? कसा मारला ? मारणें बरोबर होतें कीं नाहीं ? त्यांत साधनशुचिता होती कीं नाहीं ? एक ना हजार प्रश्न आणि चर्चा ! ' साध्य बुडालें तरी चालेल पण साधनशुचिता पाहिजे ' असें म्हणणारी मंडळी आजदेखील आहेत ! अरे, ही चर्चा कशाला पाहिजे ? मारला ! स्वराज्यासाठीं मारणें आवश्यक म्हणून मारला ! त्यांत काय बिघडलें ? परंतु ' स्वराज्य बुडालें तरी हरकत नाहीं पण साधनशुचिता पाहिजे ! ' असें म्हणणारे निघाले म्हणजे मोठें कठीण होऊन बसतें ! आज अनेक पक्ष आहेत. जो तो म्हणतो शिवाजी आमचा ! म्हणून मला वाटतें कीं ' टिळक आज हयात असते तर— ' या विषयावर जशी लेखमाला मध्यंतरीं लिहिली गेली तशी ' शिवाजी आज जिवंत असता तर— ' अशी लेखमाला सुरू झाली तर काय होईल ? अच्युतराव कोल्हटकरांनीं एकदां ' माधवाश्रमांत शिवाजी ' असा लेख लिहून मोठी गंमत उडविली होती ! शिवाजी आज जिवंत असता तर त्यानें काय केलें असतें तें मी सांगूं शकत नाहीं ! ' तो कम्युनिस्ट पक्षाचा सभासद झाला असता ' असें तर मी बिलकूल सांगणार नाहीं ! पण या सर्व इतिहासाकडे पाहण्याचा मात्र आमचा एक विशिष्ट दृष्टीकोन आहे. आणि तो कम्युनिस्ट दृष्टिकोन आहे. तो कोणता ? तो कांहीं मंडळींना ऐकून माहीत असेल. एक म्हणजे इतिहास हा चक्रासारखा फिरतो असें कांहीं मंडळी म्हणतात. म्हणून त्याची पुनरावृत्ति होते असें ते म्हणतात. पण इतिहास वरवर जरी चक्रासारखा दिसला तरी प्रत्येक वेळेला तो पुढें पुढें जातो, त्याच्यांत प्रगति होते हा पहिला दृष्टीकोन. दुसरें म्हणजे, ' कांहीं कांहीं दिवसांनीं एक एक सत्पुरुष जन्माला येतो आणि तो इतिहास घडवतो ', असें कांहीं म्हणतात. तें बरोबर नाहीं. समाजाला ज्या वेळीं ज्याची जरूर असते त्या वेळी तो तसा पुढारी निर्माण

करतो. कार्लाईल म्हणतो, पुढारी म्हणजे ईश्वराचा अवतार ! तो स्वयंस्फूर्तीनें जग बदलून टाकतो ! मग बुद्ध जग कां बदलू शकला नाहीं ? इतर कां बदलू शकले नाहीत ? म्हणून हा 'अवताराचा' सिद्धान्त चुकीचा. परिस्थिति निर्माण झाली कीं गुण निर्माण होतात. समाजाला जरूर भासली म्हणजे तसें व्यक्तिमत्व तयार होते. **म्हणून, परिस्थिति अधिक गुण, समाजाची जरूरी अधिक त्याचें व्यक्तिमत्व मिळून पुढारी तयार होतो !** हा आमचा दुसरा दृष्टिकोन. ब्रिटिशांच्या वेळीं सुरुवातीला जसे राजनिष्ठ लोक निर्माण झाले तसे मोंगलांच्या काळांत झाले. कांहीं लोक औरंगजेबाला 'सत्पुरुष' म्हणायला लागले. तो सूत काढीत नव्हता पण हातानें टोप्या तर शिवत होता ! आणि कांहीं लोक व्यक्तिशः आचरणानें सत्पुरुष असतात पण प्रसंगीं गोळ्या घाल-तात हें तुम्हांला माहीतच आहे ! पण अशा राजनिष्ठ लोकांत शिवाजीचा बाप शहाजी जरा वेगळा होता. तो मुत्सद्दी होता. सर्व शाह्यांशी संधान बांधून त्यानें आपलें बस्तान बसविलें. विस्तार वाढवला. तो निजामशाहीच्या लहान बादशहाला मांडीवर घेऊन तख्तावर बसे व त्याच्या नांवें स्वतः कारभार चालवी. हें कांहीं लोकांना आवडत नसे. 'राज्य निझामशाहीचें पण शहाजी तख्तावर ! मग खरा शहा कोण ?' असा प्रश्न ते विचारूं लागले. असा शहाजी होता. पण **एक गोष्ट त्याला जमली नाहीं. स्वराज्य स्थापन करणें त्याला जमलें नाहीं. तेंच शिवाजीनें केलें म्हणून तो मोठा ! हेंच त्याचें वैशिष्ट्य !** म्हणून शहाजीचा मुलगा शिवाजी असें कोणी म्हणत नाहींत, शिवाजीचा बाप शहाजी असाच उल्लेख करतात !

त्यावेळची परिस्थिति काय होती ? मोगल राजवटींतसुद्धां पूर्वीप्रमाणें शेतकरी खंड भरीत होते, बलुतेदार बलुते भरत होते. पण फरक असा झाला कीं ब्राह्मणांचा कायदा गेला, आणि काझींचा कायदा आला. हा निव्वळ धार्मिक प्रश्न नव्हता. सत्ता-बदल झाला. कर वाढले. खंड वाढत चालले. देशमुखी, पाटीलकी यांच्यासाठीं वाद सुरू झाले. कबजाचीं भांडणें मोंगलाच्या दरबारांत जाऊं लागलीं. त्यामुळें जनता कंटाळली, कबजा व कर यांतून कांहीं मार्ग निघतो कां तें ती शोधूं लागली. तुम्हांला वाटेल, हा जमिनीचा, खंडाचा प्रश्न साधा आहे, क्षुल्लक आहे. पण तो क्षुल्लक नाहीं. महत्त्वाचा आहे. कारण शेतकरी कंटाळला कीं बंड करतो ! केवळ हवा खाऊन विश्वामित्रच कांहीं दिवस जगला ! हवा खाऊन संसार करतां येत नाहीं !

मात्र हवेवर तरंगून हल्ले करीत हल्लीं राज्य करतां येतें! पुराणकाळीं राजे फार खंड घेत असत, म्हणून '⅙ खंड घेईल तो चांगला राजा' असें कालिदासानें चांगल्या राजाचें वर्णन केलें आहे. मनुस्मृतींतहि तेंच म्हटलें आहे. कारण तो प्रश्न महत्त्वाचा होता. इतिहासांत तोडरमल, मलिकंबर यांची धारापद्धती आपल्याला शिकवतात. ती कोणती होती? त्यापूर्वी प्रमाण नव्हतें. राजा म्हणाला, 'दहा मण खंड घातलाच पाहिजे.' मग घातलाच पाहिजे! मग पीक येवो न येवो! उसनें घेऊन खंड घाला-पण घातलाच पाहिजे! तोडरमल, मलिकंबर यांनीं ही पद्धत बदलली. पिकाच्या प्रमाणांत खंड घालावा हा दंडक त्यांनीं केला. दादोजी कोंडदेव यांनींहि तेंच केलें. शेतकऱ्यांना समाधान देण्याचे प्रयत्न केले. उठून गेलेल्या शेतकऱ्यांची पुनर्वसाहत केली. शिरवळांत सुबत्ता केली असा दाखला सांपडतो. अभ्यासासाठी जैमिनीसूत्र तुम्ही वाचा. जैमिनीसूत्रांत सांगितलें आहे, 'जमीन कोणाची? सगळ्यांची, खाजगी नाहीं! म्हणून ती कोणाला दान करतां येत नाहीं.' पण ही पद्धत बदलत गेली. कशी बदलली त्याचे धागेदोरे जैमिनीसूत्रावर सोळाव्या शतकापर्यंत झालेल्या टीकांमध्यें सांपडतात. खाजगी जमीन व सर्वांची जमीन असे दोन भाग पडले. कसवणुकीखालची जमीन खाजगी मालकीची व बाकी सगळ्यांची, असा बदल झाला! आणि हा वाद अजून चालू आहे. कॉंग्रेसच्या नागपूर ठरावापर्यंत तो चालू आहे!

कॉंग्रेसच्या नागपूरच्या शेती-ठरावाला विरोध करणारीही मिनू मसानी सारखी मंडळी अद्याप आहेत व लोकसभेंत ते 'सिव्हिल वॉर'ची घोषणा करतात! आतांपर्यंत कम्युनिस्टांवर हा आरोप होता. आतां हेच ती भाषा वापरूं लागले! तेव्हां हा जमिनीचा प्रश्न विशेष महत्त्वाचा असून पुराणकाळापासून आतांपर्यंत चालत आला आहे. याची तुम्ही नोंद घ्या! किंबहुना, गाईचे कळप, घोडदौड व जमीन हे पुराण काळापासून आतांपर्यंतचा इतिहास शोधण्याचे मुख्य दुवे आहेत. ते दुवे घेऊन इतिहासाचा अभ्यास करा! शिवाजीनें हाच दुवा हातीं घेतला. त्याचा दृष्टीकोन जातीय नव्हता, हिंदु-मुसलमानवादाचा नव्हता. कराने नाडलेल्या शेतकऱ्यांसाठीं त्यानें कायदे केले. "सर्व 'मोकासे' रद्द करण्यांत आले" असा त्यानें पहिला हुकुम काढला. तो सभासद बखरीमध्यें लिहिला आहे, तो वाचा. शिवाजीनें शेतकऱ्यांना संरक्षण दिलें म्हणून ते शिवाजीभोंवती—स्वराज्याभोंवती जमा झाले.

शहाजीच्या वेळीं केवळ त्यांना लुटींतला हिस्सा मिळत असे. कधीं कधीं लूटहि मिळत असे. पण शिवाजीच्या काळांत कांहीं मिळालें नाहीं तरी स्वराज्यासाठीं मावळा, मराठा, शेतकरी सगळा एक झाला व शिवाजीच्या मागें उभा राहिला. कारण शिवाजीने त्यांना संरक्षण दिलें, सुरक्षित जमीन व पीक दिलें, मूलभूत बदल घडवून आणला, त्यांच्या परिस्थितींत सुधारणा केली. पंच हजारी सरंजामदाराला शंभर होनांचें उत्पन्न ठरवून दिलें व तें त्यानें स्वराज्याच्याच कचेरींतून घेऊन जावें, स्वतः व्यक्तिशः गांवांतून वसूल करण्याचा त्याला अधिकार नाहीं, असें त्यानें फर्मान काढलें. सगळी पिळवणूक, सगळे अडते नष्ट केले. म्हणून त्याला शेतकऱ्यांनीं पाठिंबा दिला. नाहीं तरी स्वराज्य कशासाठीं असतें ? केवळ झेंडावंदनासाठीं ? मग झेंडा राहतो वर आणि झेंड्याची काठी बसते पाठींत !

शिवाजीचें स्वराज्य तसें नव्हतें. त्यानें शेतकऱ्यांना समाधान दिलें. तें खरेंखुरें स्वराज्य होतें. म्हणूनच लोक त्याला हिंदवी-स्वराज्य म्हणूं लागले !

म्हणून शिवाजीच्या कार्याचा जे जातीयवादी अर्थ लावतात ते चूक आहेत. मुसल्मानांचा बीमोड होऊन हिंदूंचें राज्य झालें असा त्याचा अर्थ नव्हे. कांहीं लोक रामदास ब्राह्मण म्हणून त्याची बाजू घेतात तर इतर कांहीं शिवाजीची मराठा म्हणून बाजू घेतात व ‘ कोणी कोणाला शिकवलें ? ’ असा वाद घालतात ! तो महत्त्वाचा नाहीं. रामदासानें लिहिलें, ‘ औरंग्या पापी बुडाला ! ’ त्यांत रामदासांचा जातीय उद्देश नव्हता. धर्म हा त्यांतील एक भाग होता. सर्वच कार्य धार्मिक नव्हे. मुसलमान झालेल्या बजाजीला शिवाजीनें चार पाण्याचे थेंब टाकून परत हिंदु धर्मांत घेतलें ! माझ्या माहितीनुसार हिंदुधर्माप्रमाणें असें करतां येत नाहीं. हिंदुधर्म हा इतरांहून निराळा आहे. त्याला एक गुरु, एक पोथी, एक कायदा नाहीं. अनेक समाजांच्या संघर्षाचें सार व समन्वय घेऊन तो बनला आहे. त्यांत बारीकसारीक व्यावहारिक नियमांपासून आध्यात्मापर्यंत सर्व कांहीं भरलें आहे. म्हणून ज्या अर्थानें हिंदु धर्माला कांहीं लोक धर्म म्हणतात त्या अर्थानें शिवाजीचें कार्य मोजतां येत नाहीं. तो धर्माधर्माचा झगडा नव्हता. मोंगली सरंजामदारांची साम्राज्यशाही व मराठी दलित जनता यांचा तो लढा होता. तो राजकीय आर्थिक सत्तेचा लढा होता. शिवाजीनें धर्म

राखला पण मराठी जनतेचें हित करणारें असें जें स्वराज्य तें स्थापन केलें.

ही झाली शिवाजीच्या कार्याची पार्श्वभूमि. मग पुढें काय? असा प्रश्न आला. शिवाजी होता आमच्या समितीसारखा! समितीशीं तुलना करून मी शिवाजीचा अपमान करत नाहीं. पण समिति देखील आज महाराष्ट्रांतील एक बलाढ्य शक्ति–शिवशक्ति बनली आहे. शिवाजीचें धोरण समितीसारखें होतें. सर्वांना सामावून घेण्याचें! त्यानें सांगितलें, 'सर्वजण स्वराज्याच्या एकींत या!' पण कांहींनी मानले नाहीं. कोणाला मंत्रिपदाची, कोणाला कशाची लालूच सुटली! त्यांनीं एकींत येण्याचें नाकारलें व विरोध केला त्यांपैकीं जावळीचे मोरे, शिर्के वगैरे. त्यांचा विरोध शिवाजीनें कापून काढला. तो म्हणाला 'स्वराज्याच्या एकींत आला नाहींत, फाटाफूट केलीत, तर कापून काढूं!' 'एकींत या, नाहींतर मरा!' तेव्हां कांहीं लोक म्हणाले, 'अरे हा शिवाजी मारकुटा आहे, हिंसक आहे, लोकशाही मानेल कीं नाहीं, शंका वाटते!' पण शिवाजीनें तिकडे दुर्लक्ष करून आपलें कार्य चालूंच ठेवलें. लोकशाहीसाठीं विरोधी पक्ष पाहिजे, (आपोझिशन पार्टी) तरच ती लोकशाही असें कांहीं म्हणतात. पण शिवाजीनें चंद्रराव मोरे, शिर्के यांची आपोझिशन पार्टी बनविली नाहीं! त्यानें स्वराज्य राखलें. आडवा आला त्याला कापून काढला. 'स्वराज्य गेलें तर बेहेत्तर पण लोकशाही टिकवा, साधनशुचिता राखा, भांडवलदार जमीनदारांनी स्वराज्य विकून खाल्लें तरी चालेल पण त्यांचे खाजगी संपत्तीचे लोकशाही हक्क राखलेच पाहिजेत' असें म्हणणाऱ्यांना शिवाजी पचणार नाहीं! त्यानें जातगोत पाहिलें नाहीं! पक्ष पाहिला नाहीं, सर्वांना सांगितलें. 'एक आघाडी करा. आपला शत्रू एक. ध्येय एक—मोंगलाना मारणें!' अशी स्वराज्यासाठीं एकीची हांक त्यानें दिली. तेव्हां सर्वजण एकींत आले आणि एकजूट भक्कम झाली!

एकदां त्यानें सर्वांना जेवायला बोलाविलें! तिथें 'शिवाजीचाच चौरंग इतरांपेक्षां उंचावर कां?' म्हणून कांहीं देशमुखांनी व सरदारांनीं तक्रार केली. ते म्हणाले 'आम्ही देशमुख, पाटील सर्व तुमच्याच जातीची घरंदाज इनामदार मंडळी! जुने आहोंत! शहाण्णव कुळीचें आहोंत! आमचा चौरंग खाली कां?' शिवाजी म्हणाला, 'हा भेद राहणार. मी राज्य लढून

मिळविलें! कुळीचें नांव सांगून नव्हे! कित्येक शूद्र होल्सातेसुद्धां राज्य करतात. उच्चासनी बसतात. पटेल तर रहा. नाहींतर चालू लागा!' असा शिवाजी होता. त्यानें धर्म राखला पण धर्मांधता आणली नाहीं! कुळांना संरक्षण दिलें पण कुळीचा बडेजाव माजवला नाहीं! स्वराज्याची एकी केली आणि प्रतिगाम्यांची फळी फोडून काढली!

स्वराज्य झाल्यावर भाषेचा प्रश्न आला. राज्यकर्ता व राज्याची भाषा हा प्रश्न जुनाच आहे! स्वराज्यांत भाषा कोणती? फारशी कीं मराठी? प्रश्न आला. शिवाजीनें कमिशनें नेमलीं नाहींत! त्यानें सांगितलें 'महाराष्ट्राची भाषा मराठी. मराठीचा कर्ता, कर्म, क्रियापद ठेवा, बाकी वाटेल तें जोडा!' 'कर्ता मी मराठी, कर्म माझें, क्रिया माझी, बाकी सर्व तुमचें!' असें सांगून वाद निकालांत काढला! मराठी ही राजभाषा केली. आज भाषेचा वाद आहे. तो मातृभाषा ठेवूनच सुटेल. बुद्धानें संस्कृत टाकून जनतेची अर्ध-मागधी, पाली घेतली. जनतेची भाषा घेणें हाच वाद सोडविण्याचा मार्ग. भाषेचा लढा हा तांत्रिक नसून जीवनाचा लढा आहे. शिवाजीनें जनतेची, जीवनाची भाषा घेतली. स्वराज्याबरोबरच स्वभाषा साधली!

अशा रीतीनें स्वराज्य, स्वराज्याची एकी, स्वराज्याच्या जनतेचें हित व स्वराज्याची भाषा घेऊन शिवाजी मराठी राज्याचा संस्थापक बनला!

पण त्याच्या राजवटींत एक कमकुवतपणा राहिला. तो कोणता? तंत्रज्ञानाचा, यंत्रसामुग्रीचा! स्वराज्य मिळवलें खरें पण स्वराज्याचें रक्षण तोफांवर अवलंबून होतें व तोफा बनवणारे इंग्रज, फरेंच! त्यांच्याशीं करार करून तो तोफा मिळवीत असे. त्यांना एक होऊं न देतां अलग अलग ठेवून यंत्रसामुग्री मिळवीत असे. दारू मिळवीत असे. असें त्याचें कौशल्य होतें! त्याकाळीं यंत्रज्ञानांत आपण मागासलेले होतों. शिवाजीनें हा कमकुवतपणा जाणला होता. कारण तो हुशार होता. (मराठा म्हणून नव्हे! सर्वच मराठ्यांना अक्कल असतेच असें नाहीं!) पण तो अक्कलवंत होता. तोफांशिवाय स्वराज्याचें संरक्षण होणार नाहीं हें त्यानें ओळखलें. संरक्षणाची योजना (डिफेन्स सिस्टिम) त्याला माहीत होती. आजच्या राज्यकर्त्यांसारखा तो नव्हता! आज आपली डिफेन्स सिस्टिम (संरक्षण योजना) आपल्यालाच

माहीत नाहीं! पण इतरांना कळते! युरोपांत त्या काळीं १६४८ मध्यें भांडवलशाही उदयाला आली होती. कारखाने होते. यंत्रें होत होतीं. तंत्रज्ञान होतें. युरोपमध्यें १७ व्या शतकांत विज्ञानाची (सायन्सची) प्रगति झाली होती. १८ व्या शतकांत तें वाढीला लागलें. शिवाजीच्या काळांत आपली त्या दृष्टीनें प्रगति नव्हती. भवानी तलवार आपली. त्या तलवारीनें स्वराज्य स्थापन केलें. पण त्या तलवारीला लागणारें पोलाद पोर्तुगीजांजवळ! दमास्कसमधलें किंवा तोलेदो (स्पेन) चें पोलाद चांगलें अशी आपल्या बाजारपेठेंत त्यावेळीं चर्चा होत असे! तोफ दुसऱ्यांच्या हातीं, स्थापत्यशास्त्र दुसऱ्यांच्या हातीं! त्यामुळें शिवाजीच्या स्वराज्यांत कमकुवतपणा आला. मागाहून महादजी शिंदेनें एक तोफांचा कारखाना काढला. पण तो दुसऱ्यांच्या मदतीनें. तो किती दिवस चालणार? म्हणून केवळ अक्कल असून चालत नाहीं. स्वराज्य टिकवायला तोफहि लागते! पण तोफेचा पाया कशांत? यंत्रसामुग्रींत. अखेर तोफेनें अकलेचा पराजय केला आणि हळूहळू आपलें स्वराज्य नष्ट झालें! हा एक कमकुवत दुवा आपण लक्षांत घेणें आवश्यक आहे, आणि तो कमकुवतपणा यापुढें राहू देतां कामा नये!

तेव्हां 'शिवकार्याचें स्वरूप' लक्षांत घेतांना स्वराज्य, स्वराज्याची एकी, स्वराज्यांतील जनतेचें हित, स्वराज्याची भाषा, स्वराज्याच्या रक्षणासाठीं यंत्र व तंत्रज्ञान, त्यासाठीं लागणारे कारखाने व या कारखान्यांची किल्ली ज्या कामगारवर्गाच्या हातीं तो कामगारवर्ग हें सर्व बरोबर घेऊन आपण पुढची वाटचाल केली पाहिजे! हेंच शिवाजीच्या शिकवणुकीचें सार आहे!

● ● ●

: २ :

प्रतापगडावर शिवछत्रपतींचें स्मारक दि. ३० नोव्हेंबरला पं. नेहरूंच्या हस्तें उघडलें जाणार आहे. शिवछत्रपतींचें स्मारक तिथें व्हावें हें सर्वांना मान्य आहे. आणि त्यासाठीं उद्घाटक म्हणून जर पं. नेहरूंसारखा पुढारी आणि पंतप्रधान मिळाला तर चांगलेंच झालें. अशा घटनेचें स्वागत सर्वांनींच करायला हवें.

पण संयुक्त महाराष्ट्र समिति आज तसें करूं शकत नाहीं. स्मारक उभारावें. त्यासाठीं नेहरूंनीं यावें. पण तें आज नको. संयुक्त महाराष्ट्राचें राज्य स्थापून मग तें व्हावें असें आमचें म्हणणें.

आज नको कां ? आज नको, नंतर करा, म्हणण्यांत कांहीं गैर आहे का ? स्वराज्य स्थापून १० वर्षें झालीं पण या १० वर्षांत महाराष्ट्रांतील कुठच्या ऐतिहासिक स्थळांची व स्मारकांची दखल घेण्यांत आली ? भारत सरकार, मुंबई सरकार व महाराष्ट्र—मुंबईची कॉंग्रेस यांनीं महाराष्ट्रांतील कोठच्या ऐतिहासिक स्थळांची, विशेषतः शिवछत्रपतींच्या स्थळांची दखल घेतली ? सहा महिन्यांपूर्वी मुंबई असेंब्लींत वा पार्लमेंटांत दिलेल्या उत्तरांत सरकारनेंच जाहीर केलें होतें कीं, शिवछत्रपतींना जेथें राज्याभिषेक झाला त्या रायगडवरील वाड्यावरचीं छप्परें पडून गेलीं आहेत व त्यांची डागडुजी केलेली नाहीं. मग या प्रतापगडावरील स्मारकाची एवढी घाई व एवढा गाजावाजा कां व तो आजच कां ?

कॉंग्रेस पुढारी म्हणतात कीं, हेंच स्मारक फेब्रुवारींत निवडणुकीच्या काळांतच उघडायचें घाटलें होतें व त्याहि वेळीं नेहरूंनाच आणायचें चाललें होतें.

पण शिवाजीचें स्मारक हा निवडणूक जिंकण्याचा डाव आहे असें लोकांना वाटेल म्हणून म्हणे नेहरूंनीं तें तहकूब करण्याचा सल्ला दिला.

असें जर आहे तर, आज तें स्मारक द्विभाषिक घट्ट करण्याचा व संयुक्त महाराष्ट्र नाकारण्याचा डाव आहे असें लोकांना वाटतें म्हणून तें आज करूं नका असें आम्ही म्हटलें तर चूक काय झालें ?

संयुक्त महाराष्ट्र कोणाला आतां टाळतां येणार नाहीं. आज ना उद्यां तो

होणारच. मग जरा थांबा; आणि तो झाल्यावरच या कीं छत्रपतींना हार घालायला. एवढे सांगूनहि ते ऐकत नाहींत, संयुक्त महाराष्ट्राची गोष्ट सुद्धां काढत नाहींत. तर मग आम्हीं त्यांच्या या महाराष्ट्रविरोधी वागण्याचा निषेध केला तर वाईट कां मानावें ?

कांहीं मंडळी म्हणतात, स्मारकाचा आणि संयुक्त महाराष्ट्राचा संबंध जोडूं नका. मग निवडणुकीचा आणि स्मारकाचा संबंध जोडून तो त्यावेळीं कां टाळला आणि आजच कां टाळीत नाहींत ? यांतच तर खरें पाणी मुरतें आहे.

एवढें खरें कीं, उद्यां सुद्धां त्या समारंभाला जाणारी बहुतांशी मंडळी संयुक्त महाराष्ट्राच्या विरुद्ध नाहींत. किंवा सरकारभक्तहि नाहींत. अनेक तर केवळ भाविकपणानेंहि जातील.

पण राज्यकर्ते कॉंग्रेस पुढारी अशाच भाविकपणाचा फायदा घेऊन बुद्धि-भ्रंश करून आपले डाव साधतात. निवडणुकीच्या वेळीं त्यांना तें फार जड गेलें असतें. म्हणून तें नेहरूंनीं टाळलें. पण आज मात्र ही सुबुद्धि त्यांना सुचली नाहीं. यालाच म्हणतात राजकीय डावपेंच. कॉंग्रेस राज्यकर्त्यांनीं शिवस्मारकाला राजकीय डाव बनविलें आहे.

एवढेंच करून ते थांबले नाहींत, तर शिवछत्रपतींचे आपणच काय ते भोक्ते, व समितीचे पुढारी त्यांचे द्वेष्टे, असाहि अपप्रचार सुरू झाला आहे. माझा त्यांत प्रत्यक्ष उल्लेख करण्यांत आला आहे असें मला कळतें. म्हणून त्याबाबत दोन शब्द लिहिणें जरूर आहे.

स्वतःबद्दल सांगायचें म्हणजे मी माझ्या शाळकरी अवस्थेपासूनच लोक-मान्य टिळक व सावरकर यांचा भक्त होतों. मी नाशिकला शिकलों तेव्हां हें वातावरण त्या शहरांत किती होतें हें सांगावयास नकोच. आणि १९१० ते १९२० च्या काळांत नाशिक-मुंबईमध्यें विद्यार्थी चळवळींत शिवजयंती, मेळे व लोकमान्यांच्या मोहिमा यांमध्यें ब्रिटिश पोलिसांचे अत्याचार मी सहन केलेले आहेत. शिवाजी दरोडेखोर होता ही इंग्रजी शिकवण आम्हांला जडली नाहीं.

पुढें जशी चळवळ वाढली, इतिहासाचें ज्ञान वाढलें तेव्हां शिवाजीच्या कर्तबगारीची जास्त चांगली जाणीव झाली. १९३५-३६ मध्यें पुण्याच्या वसंत व्याख्यानमालेंत पोतदारांच्या अध्यक्षतेखालीं मी व्याख्यान दिलें त्यावेळीं शिवछत्रपतीनें आपल्या राज्यांत शेतकरी व कारीगर यांच्याबाबत किती मूलभूत

सुधारणा केल्या व त्यांची दृष्टी किती जनताभिमुख होती हें मी सांगितलें तेव्हां माझ्यावर अनेकांनीं असे आरोप केले कीं, मी शिवाजीला समाजवादी बनविलें! मी तसें कांहीं एक केलें नसूनहि !

१९३७ मध्यें मुंबई येथें लालबागला श्री. दोंदे यांच्या अध्यक्षतेखालीं श्री. मसुरकरांच्या एका संस्थेनें शिवजयंती साजरी केली तेव्हांहि शिवाजीच्या चरित्राचा जनताभिमुख अर्थ मी मांडला. नंतर संत वाङ्मयाची चर्चा करतांना संतांना परचक्राविरुद्ध जो ' अवतार ' पाहिजे होता तो शिवछत्रपतींनें पुरविला अशी मी मांडणी केली.

हे माझें लिखाण व व्याख्यान इतकें प्रसिद्ध आहे कीं त्याचे उतारे देत बसण्याची जरुरी नाहीं. तरी पण शिवाजीच्या चरित्रांतील कांहीं गोष्टींचा उल्लेख आज करणें जरूर आहे. कारण शिवाजीचें स्मारक करायला आजची मंडळी सरसावली आहेत त्यांपैकीं कांहींनीं शिवाजीच्या जीवनांतील मूलभूत तत्त्वांना आजन्म विरोध केला आहे. शिवचरित्राचा जनताभिमुख भाग झांकून ठेवण्याचा जसा इंग्रजांनीं प्रयत्न केला तसाच त्यांच्यानंतर आलेल्यांनींहि केला. तो कोणता ?

**शिवचरित्राचें खरें सार काढलें तर त्यांतून दोन प्रमुख सूत्रें बाहेर पडतात. एक, परचक्राचा हर तऱ्हेनें विरोध करून स्वराज्य स्थापायचें आणि दुसरें, स्वराज्याचा पाया मुख्यतः कष्टाळू जनतेवर आधारून तिला अनुरूप अशा सुधारणा करून स्वराज्य संपन्न करायचें.**

शिवकालीन परचक्र म्हणजे मोंगल राज्य व दक्षिणेंतील बादशाह्या. त्या उलथून पाडणें हें पहिलें काम.

पण हें परकीय राज्य चालविणारांस अनेक स्वकीय वर्ग व घराणीं मदत करीत होतीं.

परकीयांचीं वतनें, जहागिऱ्या घेऊन महाराष्ट्रीय शेतकरी कारीगरांना लुटून गब्बर होणाऱ्या अनेक घराण्यांनीं व सरंजामदार वर्गांनीं स्वराज्याला विरोध केला होता.

आणि स्वराज्य मिळाल्यावर हीच मंडळी शिवाजीला मुजरा करायला पुढें सरसावली होती. तीनशें वर्षांनंतर हिंदुस्थानांत तोच इतिहास परत घडत आहे. इंग्रजी अमदानींतले संस्थानी व जमीनदार वर्ग हे स्वराज्य विरोधक.

त्यांच्या हातून पीडला जाणारा शेतकरी स्वतंत्र करून त्याची राजकीय तशीच आर्थिक मुक्तता करा कीं पहा हिंदुस्थान कसा संपन्न व प्रसन्न दिसेल असें आम्हीं सांगत आलों. त्याला शिवाजीचा सुद्धां हवाला दिला. पण आज शिवस्मारक करूं पाहणाऱ्या 'राजघराण्यांनीं' त्याला आजतागायत विरोध केला. एकानें सांगावें, निजामी घराणें राहिलेंच पाहिजे, दुसऱ्यानें सांगावें, जमीनदारी वतनें नष्ट केल्यानें देशाचा आर्थिक घात होईल, इत्यादि इत्यादि. आणि हीच मंडळी शिवाजीचा उदोउदो करायला पुढें येतात व आम्हांला त्याचे विरोधक म्हणतात!

हिंदुस्थानांतल्या वतनदार–जहागीरदारांनीं परचक्राला साथ दिली व जनतेला छळले. म्हणून शिवाजीनें मराठी राज्य स्थापतांच मोकासे व जहागिऱ्या रद्द केल्या आणि सैन्यानें सुद्धां गांवांमधून कांहीं वस्तू घेतल्यास तिची किंमत दिली पाहिजे असा हुकूम केला. पिकावरचा सारा मक्ता देऊन वसूल करण्याची पद्धति बंद केली. सैरावैरा फिरणारे कातकरी, वेरड जमातींना किल्ल्यावर पहाऱ्याच्या नेमणुका करून दिल्या व त्यांना शेतें देऊन त्यांच्या वसाहती केल्या. त्यामुळें त्यांना प्रामाणिकपणाचें आयुष्य घालविण्याची संधि व साधनें मिळालीं व बेकारी नष्ट झाली.

वतनदारी, मिरासदारी, मोकासे, जमीनदारी यांच्यावर शिवाजीचा कटाक्ष असण्याचें कारण त्यानें असें दिलें आहे :

"आहे वतन इतकियावर कालक्रमण करावी, सर्व देशाचा स्वामी म्हणजे राजा, त्याशीं निष्ठेनें वागावें, कोणाचा अन्याय न करावा, ही त्यांची बुद्धीच नाहीं. बळकट व्हावें व दुसऱ्याचे घ्यावे, दावे दरवडे करावे हा त्यांचा सहज हव्यास... परचक्र आलें म्हणजे वतनाच्या आशेनें आगोदर सलूख करतात, स्वतः भेटतात, तिकडील भेद इकडे, इकडील भेद तिकडे करून राज्यांत शत्रूचा प्रवेश करितात."

इंग्रजी राज्यांतसुद्धां स्वराज्याची चळवळ करणारी अनेक मंडळी परचक्राच्या विरोधी असूनहि संस्थानिक आणि जमीनदारशाहीला विरोध करायला तयार नव्हती.

अर्थातच ही मंडळी त्यावेळीं शिवाजीचे भक्त नव्हती ह्यांत नवल नाहीं.

आणि आजहि ते शिवाजीचें स्मारक करतांना शिवाजीच्या या मूलभूत

कार्याचा उल्लेख करूं इच्छित नाहींत. उलट संयुक्त महाराष्ट्राचे आमच्यासारखे अभिमानी शिवचरित्राचा हा भाग सांगूं लागले कीं त्याचा विपर्यास करतात.

शिवछत्रपतींनीं अशा मूलभूत भूमिका घेतल्या म्हणूनच अनेक नामांकित देशमुखी घराण्यांनीं ( मोरे आदींनीं ) त्यांना विरोध केला. एवढेंच नव्हे, तर त्यांच्या राज्याभिषेकाला विरोध केला. त्यांना उच्चासनावर बसण्याचा अधिकार नाहीं असें सांगून त्यांच्या मेजवानीवर बहिष्कार घालण्याची धमकी दिली त्यावेळीं " कित्येक शूद्र होत्साते राज्य करितात " ( चिटणिसी बखर ) म्हणून इतिहासाचा दाखला शिवाजीनें त्यांच्या तोडावर फेंकला आणि साध्या कष्टकरी मावळ्यांची मदत घेऊन मराठी राज्य स्थापलें.

तेव्हां कुठें ही मंडळी ताळ्यावर आली व वेदाभिषेक करायला तयार झाली.

शिवछत्रपती नुसते राज्याभिषेक करून मंत्रिमंडळाची स्तुति करीत बसले नाहींत. तावडतोब मराठी राज्य-भाषाकोश तयार करून परकीय भाषेची त्यांनीं महाराष्ट्रांतून हकालपट्टी केली. फारशी भाषेवांचून माझें कायदे-कोर्ट चालणार नाहीं अशी अडचण त्यांना भासली नाहीं. राज्य असल्यानेंच मराठी भाषा आणि संस्कृति ह्यांचा विकास झाला. नुसत्या देणग्यानीं नव्हे.

म्हणूनच हें राज्य गरीब जनतेनें आपलें म्हणून मानलें. म्हणूनच संभाजीला मारल्यावर सेनापती मेला म्हणून महाराष्ट्र रडत बसला नाहीं. तर प्रत्येक शेतकरी, मराठा, मावळांत लढत राहिला. भाऊसाहेब पडले तर पानिपतमध्यें पळापळ झाली पण संभाजी राजा पडला तरी महाराष्ट्र पडला नाहीं.

म्हणूनच शिवाजीच्या मुजऱ्याला शेतकरी फौजा जात तेव्हां लोक म्हणत,

" बिनहत्यारी लोक। कसे जाऊं महाराजांचे भेटीला।
आकड्या कोयत्या कमरेला। "

( सिंहगडचा पोवाडा )

पण स्वातंत्र्याची लढाई संपून जेव्हां सरंजामदार श्रीमंतीचा जमाना आला तेव्हां पानिपतवरच्या फौजेचें वर्णन सगनभाऊ असें करतो,

"तीस हजारी अब्दागिरी
बरोबर चाले ढिगारा
संगे झडती चौवडे
शिंगे तुतारा"

आजच्या आपल्या स्वराज्यांत आणि महाराष्ट्रांत हेंच दर्शन घडत आहे. शिवाजीचा उत्सव करणारी सरंजामदारी मंडळी चौघडे आणि ढिगारा घेऊन महाराष्ट्राच्या जनतेच्या एकमुखी मागणीविरुद्ध शिवोत्सवाला वापरूं पहात आहेत. पण आम्हीं सामान्य जनता, "बिनहत्यारी लोक" त्यांच्याच मुजऱ्याला जात आहोंत. आम्हींच त्यांचे खरे भोक्ते. आम्हांला हिणविणाऱ्यांनीं स्वतःच्या विचाराची, आचाराची, जनताविरोधी कॉंग्रेस राज्यपद्धतीची छाननी करून मग इतिहासाला विचारावें कीं, शिवस्मारक करायला आज तुम्ही खरेंच लायक आहांत का? आणि आजच्या परिस्थितींत संयुक्त महाराष्ट्र स्थापन होण्यापूर्वी तुम्हीं तें करणें योग्य आहे का?

उद्यां संयुक्त महाराष्ट्राचे तुम्ही विरोधक शिवछत्रपतींची खूप स्तुति कराल हें आम्हांला माहित आहे आणि त्या स्तुतीमध्यें पंडित नेहरू कोणाला हार जाणार नाहींत हेंहि खरें. त्या स्तुतीमध्यें आम्ही सहभागी आहोंत. तुम्ही शिवाजीला आज हार घालाल. तुम्ही आमचे रस्ते मोकळे केलेत तर उद्यां नंतर आम्हींहि छत्रपतींना हार घालूं.

पण आमचा हार संयुक्त महाराष्ट्राचें एकभाषी राज्य स्थापन करण्यासाठीं असेल तर तुमचा हार "शिवबा, हा मराठी राज्याचा हव्यास कां धरलास व आम्हांला उगाच पेंच कां निर्माण केलास?" अशा अर्धस्तुतीचा, अर्धउद्वेगाचा असेल.

म्हणून आमचें म्हणणें कीं, तुम्हीं आम्हीं सर्व एक होऊन संयुक्त महाराष्ट्र राज्याची घोषणा करूं प्रथम; आणि मग एकजुटीनें उभारूं या तें स्मारक! पण शिवबाप्रमाणें तुम्ही जनतेचें कसें ऐकणार? म्हणून आम्हीं उत्सवाला विघ्न न आणतां, तुमच्या कडेकोट बंदोबस्तांतल्या प्रतापगडाला दुरून का होईना, मुजरा करून तुमच्या द्विभाषिक जुलमाचा निषेध, शांततामय निषेध करणार आहोंत.

(दैनिक 'मराठा' ता. २७ नोव्हेंबर १९५७,) ● ● ●

# धर्मराजाचा रथ ढळला!

*कॉ. डांगे यांनीं लोकसभेंत १७ ऑगस्ट १९५९ रोजीं केरळबाबत राष्ट्रपतींच्या घोषणेवरील चर्चेच्या प्रसंगीं केलेलें भाषण*

आज आपणासमोर असलेल्या प्रश्नानें सबंध देशांत केवळ प्रचंड खळबळ माजलेली आहे एवढेंच नव्हे तर सर्व राजकीय पक्ष, सर्व हितसंबंधी, व सर्व वर्ग या सर्वांच्या मनामध्यें या प्रश्नामुळें एक प्रकारची बेचैनी पैदा झालेली आहे......

एखाद्यानें देशभर संचार करून जर वृत्तपत्रें वाचलीं व कम्युनिस्टविरोधी असणाऱ्या काँग्रेसवाल्यांची जरी त्यानें मुलाखत घेतली तरी त्याला आढळून येईल कीं, त्यांच्या व विशेषतः मध्यमवर्गाच्या मनामध्यें या प्रश्नाबाबत आज बरीचशी अस्वस्थता आहे. कांहीं मंडळींनीं जरी कम्युनिस्ट पक्षाला व कम्युनिस्टांना वाईट म्हणून दूषणें दिलीं, या देशांत राज्य करण्याचा, किंबहुना जगण्याचा देखील त्यांना अधिकार नाहीं असेही प्रलाप काढले, तरी ही कट्टर कम्युनिस्टद्वेष्टी मंडळी देखील आज या प्रश्नावर असंतुष्ट आहे. हा असंतोष निर्माण होण्याचें कारण काय? याचें कारण, प्रचंड जनविभागाला—देशांतील बहुसंख्य जनतेला—जें कांहीं घडलें तें लोकशाहीच्या संकेतास धरून घडलें नाहीं याची तीव्र जाणीव झालेली आहे......

यापूर्वींच्या हस्तक्षेपांनीं, आजच्यासारखी प्रचंड खळबळ देशभर कधींहि माजली नव्हती, मध्यमवर्ग, बुद्धिवादी, आणि काँग्रेसवादी देखील आजच्याप्रमाणें कधींहि बेचैन झालेले नव्हते. आजच्या या विशिष्ट अवस्थेचें कारण काय?

## देशांतील खळबळीचें कारण

या प्रश्नाकडे सर्वांचें लक्ष वेधण्याचें मुख्य कारण म्हणजे कम्युनिस्ट मंत्रिमंडळ व या मंत्रिमंडळानें केरळ राज्यांत निर्माण केलेली अभूतपूर्व परिस्थिति. अर्थात् याबावत केंद्र सरकारनें पहिल्यापासूनच सहाय्य करण्याची भूमिका घेतली होती ! केरळ सरकारला मदत करण्याचा तर त्यांनी खास प्रयत्न केला ! क्वचित् प्रसंगी काँग्रेसच्या खास चालीवर जाऊन मुख्य मंत्र्यांना कवटाळण्यापर्यंत त्यांनीं मजल गांठली ! नाहीं तर कोणी म्हणायचें कीं केरळमध्यें कम्युनिस्ट मंत्रिमंडळ असल्यामुळेंच त्याला मदत करण्यांत आली नाहीं !

म्हणूनच ते म्हणतात कीं, केवळ काँग्रेस पक्षाच्या हितरक्षणार्थ अगर कम्युनिस्ट पक्षाचें अहित साधण्यासाठीं हा हस्तक्षेप केलेला नसून, असाध्य परिस्थितीवर याशिवाय दुसरा इलाज नव्हता म्हणून तो करण्यांत आला...

ही गोष्ट खरी आहे काय ? माझ्या माहितीनुसार, केरळांत जें घडतें आहे तें वाईट आहे व तें चिरडून टाकलें पाहिजे अशीच गल्लीपासून दिल्लीपर्यंतच्या काँग्रेसवादी पुढाऱ्यांची पहिल्यापासून भूमिका होती. माझें म्हणणें स्पष्ट करण्यासाठीं एक दोन मुद्यांची मी या ठिकाणीं सविस्तरपणें चर्चा करतो.

पहिल्या प्रथम जेव्हां केरळ निवडणुकांचा निकाल जाहीर झाला तेव्हां सगळीकडे आश्चर्य पसरलें. ‘काय कम्युनिस्ट निवडून आले ? ते देखील बहुमतानें ? आणि राज्यांत तेच आतां मंत्रीमंडळ बनवणार ? काय भयंकर गोष्ट आहे ही ? शक्यच नाहीं ! असें कधीं घडेल काय ?’ हीच ती भावना होती.

हें आश्चर्य कशासाठीं ? कारण ‘या देशांत कम्युनिझमच्चीं पाळेमुळे रुजलेलीं नाहींत’, ‘मार्क्सवाद जुनाट ठरला आहे’, ‘मार्क्सवादी समाजवादाचा कधींहि विजय होणें शक्य नाहीं’ इत्यादि स्वकृत सत्याचे सिद्धांत त्यांच्या डोक्यांत भिनलेले होते ! निवडणुकीच्या मार्गानें बहुमत मिळवून, कम्युनिस्ट सत्तारूढ होणें ही अशक्य कोटींतील गोष्ट; आणि आमचा देश तर कम्युनिस्टांना कधींच मत देणार नाहीं; अशी कांहीं मंडळींची बालंबाल खात्री होती.

पण जें घडूं नये तें घडलें! कम्युनिस्टांना मतें मिळून विधानसभेंत बहुसंख्य जागा मिळाल्या. त्यामुळें कांहीं मंडळी आश्चर्यचकीत झाली, कांहींना धक्का बसला, कांहीं भयभीत झाले. विशेषतः कॉंग्रेस पक्ष, आणि केंद्रीय व राज्य कॉंग्रेस सरकारें यांच्यावर तर तो एक आघातच झाला!

निवडणुकीपूर्वी एका मंत्र्याची तर असें सांगण्यापर्यंत मजल गेली कीं, " जरी कम्युनिस्ट जिंकले असले तरी त्यांना मंत्रिमंडळ बनवूं दिलें जाईलच असें सांगतां येत नाहीं. " ( सभागृहांत गोंगाट ) नंतर त्याची कानउघाडणी करण्यांत आली. शेवटीं सद्भावनेचा विजय झाला. कम्युनिस्टांना, दोन जागेच्या बहुमतानें अखेर मंत्रिमंडळ बनविण्याची परवानगी देण्यांत आली. त्याचक्षणीं कॉंग्रेसच्या सरचिटणीसांनी केरळांत धांव ठोकली आणि तेथें अवघ्या तीन दिवसांत कायदा, सुव्यवस्था व जीवन धोक्यांत आल्याची आरोळी ठोकली. कम्युनिस्ट मंत्रिमंडळाच्या अवघ्या तीन दिवसाच्या कारभारांत, व या सद्गृहस्थाच्या केरळमधील अवघ्या तीन तासांच्या वास्तव्यांत त्याला तेथें कायदा व सुव्यवस्था कोसळून पडल्याचें, जीवन धोक्यांत आल्याचें दृश्य दिसलें व यासाठीं तावडतोब कांहींतरी केलें पाहिजे असें तो म्हणूं लागला. आणि याच ठिकाणीं पुढची सांखळी जोडली गेली!

## योजनाबद्ध घटना

अतिशय गुप्तपणें, योजनाबद्ध पद्धतीनें आणि नाना तऱ्हेनें ही सांखळी पुढें सांधली जात होती. तेव्हां, माझा पहिला मुद्दा असा कीं, पहिल्याप्रथम त्यांना धक्का बसला, ते भयभीत झाले. कम्युनिझम्‌संबंधीं त्यांनीं उराशीं बाळगलेले सर्व सिद्धांत कोसळून पडले. कारण आम्ही निवडणुकांद्वारें अधिकारावर आलों.

**श्री. अशोक मेहता ( मुझाफरपूर ) :** निवडणुकांद्वारें तुमचा कांटा काढतां येतो कीं नाहीं तें आम्ही पहात आहों; तो एक सिद्धांत आहे.

**कॉ. डांगे**— त्याच्याकडे मी मागाहून वळतों. निवडणुकांद्वारें आमच्यापासून तुमची कधींच सुटका होणार नाहीं. म्हणूनच तुम्हांला हस्तक्षेप पाहिजे होता! आतां कांहीं मंडळी म्हणतात कीं, आम्हीं जे केरळमध्यें निवडून आलों ते लोकांच्या इच्छेनुसार नव्हे. ते म्हणतात कीं, आम्हांला अल्पमतें मिळालीं.

माझ्यासमोर बसलेल्या सरकारी बांकावरील मंडळींना तरी देशांतील बहुमताचा पाठिंबा आहे काय ? हा माझा त्यांना सवाल आहे....

केरळमध्यें १९४७ पासून सात मंत्रिमंडळें झालीं. असें असून आम्हीच राज्यामधील अस्थिरतेला कारणीभूत झालों असें ते म्हणतात हें सत्य नाहीं. उलटपक्षी आमच्यामुळेंच राज्याला बरीचशी सुस्थिरता येऊन योग्य कारभार सुसंगतपणें चालूं लागला. गेल्या दहा वर्षांतील सात मंत्रीमंडळांपैकीं पांच काँग्रेसचीं होती व त्यांपैकीं पांच मंत्रीमंडळें भांडणामुळें गडगडली. हें आहे काँग्रेस राजवटीचें व अस्थिरतेचें चित्र. केरळमध्यें यापूर्वीं तीनचार सार्वत्रिक निवडणुका व दोनदां हस्तक्षेप झाले. त्यालासुद्धां आम्हीच कारणीभूत होतों काय ? बिलकूल नाहीं. त्याचें कारण, त्याची पार्श्वभूमि म्हणजे राज्यांतील अस्थिरतेचा पाया काँग्रेस मंत्रिमंडळानेंच प्रथम घातला. आणि म्हणूनच आमच्या राजवटींत सुद्धां मागाहून घडलेल्या सर्व गोष्टींना तेच सर्वस्वी जबाबदार आहेत.

## आम्हांला सत्तेची हांव नाहीं

गेल्या निवडणुका आम्ही लढविल्या त्यावेळची अशी परिस्थिति होती. आम्हां कम्युनिस्टांना फक्त आपल्या पक्षाचीच सत्ता पाहिजे होती का ? आम्हांला फक्त कम्युनिस्ट पक्षाचीच सत्ता पाहिजे असा आमच्यावर कांहीं मंडळी आरोप करतात. आमच्या कृतीवरुन असें दिसतें काय ? इतिहासांतील सत्य घटना तुम्हीं कां विसरतां ? खुद्द निवडणुकीमध्येंच, आम्ही प्रजासमाजवादी, क्रांतीकारक समाजवादी व इतर पक्षांना निवडणूक-आघाडी, कार्यक्रमाची एकजूट किंवा जागांसाठीं एकी करण्याचें आवाहन केलें होतें. गेल्या निवडणुकीच्या वेळीं प्रजासमाजवाद्यांनीं ३७ जागा मागितल्या होत्या आणि क्रां. समाजवादी पक्षानें १७ जागा मागितल्या होत्या आणि आम्ही दोघांशीं तडजोड करायला तयार होतों. आतां होऊं घातलेल्या नव्या काँग्रेस एकजुटींत त्यांना तितक्या तरी जागा मिळतात कां तें पाहू या. बहुधा काँग्रेस ९७ जागा बळकावून उष्टया पत्रावळी त्यांच्या वांट्याला येतील, अशा परिस्थितीचा सामना त्यांना करावा लागेल. तें कांहींही होवो; पण आम्ही केवळ आमच्या पक्षासाठींच सत्ता हातांत घेण्याचा प्रयत्न करीत नव्हतों हेंच त्यावरून सिद्ध होतें.

आम्हांला सत्तेची हांव आहे असे कांहीं मंडळी म्हणतात. परंतु निवडणुकीनंतर जेव्हां आम्हांला बहुमत मिळालें तेव्हां देखील आम्ही इतर डाव्या पक्षांना सरकार बनविण्यासाठीं एकजुटीचें पाचारण केलें नव्हते काय? कम्युनिस्ट पक्षानें घालून दिलेलें तें एक अपूर्व उदाहरण होतें.

आम्ही आमचेंच सरकार बनविण्याचा हट्ट धरला नाहीं, कारण आम्हांला खरेखुरें लोकशाही सरकार पाहिजे होतें. तसें नसतें तर आम्ही तशी हांक दिली नसती. निवडणुकीनंतर, आम्हांला बहुमत मिळाल्यावर सुद्धां आम्ही संयुक्त मंत्रिमंडळ बनविण्याची तयारी दर्शविली. परंतु या मंडळींनी आमची सूचना झिडकारली. कदाचित् त्यांचे करणें बरोबर असेल; ते आमचा मनापासून द्वेषच करतात; पण तो प्रश्न अलाहिदा. मुख्य मुद्दा हा कीं आम्ही प्रयत्न केला. त्यांनी रुकार दिला असता तर परिस्थिति फार निराळी झाली असती. संयुक्त आघाडीचें मंत्रीमंडळ बनलें असतें—कम्युनिस्ट पक्ष, प्रजासमाजवादी पक्ष, क्रां. समाजवादी पक्ष यांचे मिळून विधानसभेंत मोठें बहुमत राहिले असतें. अशा रीतीनें सत्तेवर येण्याच्या क्रियेंत, मंत्रिमंडळ बनवतांना, राज्यकारभार हांकतांना, हरेक बाबतींत आम्ही केवळ पक्ष सत्तेचीच हांव धरली नाहीं. सर्व डाव्या पक्षांचें मिळून बनलेलें असें मंत्रिमंडळच घडवण्याची आम्ही इच्छा प्रदर्शित केली. लोकशाही सरकार बनविण्याचा प्रयत्न केला. हीच त्यावेळची आमची भूमिका होती. कांहीं मंडळींच्या म्हणण्याप्रमाणें कम्युनिस्ट पक्षाचीच सर्वंकष हुकुमशाही निर्माण करण्याचा आम्ही बिलकूल प्रयत्न केला नाहीं.

## शीतयुद्धाला सुरूवात

पण जेव्हां निवडणुकींत आमच्या विरोधकांची निराशा झाली तेव्हां त्यांना प्रथम धक्का बसला; नंतर तो धक्का कसाबसा पचवून त्यांनीं आमच्याविरुद्ध शीतयुद्धाला सुरुवात केली. या मंत्रिमंडळाला शांततेने कारभार हांकू द्यायचा नाहीं असें त्यांनीं ठरवलें. ही गोष्ट त्यानंतरच्या कांहीं प्रसंगांनीं सिद्ध होते.

आपल्या अपेक्षेनुसार कम्युनिस्ट कांहीं गोष्टी करीत नाहींत याबद्दल त्यांनीं आश्चर्य व्यक्त केलें. कॉंग्रेससमोर उभें राहिलेलें हें दुसरे संकट. कम्युनिस्ट ज्याचें त्याचें राष्ट्रीयकरण करीत नाहींत, कम्युनिझममध्यें अंतर्भूत असलेला प्रचंड

कार्यक्रम अंमलांत आणीत नाहींत, हुकुमशाही लादत नाहींत, हिंसा करीत नाहींत, या सर्व गोष्टींचे त्यांना आश्चर्य वाटलें.

उलटपक्षीं आम्ही काँग्रेसचाच कार्यक्रम अंमलांत आणण्याचा प्रयत्न करतों असेंच त्यांना आढळून आलें व त्यापैकीं कांहीं लोक आम्हांला विचारूं लागले, " तुम्ही तुमच्या कम्युनिझम्‌च्या मार्गापासून ढळला नाहीं काय ? "

या देशाच्या दृष्टीनें कम्युनिझम्‌चा अर्थ काय होतो असें मला विचारायचें आहे. जमीन सुधारणा हा कम्युनिझम्‌चा मूलभूत सिद्धांत आहे. जगण्याएवढा पगार हाही कम्युनिझम्‌चा मूलभूत सिद्धांत आहे. खरें पाहूं गेल्यास जर काँग्रेसने स्वतःचाच कार्यक्रम अंमलांत आणला तर त्यांचेही स्वरूप पालटेल व देशहि आजच्याहून निराळा बनेल !

म्हणून कार्यक्रम किंवा ध्येय याबाबतचा खरा प्रश्न नाहीं. समाजवाद हें आपलें ध्येय ठरलेलेंच आहे. कार्यक्रमहि तयार आहे. नागपूर कार्यक्रमाची त्यांत भरहि पडलेली आहे. पण हें सर्व अंमलांतच येत नाहीं. इथेंच घोडें खरें पेंड खातें ! जेव्हां जमिनीवरून शेतकऱ्यांना हुसकावून लावण्यांत येतें तेव्हां त्यांची हकालपट्टी रोखण्यासाठीं मंत्री निःपक्षपातीपणें निर्धारयुक्त भूमिका घेत नाहींत व त्यामुळें शेतकऱ्यांच्या हकालपट्टीला विरोध करण्याचा चांगला कार्यक्रम केवळ कागदावर शिल्लक राहातो ! जमिनदारी नष्ट करण्याचेंच उदाहरण घ्या. कांहींहि केले तरी जमिनदार शिल्लक राहतातच. मग त्यांना तुम्ही कोणतेहि दुसरें नांव द्या ! म्हणून हा केवळ कार्यक्रम अगर ध्येय ठरवण्याचा प्रश्न नाहीं. अंमलबजावणीचाच खरा प्रश्न आहे.

तसें पाहिलें असतां काँग्रेसचा कार्यक्रम सर्व कांहीं ठीक आहे. म्हणूनच आम्ही तो अंमलांत आणण्याचें ठरविलें. काँग्रेससमोर हें आणखी एक संकट उभें राहिलें. ते त्यामुळें घाबरून गेले. कम्युनिस्ट–आणि काँग्रेसचा कार्यक्रम अंमलांत आणणार ? असा त्यांना प्रश्न पडला. वास्तविक कायदे जर योग्य रीतीनें अंमलांत आणले तर शेतकऱ्यांना फायदा होतो. संयुक्त प्रांत, बंगाल व केरळ येथील कायदे सारखेच आहेत. परंतु त्याचे परिणाम मात्र भिन्नभिन्न झाले आहेत. केरळांत जनतेला ज्या कायद्यामुळें फायदा झाला तसा इतर राज्यांतील जनतेला झाला नाहीं. कारण मंत्र्यांत फरक होता. हें उत्तर साहजिकपणें जनतेच्या मनांत तयार झालें.

काँग्रेसची मंत्रिमंडळें ही भांडवलदार-जमिनदारांची मंत्रिमंडळें बनलीं आहेत, इतरांचें तसें नाहीं. एकाच कायद्यानुसार मूलभूत फरक घडून येतात. तेच कायदे व तेच कार्यक्रम ठेवून देखील जास्त चांगल्या समाजरचनेसाठीं, मंत्री व मंत्रिमंडळें बदलून घेतां येतात, या भावनेची पकड एकदां कां जनमनावर बसली कीं मग सर्व ठिकाणच्या काँग्रेस मंत्रिमंडळांची धडगत नाहीं. तीं केव्हांच संपुष्टांत येतील. काँग्रेसच्या समोर उभें राहिलेलें हें आणखी एक संकट होतें.

प्रचलित कायद्यांची व कार्यक्रमाची अंमलबजावणी करीत असतांनाच, दलित जनतेच्या हितसंबंधांचे संरक्षण करणारे नवे कायदे अंमलांत आणणें असें दुहेरी हत्यार केरळच्या कम्युनिस्ट सरकारनें वापरलें हीच आमच्याविरुद्ध प्रमुख तक्रार होती.

## आमचें पोलिस-धोरण

काँग्रेसवाद्यांना आणखी एक भीति निर्माण झाली. राज्यसंस्थेचा मुख्य आधार पोलिस हा आहे. राज्यसंस्थेंत पोलिसांचा वापर कशासाठीं होतो? प्रचलित वर्गसंबंध कायम ठेवण्यासाठींच त्यांची शक्ति उपयोगांत येते. साहजिकच कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग यांच्याविरुद्ध व पिळणाऱ्या वर्गांच्या हितासाठींच ते नेहमी कार्यान्वित होत असतात. या प्रकरणीं पोलीस हीच निर्णायक शक्ति बनते.

उदाहणार्थ, समजा, कुळाला जमिनीवरून हुसकावून लावण्यास प्रतिबंध करणारा एक कायदा आहे. कुळ म्हणतें कीं जमीन सोडणार नाहीं. तावडतोब जमिनदार दरोग्याला फोन करतो, मग पोलीस येतात आणि त्या कुळाला जमिनीवरून हांकून लावतात. कुळ म्हणतें, कायद्याप्रमाणें जमिनीवर राहण्याचा माझा हक्क आहे. पण त्याला सांगण्यांत येतें कीं, तूं कोर्टांत जा आणि तिथें आपला हक्क सिद्ध कर! यावरून पोलीस हे श्रीमंतांची– थैलीवाल्यांचीच नेहमी बाजू घेतात हें आपणांला कळून येईल.

परंतु केरळमध्यें कम्युनिस्ट मंत्रिमंडळानें पहिल्या प्रथमच याबाबतच्या आपल्या धोरणाचें एक निवेदन जाहीर करून एक नवें पाऊल उचललें. त्या धोरणाचें आम्ही आजहि समर्थन करतों व यापुढेंहि करूं. ते धोरण म्हणजे—

पोलीस मालकांची बाजू घेऊन संपामध्यें कधींहि ढवळाढवळ करणार नाहींत, जमीनदारांची बाजू घेऊन शेतकऱ्यांच्या प्रश्नांत कधीहि हस्तक्षेप करणार नाहींत व दलित जनतेची पिळणूक करणाऱ्या वर्गाच्या हातांतील बाहुलें म्हणून त्यांचा उपयोग होणार नाहीं. हा जाहीरनामा योग्यच होता व अशा तऱ्हेचेंच धोरण इतर मंत्र्यांनी व मंत्रिमंडळांनी घेतल्यास मी त्यांचे अभिनंदन करीन. पण ते असें धोरण घेणार नाहींत. संपाची जरा कुठें चाहुल लागतांच ते याहून निराळी उपाययोजना करतात. पंतप्रधानांसमोर मागण्या ठेवून कामगार प्रतिनिधी एकीकडे वाटाघाटी करत असतांनाच दुसरीकडे दिल्लीच्या भंगी कॉलनींत कामगारांवर पोलीसांकरवी गोळीबार चालू होता! कॉंग्रेस कशा तऱ्हेनें राज्य करते याचा हा एक नमुना आहे. आम्हांला तसें करावयाचें नाहीं...

आपण म्हणाल कीं, जर कामगारांविरुद्ध पोलीस वापरले नाहींत तर सुरक्षितता कशी नांदेल?

मग मी विचारतों, तुमची सुरक्षितता कोणासाठीं आहे? तुम्ही को ला संरक्षण देऊं इच्छितां? कामगारांना चिरडणाऱ्या भांडवलदारांना? आम्ही त्यांना तसें संरक्षण देऊं इच्छित नाहीं. तो मक्ता कॉंग्रेस सरकारनें स्वतःसाठीं राखून ठेवला आहे!

अर्थात्, पोलीसांना निष्प्रभ करून सर्व गुन्हेगारीला मोकाट रान सोडणें असा त्याचा मुळींच अर्थ नव्हे. मुख्य प्रश्न आहे तो असा कीं, वर्गसंबंध व लढे याबाबत पोलीसांची भूमिका कशी असावी.

तेव्हां, महाराज, आमच्याविरुद्ध असणारा हा आणखी एक घुस्सा! म्हणून काय आम्ही आमच्या या धोरणाला सोडचिठ्ठी द्यावी काय? आम्ही आमच्या या धोरणापासून कधींहि माघार घेणार नाहीं.

## खरी लोकशाही कशाला म्हणतात?

त्यानंतर कामगार, शेतकरी, जेव्हां आपल्या मागण्या मागूं लागल्याचें दृश्य त्यांना दिसलें तेव्हां कम्युनिस्ट आपल्या पक्षबाजीसाठीं या मागण्यांचा घोष उठवित आहेत असा त्यांनीं आमच्यावर आरोप केला.

आमच्या कारकिर्दींत, मळे कामगारांना पगारवाढ मिळाली, काथ्या-कामगारांचा पगार वाढला, एकूण १८ धंद्यांतील कामगारांसाठीं किमान-वेतन

कायदा लागू झाला. बेकारीला आळा घालण्यासाठीं आम्ही काथ्याच्या धंद्याची पुनर्रचना केली. या सर्व गोष्टींची आम्ही अंमलबजावणी केल्यामुळें साहजिकच कम्युनिस्ट मंत्रिमंडळाला त्याचें श्रेय मिळालें. यांत आमचा काय दोष? आणि तर्कबुद्धीला थोडासा ताण दिल्यास त्याचें श्रेय पर्यायानें ए. आय. टी. यू. सी. लाहि मिळालें हेंहि आपल्या लक्षांत येईलच!

किमान वेतन कायदा लागू करणें, कुळांची जमिनीवरून हकालपट्टी करण्याला प्रतिबंध करणारा कायदा अमलांत आणणें, नवें पोलीस धोरण—हा आमच्या सर्व कार्यक्रमाचा गाभा होता. हा कार्यक्रम जनताविरोधी होता काय? हा कार्यक्रम लोकशाहीविरोधी होता काय? या कार्यक्रमानें लोकशाही कशी धोक्यांत आली असती? या गोष्टी मला समजूं शकत नाहींत. आम्ही लोकशाहीविरोधी वर्तन करीत होतों काय? मुळींच नाहीं. उलटपक्षीं या कार्यक्रमानें आम्ही प्रत्यक्षांत लोकशाहीचे रक्षण करून तिला बळकटच करीत होतों. आणि या देशांतील लोकशाही जर खऱ्या अर्थानें लोकशाही बनवायची असेल तर ती श्रमिकांचीच लोकशाही असली पाहिजे. पिळले जाणारे व पिळणारे या दोघांचीहि लोकशाही—निःपक्षपाती लोकशाही—असूंच शकत नाहीं. प्रत्यक्षांत या लोकशाहींत, श्रीमंत गबर होतात व देशाला मन मानेल तसा खड्डयांत लोटतात, आणि पुन्हां वर लोकशाहीचे पाईक म्हणून मिरवतात ते वेगळेच! महाराज, लोकशाही सर्वांसाठी आहे ही गोष्ट खरी, पण ती कशासाठीं आहे? जबर पिळवणूक करून देशाचे धिंडवडे काढणाऱ्यांसाठीं नव्हे! नाहीं, महाराज, याला लोकशाही म्हणत नाहींत!

आमच्या कार्यक्रमाला जरी कोणी पक्षपाती म्हणून दूषण दिलें तरी त्याच कार्यक्रमानुसार आम्ही प्रत्यक्षांत अर्थव्यवस्थेचे—आमच्या देशाच्या अर्थव्यवस्थेचेंच—संरक्षण करीत होतों. आम्ही पिळल्या जाणाऱ्यांचें-गोर-गरिबांचेंच संरक्षण करीत होतों. म्हणूनच आमच्याविरुद्ध जो उठाव झाला तो साहजिकपणें बँकवाले, मळेवाले, जमिनदार आणि त्यांचे सोयरे यांचाच उठाव होता. त्यांनींच आमच्याविरुद्ध हा कट रचून तो अंमलांत आणला. अशा रीतीनें या कटाच्या मागें एक विशिष्ट हेतू होता. तो कोणता? कम्युनिस्ट पक्षाला नामशेष करण्याचा? बिलकूल नव्हे. हा प्रश्न खऱ्या अर्थानें अफाट

जनतेचा आहे. आणि ही अफाट जनता म्हणजेच खरें राष्ट्र होय. जनता म्हणजे काय? लोकशाही जनता कोणाला म्हणावें? याचीच व्याख्या केरळमध्यें ठरत होती. आणि ज्यांची पिळवणूक होते तीच जनता अशी व्याख्या आम्हीं केली, व राष्ट्राचें संरक्षण करणें म्हणजे या जनतेचें संरक्षण करणें असें आम्हीं ठरवलें. राष्ट्राच्या नांवाखालीं, भांडवलदार व जमिनदार यांना सत्तेवर ताबा ठेवण्याची व श्रमिकांच्या कष्टाचा सर्व मलिदा खाण्याची जर तुम्ही मुभा दिलीत तर 'कष्ट करा' ही तुमची नेहमीची घोषणा निरर्थक ठरेल. मग लोकशाही कुठें राहणार? मग समृद्धता कशी आणणार?

आम्ही शिक्षण विधेयक आणलें, शेती संबंधविषयक विधेयक आणलें, शेवटीं शेवटीं आम्ही औद्योगिकसंबंधविषयक विधेयक आणलें. शिक्षण विधेयकाच्या विरुद्ध कांहीं मंडळीचा रोष व प्रचार होता हें मी जाणतों. तसेंच आम्ही मंजूर केलेल्या शेतीसंबंधविषयक विधेयकाच्या विरुद्धही कांहीं कांहीं मंडळी होती हें आम्हांला माहीत आहे. परंतु आपला असंतोष त्यांनी कोणत्या मार्गानीं व्यक्त केला?

## केंद्राची भूमिका

केंद्र सरकार, काँग्रेस पक्ष आणि इतर मंडळींनीं हा असंतोष संघटित करून व त्याला विशिष्ट वळण लावून काय साधलें? हाच खरा प्रश्न आहे.

आणि माझी खात्री आहे कीं मुंबई अगर बंगाल राज्यांतील जनतेला याच मार्गानें आपला असंतोष व्यक्त करायला गृहमंत्री कधीहि कबुली देणार नाहींत! कारण केरळमध्यें त्यांनीं संघटित केलेल्या वर्गानी प्रस्थापित सरकारविरुद्ध उघड बंड करण्याची हांक देऊन तशी चळवळ संघटीत केली. पंतप्रधानांच्या म्हणण्यानुसार केरळमध्यें त्यांनी फक्त लाक्षणिक निदर्शनें करण्याची परवानगी दिली होती. पण त्या लाक्षणिक निदर्शनांचें रूपांतर प्रचंड चळवळींत झालें, नंतर ती चळवळ हिंसक बनली, त्यांतून बसगाड्या जाळल्या गेल्या, हळूहळू त्यांतूनच त्रिवेंद्रम्‌मधील कलेक्टर कचेरीवर हल्ले होऊन झेंडे फडकवण्यापर्यंत मजल गेली. आणि अखेरीस त्यांतूनच त्रिवेंद्रम्‌ला मोर्चा नेऊन सचिवालय ताब्यांत घेण्याची, राज्ययंत्र खिळखिळे करण्याची धमकी देण्यांत आली. हें सर्व काय होतें? ही उघड उघड

बंडाची चिथावणी देऊन जबरदस्तीनें सरकार उलथून पाडण्याचीच घोषणा नव्हती काय ?

असाच हक्क संयुक्त महाराष्ट्र समितीला देण्यांत येईल काय ? कॉंग्रेसपेक्षां समितीला महाराष्ट्रांत सहा लाख मतें जास्त मिळाली. ज्याला आपण 'जनतेचा उठाव,' 'लोकक्षोभ' जें जें कांहीं म्हणतां त्या त्या सर्वांचा सर्वोत्कृष्ट नमुना समितीनें तुमच्या समोर उभा केला होता. परंतु त्यावेळीं–त्या ठिकाणीं मात्र आम्हांला बजावण्यांत आलें–खुद्द पंतप्रधानांनीं सांगितलें, "स्वराज्यामध्यें प्रत्यक्ष प्रतिकाराचा लढा व सत्याग्रह यांना बिलकूल स्थान नाहीं. तसें करणें ब्रिटिशांच्या कारकिर्दीत योग्य व पवित्र होतें. पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर या गोष्टी करणें चुकीचें आहे." आतां ते सिद्धांत बदलले आहेत ही चांगली गोष्ट आहे !

केरळच्या बाबतींत मात्र ते सर्व सिद्धांत वाऱ्यावर उडवून लावण्यांत आले. कारण केरळमध्यें कम्युनिस्ट सरकार होते ना ! म्हणूनच प्रत्यक्ष प्रतिकाराच्या लढ्याला मंजुरी मिळाली. त्रिवेंद्रम्‌मधील चढाईला मंजुरी मिळाली, सचिवालय कबजांत घेण्याची मंजुरी मिळाली, — साऱ्या बंडाला मंजुरी मिळाली !

( एक सामान्य सभासद :- 'नाहीं. नाहीं.' )

ते म्हणतात कीं आमची त्याला संमति नव्हती. पण त्यांत देखील एक मेख आहे. या जबाबदारीचा प्रश्न आला कीं कॉंग्रेसपैकीं कांहींजण म्हणत, आम्ही कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाचे सभासद नाहीं व बोर्डानें काय केलें हें आम्हांला माहीत नाहीं. केरळ कॉंग्रेसचे श्री. शंकर यांना अशी चळवळ करण्याची परवानगी कशी देण्यात आली असा जेव्हां प्रश्न उपस्थित झाला तेव्हां ती ढेबरभाईंनी ठराव करून दिली होती हें उघड झालें. पण त्या ठरावाची न दुरुस्ती केलेली कॉपी शंकरना मिळाली व दुरुस्त ठराव आपल्या खिशांतच राहिला असें सांगून ढेबरभाई मोकळे झाले ! आणि म्हणूनच त्रिवेंद्रममध्यें त्यानंतर न दुरुस्त केलेल्या चढाईचें प्रात्यक्षिक घडलें !

( श्री. सी. के. नायर ( दिल्ली प्रदेश ) : मालकाला जर कोणताच हक्क नसला तर त्याला असुरक्षितता वाटणार नाहीं काय ? त्यानें मग काय करावें ? ( सभागृहांत गोंगाट ) )

**कॉ. डांगे :** असुरक्षितता निर्माण झाल्यावर जनतेला संरक्षण देण्याचा सर्वोत्कृष्ट मार्ग म्हणजे बस--गाड्या जाळणें ! असुरक्षितता निर्माण झाल्यावर जनतेला संरक्षण देण्याचा उत्तम मार्ग म्हणजे विद्यार्थ्यांना शाळेंत नेऊन शिक्षण देणें नव्हे, तर त्यांना शाळांतून रस्त्यावर आणणें ! देशांत सुरक्षितता ठेवण्याचा हाच कॉंग्रेसप्रणीत मार्ग आहे !

## वाटाघाटीस नकार

आतां याच प्रश्नाची आपण जरा चर्चा करूं. आम्ही कायदे करून ते अंमलांत आणले. तुम्हांला ते मान्य नव्हते. त्यामुळें दोघांत मतभेद निर्माण झाले. हे मतभेद कसे मिटवणार ? आमच्या मंत्रिमंडळानें सांगितलें, " आपले कांहीं आरोप आहेत काय ? असल्यास त्यांची आपण चौकशी करूंया. आपल्या कांहीं मागण्या आहेत काय ? असल्यास आपण एकत्र टेबलावर बसूं या, बैठक घेऊन मार्ग काढूं या ! "

पण, ज्या आमच्या मित्रांनीं ब्रिटिशांबरोबर देखील गोलमेज परिषदा केल्या त्यांनीं आमच्या केरळ सरकारशीं मात्र वाटाघाटी करण्याचें नाकारलें ! मग आम्ही तर त्यांचे भाऊबंदच होतों. ब्रिटिशांबरोबर वाटाघाटी करण्यासाठीं त्यांनीं गुडघे झिजवले--पण आमच्या सारख्या पामरांशीं मात्र—वाटाघाटी बंद ! त्यांच्या दृष्टीनें आम्ही एवढे अस्पृश्य बनलों आहोंत कीं आमच्याशीं एकत्र टेबलावर बसायला देखील ते तयार नाहींत ! बाहेरच्या जगाशीं वाटाघाटी करायचा ते आग्रह धरतात पण आपल्या देशांत वाटाघाटीचा प्रश्न येतांच मात्र ते बहिरे बनतात ! या ठिकाणीं दररोज आमचे मजूरमंत्री आमच्या कानीं-कपाळीं ओरडत असतात—' तंट्यामध्यें वाटाघाटी करा, पण संपावर जाऊं नका. मतभेद वाटाघाटीनें मिटवा, पण संप करू नका. मतभेद मिटवण्यासाठीं लवाद स्वीकारा, पण संपावर जाऊं नका. '

पण केरळ मंत्रिमंडळाचा प्रश्न येतांच मात्र वाटाघाटीच्या या सर्व घोषणा बंद करण्यांत आल्या ! त्यांना सपशेल तिलांजली देण्यांत आली ! कारण ? मिळेल त्या मार्गानें त्यांना आमचे मंत्रिमंडळ बरखास्त करावयाचें होतें ! एकत्र बसून वाटाघाटी केल्या तर मार्ग निघतो आणि मार्ग निघाला तर तडजोड होते आणि तडजोड झाली तर मंत्रिमंडळ रहातें आणि मग

त्यांच्या नावडत्या मंत्रिमंडळाचे कार्य पुन्हां चालू होतें. नेमकें हेंच त्यांना नको होतें. म्हणूनच त्यांनीं वाटाघाटी नाकारल्या. कारण आमचे मंत्रिमंडळ उडवून लावणें हाच त्यांचा हेतू होता! आम्ही स्वतः होऊन पंतप्रधानांना केरळमध्यें येण्याचें निमंत्रण दिलें. त्यांच्या केरळभेटीला आम्ही डरत नव्हतों.

त्यांनीं काय निष्कर्ष काढला? केरळच्या चळवळीला कांहीं प्रमाणांत उन्माद चढल्याचें त्यांनीं सांगितलें. आणखी कोणता निष्कर्ष काढला? या उन्मादाला शरण जा! मंत्रिमंडळ बरखास्त करा! याला राजकारण म्हणतात काय? हीच लोकशाही आहे काय? निवडून आलेल्या विधानसभेबद्दल आदर दाखविण्याचा हाच मार्ग आहे काय?

लोकनेता या नात्यानें त्यांचे काय कर्तव्य होतें? राष्ट्रनेता म्हणून, पंतप्रधान म्हणून, काँग्रेस पुढारी म्हणून त्यांनीं काय करायला पाहिजे होतें? 'सबंध केरळ दोन शत्रु पक्षांत विभागला गेला असून त्यांच्यामध्यें कोणत्याहि तऱ्हेचे संबंध शिल्लक राहिलेले नाहींत', एवढेंच आपलें मत देऊन ते स्वस्थ बसले. मग आम्ही तुम्हांला कशासाठीं बोलावलें होतें? त्या दोहोंमध्यें दुवा सांधण्यासाठींच ना? पण त्यांनीं हा दुवा सांधून देण्याचें नाकारलें! आणि अखेर त्यांनी काय केलें? हे दोन्ही विभाग त्यांनी तसेच अलग ठेवले, त्यांपैकी एकाला चिरडून टाकला आणि दुसऱ्याला चढवला!

जर पंतप्रधानांनी केरळमधील आपल्या लोकांना वाटाघाटीसाठीं एकत्र बसण्याचा आदेश दिला असता तर काँग्रेसवाले, खिश्चन मिशनरी आणि इतरांना तो धुडकावून लावण्याची हिंमत होती काय? आमच्यावर ते जसे तुटून पडतात त्याच्या दहाव्या हिश्श्यानें जरी त्यांच्यावर तुटून पडले असते तर ते सगळे वाटाघाटीला तयार झाले असते.

परंतु त्यांनी तें केलें नाहीं. कारण केरळच्या उन्मादानें ते सुद्धां सर्वस्वी भारले गेले! 'जनता उठावा'च्या विशिष्ट कल्पनेने ते देखील झपाटले गेले! आणि अशा रीतीनें भारावून गेल्यामुळें तडजोड घडवून आणण्यासाठीं दुवा म्हणून कार्य करण्याचें त्यांनी नाकारलें, कायद्यांना दुरुस्ती सुचवून मार्ग काढण्याचें नाकारलें; कोणतीहि उपाय योजना न सुचवतां चौकशी कमिटी प्रस्थापित करण्याचे नाकारलें. या सर्व गोष्टी नाकारून ते म्हणाले, "तुम्ही राजिनामा द्या अगर फेरनिवडणुकीला तोंड द्या!"

फेरनिवडणुका ? आणि त्या कशासाठीं ? कोणीतरी मला विचारलें, " फेरनिवडणुका ही लोकशाही उपाययोजना नव्हे काय ? मग ती तुम्ही कां स्वीकारली नाहींत ? " ही उपाययोजना राष्ट्रव्यापी असती अगर घटनेमध्यें मतदारांना अमान्य असलेल्या लोकप्रतिनिधींना परत बोलावण्याचा जर अधिकार असता तर सर्वप्रथम आम्हींच तो मान्य केला असता व पाळला असता. पण सगळ्याआधीं केरळ मंत्रिमंडळावरच हें बंधन कां ? बंगालमध्यें सरकारचें दिवाळखोर अन्नधोरण बाहेर आल्यावर व त्याच्या निषेधार्थ एका मंत्र्यानें राजिनामा देऊन, फेरनिवडणुकींत काँग्रेस उमेदवाराचा पराभव करून तो पुन्हां निवडून आल्यावर, हेंच बंधन त्या सरकारला कां लागू केलें नाहीं ? तेथील अन्नमंत्र्यांना राजिनामा देण्यास कां भाग पाडण्यांत आलें नाहीं ? मी सगळ्या मंत्रिमंडळाच्या राजिनाम्याबद्दल बोलत नाहीं, पण निदान अन्नमंत्र्यांचें लांचलुचपतखोर अन्नधोरण सिद्ध झाल्यावर व ज्यानें हा आरोप केला तो मनुष्य निवडणुकींत पुन्हां निवडून आल्यानंतर तरी तेथील अन्नमंत्र्यानें राजिनामा द्यायला नको कां ? पण त्याबाबत मात्र अद्याप कोणतेंच पाऊल उचलण्यांत आलेलें नाहीं !

## ही लोकशाही कीं हुकुमशाही ?

काँग्रेस राजवट असलेल्या इतर प्रांतांचीं उदाहरणें देण्याची मला आवश्यकता वाटत नाहीं. कारण विरोधी पक्षाच्या एका सभासदानें ' जर एखाद्या राज्यांत असुरक्षितता वसत असेल व त्या ठिकाणचें मंत्रिमंडळ दुसऱ्या पक्षाचें असेल तर तें बरखास्त करा अगर फेरनिवडणुका घ्या ' असा सवंग सल्ला आपल्या निवेदनांत देऊन ठेवलेलाच आहे ! उत्तर प्रदेशांतील ९६ किंवा ९८ फुटीर काँग्रेस आमदारांचे काय आरोप आहेत ? ते म्हणतात की, राज्यांत असुरक्षितता निर्माण झाली आहे आणि संपूर्ण काँग्रेस पक्षासाठीं म्हणून नव्हे तर काँग्रेसमधल्या एका गटाच्या स्वार्थासाठीं सरकार चालवले जात आहे.

उत्तर प्रदेश, बंगाल व इतर ठिकाणीं ज्यांच्या पायाखालीं सतत आग जळत आहे त्यांनी त्याच गोष्टीसाठीं आम्हांला दोष देणे म्हणजे उर्मटपणाचा उच्चांक आहे ! आणि तो काँग्रेसवालेच करूं जाणोत ! यावरून त्यांना लोकशाही, सुव्यवस्था, पावित्र्य या सर्वाबद्दल काडीचेहि सोयरसुतक नसून केवळ कम्युनिस्ट

मंत्रिमंडळाच्या दीर्घ द्वेषानें व त्यांच्यापासून लवकर एकदां सुटका करून घेण्याच्या एकमेव इच्छेने त्यांनीं या सर्व कारवाया केल्या हेंच सिद्ध होतें. हीच जर त्यांची लोकशाहीची व्याख्या असेल तर मग हुकुमशाही म्हणजे तरी काय तें मला समजूं शकत नाहीं !

**अध्यक्ष :** सन्माननीय सभासदांचा वेळ संपला आहे.

**कॉ. डांगे :** मला इशारा देण्यांत आला आहे तेव्हां मी आपल्या भूमिकेचें सार थोडक्यांत सांगतों.

या ठिकाणीं आम्ही लोकशाही मोडली किंवा नाहीं हा प्रश्न नाहीं. आम्ही कायद्याचा भंग केला किंवा नाहीं हा प्रश्न नाहीं. हा कैदी सोडला कीं तो, हा देखील प्रश्न नाहीं. मुद्दा असा आहे कीं, आमच्याविरोधी हा कट सर्व बाजूंनीं व विशिष्ट पद्धतीनें शिजत होता. " कम्युनिस्ट कधींच निवडून येणार नाहीत, असें म्हणतां म्हणतां ते निवडून आले. आतां आमची सत्तेची परंपरागत वतनदारी नष्ट झाली. ते जर असेच सतत निवडून येत राहिले तर मग ही सांथ किंवा रोग पसरत जाईल " ही त्यांची पहिली भावना. ' बरें, निवडून आल्यानंतर ते घटनेप्रमाणें राज्य हांकतात ' हा त्यांना मिळालेला आश्चर्याचा दुसरा धक्का. त्यानंतर ' हे सरकार चांगले आहे व चांगल्या गोष्टी करतें ' , हा तिसरा धक्का. " आणि एवढेंहि करून पुन्हां ते, ( वास्तविक काँग्रेस मंत्रिमंडळांनी अंमलांत आणावयाचा ) काँग्रेसचाच कार्यक्रम अंमलांत आणतात, काँग्रेसचेच कायदे जारी करतात, काँग्रेसचीच घटना राबवतात, ( ही त्यांची सर्वांत मोठी डोकेदुखी ! ) आणि असें होत राहिलें तर इतर राज्यांतील काँग्रेस राजवटींना तें एक आव्हान ठरेल. मग काय करा ? तें मंत्रिमंडळ उडवून लावा ! " असें हें या कटाचे सारें सूत्र होतें !

## बडतर्फीचा संघटित कट !

केरळ कम्युनिस्ट मंत्रिमंडळाची बडतर्फी हा एक संघटित कट होता. एवढेंच नव्हे तर त्याला वरून आशीर्वादहि होता. मग त्याच्या पितृत्वाची जबाबदारी कोणी स्वीकारो किंवा नाकारो, तो या ठिकाणीं मुद्दा नाहीं. साकल्यानें विचार केल्यास त्याला वरिष्ठांची फूस होती. सर्वसाधारणपणें त्याची जबाबदारी कोणीच नाकारीत नाहीं. एकंदरीत, तो हाणून पाडण्याचे प्रयत्न झाले नाहींत.

अगर महत्त्वाच्या काँग्रेसमंत्र्यांनी किंवा पुढाऱ्यांनी केरळमध्यें जाऊन तो थांबवण्याचे सुतराम् प्रयत्न केले नाहींत. उलटपक्षीं काँग्रेसमधील महत्त्वाच्या व्यक्तींनी त्याला पाठिंबा दिला. या सर्व गोष्टीवरून तो कम्युनिस्ट मंत्रिमंडळाविरुद्ध कटच होता हें उघड दिसतें. आणि दुःखाची गोष्ट म्हणजे तो कट अखेर यशस्वी झाला. हा केवळ जनहितासाठीं राबणाऱ्या कम्युनिस्ट मंत्रिमंडळाचा नव्हे तर लोकशाही मूल्यांचा बळी घेण्यांत आला आहे !

## धर्मराज देखील घसरला !

आणि या सर्व प्रकरणीं पंतप्रधानांवरील जनतेच्या विश्वासास तडा गेला आहे. मला या ठिकाणीं पुराणांतील एका गोष्टीची आठवण होते. कदाचित् ती या ठिकाणीं तंतोतंत लागू पडत नसेलहि. पण आपणा सर्वांना महाभारतांतील ही गोष्ट माहीत आहे कीं, धर्मराजाचा रथ इतरांप्रमाणें जमिनीला न टेकतां चार अंगुळे जमिनीपासून वर चालत असे. कारण तो सत्यवचनी होता. तो कधींहि खोटें बोलत नसे. परंतु एकदां तो युद्धांत घसरला. त्याला विचारण्यांत आलें कीं, अश्वत्थामा मेला कीं जिवंत आहे ? तेव्हां अश्वत्थामा जिवंत आहे हें माहीत असून देखील तो म्हणाला, ‘ नरो वा कुंजरो वा ’ ! आणि त्याचक्षणीं त्याचा रथ जमिनीला टेकला ! अखेर धर्मराज इतर मर्त्यांच्या पंक्तीला येऊन बसला !

केरळच्या बाबतींत आमच्या पंतप्रधानांची तीच गत झाली. ते बावरून म्हणाले, “ मला निश्चित कांहींच कळत नाहीं. त्या ठिकाणीं दोन तट आहेत. तेहि बरोबर असतील, हेहि कदाचित् बरोबर असतील ! ” आणि त्याचक्षणीं त्यांचाहि रथ जमिनीला टेकून ते इतरांच्या जोडीला येऊन बसले ! पण त्यामुळें देशाचा फायदा न होतां उलट नुकसानच झालें आहे. त्यांचे व्यक्तिमत्व डागाळलें आहे. आणि हेंच लोकशाहीचें सर्वांत मोठें नुकसान आहे. कारण ज्याच्यावर विश्वास टाकावा अशी कोणीहि दुसरी व्यक्ति आतां जनतेच्या नजरेसमोर नाहीं. इतरांना आम्ही चांगलेच ओळखतों. त्यांची लोकशाही, त्यांच्या कारवाया —त्यांचे सर्व कांहीं आम्ही जाणून आहोंत !

मी मुंबईतून निवडून आल्यामुळें मला समितीचा अनुभव आहे. काँग्रेसवाल्यांची अहिंसा आम्ही चाखली आहे, त्यांचे सत्य आणि सर्व कांहीं आमच्या वांट्याला पुरेपूर येऊन चुकलें आहे !

पण, राष्ट्रीय दृष्ट्या व आंतरराष्ट्रीय दृष्ट्या, अखिल भारताचें प्रतिनिधित्व करणारी आमच्या मतें एकच व्यक्ति शिल्लक होती. आणि आजच्या आणी-बाणीच्या क्षणीं—ज्या क्षणीं निःपक्षपातीपणाची गरज होती, ज्या क्षणीं जनतेच्या बाजूनें उभे राहण्याची गरज होती, ज्या क्षणीं कम्युनिस्ट असले तरी त्या मंत्रिमंडळाची बाजू घेण्याची गरज होती—नेमक्या त्याचक्षणीं ती व्यक्ति कम्युनिस्टविरोधाच्या क्षुद्र संकुचित भावनेला बळी पडली ! मार्क्स कालातीत ठरला असला तरी त्याच्या आत्म्याने या व्यक्तीला झपाटलें आहे ! मार्क्स थडग्यांतून उठला आणि केरळांत प्रगट झाला ! अर्थात्च त्याचें पुन्हां दफन करणें प्राप्तच होतें ! !

म्हणूनच अखेर, आज घटनेहून बंदूक वरचढ ठरली आहे. घटनेचें काय होणार तें कळत नाहीं. प्रमुख व्यक्तीच घसरल्यामुळें लोकशाही धोक्यांत आली आहे. त्याचबरोबर देशाचेंहि अपरमित नुकसान झालें आहे. कारण घटना, लोकशाही, निःपक्षपातीपणा, पिळणुकीसाठीं पोलिसांचा वापर न करणें-इत्यादि साऱ्या साऱ्या पुरोगामी गोष्टींचा पराभव झालेला आहे.

परंतु हा पराभव म्हणजे अखेर नव्हे. कारण आज जरी केंद्र सरकारनें हस्तक्षेप केला तरी अखेरचा हस्तक्षेप जनताच करील !

● ● ●

# आमची परंपरा

*कॉ. डांगे यांच्या ६० व्या वाढदिवसानिमित्त रविवार ता. २५ ऑक्टोबर १९५९ रोजीं मुंबईच्या नागरिकांतर्फे त्यांचा अभूतपूर्व असा सत्कार शिवाजी पार्कवर झाला. या प्रसंगीं कॉ. डांगे यांनीं उत्तरादाखल केलेलें भाषण*

अध्यक्ष महाराज आणि बंधू भगिनींनो,

कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग, विद्यार्थी या सगळ्यांनीं इथें येऊन माझा सत्कार केला याबद्दल नुसते औपचारिक अभार मानणें हें कांहीं फारसें शोभत नाहीं म्हणून मी आभार मानीत नाहीं.

सगळ्यानीं इथें माझ्या सद्‌गुणांचें इतकें वर्णन केलें आहे कीं मला आणखी कोणीतरी माणूस शोधावा लागेल कीं जो माझ्या दुर्गुणांची यादी लिहून देईल. अर्थात असा मनुष्य मिळणें कांहीं कठीण आहे असें नाहीं. तोहि सद्‌गुण माझ्यामध्यें आहे कीं अशा माणसाला मी स्फूर्ति देऊं शकतो. असा माणूस इथें हजर नाहीं त्यामुळें या समारंभामध्यें थोडीशी चूक राहिली आहे असें मला वाटतें. कारण तत्त्वज्ञानाच्या दृष्टीनें पाहिलें तर गुणांच्याबरोबर दुर्गुणहि सांगावेत अशी आपल्या जुन्या संस्कृतीमध्यें परंपरा आहे. आणि ती परंपरा राखणें हें कम्युनिस्ट पार्टीचें आणि कम्युनिझमचें तत्त्व आहे. दुसरी परंपरा म्हणजे सद्‌गुणांबरोबर दुर्गुण ऐकून घेणें आणि त्याप्रमाणें विचार करणें, सुधारणा करणें. हा जुन्या संस्कृतीचा नियम आणि तो नवीन कम्युनिस्ट पार्टी-मध्यें कसा याचें साधें उदाहरण सांगतो. जर चुकलें असेल तर मनुष्यानें पश्चात्ताप करावा. कम्युनिस्ट पक्ष या तत्त्वाला सेल्फक्रिटिसिझम म्हणतो. तुम्हीं कदाचित आमचें सगळें लिखाण वाचलें नसेल, पण जर कांहीं मंडळींनी वाचलें असेल

तर त्यांना पटेल कीं चुका कबूल करणें हें कम्युनिस्टांमध्येंच आहे. म्हणून इथें सत्कार झाला त्याच्या जोडीला तोहि भाग असता तर बरें झालें असतें.

दुसरी अडचण अशी आली कीं इतकें सगळें वर्णन करून, तूं आतां साठ वर्षांचा झालास असें ऐकवण्यांत येतें. म्हणजे अनेक प्रकारचीं बंधनें पाळावीं लागतात. नीट बसलें पाहिजे. गंभीरपणें चाललें पाहिजे. गंभीर चेहेरा करून बोललें पाहिजे. विनंत्या केल्या पाहिजेत. रस्त्यानें जातांना उडी मारतां कामा नये ! तेव्हां हीं बंधनें मी पाळणार नाहीं. तीं पाळलीं तर माझा अधःपात होईल. मी नालायक ठरेन. कारण १७ वर्षें तुरुंगामध्यें सहीसलामत राहून गोळीबार खाऊन, जे कर्माला आले तें घेऊन आज तुमच्यासमोर तुमच्या कार्याला पुढें नेण्याकरतां उभा आहें. अजून कडवट झालों नाहीं. एस. एम. म्हणतात त्याप्रमाणें अजून मानवता शिल्लक आहे. त्याचें कारण विनोद. आणि हा महाराष्ट्राचा खरा स्वभाव आहे. मला असें वाटतें कीं आग्र्याच्या तुरुंगामध्यें बंद केल्यानंतर शिवाजीनें औरंगजेबाचा विनोद करून आपल्या दोस्तांना सांगितलें असलें पाहिजे, आतां कसा दावतों त्याला माझा मराठी इंगा ! आणि मग पेटारे तयार करून औरंगजेबाला मेवामिठाई चारली. लाडवाच्या पेटींतून हे महाराज परागंदा झाले ते परत त्यांची भेट झाली सबंध साम्राज्य उलथून टाकल्यानंतर. ही शिवाजीची कृति आहे. ती कृति संयुक्त महाराष्ट्र समितीनें अंमलांत आणली आणि ती अखेर लाभली तिला. तो विनोद राहिला, त्या टॅक्टिक्स राहिल्या, हा धडा शिकलों म्हणून गेलेला महाराष्ट्र परत यायला लागला. इतिहासाची शिकवणूक शिकलेले आम्हीं लोक महाराष्ट्राचा स्वभाव घेऊन तुरुंगामध्यें गेलों, परत आलों आणि कामाला लागलों. हा स्वभाव चांगला असतो. मी सगळे प्रांत पाहिले आहेत. इतर प्रांतांहून आपण फार मोठे आहोंत असें नाहीं. पण प्रत्येक प्रांताची एक विशिष्ट प्रकारची संस्कृति, स्वभाव, असतो. असे विशिष्ट गुण जे असतात त्यांतील एका गुणामुळें आणि इतर ऐतिहासिक कारणांमुळें इंग्रजांचें राज्य आल्यानंतर पहिल्या प्रथम त्यांना फटका द्यायला जो पुरुष उभा राहिला तो महाराष्ट्रांत उभा राहिला. इतर प्रांतांना इतिहास नाहीं आणि आम्हांलाच तो आहे असें नाहीं, तर महाराष्ट्राला थोडा जास्त इतिहास आहे. म्हणून १९५७ सालीं इंग्रजांविरुद्ध सगळ्यांनीं बंडं उभारलीं त्यामध्यें महाराष्ट्राला पुढारीपण लाभलें. आणि मग हिंदुस्थानच्या राजकारणाला निव्वळ मराठीपण

लक्षांत न घेतां एतद्देशीय स्वरूप देऊन त्याचें पुढारीपण करण्याचा मार्ग ज्यांनीं स्वीकारला ते लोकमान्य टिळक.

मगाशीं कांहीं मंडळींनी उल्लेख केला- माझी गुरुपरंपरा सांगितली. मी पुन्हां एकदां सांगतों, कीं या सगळ्या परंपरा ओळखल्या लोकमान्य टिळकांनींच. लोकमान्यांचा मी प्रत्यक्ष शिष्य होतों. ज्या ज्या वेळेला कांहीं करायचें त्या त्या वेळेला मी लोकमान्यांना सांगत होतों. एकदां फिजी बेटासाठीं इंग्रज भांडवलदार बायकापुरुषांची रिक्रूटभरती करून नेऊं लागले. तिथें ते गुलामगिरीमध्यें मरत. हें बंद करावें म्हणून लोकमान्यांनीं घोषणा केली. मी लोकमान्यांना म्हटलें, मी आलों. ते म्हणाले, तूं काय करणार आहेस ? मी म्हटलें, आमची १०-१२ मंडळी आहेत. त्यांचा इरादा असा कीं ज्या डेपोमध्यें रिक्रूटभरती करतात तिथें बाईला किंवा पुरुषाला भरती करायला आले कीं त्यांना चोपून काढणें. ते म्हणाले, अहो, असें नाहीं करायचें, मग म्हटलें, तुम्ही सांगा. ते हणाले, व्हालंटियर्स गोळा करा. मी सांगेन त्याप्रमाणें करा. मी साताहिक काढलें त्या- वेळीं त्यांना विचारायला गेलों. ते म्हणाले, दिवाळें वाजेल तुमचें पोरांनो. पैसे कोठून आणणार ? मी म्हटलें, आणूं कोठूनतरी. आईबाप रागावणार नाहींत ? नाहींत. मग करा सुरू.

अशा रीतीनें लोकमान्यांची दीक्षा घेतघेत मी पुढं निघालों. पण मला खरा लोकमान्य कुठं भेटला ? १९१८ सालीं इन्फ्लुएन्झा आला कामगारविभागांत. चाळींतून कामगार आजारी पडताहेत, मरताहेत— औषध नाहीं. त्यावेळेला सोशल सर्व्हिस लीगमधून औषधें वाटावींत असें ठरलें. आम्हीं कॉलेजचीं मुलें गेलों. कोणत्याहि माणसाला विचारलें, काय भाऊ, अरे ताप आहे तुला. कीं तो उठून बसायचा. साहेब, ताप नाहीं आम्हांला. आम्हीं म्हणायचों, अरे औषध घे. तर तो म्हणायचा — छे छे. मी चांगला आहें. तुम्हीं जा ! आम्हीं विचार करूं लागलों, या लोकांना झालंय काय ? औषध द्यायला गेलों तर ‘ नको ’ कां म्हणतात ? कारण त्या लोकांना १८९८ मध्यें ब्रिटिश राजवटींत प्लेगच्या वेळीं झालेला सोजिरांचा अत्याचार आठवत होता. ब्रिटिश सोजिरांनीं घरावरांतून ओढून ओढून माणसें नेलीं. प्लेगचा माणूस उचलला कीं नेला इस्पि- तळांत- मग तो कायमचा बेपत्ता ! त्याची आठवण मुंबईच्या कामगाराला होती. नंतर मला कल्पना सुचली. आम्ही पुन्हां पहिल्याच ठिकाणीं गेलों आणि म्हटलें,

आम्हांला लोकमान्यांनीं पाठवलें आहे. टिळकांनीं पाठवलं ? मग पाजा औषध. आमचीं सर्व औषधें संपलीं. तेथें मी राष्ट्रवादाचा धडा शिकलों. राष्ट्रवाद हा कामगारांवर आधारला पाहिजे हें शिकलों. १९१८ सालीं लोकमान्य टिळकांनीं भाषण केलें, "या हिंदुस्थानचे राजे कोण ? कामगार, शेतकरी जनता या हिंदुस्थानचे राजे."

लोकमान्यांपासून राष्ट्रवाद तर शिकलोंच. पण राष्ट्र म्हणजे कोणाचें ? टाटाचें, काळाबाजार करणाराचें, का साखर काळ्या बाजारांत घालणाऱ्यांचें ? राष्ट्र कोणाचें ? भाक्रा, नानगलमध्यें खोटें सीमेंट घालून त्याला भगदाड पाडणारांचें कीं दामोदरव्हॅलीमध्यें चार धरणें बांधून परत डॅममध्यें ती दामोदर नदी अडवीत नाहीं म्हणून हजारों, लाखों घरें बेपत्ता करणारांचें ? हपूरच्या बाजारामध्यें आलेला गहू दडवून कामगारांना आणि शेतकऱ्यांना उपाशी मारणाऱ्यांचें ? असला राष्ट्रवाद मी मानत नाहीं— मानणार नाहीं.

माझा राष्ट्रवाद– या राष्ट्रावर कोणी बाहेरून हल्ला केला तर, मग तो चीन असो, रशिया असो, इंग्लंड असो कीं अमेरिका असो—त्याचं रक्षण करणं याला राष्ट्रवाद म्हणतात. ( टाळ्या ) कोणी म्हणतात, आम्हीं चीनचे एजंट, आम्हीं रशियाचे एजंट, आम्हीं म्हटलें, आम्हीं एजंट हिंदुस्थानचे. आम्हीं अशा भिंती ठेवीत नाहीं. आम्हीं राष्ट्राराष्ट्रांत भेद करतों. परंतु असें भांडण आम्हीं ठेवीत नाहीं. कोणत्या राष्ट्रामध्यें बेकारी खलास झाली, कोणत्या राष्ट्रामध्यें साम्राज्यवाद मेला, कोणत्या राष्ट्रांमध्यें भांडवलशाही मेली, कोणत्या राष्ट्रांत शेतकरी, कामगार स्वतंत्र झाला, कोणी खरा समाजवाद आणला तीं राष्ट्रें आणि ज्यांच्याकडे अजून भांडवलदारी, बेकारी, सट्टेबाजी आहे तीं राष्ट्रें यांच्यामध्यें जरूर भेद करतों. आम्हीं अभिमानानें सोव्हियट रशियाबद्दल प्रेम दाखवतों. तसेंच पोलंड, हंगेरी व चीनवरहि दाखवतों. कारण त्या देशांत भांडवलशाही, बेकारी नाहीं. तेथें कामगारांचें राज्य आलें. त्या ठिकाणीं नवीन समाज आला. या समाजवादी देशांवर कामगार, शेतकरी मध्यमवर्गाच्या दृष्टीनें प्रेम करणें चूक नाहीं. पण त्याचा अर्थ असा नाहीं कीं इतरांनीं येऊन या देशाचें राज्य घ्यावें. किंवा आमचा देश घ्यावा !

चीननें आगळिक केली त्यावेळीं मी म्हटलें, कीं आगळीक केली. पण चीननें आमच्यावर शत्रुत्वाची स्वारी केली नाहीं. चीन म्हणतो, तुम्हीं

आमच्या तिबेटमध्यें काड्या घातल्यात काय ? मग आम्हीं तुमच्या बॉर्डरवर काड्या घालतों. पण हें असें करून कसें जमेल ? म्हणून आपल्याला सांगितलें पाहिजे कीं चीनच्या दोस्तांनो, तुम्ही आपली चूक दुरुस्त करा. कम्युनिस्टांमध्यें भांडणें नाहींत. पण मतभेद जरूर आहेत. कोणाला यांतच आनंद वाटत असेल तर वाटूं द्या. मी जाहीर करतों. पण ज्यांना वाटलें, मतभेदांमुळें पार्टी बुडाली, ते साफ घसरले. मतभेद असून सुद्धां पार्टी पुढें गेली. चुकांची कबुली देऊन पुढें गेली. १९४२ बद्दल विचारतात, ४२ मध्ये चूक केलीत ? केली. कां हो मानतां चूक ? हो. मानतों. कां केलीत ? साधी सरळ गोष्ट. नेहरूंनी ठराव आणला, फॅसिझम हाणून पाडला पाहिजे. सोवियेतचा जय झाला पाहिजे. आमचें मत आम्हीं मांडलें– ते म्हणाले, इंग्रजांविरुद्ध लढा केला पाहिजे. आम्ही म्हटलें, 'दोन वर्षें थांबा. लढाई निकाल करील.' इथें मतभेद झाला. ही मंडळी जेव्हां तुरुंगांत आली तेव्हां मी त्यांना वर्तमानपत्रें पुरविलीं. ४३ पर्यंत मी तिकडे राहिलों. या धरपकडी झाल्या त्याच्याकरतां संप करा अशीं माझ्या नांवाची हँडबिलें काढून वाटली गेलीं आणि सार्वत्रिक संपही झाले. १९४२ च्या संपाला येरवड्यांतून माझा पाठिंबा होता–माहित नसेल तर ऐका ! हिंदुस्थानची कामगार जनता जशा चुका लक्षांत ठेवते तसे जो काम करतो व लढतो त्याचा लढाऊपणाहि लक्षांत ठेवीत असते. जनता चुका उगाळीत बसत नाहीं. चुका सुधारल्यात तर तुम्ही खरे लढवय्ये म्हणून तुम्हांला हार तीच जनता घालते. म्हणून अभिमानानें सांगतों, कीं ४२ सालीं ज्यांच्यावर लत्ता प्रहार झाले त्याच पार्टीला हिंदुस्थानच्या जनतेनें पहिल्यानें राज्य दिलें. केरळच्या जनतेनें कम्यु-निस्टांना राज्य कां दिलें ? पार्टी जशा चुका करते तशा सुधारते पण. अशा चुका करीत नाहीं कीं त्यामुळें देश आणि जनतेचा घात होईल ! एकादे वेळीं होईलहि. पण जाणूनबुजून होणार नाहीं. करणार नाहीं. लोक म्हणतील, अहो, पण खड्डयांत पडता कशाला ? कोण नाहीं पडत ? खड्डयांत पडल्यानंतर बाहेर कसें यायचें हें शिकविणारा माझा दुसरा गुरू महात्मा गांधी !

महात्मा गांधीनीं आयुष्यामध्नें लढविलेल्या प्रत्येक लढ्याच्या शेवटीं सांगितलें कीं, मी हिमालयाएवढी चूक केली. आय हॅव कमिटेड हिमालयन ब्लंडर ! पण चुका करून परत चढायला लागायचे. महात्माजींचे ऐकून आम्हीं कॉलेजच्या बाहेर पडलों. त्यानीं सांगितलें, चरखे चालवा. मी सांगितलें,

आम्ही कॉलेजांतून बाहेर कशाला आलों ? आम्हीं चरखे चालवणार नाहीं. शंकरलाल बँकरच्या घरीं विठ्ठलभाई पटेल वगैरे मंडळींनीं सभा घेतली. विद्यार्थ्यांना आणि त्यांच्या पुढाऱ्यांना सांगितलें, महात्माजींचा हुकूम आहे–चरखा चालवा. मी सांगितलें, मी नाहीं चालवणार ! खादी घाला– नाहीं घालणार ! तुम्हांला मान्य नसेल तर तुम्ही बाहेर जा. मी विद्यार्थ्यांना सांगितले,– कॉलेजांत परत जायचें असेल तर जा. पण मी नाहीं जाणार. तुम्हांला जें काय करायचं असेल तें करा. आज असे आमचे मंत्री आहेत कीं ज्यांनीं त्या वेळेला असहकाराच्या चळवळीमध्यें नांव दिलें नी पुन्हां कॉलेजमध्यें जाऊन बी. ए. एम. ए. झाले ! सन्मार्गाला लागले आणि शेवटी मंत्रीपद त्यांना लाभलें. पण आम्हीं नाठाळ ठरलों. आणि मग विचार करायला सुरुवात केली कीं हें असं कां ? महात्माजींवर हा हल्ला होता कीं असहकार हा बोल्शेव्हिझम होय. तेव्हां मी सांगितलं कीं हा बोल्शेव्हिझम नाहीं. विचार केला, देश स्वतंत्र झाला पाहिजे–भांडवलदार आपले नाहींत– लढणार कोण ? महात्माजी म्हणाले, जनता ! जनता कोण ? एक कोटी फंडाला मदत देईल ती ! एक कोटी फंडाला तीस लाख रुपये देणारासुद्धां जनताच ! टिळक स्वराज्य फंडाच्या एक कोट रुपयांपैकीं दहा लाख ब्रिटिश कंपनीमध्यें गुंतवले, पांच लाख रुपये एका विलायती कापड विकणाऱ्या स्टोअर्सला दिले– तो हिशेब घेऊन मी कॉंग्रेसवाल्यांच्या पुढं उभा राहिलों आणि विचारलें, कीं टिळक फंड ब्रिटिशांना भांडवल पुरविण्यासाठीं आहे का ? हा भांडवलदार स्वराज्यवादी ? हा स्वातंत्र्यवादी ? नाहीं. मग स्वातंत्र्यवादी कोण ? कामगार, शेतकरी, मध्यमवर्ग. या जनतेला हाताशी धरून त्या जनतेशी युद्ध खेळणारा एकच मनुष्य दिसतो–तो म्हणजे मार्क्स–लेनिन. म्हणून धर्म असावा, रामदास असावा, शिवाजी असावा, गीतारहस्य असावें, टिळक असावेत, महात्माजींचा निर्भीडपणा असावा पण या सगळ्याच्या जोडीला लेनिनचा कामगारहि असावा हें मी त्या ठिकाणीं सांगितलें. १९२१ एप्रीलमध्यें मी एक लहानसं पुस्तक लिहिलें. मग परळमध्यें शिरलों. आणि कामगार कसा आहे म्हणून पहायला लागलों. त्या वेळेला बार्डोलीला जायलाहि मी तयार झालों. विठ्ठलभाई पटेलांचा मी सेक्रेटरी होतों–सहा महिने. महात्माजींचे अनुयायी म्हणवणाऱ्यांनी महात्माजींचें राजकारण आंतून पोखरून कसें काढले तें मी त्या ठिकाणीं डोळ्यांनीं पाहिलें. यांच्या राजकारणावर कोण

विश्वास ठेवील? म्हणून मी सांगितलें, बार्डोलीपर्यंत जा. चौरीचौऱ्याला पोलिस ठार झाल्यानंतर महात्माजींनीं सांगितलें, अहिंसा बुडाली म्हणून. तेव्हां मी त्यांना सांगितलें, तुमचं आम्हांला पटायचं नाहीं. १८५७ ला लाखोंची कत्तल झाली. त्या शिपायांची आणि जनतेची आठवण ठेवून मी म्हणेन, स्वराज्या-साठीं १६ पोलीस होरपळले गेले—जाऊं द्या! ते म्हणाले, माझं तत्त्व अहिंसा. मी म्हटलं, जमायचं नाहीं. त्यावेळेला मी मार्ग शोधीत होतों. पण माझ्या मार्गामध्यें, मुद्दाम तुम्हांला सांगतो, कीं एक राष्ट्रवाद आणि दुसरा कामगारवाद असे दोन्ही सारखे चालत होते. ज्यावेळेला प्रिन्स ऑफ वेल्सवर बॉयकॉट झाला, त्यावेळीं ब्रिटिश सोजिरांनीं झाडावरून पक्षासारखी माणसं पाडलीं. मी त्या ठिकाणीं उभा होतों. उभा असतांना एक धडा शिकलों कीं गोळीबार चालू असतांना पळूं नये! त्या वेळेला मी विचार करीं कीं अशीं माणसें ठार करणारे हें ब्रिटिश राज्य अहिंसेनें मरेल याच्यावर विश्वास कसा ठेवायचा? माझा याच्यावर शेवटपर्यंत विश्वास बसला नाहीं. स्वराज्य आपल्याला अहिंसेनें मिळालें असेंहि नाहीं. पण या स्वराज्यांत आम्हीं अहिंसा मानतों. ब्रिटिश राज्यांत ती मानतां येणें शक्य नव्हतें. हें दहा वेळां महात्माजींशीं तंटा करून मी सांगितलें. मीरत केसमधें आम्ही पकडले गेलों तेव्हां महात्माजी अचानक एकदां भेटायला आले. त्यावेळीं ते अर्विनला भेटायला जाणार होते. आम्हांला ते कां भेटायला आले—कारण कांहीं नाहीं—त्यांच्या येण्याचा अर्थ एकच होता— कीं ब्रिटिश सरकारला जाणीव द्यावी— कामगार, शेतकरी आणि कम्युनिझमचे नांव घेऊन लढणारी मंडळी इथें आहेत— त्यांच्याशीं सुद्धां माझी दोस्ती आहे! भगतसिंगाला भेटायला लाहोरमध्यें महात्माजी गेले नाहींत आणि भगतसिंग फाशी गेला तेव्हां बापूजींनी सरोजिनी नायडूला मिरतमध्यें पाठविलें आणि सांगितलें, 'मला तो विषय काढतां आला नाहीं, याबद्दल माझी दिलगिरी!'

मी बापूजींना विचारलें, तुम्ही मूव्हमेंट सुरू करणार का? ते, 'हो'— म्हणाले. '१९२२ सालीं चौरीचौरा झालें. या वेळीहि पोलिस मारले जाणार. मग तुम्ही चळवळ बंद करणार का?'—ते 'नाही' म्हणाले, मग मी सांगितलें—'आपला पाठिंबा तुमच्या चळवळीला.' त्या वेळेला मी मीरत जेल-मधून अंडरग्राऊंड हँडबिलें काढून किसानांचा उठाव कसा करायचा हें सांगितलें

मुंबईला आमच्या कांहीं लोकांनीं चूक केली. ते चूक होते—आज सांगतो. महात्माजींना विचारलें, चळवळ थांबवणार आहांत कां? ते म्हणाले, 'नाहीं.' त्याच वेळेला सोलापूर मार्शल लॉ झाला. पेशावरला दंगल झाली. लखनौमध्यें उठाव झाले. महात्माजी शब्दाला जागले आणि त्यांनीं सांगितलें, चळवळ थांबणार नाहीं. आमच्यांतील कांहीं मंडळी विरुद्ध होती. महात्माजींना जनतेची नाडी ओळखण्याची जी कला होती ती आम्ही शिकलों. सैतानी सरकार असले तर काय केले पाहिजे—सैतानाशीं तडजोड होत नसते, त्याला निकालांत काढावा लागतो हे महात्माजींनी आम्हांला शिकवलें. १९३७ पर्यंत मी कॉंग्रेसचा ए. आय. सी. सी. मेंबर होतों. १९२७ सालीं मुंबई कॉंग्रेस कमिटी आमच्या हातामध्यें होती. कम्युनिस्ट पक्षाचा मनुष्य त्यावेळीं कॉंग्रेसचा जनरल सेक्रेटरी होता आणि आमच्या गटाच्या नेतृत्वाखालीं सायमन कमिशनचा बॉयकॉट उभारला गेला होता—ही आमची परंपरा. राष्ट्रवादांत चूक केली तरी राष्ट्रवाद लढवला क्रांतिकारकरीत्या. ही आमची परंपरा म्हणून दोन्हींची मी आठवण ठेवतों. १९३७ सालीं फैजपूर कॉंग्रेसला मी हजर होतों. राज्यसत्ता काबीज केल्यानंतर इंग्रजांशीं हातमिळवणी करून कॉन्स्टिट्यूशन असेंब्ली होऊं शकत नाहीं हें मत मी मांडलें. बापूजी म्हणाले, 'तुमचे बोल्शेव्हिक ख्याल आहेत.' मी म्हटलें, 'हे क्रांतिकारक ख्याल आहेत.' बापूजी कोणाकोणाजवळ विचारीत, 'हा गृहस्थ काय करणार?'

विरोधकांशीं दोस्ती ठेवून चांगले असेल तें उचलण्याची प्रवृत्ति या राजकारणांत महात्माजींनी आणली.

सगळ्यांत मी मार्क्स–लेनीनला माझे श्रेष्ठ गुरु मानतों. कारण या सबंध जगाचं तत्वज्ञान, सबंध इतिहासाचं, हजारों वर्षांचं तत्त्वज्ञान, या इतिहासाची दृष्टि दाखविणारा जर कुणी पहिल्यांदा झाला असेल तर तो मार्क्स! जग बदलतें? हो. कुणी सांगतो, ऋषीमुळें बदलतें. कुणी म्हणतो, अंतर्ज्ञानामुळें, कुणी म्हणतो अमक्यामुळें—मग सगळे अंतर्ज्ञानी ऋषि पुरुष जर परमेश्वराचे अवतार होते तर या जगामध्यें दुःख आणि दारिद्र्य कां राहिलें? असा प्रश्न माझ्या हृदयामध्यें लहानपणापासून होता.

लहानपणापासून मी म्हणत असें—अशी एखादी अदृश्य तलवार असावी —मीहि अदृश्य असावें —आणि मग त्या तलवारीनें इंग्रजाला ठोकावें. नाशिकमध्यें राहिल्यामुळें सावरकरी तेज आमच्यांत होतें. एक दिवस व्हॉईसरॉय

यायचे होते-- ब्रिटिश सोल्जर इकडून तिकडे जाऊं देईनात. सावरकर पकडले गेले. टिळकांचा खटला झाला. त्यावेळेला मला एका सोनारानें शिवाजी करून दिला होता. त्यानें सांगितलें, हा घे. त्याच्याकडे पहा. अभ्यास कर आणि लढायला शीक.त्या सगळ्या वातावरणांत जिकडे तिकडे शिवाजीचं नांव घेऊं नका,अशी मोहीम सुरू झाल्यावरोबर माझ्या म्हातारीनें तो शिवाजी सहाणेवर घांसून टाकला. तो घास-लेला शिवाजी सं. म. समितीमध्यें उत्पन्न होऊन पुन्हा वर चढला आहे. आणि तो पुन्हां घासून काढण्याचे कॉंग्रेसवाल्यानीं प्रयत्न केले पण तेच घासले गेले. या परंपरेत महाराष्ट्रातले आणि बाकीचे कम्युनिस्ट आहेत. १९२० सालीं गिरण्या-कारखान्यांतून १२-१२ तास काम करणाऱ्या कामगाराला विश्रांति घ्यायला वेळ नव्हता आणि १९४० सालमध्यें कामगार आठ तास काम करून रविवारची सुट्टी विहार तलावावर मजेंत घालवतो. जो कामगार चाळीस सालापूर्वी सांगत होता कीं १६-१६ तास काम करून वेवडा पिऊन मरायचें, त्या कामगार-वर्गाचा लढा लालबावट्यानें लढविला. त्या लालबावट्यानें सोळा तास उलथवले. आठ तासांचा कामाचा दिवस केला. पूर्वी आम्हीं १६ तास भांडवलवाल्यांच्या हातांत होतों-आज नाहीं. म्हणून या ठिकाणीं कामगारांनीं मला शेलापागोटें बांधलें. पूर्वी अशी प्रथा होती कीं दसऱ्याला शेलापागोटें बांधावें आणि सांगावें कीं, भाऊ, आतां मोहिमेवर जा. तेव्हां आपल्या राज्याचें रक्षण करणें हाच आज १९५९ सालमध्यें तुम्ही मला शेलापागोटें बांधलेत याचा अर्थ आहे. शेलापागोटें घेऊन बाहेर पडायचें आणि महाराष्ट्राची ध्वजा घेऊन पुढें जायचें. माझी गुरुपरंपरा पुष्कळ आहे. विश्वनाथ काशिनाथ राजवाडे —कुणाला नांव माहित नसेल. राजवाड्यांची इतिहासांतली परंपरा आणि स्थान सांगण्याची ही वेळ नाहीं. पण इतिहासाचें ज्ञान मी त्यांच्यापासून घेतलें. त्यांचा एक ग्रंथ छापण्याचे प्रेसवाल्यानीं नाकारलें तेव्हां मी त्यांना सांगितलें, कीं मी छापतों. १६ पानांचे तीन फार्म छापले. ४ था लेख लिहिण्याची वेळ आली आणि मला कानपूर खटल्यामधें पकडण्यांत आलें. शेवटीं तो ग्रंथ प्रसिद्ध झाला नाहीं.

तेव्हां इतिहासांतहि माझी गुरुपरंपरा आहे. राजकारणांत आहे-साहित्यांत आहे. सगळ्यांना मी गुरू मानतों. मी नेहमीं शिष्यत्व पत्करण्याच्या वृत्तीचा मनुष्य आहें. उदाहरणार्थ, बेचाळीस--बेचाळीस तुम्ही म्हणतां—पण आजपर्यंत सातारच्या त्या गढीवाल्या शेतकऱ्याला वाङ्मयांत यायला किती कठीण झालें

तुम्हांला माहित आहे ? कांहीं लेखकांनीं भूमिगतांतलें क्रांतिकारित्व कुठें आणलें? तिची आणि त्याची भेट भूमिगत अवस्थेंत झाली. नंतर बापाला कळलं, कीं यांचें जमेना. मग बाप अडचणींत पडला. मग स्वराज्य मिळाल्यानंतर हा भूमींतून वरती आला आणि मग लग्न केलं ! मधली सारी भानगड लिहिलीच आहे त्यांनीं. भूमिगतांचा हा साहित्यामधला अपमान आजपर्यंत कुणी उखडून काढला नाही. परंतु आपला गांव, आपला शेतकरी, ४२ झाल्यानंतर आज जो इतमामानें उभा राहिला तो वाङ्मयामध्यें १९ वर्षांनीं यायला लागला आहे. उदा. ' जयमल्हार ' सिनेमा जर तुम्ही बघितलात, तर तुम्हांला दिसेल, कीं कसा शेतकरी उभा केला आहे ! माडगूळकरांचा शेतकरी, दांडेकरांचा शेतकरी —कोंकणपट्टी आज वाङ्मयांत यायला लागली. तीस वर्षांपूर्वी हें कां झालें नव्हतें? कलेमध्यें हा नवा वर्ग कां आला ? हे लेखक, माडगूळकर किंवा दांडेकर, पेंडसे मार्क्सिस्ट नाहींत. पण साहित्यामधें लढाऊ वर्ग, लढाऊ वृत्ती, त्यांचीं भांडणें यांचीं चित्रें रंगवायला सुरुवात झाली. हा आपल्या देशाच्या प्रगतीचा एक भाग आहे असें समजून ह्या मंडळींचाहि विचार केला पाहिजे. सिनेमा सृष्टी-मध्यें, साहित्यामध्यें, सर्व क्षेत्रांत जर विचार केला तर आपला देश किती पुढें जातो आणि त्या प्रत्येक क्षेत्रांत आपला गुरु कोण हें प्रत्येकानें ठरवलें पाहिजे. कारण गुरुत्व मानल्याशिवाय पुढचा रस्ता येत नाहीं. तुम्ही म्हणाल, हें तर एखाद्या हिंदूसारखं झालं ! पण गुरुत्व मानणं याचा अर्थ कम्युनिस्ट किंवा सोशालिस्ट पुढारीपण पाहिजे, अनुयायीगण पाहिजे-दोहोंचा समन्वय पाहिजे, दोघांचा जनतेशीं संबंध पाहिजे, आणि मग रस्ता निघत जातो.

या परंपरेमध्यें मी अनेक उल्लेख केले नाहींत. उदा. जुनी क्रांतिकारक मंडळी—पिस्तुलें देणारी. बॉंब फेंकणारी. ह्या मंडळींशींहि माझा परिचय होता. त्या सगळ्यांची दोस्ती घेऊन आणि त्या सगळ्यांचें ऋण घेऊन आज मी साठी-पर्यंत पोंचलों. शेवटीं एकच सांगतों,—कम्युनिस्ट पार्टीवर राग असेल तर तो सोडून द्या. कारण ही पार्टी ह्याच देशाची, ही पार्टी याच कामगार–शेतकरी वर्गाची, मध्यमवर्गीय जनतेची आहे. चुका करील तर तिचा कान धरा. पण हें लक्षांत ठेवा, कीं शेवटीं देशाच्या स्वातंत्र्यासाठीं, जनतेच्या स्वातंत्र्यासाठीं आणि समाजवादासाठीं ती तुमच्याबरोबर लढायला, मरायला तयार आहे. कांहीं मंडळी परवां मला गंमतीनें म्हणूं लागली, अहो डांगे, तुम्ही आतां

चीनच्या पार्लमेंटांत जा. मी साधें उत्तर दिलं, कीं साहेब, सुरक्षितपणें राहायची जागा शोधणं एवढाच जर माझा स्वभावधर्म असता तर २२ सालीं लेनिननें मला रशियांत बोलावलं होतं. हिंदुस्थानांत सतरा वर्षं तुरुंगांत काढलीं तीं कांहीं स्वास्थ्य आणि सुरक्षितता मिळावी, आणि पार्लमेंटचे चारशें रुपये खावे, एम. पी. पद लावावं एवढ्यासाठीं नाहीं. मी हिंदुस्थानचा आहें, या हिंदुस्थानचा राहीन आणि या हिंदुस्थानलाच समाजवाद देईन. आणि तोही मार्क्सिझम-लेनिनिझमच्या तत्त्वाला धरून ! इतरांशीं दोस्ती करून– भांडण असेल तें भांडण करून, आंतरराष्ट्रीय दोस्ती ठेवून ! मी परवां बेळगांवला गेलों होतों तिथले लोक म्हणाले, तुमचा महाराष्ट्र झाला असेल, पण बेळगांव अजून बाहेर आहे आणि तुम्ही आतांच समिति मोडायला निघालांत ? त्यावेळीं मी उठून सांगितलें, समितीमध्यें सगळ्यांत भांडणारे कोण ? तर डांगे आणि एसेम. पण आम्हीं दोघे आतां आलों ना बेळगांवला ? बसलों कीं नाहीं बरोबर ? तेव्हां ही फुटीची सगळी भाषा बंद करा आणि एकमतानें, एकजुटीनें केलेला ठराव — बेळगांव, कारवारसहित हा सारा महाराष्ट्र निर्माण होईपर्यंत आम्हीं एकजुटीनें राहाणार– हें आश्वासन घेऊन तुम्हीं पुढें चला. आणि त्या ठिकाणीं त्या आश्वासनाचें जें तेज आणि जो उत्साह चढला तो पाहिल्यावर तुम्हांला कळेल कीं एकी ही काय चीज आहे ! म्हणून समाजवादी हिंदुस्थान घडविण्यांत सुद्धां जरी भांडणें असलीं तरी आमच्या सगळ्यांची एकी होवो हीच शेवटची प्रार्थना. !

● ● ●

# समाजवाद-काँग्रेसचा आणि समितीचा !

*संयुक्त महाराष्ट्र समितीच्या वतीनें ता. १४ ऑक्टोबर १९६० रोजीं शिवतीर्थावर भरलेल्या दुसऱ्या परिषदेच्यावेळीं भाई डांगे यांनीं केलेलें उद्घाटनाचें भाषण.*

स्वागताध्यक्ष, प्रतिनिधि, बंधु–भगिनीनों,

आपल्या या समितीच्या दुसऱ्या अधिवेशनाचे उद्घाटन करण्याचा मान मला स्वागत समितीने दिला, याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. पहिल्या-प्रथम अर्थातच ज्यांच्या हौतात्म्यामुळें आपल्याला यशाचा लाभ झाला त्या हुतात्म्यांना आणि ज्यांनी कष्ट भोगले, जे तुरुंगांत गेले, लाठ्या खाल्ल्या, मार खाल्ला, अपंग झाले, अशा सगळ्या लढवय्यांना प्रणाम करून मग आपण पुढच्या विचाराला लागूं. आज हे अधिवेशन भरत आहे त्याच्याकडे केवळ आपल्या महाराष्ट्रांतील कामगार, शेतकरी यांचे लक्ष नाहीं, तर हिंदुस्थानांतील इतर जनतेचेसुद्धां लक्ष आहे. कारण महाराष्ट्र लढून कोणी मिळविला याच्याबद्दल महाराष्ट्राबाहेरील जनतेत दुमत नाहीं. महाराष्ट्र काँग्रेसचे पुढारी म्हणतात, महाराष्ट्र त्यांनींच मिळविला. म्हणजे सही त्यांनीं केली याच्याबद्दल मुळींच वाद नाही ! पण त्या सहीला जे रक्त लागते ते मात्र समितीने पुरविले. एवढे त्यांनीं विसरूं नये. नाहीं तर सही करतांना तो लेखणीचा हात कुठे इकडे तिकडे जावयाचा. पण लेखणीचा हात त्यांनी चालविला. शेवटीं लेखणी मोडून आड·रानांत शिरले नाहींत. याच्याबद्दल अभिनंदन करून घ्यावयाचे असेल तर आमची मुळींच आडकाठी नाहीं. तेव्हां आपला महाराष्ट्र आपण कसा मिळ-विला त्याची बाहेरच्या जनतेला नक्की माहिती आहे, म्हणून ज्यावेळीं काँग्रेसचे राज्यकर्ते नव्या नव्या योजना करतात, विकासाच्या गोष्टी बोलतात,

पंचवार्षिक योजना आंखतात, ज्यावेळीं सभा बोलवून हे पुढारी विचार करतात त्यावेळीं महाराष्ट्रामध्ये इतर पक्षांच्या जोडीला समिती काय विचार करते, असा प्रश्न अनेक मंडळी बाहेरचीसुद्धां विचारतात. कारण महाराष्ट्र आपण लढून मिळविला परंतु आपण कांहीं राज्य मिळविले नाही. लढा केला, गोळीबार झाला, जानेवारीचा संग्राम झाला, फ्लोरा फाउन्टनचा संग्राम झाला, त्यावेळीं सर्व साधारणपणे या लढाऊ जनतेचे अनेक पक्ष, इतर कामगार संघटना, महिला, या सगळ्यांनी स्वयंस्फूर्त समिती नेमून हे लढे केले. त्यावेळी महाराष्ट्राच्या जनतेचा विचार असा कीं आम्हांला एकत्र आणणारे पुढारीपण नाही. आम्ही सगळी फौज, ही सेना एका विश्वासाने, एका धैर्याने, एका भावनेने आणि एका उद्दिष्टाने एकत्र आणून जर हा लढा केला तर तो सफल होईल.

ह्या सगळ्या जनतेला एकत्र करणारे उद्दिष्ट काय होते, त्यांत कोणत्या गोष्टी होत्या ? त्यामुळे हे सर्व पक्ष एकत्र आले ? सगळे होते, कॉंग्रेसची मंडळी होती, कम्युनिस्ट पार्टी, प्रजासमाजवादी पक्ष, शेतकरी कामगार पक्ष, लाल निशाण गट, रिपब्लीकन पक्ष, या घटनेच्या मसुद्यांत जीं नांवे दिली आहेत ते पक्ष आपल्या समितींत होते आणि इतरहि होते. पण त्यावेळी समिती नव्हती. पण ही भावनाच अशी होती, लढाऊ जनता अशी होती आणि उद्दिष्ट असे होते कीं जे हांशील करण्यासाठीं प्रत्येक माणूस लढायला उभा राहिला. संभाजी महाराजांच्या वधानंतर महाराष्ट्रांत जी अवस्था झाली; राजा गेला, त्राता नाहीं, नेता नाहीं, पण गांवोगांव आणि खेड्यापाड्यांत लोकांनीं आपापले गांवकरी नेमले. राज्य चालवायला सुरुवात केली. मोगल सैन्याने विचारावे, तुमचा पुढारी कोण ? आम्हीं तर मारला त्याला. त्यांनी उत्तर द्यावे, आमचा पुढारी प्रत्येक गांवामध्ये आहे. भीमथडी घोडें घ्यावे, खायला मिळाले न मिळाले, तरी त्यावेळचा तो महाराष्ट्रांतला शेतकरी महाराष्ट्र राज्याचे रक्षण करण्यास निघाला होता. हीच स्थिती महाराष्ट्राची ज्यावेळीं द्विभाषिक लादले तेव्हां झाली. कोणी सांगितले होते कामगारांना तुम्हीं संप करा म्हणून ? कोणी सांगितले होते शेतकऱ्यांना लढा करा म्हणून ? महिलांना कोणी सांगितले होते तुम्हीं तुरुंगांत जा म्हणून ? एक पुढारी नव्हता. पक्षांचे पुढारी होते, पण सगळ्यांना बांधणारी संघटना नव्हती. अनेक मंडळी म्हणत होती, एक व्हा, ॲक्शन कमिटी नेमली, ती म्हणे एवढ्याच पुरती, परत कोलमडायची. फ्लोरा

फाउन्टनला गोळीबार झाला, लढाई झाली रे झाली कीं ही मंडळी परतलीच. कांहीं पुढारी म्हणतात ना, आतां काम झाले आपले, आतां बरखास्त. पण प्रत्यक्षांत जनतेला जास्त कळते. अशा परिस्थितींत त्या लोकांना आम्हांला थांबवून धरावे लागले. जानेवारींत जो संग्राम झाला त्यामुळे कॉंग्रेसच्या राज्यकर्त्यांना या लढ्याचे स्वरूप कळून आले, कीं यांत जातीयतेचे भांडण नाही, धर्माचे भांडण नाही, प्रादेशिक भांडण नाही, संकुचित कांहीं नाहीं, आणि महाराष्ट्राची एकी फुटेल असे दिसत नाही. तीन कोटी महाराष्ट्राच्या जनतेचा हा आपली एकी वाढविण्यासाठीं लढा होता. कॉंग्रेसच्या राज्यकर्त्यांच्या डोक्यांत याचा प्रकाश पडला नाही. लढ्यांचा तडाखा दिल्याशिवाय त्यांना अक्कल सुचत नाहीं. जानेवारींत, नोव्हेंबर महिन्यांत तडाखे बसले तेव्हां विचार करतो म्हणाले, त्यांनीं दडपशाही केली असतांनाहि आपण लढत राहिलो. हे सगळे झाल्यानंतर अनेकांना पटले कीं परिषद भरवावी. ती परिषद भरली. समिती स्थापन झाली. सर्व पक्ष, त्यांची अनेक प्रकारची ध्येये असतांनासुद्धां, त्यांच्यामध्ये मतभेद असले तरीसुद्धां एका विशिष्ट ध्येयासाठीं समितीच्या रूपानें एकत्र आले. एक विशिष्ट कार्यक्रमहि त्यांनीं मराठी जनतेला दिला आणि अशा रीतीने मराठी जनतेच्या हातांत हे एक एकीचे हत्यार आले. १९५६ मध्ये अशी ही समिती तयार झाली. मग निवडणुका लढविल्या, त्यांचे यश तुम्हांला माहित आहे. समितीविषयीं आत्मविश्वास वाढला लोकांमध्ये. सबंध हिंदुस्थानमध्ये ४४ टक्के मते मिळणारांना जागा जास्त मिळतात, महाराष्ट्रामध्ये जागासुद्धां मिळाल्या नाहीत. कुठले तिकडचे कुठले इकडचे हातीं घेऊन शेवटी मेजॉरिटी करून मंत्रिमंडळ बनविले. शेवटीं दिसली त्यांना ताकत, ही जनता आतां कांहीं हातीं लागणार नाही, असे समजल्यानंतर मग ही मंडळी तयार झाली. बरे आहे, संयुक्त महाराष्ट्र तुमचा, घेऊन टाका. या सही करणाऱ्या मंडळीनीं सही केली आणि महाराष्ट्र राज्य स्थापन झाले. मी पार्लमेन्टमध्ये म्हटले होते, कॉंग्रेस राज्यकर्त्यांना कशी अवदसा सुचली कीं चूक झाली, कुणाला ठाऊक, परंतु हा महाराष्ट्र अनाचारी नाही, जातीयवादी नाही, राष्ट्रऐक्य फोडणारा नाही, एवढेच नव्हे तर महाराष्ट्र अशा वर्गाचा, कीं ज्यांचे लढे असे चालतात, –कामगार शेतकरी–त्याच्या जोडीला मध्यम वर्ग, असा हा महाराष्ट्र आहे, याची नकळत, अजाणतेपणाने कॉंग्रेस सरकारने कबुली दिली.

कशी दिली, तर म्हणे महाराष्ट्राची स्थापना कामगार दिन, एक मे, त्या दिवशी. पंडित पंतांनी ही घोषणा केली, मी म्हटले, ही परत घेणार की काय लक्षांत आल्यावर ? नाहीं. म्हणे परत घेत नाही. एक मे ला संयुक्त महाराष्ट्राची जनता फ्लोरा फाउन्टनला गेली, हुतात्म्यांना वंदन करावयाला, गव्हर्नरच्या खोलीमध्ये नव्हे ! समितीने रात्रीं बारा वाजतां जाऊन हुतात्म्यांना अभिवादन केले आणि सांगितले, नवा महाराष्ट्र सगळेजण करूं. महाराष्ट्र स्थापन झाला. आतां प्रश्न असा, महाराष्ट्र मिळविला, पण घडविणार कसा ? कसा घडविणार महाराष्ट्र आणि कोण घडविणार महाराष्ट्र ? हे दोन मुख्य प्रश्न या समितीच्या परिषदेसमोर आहेत. हा इतिहास एवढ्यासाठीं सांगायचा असतो कीं, मागील इतिहास लक्षांत ठेवला तर पुढच्या गोष्टी नीट कमविता येतात. मागचे लढे आपण कसे लढलो, काय कमविले त्या लढ्यामध्ये, कोणत्या गोष्टी जनतेने घडवून आणल्या हे लक्षांत ठेवले तर ज्या जनतेने या गोष्टी कमविल्या तीच जनता हा महाराष्ट्र घडविणार. दुसऱ्यांना हे जमायचे नाही. महाराष्ट्र ज्या तऱ्हेने मिळविला त्याच तऱ्हेने तो घडविणार आहोत. याचा अर्थ स्पष्ट आहे. कोण लढले महाराष्ट्रासाठी ? मुंबईचे कामगार, त्यांनी सार्वत्रिक संपाचे लढे केले. गोळीबार, तुरुंग, आणि तोफा यांची धमकी दिल्यानंतर ज्या कामगारांनीं अशा धमक्याना भीक घातली नाही, तो कामगार महाराष्ट्र घडविणार. मुंबईचे भांडवलदार आणि बँकवाले हे घडविणार नाहींत महाराष्ट्र. देशाचे उत्पादन कोण करतो ? कामगार करतो, कामगार शेतकरी उत्पादन करतात आणि तुम्ही काय करतां ? हिंदुस्थान-भर पांच रुपयांसाठीं सरकारी नोकरांनी संप केला, मध्यम वर्गीय नोकरांनी केला, त्यांना तुमची कांहीं गादी मिळवावयाची नव्हती. या मध्यम वर्गात साहित्यिक आहेत, कवि आहेत, विद्यार्थी आहेत, हे महाराष्ट्र घडविणार आहेत. भांडवल-दार महाराष्ट्राचा कैवार घेणार नाही. महाराष्ट्र मिळवितांना सही कोणीहि केलेली असो, राज्य कोणी चालवो, महाराष्ट्र घडविणार, कामगार, शेतकरी, आणि मध्यमवर्ग. महाराष्ट्र तुम्हीं कोण देणारे ? या सगळ्या वर्गांनीं आपल्या लढ्यांच्या सामर्थ्यावर महाराष्ट्र घेतला. संयुक्त महाराष्ट्र समितीमध्ये फूट पडली नसती तर, पहिल्यापासून समितीमधील आमची मंडळी सांगत होती कीं संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर तो घडवायचा कसा, तो कसा बनवायचा, हे ध्येय आपण कायम करून तसेच धोरण आंखले पाहिजे. आमच्या कांहीं दोस्त

मंडळींना तें पटले नाहीं. मिळाला कीं पळा, पळा, रे पळा ( हंशा ), घर बांधल्यानंतर म्हणे पळून जाणार, जाणार तर जा, आम्हीं संन्यास घेतो अशा समजुतीने गेलांत तर आम्हीं समजू शकतो. घर तुमचे, भांडवलदारांच्या हवालीं करतां कशाला ? म्हणे आम्हीं बाहेर जातो. समितीचा उपदेश ऐकला नाही, काय झाला त्याचा परिणाम ? समितीचे बळ पाहून कांहीं मंडळी समितीकडे येत होती. इंग्रजीमध्ये ग्रॅव्हिटी अराउन्ड धी समिती, असे दोष होते. कांहीं महत्वाकांक्षी लोक मोहाला बळी पडले. त्याला समिती काय करणार ? ग्रॅव्हिटेशनचा धक्का बसला आणि हीं माणसें इकडे येण्याऐवजीं तिकडे गेली.

संयुक्त महाराष्ट्र झाल्यानंतर दुसरा गेला, तिसरा गेला, समितीच्या हातांत सत्ता आली असती तर ते इकडे आले असते. मंत्रीपदासाठीं तिकडे जातात. अशी ही रांगडी मंडळी होती ती गेली, आतां समितीची भूमिका खंबीर झाली आहे. ही फूट पडली नसती तर कॉंग्रेसच्या हातांत सत्ता गेली नसती. म्हणून मला आश्चर्य वाटते याच्यासाठी, अरे, घडविण्याचे पुण्य पदरी लाभत होते ते करंट्या मंडळींना पटले नाही, त्यांची इच्छाच नाहीं ! सार्वत्रिक संप म्हटले तरी त्यांची रडारड, त्यांना येऊन जाऊन विषय दिसायचा काय ? हिंसा. हिंसा करायला आमच्या हातामध्यें आहे काय ? गिरणीच्या कांड्या किंवा बुलेरचा दांडा. मारामाऱ्या करायला पूर्वी बुलेरचा दांडा लोक वापरीत असत. मारामारी करावी असे माझे म्हणणे नाही, पण ही एक जुनी प्रथा होती. आमच्या या रिपोर्टर मंडळींना बुलेरचा दांडा हे काय आहे माहित नसेल. १९२०, २४, २७, ३० बुलेरचा दांडा आपल्या हातांत होता, म्हणून आठवण होते. तेव्हां माझे म्हणणे असे कीं समिती भोवतीं जे ग्रॅव्हिटेशन होते त्यामुळे ही कांहीं मंडळी गेली. पण ज्या शक्तींनी महाराष्ट्र घडविला त्या वर्गाची शक्ती अजूनहि समितीमध्ये कायम आहे. त्यांची बहुतांशी निष्ठा अजूनहि आहे, पाहू या. दुसऱ्या कोणाला प्रतिसमिती भरवायची असेल तर भरवा आणि हा प्लॅटफॉर्म पाहा. समिती ही सर्व पक्षांची–वर्गांची आहे, जमिनदार आणि भांडवलदार सोडून-अशांची-या रांगडी शेतकऱ्यांची, कामगार, बुद्धिवादी, साहित्यीक, शिक्षक, कवन करणारे, नाचणारे, हे सर्व जण या समितीत आहेत. सत्य, सौंदर्य आणि दिमाख या समितीमध्यें आहे. आणि अशांची ही परिषद आहे. फक्त नाही पैसा, परंतु तो तुमच्या हातामध्ये आहे. थैली आपल्याला जवळ घेऊन

येण्याची जरूरी काय ? नांगरं जुंपलीत कीं मातीचे सोने करतां तुम्हीं आणि त्यामुळेंच बँकेची ठेव तयार होते. ती हातामध्यें घ्यावयाचा अवसर राहिलेला आहे, त्याचा कार्यक्रम समितीला पार पाडायचा आहे. विकास विकास म्हणजे काय ? महाराष्ट्राच्या तीन कोटी लोकांच्या विकासाचे हे काम करायचे. शेतकरी शेती करतो, मध्यम वर्ग काम करतो, बुद्धि चालवितो, कामगार धन उतन्न करतो, महाराष्ट्राचा विकास होत नाहीं म्हणजे काय ? विकास होईल, जास्त व्हायला पाहिजे. योजना करायला पाहिजे. अनेक कालवे, बंधारे, विहिरी, कारखाने, शिक्षण, घरेदारे, सगळ्यांचा विकास व्हायला पाहिजे, ह्या स्कीम्स, योजना करायला पाहिजेत, क्रोडो रुपये वाढवले पाहिजेत. याच्याबद्दल दुमत नाही. कोणी म्हणतील, काँग्रेस तेच करूं इच्छिते. या बाबतींत आपलें एकमत. ३६० कोटी घालायचे असतील तर पांचशे कोटी घाला. बातचित करायला येतां का ? असेंब्लीचे सगळ्या पक्षांचे पुढारी तयार आहेत. योजना करायला बसतों. तुमच्या विकासाच्या कल्पना सांगा, मापा, किती विहीरी पाहिजेत, किती शेती पाहिजे, सगळा हिशेब करा. प्रश्न असा आहे कीं हें कोण करणार ? कोणासाठीं करणार ? योजना हवी, विकास हवा, मागासलेल्यांना पुढे न्यायला हवे, मराठवाड्याचा विकास हवा, विदर्भाचा विकास हवा, सोलापूर, नगर, पुष्कळ जिल्हे मागासलेले आहेत. सगळ्यांचा विकास हवा, मुंबई आघाडीवर आहे म्हणतात, ती सुद्धां मागासलेली आहे. मुंबई आघाडीवर आहे, एका बाजूला गिरण्या आहेत, धन दौलत आहे. संपत्ति वाढलेली आहे, दुसऱ्या बाजूला खाचरामध्ये, झोपड्यांमध्ये बायका, मुले, राहातात, मरतात, त्यांचे कसे काय ? बाहेर पडले कामाला कीं दोन रुपये मजुरी, उतन्न करतो पांच रुपये, खाचरांतल्या झोपडीमध्ये झोपतो आणि ती झोपडी उडवून लावायला म्युनिसिपालिटीचे अधिकारी तयार. तेव्हां अशा मुंबईचा विकास हवा. विकास कोणासाठीं आणि कोणाच्या हस्ते, याच्याबद्दल वाद नाही. यशवंतराव करणार, कां समिती करणार, कां काँग्रेसवाले करणार ? ध्येय एक, कबूल, पण करावे कसे ? करावे हे खरे, मतभेद आहेत तपशीलामध्ये, कारखाने वाढावेत, शेती वाढावी, शिक्षण वाढावे, घरे वाढवावीत, सगळ्यांना नोकऱ्या मिळाव्यात, सगळ्यांचे संसार सुखी व्हावेत, सुंदर महाराष्ट्र पुढे जावा, हें जी मंडळी म्हणतात, त्यांच्यामध्ये मतभेद काय आहेत ?

आमचा असा दावा आहे कीं ज्यांच्या सहाय्याने, कामगारांच्या, शेतकऱ्यांच्या सहाय्याने हे धन वाढते त्यांच्याच सहाय्याने, त्यांच्या हस्तक्षेपाने, त्यांच्या मेहनतीने महाराष्ट्राचा विकास होणार आहे. तुमचा दावा काय ते सांगा. राज्यकर्त्यांना आमची विचारणा आहे. आमचा दावा आणि तुमचा दावा! भांडण कसले? त्यांच्या नामी टॅक्टीक्स, ते म्हणतात तुम्ही मराठे आम्ही मराठे, दुसरा त्यांत नको, तसा मुरारजी देसाई आतां राहिलेला नाही. तुमचे आमचे भांडण कोठे? भांडण कोणासाठी? जनतेच्या विकासासाठीं, त्याच्याबद्दल मतभेद नाही. कामगारांसाठी, शेतकऱ्यांसाठी, मध्यम वर्गासाठी आणि सर्वांच्यासाठीं! ते विचारतात, हे तुम्हांला मंजूर नाही का? ते म्हणतात, हा फॉर्म्युला कामगारांसाठीं, शेतकऱ्यांसाठीं आणि मध्यम वर्ग यांच्यासाठी आणि इतर सामान्य जनतेसाठीं. मग तुमचे हे बाकीचे कोण? हे सर्वोदयी कोण? नाही म्हणाले, असे आहे, आपण कांहीं श्रीमंतांना एकदम कापत नाही. भांडवलदारांना एकदम मारून टाकत नाही. आमची ही प्रथा नाहीं! आम्हीं म्हणतों, जरूर काय मारावयाची? पुष्कळ नांवे आपल्याला मुंबईमध्ये माहित आहेत. हा बिर्ला शेठजी, सेंचूरी मिलचा मालक, त्यांच्या गिरणीमध्ये १७ हजार कामगार काम करतात, मुंबईमध्यें सर्वात मोठी गिरण, कामगारांचा बोनस मारून बिर्ला समाजवाद बोलतो. हे म्हणतात, सगळ्यांचा विकास म्हणजे समाजवाद. हा कॉंग्रेसचा समाजवाद. कॉंग्रेस समाजवाद मानते.– समिती समाजवाद मानते, कॉंग्रेस विकास मानते, समिती विकास मानते, कॉंग्रेस कामगार, शेतकरी मध्यम वर्ग आणि सर्वांच्या विकासाची तयारी करते. समितीने तर तें आपले ध्येय मानले आहे. आपल्या पॉलिसीमध्ये तसे लिहिले आहे कीं समाजवादी भारतामध्ये समाजवादी महाराष्ट्र. नेहरू तसेच म्हणतात, समाजवादी भारत, आम्ही तसेच म्हणतो. मग आमचे पटत कां नाही? चार आण्याचा फॉर्म भरून सगळे एकत्र कां बसत नाहीत? सगळे भांडण मिटले असते. पण हे भांडण सरळ आहे. पंडित नेहरूंनीं सुंदरपणे एका ठिकाणीं जातां जातां त्या भांडणाचा मतितार्थ सांगून टाकला. नकळत झाले ते. संपत्ति हिंदुस्थानमध्ये १२ वर्षांमध्ये वाढली. कारखाने वाढले, सगळे कांहीं वाढले. परवांच पार्लमेन्टमध्ये प्रश्न असा आला, दरिद्री जास्त दरिद्री झाले, श्रीमंत अधिक श्रीमंत होत आहेत, असें ते म्हणाले. असे

म्हणतां तर एवढी संपत्ति गेली कुठे ? असा प्रश्न विचारला. पंडितजी सारखे कुशल नेते, त्यांनीं उत्तर दिले, कुठे गेली ती तपासणे आम्हांला मान्य आहे. बरोबर कुठे गेली ते विचारले पाहिजे. सगळे पाहायला लागले. डावपेंच टाकूं, कसे शोधायचें, कमिटी नेमूं, ( हंशा ) संपत्ति गेली कुठे ? आणि विकासासाठीं कां मिळत नाही ? चांगली गोष्ट आहे. भांडवलदारांकडे मागा म्हटले तर मिळत नाही. एका रुपयाचे दहा रुपये कसे होतील असा पॉइंट सांगा भांडवलदाराना कीं भांडवलदार शंभर कोटी रुपये उभे करतील. असा कारखाना त्यांना दाखवा कीं एका रुपयाचे शंभर रुपये दोन महिन्यांमध्ये, तर एक रुपयाचा शेअर शंभर रुपयांना घेऊन भांडवलदार उभा. तुम्हीं म्हणाल, एखाद्या शाळेला दोन हजार रुपये कमी पडतात, तर असे वाटेल कीं तुमच्या मुंबई शहरामध्ये श्रीमंत माणसे जिवंतच नाहीत. सगळे मेले. विहिरी खणायला पैसा मागा, मुंबईमध्ये घरे बांधायला पैसा मागा, नांव नाही. उलट सरकारला सांगतात कीं कामगारां साठी घरे बांधायला तुम्ही पैसा द्या. असे हे भांडवलदार या संबंध १२ वर्षात संपत्तीचा मोठा हिस्सा घेऊन बसले आहेत. हा यांचा समाजवाद.

समितीचा समाजवाद याच्या उलट आहे. जे उत्पन्न होईल, पैदावार होईल त्याचा मुख्य हिस्सा, जास्तींत जास्त हिस्सा कामगार, शेतकरी, मध्यमवर्गीय जनता यांच्या हातामध्यें जाईल. हा आमचा समाजवाद. कारखाने देशाच्या मालकीचे करा. जनतेच्या जीवनाची जीं जीं प्रमुख साधने असतील तीं तीं समाजाच्या आणि देशाच्या मालकीचीं करून त्यांचे उत्पन्न समाजासाठीं वापरणे, हा आमचा समाजवाद. ते उत्पन्न भांडवलदारांच्या घशांत समाजवादाच्या नांवाने घालणे हा तुमचा समाजवाद. येथे मतभेद आहेत. नुसत्या नांवाने फसून जाण्याची गरज नाही. समाजवादी सरकारचे हे ध्येय. कोणी म्हणतील हे असे कसे ? ते म्हणतात, आस्ते आस्ते होईल. कसे ? आज आम्ही काम करतो, मरतो आहोत, खायला कमी आहे, जिवंत राहिलो तर ५० वर्षांनी पाहूं, अशी ही भोंदुगिरीची समाजवादाची भाषा वापरून समाजवाद महाराष्ट्रामध्ये स्थापन होणार नाहीं. दलित जनता, शेतकरी, कामगार, मध्यम वर्ग यांचा सोशालिझम आम्हांला मान्य आहे. सर्वांनी मरावे असे आमचे म्हणणे नाही. आमच्याबरोबर येऊन खपावे, आम्ही कोणाला मरा म्हणून सांगत नाही. आमच्या बरोबर येऊन करा काम. करतां येत नसेल तर मरा, हे शेवटचे

वाक्य आहे. काँग्रेसच्या धोरणाप्रमाणे, तुम्ही श्रमदान करा, धनदान करा, अशी विनंती करून कधी समाजवाद येत नाही जी जनता आहे, कष्टकरी वर्ग आहेत, त्यांच्या संघटनांनी लढून आणि त्यांची शक्ती स्थापन करून समाजवाद येत असतो. हे काँग्रेस आणि समिती यांच्यामधले महत्वाचे मतभेद आहेत. तुम्ही पुढे म्हणाल, तेहि तसेच म्हणतात. कामगार, शेतकऱ्यांचे बहुमत करतों, कबूल. बहुमत मिळालें, मान्य करतो, पुढे निवडणुका जिंकतील किंवा नाही याचे भविष्य आपण कशाला करा ? यावेळीं सगळे वर्ग तुमच्या पाठीशीं आहेत म्हणतां, पण कामगारांनी हजारो लाखो रुपये नफा कमवून दिला मुंबई शहरांत काम करून, त्यांच्या खिशांतून बोनस कसा काढून घ्यावा याचा विचार करणारे हे काँग्रेस सरकार आणि त्यांचे पुढारीपण करणाऱ्या ट्रेड युनियन्स विरुद्ध मुंबई शहरांत काय चाललें आहे ?

बिर्ला शेठजीने गेल्या तीन वर्षांत अमाप नफा कमविला. काँग्रेसचा भांडवलदारी समाजवाद असा. त्यांचा हा नमुना बघा कीं बोनसाच्या वर्षी जास्तीत जास्त नफा असूनहि मग जितका झाला त्याच्यापेक्षां कमी बोनस जाहीर केला. आणि सरकार म्हणते, त्यामध्ये आम्हांला हस्तक्षेप करण्याचा प्रश्न येत नाही. हा भांडवलदारी समाजवादाचा नमुना. दुसरे उदाहरण. दोन भावांचे भांडण, पैसा खाऊन बसले, गिरण तोट्यांत, नफा कुठे गेला हे सांगायला नको. ती गिरणी दर सहा महिन्यांनी बाहेर येते. सरकारजवळ असा कायदा नाही कीं जर गिरण सहा महिने बंद पडली तर आम्ही ताब्यांत घेतो. पांच हजार माणसे काम करतात तिथे. या सतरा तारखेला ती बंद होणार आहे. हायकोर्टाच्या जज्जमेंटने, पांच हजार कामगार बेकार होणार-हा यांचा समाजवाद. आमचा समाजवाद-ज्या गिरणीत पांच हजार कामगार काम करतात ती गिरण चालू राहिली पाहिजे असा दिल्लीला कायदा करतां कां ? आम्ही काम करतो पण उपाशी राहाणार नाही, हा आमचा समाजवाद. दर तीन मिनिटांनी नोटीस देतात कामगारांना बेकार करण्याची, हा भांडवलदारी समाजवाद. काँग्रेसच्या भांडवलदारी समाजवादाचीं अनेक उदाहरणे देतां येतील. अन्नधान्याचा प्रश्न, भीक मागावी लागते परदेशांत. अगदी लेटेस्ट उदाहरण म्हणजे २२ लाख सरकारी कामगारांचे. ते काय मागत होते ? महागाई वाढत आहे, किंमती आवरत नाहीत, हिंदुस्थानांतील प्रत्येक माणूस, प्रत्येक स्त्रीपुरुष हैराण झाला

आहे, या सगळ्या महागाईमुळे. हे आवरत कां नाही ? बाजारावर नियंत्रण कां नाहीं ? सदोबा पाटील इकडून तिकडे सारखे धांवत आहेत. नियंत्रण करीत सगळे धांवत आहेत. सगळे सांगतात, जास्त पैसे घेऊ नका. योग्य किंमतीच्या भावाने विका. योग्य किंमत किती ? योग्य किंमत अशी कीं कधीहि विकत घेतां येणार नाही ! व्यापारावर कांहीं नियंत्रण येत नाही. सरकार म्हणते, बाजारभाव कसे खाली वर होतात याचा हिशेब करायला वेळ नाही. याला कशाला वेळ लागतो हो ? समितीमध्ये अनेक तज्ञ लोक आहेत, या चढउतार भावांची तीन दिवसांत संपूर्ण माहिती देतील. कपड्यांचा, शर्ट, धोतर, लुगडे, साखर, कशाचाहि नमुना आणा. भाव सांगूं शकतील. सरकारलाहि माहित आहे आमच्यापेक्षां जास्त. किंमती चढल्या कीं नियंत्रणे करूं म्हणतात, पण होत नाही. या चोरांचे नफे वाढले किंमती वाढल्यामुळे, त्याचे रक्षण करणे म्हणजे भांडवलदारी समाजवाद आणि नियंत्रण जमत असेल तर भांडवलदारांना बाजूला सारून कामगारांची सत्ता स्थापन करून भांडवलशाहीवर नियंत्रण आणणे हा आमचा समाजवाद ! तुमचे आमचे मतभेद हे नवीन नाहीत. नुसते वेगडी तत्त्व नाही हे. कोण करणार ? कसे करणार ? काय करणार ? आपण आपला महत्त्वाचा प्रोग्रॅम, साधने आणि ध्येय स्पष्ट करून मार्गाला लागूं. सरकारी नोकरांना यांनीं सांगितले, तुम्ही संप केला तर तुमच्यावर सर्व लष्करी सैनिक सोडूं. त्यांनी संप कशाकरितां केला ? ३०–३४ रुपये मिळविणाऱ्या प्यूनवर आणि ८० रुपये मिळविणाऱ्या कारकूनावर सरकार तुटून पडते. केले काय त्यांनीं ? पांच रुपये वाढ मागितली. सरकार उलथवायला निघाले होते सरकारी नोकर ? कांहीं ठरविले नव्हते. नाही म्हणे, हे सरकार उलथून पाडण्याचे बंड आहे. त्यांनी काय सांगितले, आम्ही तारा पाठविणार नाही, पत्रे देणार नाही, तुमचे तुम्ही बघा, आतां त्यांची, सरकारची बंडाची व्याख्या निराळी झाली आहे. कुठलाहि सरकारी कामगार संप करायला उठला कीं ते बंड ! एसेन्शल सर्व्हिसेसच्या नांवाखाली सरकारी नोकरानें संप केला कीं ते बंड ! मंत्र्याचा लोटा नोकराने खुशीने घांसला नाही तर त्याला धमकी दिली जाईल, हे बंड आहे ! ( हंशा ) हा भांडवलदारी समाजवाद. एसेन्शल सर्व्हिस म्हटले कीं संपाचा अधिकार नाही. आणि कामगारांची न्याय्य मागणी असेल तर आणि ती सरकारच्या विरुद्ध असली तरी त्या मागणीवर समिती बसवून ती समझोत्याने, तडजोडीने निकालांत काढणे, हा कामगारांचा समाजवाद. हा फरक

आहे. हिंदुस्थानांत अनेक बँका आहेत. त्यांतील नोकरांना भांडवलदारांच्या गुप्त ठेवी माहित आहेत. बँकांचे नोकर पगार वाढवून मागतात. ते म्हणतात, नाही मिळणार. कसे नाहीत? तुमच्या गुप्त ठेवी दाखवितो. हायकोर्टामध्ये गेले. जज्जालासुद्धा गुप्त ठेवी दाखवित नाहीत. म्हणे कायद्याने तसा अधिकार नाही. कारण कंपनी कायदा बदलला. गुप्त ठेवी बाहेर दाखवून देण्याची मागणी कामगारांच्या युनियनला करतां येत नाही, ठेवी गुप्त ठेवण्याचा अधिकार भांडवलदारांना, हा भांडवलदारी समाजवाद. आमचे म्हणणे, गुप्त ठेवी शोधून काढण्याचा अधिकार कामगारांना हवा. त्या ठेवी भांडवलदारांच्या हातांमध्ये रा नयेत. हा आमचा समाजवाद. तुम्हाला महाराष्ट्राचा विकास करायचा आहे, महाराष्ट्र घडवायचा आहे, तर नुसते नांव पसंत करून जमावयाचे नाही. हा विकास कसा करायचा हे भांडण आहे, ते लक्षांत घेतले पाहिजे. काँग्रेसच्याने विकास होत नाही. आतां दुसराहि प्रश्न उपस्थित झाला आहे. अन्नधान्याचा प्रश्न उत्पन्न झालेला आहे, हा बिकट प्रश्न झालेला आहे.

बारा वर्षे झाली. आम्ही प्रयत्न करीत आहोत म्हणतात. हा कांहीं आरोप नाहीं. मुख्य आरोप म्हणजे तुमच्याकडून हे होणार नाही. बारा वर्षेच काय, पण बाराशे वर्षे भरत राहिलांत तरी होणार नाही. कां नाहीं? आमच्या पेक्षां जास्त हुशार मंडळी ती. अक्कल आहे, त्यागी आहेत, सगळे आहे, पण त्यांना जमायचे नाही. कां नाही? कारण तुमची किल्ली भांडवलदारांच्या खिशांत आहे. जमीन नाही म्हणे, जमीन कशी नाही? पडित जमीन तर आहे? लाखो भूमिहीन जमीन मागतात, शरीर आहे, हात आहेत, एनर्जी आहे, शक्ती आहे, मनुष्य देह परमेश्वराने घडविलेला उभा आहे, तयार आहे, जमीन कसण्याची तयारी आहे, खेडेगांवांत जमीन नाही म्हणून माणूस येथे गिरण्यामध्ये राबायला येतो. त्याला घर नाही, मुंबईत घर बांधायला जागा नाही. जमिनीवर घरे बांधली, झोपड्या बांधल्या तर त्या पाडून लोकांना देशोधडीला लावतात. या मुंबई शहरांत असे कांहीं मालक आहेत कीं त्यांना स्वतःच्या चाळी किती आहेत ते माहित नाही. पूरमय्ये नेमले भाडे वसूल करायला, मुंबईत घरांची विक्री खरेदी काळाबाजारांत चालते. या महाराष्ट्रामध्ये गरीब शेतकऱ्यांना आणि भूमिहीनांना, जे मेहनत करतात, ज्यांच्याजवळ सजीव देह आहे, त्यांच्या हातामध्ये जमिनी दिल्या पाहिजेत. असे केले तरच आपला शेती विकास होईल आणि अन्नधान्याचा

प्रश्न तीन वर्षात सुटेल. हिंदुस्थानांत जी जमीन आहे तिचे वांटप करून शास्त्रशुद्ध शेती केली तर हा प्रश्न तीन वर्षात सुटेल. हा शेतकऱ्यांचा समाजवाद. सीलींगच्या नांवाने गेली १२ वर्षे शंख करताहेत. पहिल्या पंच-वार्षिक योजनेत सिलींग करावयाचे नाहीं म्हणे. कमाल मर्यादा किती असावी असे कांहीं ठरविले तर हिंदुस्थानमध्ये म्हणे अशा कांहीं शक्ति आहेत कीं त्यांच्यामुळे समाजांत उत्पात् होतील. म्हणून सिलींग ठरवूं नये. उत्तर हिंदुस्थानमध्ये जमिनदार गेले तरी कुळे म्हणून माणसे उभी राहिली. त्यांच्या जमिनी किती, पांचशे, पांचशे एकर, जमिनदार किती ? मूठभर, उत्पात् करायला गेले तर त्यांचाच उत्पात् होईल. रसातळाला जातील. पण अशा ह्या भांडवलदारी समाजवाद्यांनी जमिनदारीला हात लावायचे नाकारले. नंतर नागपूरच्या अधिवेशनामध्ये ठराव केला कीं सिलींग झाले पाहिजे आणि सहकारी शेतीउत्पादन केले पाहिजे. सहकार कोणाचा ? झाले, सहकारी सोसायट्या सुरू झाल्या. आपल्या येथे साखर कारखाने आहेत. सहकारी जमीन दिलेल्या मंडळीचे भांडवल २० लाखांचे आणि सरकारने आश्वासन दिले ८० लाखांचे. याला म्हणतात सहकार. ज्यांनी २० लाख जमा केले त्यांच्या ताब्यांत जनतेने करांच्या रुपाने दिलेले ८० लाख रुपये. आमच्या पैशांतून या सहकारी सोसायट्यांना कर्ज देतात आणि त्यांच्यावर जो नफा येतो तो मात्र या २० लाख देणाऱ्यांच्या पशांत. याचा अर्थ हल्लींच्या सहकारी सोसायट्या. ते म्हणतात, याने समाजवाद येणार. म्हणून तुमच्यापुढे हा विचारासाठीं प्रश्न आहे. अन्नधान्याचा प्रश्न सोडविण्याचा हिंदुस्थानांत खरा मार्ग कुठला ? या बाबतीमध्ये आपल्या समितीने विचार करून तुमच्यासमोर हा प्रश्न ठेवलेला आहे. एक निवेदन प्रसिद्ध झालेले आहे. त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे.

एका वर्तमानपत्रवाल्यानें हेड लाईन दिली कीं समितीत या प्रश्नावर मारामाऱ्या झाल्या. कांहीं मारामाऱ्या झाल्या नाहींत. अनेकांना स्वप्ने पडली असतील, समिती फुटली. समिती फोडणारीं जी बांडगुळें होती ती गेली. त्या शब्दाचा आपण वाईट अर्थ लावूं नये, तें नैसर्गिक आहे. एखाद्या प्राण्याला जडलेला रोग सर्जरी करून उपटून काढला कीं तो प्राणी निरोगी होतो. समितीची ही सर्जरी झालेली आहे. आणि म्हणून ती आतां स्वच्छ स्वरूपांत उभी राहिली आहे. मला सांगायचे आहे कीं सध्याचा प्रश्न आपल्या समोर समिती मांडणार

आहे. त्याच्यावर वादविवाद होतात, चर्चा होते, झाली आहे. त्या प्रमाणे त्यामध्ये फेरफार करून कांहीं मांडीत नाहीं. मुख्य गाभा सांगतो. सर्वसाधारण-पणे एका कुटुंबांत पांच माणसे धरली तर, त्यांच्यामध्ये नवरा बायको, दोन पोरे, म्हातारा एखादा माणूस, तीन माणसे काम करणारीं, तशी बायका माणसे जास्त काम करतात. मुंबईमध्ये अरबी समुद्रांत मासळी धरायला गेले तर दादल्यापेक्षा बाया जास्त मासळी धरतात. घरी आल्यावर दादला म्हणतो, चार आणे दे, मारून येतो बाटली. तसे तुम्ही वाईट बुद्धीने समजूं नका. तीन माणसांचे एक कुटुंब धरले तर आणि एक बैल जोडी दिली तर सर्वसाधारणपणे किती कसतील? तर खायला प्यायला मिळेल एवढे कसतील. असे कुटुंब धरले तर त्याला जमिन किती ? ते ठरवावे लागेल. वरच्या शेतकऱ्याला एकदम काढून भागायचे नाहीं. पण ज्यांच्याजवळ शंभर शंभर एकर जमिन आहे, १०-१५ गडी घालून शेती करतात, राहातात कुठल्या गांवाला त्याचा पत्ता नाहीं, अशा शेतकऱ्यांना सांगावे लागेल, तूं स्वतः मेहनत कर, कष्ट कर, वाटल्यास दोन, तीन गडी कसण्यासाठीं घे आणि अशी शेती करणारी माणसे असली तरच शेती वाढेल आणि अन्नधान्याची पैदास मुबलक होईल. त्यामुळे सामर्थ्यशाली महाराष्ट्र बनेल असा आमचा विश्वास आहे. कांहीं श्रीमंत शेतकरी असतील त्यांना वाटेल कीं आपल्यावर गदा आली, परंतु त्यांना सांगावे लागेल, भूमिहीन गरीब आहेत त्यांना जमिनी द्या, महाराष्ट्राचे भले करायला निघालात ना ? मग देशाच्या भल्यासाठी थोडा त्याग नाही कां करणार ? महाराष्ट्राच्या भल्यासाठीं जमीन द्या आणि सगळ्या जनतेच्या कल्याणासाठीं समितीच्या पाठीमागे उभे राहा. सरकार म्हणते, सिलींग घालणार आहे, हिशोब कसा ? वाटप करणार कलेक्टरसाहेब आणि ग्रामपंचायती. आता आपल्याला माहित आहे, ग्रामपंचायती कशा चालतात त्या. मी लहान असताना शाळेमध्ये जायचा, आम्ही आंत बसायचे आणि एक मुलगा शाळेच्या ओट्यावर बसायचा. मास्तर त्याची पाटी दुरून घ्यायचे. मी विचारले, मास्तर त्याची पाटी सरळ कां घेत नाहीं ?

ते म्हणाले, ती पाटी मी कशी घेणार ? तो महार आहे. म्हणून मला सांगायचे कीं अजूनहि या ग्रामपंचायतीमध्ये बदल झालेला नाही. थोडासा झालेला आहे, समितीच्या चळवळीमुळे. उगीच कां हे दादासाहेब गायकवाड नाशिकमध्ये एम्. पी. म्हणून दिमाखाने निवडून आले? सगळीं बामणे

म्हणतात, माझे पार्लमेंन्टमध्ये काम करतां का ? ही शक्ति समितीने उत्पन्न केली. ही सर्व एकजुटीची शक्ति आहे. महाराष्ट्रामधल्या या भूमिहीनांना, मराठी भूमिहीन काय कमी आहेत ? सर्व जातीचे गरीब लोक आहेत. शेतकरी, मध्यम वर्ग या सगळ्यांचा मेळावा करून त्यांच्या हातामध्ये महाराष्ट्राची जमीन द्या, वाटेल तेवढी बाजरी, गहूं, साखर उत्पन्न होईल. कॉंग्रेस सरकार दहा वर्षे कमाल मर्यादा ठरवीत आहे. जमिनी वाटल्या म्हणे, कोणाच्या हातांत गेल्या ? मग ही मंडळी दहा वर्षांनी म्हणतात, कमिटी नेमतों, आम्हांला कमिटी नेमून पाहायचे नाही. जो पैदा करतो त्याला जमीन दिली पाहिजे. पैदा करायला आम्ही जिवंत राहिलो तर तुमच्या कमिटीचा उपयोग. तेव्हां अशी चळवळ, अशी नीति, असे डावपेंच, हा प्रोग्राम आणि ही दिशा घेऊन चालणारा तो समाजवाद. याच्या विरुद्ध चालणारा तो महाबळेश्वरी समाजवाद तो भांडवल–दारांचा फायदा करणारा समाजवाद. नांव सांगणार, हे महाबळीचे राज्य, तुमच्या-साठीं, जगासाठीं कांहीं करणार आणि हा महाबळी तुम्हालाच खाणार. शेवटीं तुमच्याच डोक्यावर पाय देतो असे सांगणारा हा समाजवाद. महाबळी समाज-वाद, तुम्हांला गिळणार, हा कॉंग्रेसचा रसातळाला नेणारा समाजवाद आम्हांला मान्य नाहीं. एका कवीला चारशे–पांचशे मानधन दिले याबद्दल यशवंतराव चव्हाणांचे अभिनंदन करतो, पण एकाला देऊन दहा कवि जिवंत राहूं शकतील काय ? आज साहित्यिक, वर्तमानपत्रकार किती भिकार जीवन जगतात, वर्तमान-पत्रे आजची अवलंबून जाहिरातीवर. ही परिस्थिती सुधारायची असेल तर भांडवलदारी समाजवाद आणून सुधारणार नाही. कॉंग्रेसच्या राज्यांत कवींची किंवा कलावंतांची कॉन्फरन्स असली की त्याच्यासाठीं मंत्री लागतो अध्यक्ष म्हणून. साहित्य अकादमीत यांच्या मारामाऱ्या. अकादमींत वशीला असेल तर पुस्तके छापली जातात. त्या आर्ट अकादमीत पैशांचा फन्ना झाला आणि साहित्यांत सगळा गोंधळ. भांडवलदारी समाजवादांत साहित्याची हीच गत होते. उत्तर प्रदेशांत पांच सहा युनिव्हर्सिटीज आहेत, सगळ्यांचा कारभार अंदा–धुंदीचा, लाखो रुपये गायब, दहा वर्षांनी आतां सरकारला जाग आली आणि एक कमिटी नेमली, चौकशी करावी. किंमती चढल्या–चौकशी, युनिव्हर्सिटीनी मलिदा खाल्ला,– चौकशी, कामगार संप करायला उभे राहिले तर मात्र त्यांना दडुंका, तेथे चौकशी नाही ! याचे

नांव भांडवलदारी समाजवाद, याचें नांव कॉंग्रेसचा समाजवाद, याचें नांव महाबळेश्वरी समाजवाद. म्हणून आमचे भांडण. तुम्हांला असे राज्य करणे जमायचे नाही. दोन तीन वर्षे राज्य तुम्हीं चालवाल. कारखाने वाढतील, संपत्ति वाढेल, पण प्रश्न असा येईल, वाढलेली संपत्ति गेली कुठे ? हटा तुम्ही, आम्हीं शोधून दाखवितो. जो कामगार संपत्ति उत्पन्न करतो त्याला बरोबर ठाऊक असते, कुठे संपत्ति जाते ती. तो ती दाखवू शकतो. जो उत्पन्न करतो त्याला स्पष्ट दिसते. हा सिद्धांत आहे. म्हणून अशा रीतीने समिती चालली तर महाराष्ट्रांत समाजवाद स्थापन करूं शकेल. नाही तर आज वाद माजला आहे. मागासलेले प्रदेश असतील त्यांचा विकास करा, शंभर कोटी रुपये खर्च करा. मराठवाड्याचे म्हणायचे, आम्ही फार मागासलेले आहोत ५० कोटी रुपये द्या. विदर्भ म्हणायचा, आम्हाला ७५ कोटी रुपये पाठवा. म्हणजे खर्च सव्वाशे कोटी रुपये आणि मारामाऱ्या. त्यानी सांगायचे येथे कारखाना काढा, आणि मग मारामाऱ्या करायच्या.

भांडवलदारी कॉंपिटिशनमध्यें मागासलेले आणि पुढारलेले अशी परिस्थिति राहाणार, त्यांची कायम भांडणें राहाणार आणि राहोत. सगळ्या भांडवलदारी देशामध्ये हा अनुभव आहे. अमेरिका, इंग्लंड, फ्रान्स, सर्वत्र हे तंटे आहेत, पण समाजवादी व्यवस्थेत बेकारी नसते, समाजवादी व्यवस्थेत जमिनीची अडवणूक नसते. झोपड्या पाडून त्या ठिकाणीं बिल्डिंग बांधणे, ही तरतूद नसते. समाजवाद नीट समजून घेतला पाहिजे. इंग्लंडमध्यें चांगली भांडवलदारी प्रथा. प्रत्येक गल्लीला कारखाना, ७०-८० टक्के जनता कामगार. पण समाजवाद होत नाहीं. भांडवलदारांत चुरस. मागासलेले आणि पुढारलेले. त्यांच्या मारामाऱ्या होतात. समिती काय करूं इच्छिते ? समाजवाद कसा आणणार ? तर जनतेचा विकास, मध्यम वर्ग, कामगार वर्ग यांचा विकास, गरीब जनतेचा विकास. जमिनदार आणि कारखानदार यांच्या कामाची सांगड घालून, भांडवलदारांचे वजन बाजूला काढून आणि कामगार, शेतकरी यांच्या हातांमध्ये सत्ता देऊन, सुंदर समाजवाद महाराष्ट्रामध्ये कसा निर्माण करायचा याचा विचार या परिषदेमध्ये केला पाहिजे. यशवंतराव महाबळेश्वरला म्हणाले कीं मला वर्गीय विग्रह मान्य आहे, वर्गीय लढा मान्य नाहीं. यशवंतरावांना वर्गीय भाषा माहित आहे म्हणून ते म्हणतात, विग्रह आहे. तो सोडवावा कसा ? तर कामगार, शेतकरी,

मध्यम वर्ग, भांडवलदार, जमिनदार, ह्या सगळ्याना घेऊन, त्यांच्या बाजूला विनोबांचे पुण्य जोडून हा राज्याचा गाडा चालविणें आणि जनतेला समाजवादाप्रत नेणें. त्यांनीं गेलीं बारा वर्षे हें चालविले. पण त्यांतून भांडवलशाही निर्माण होत आहे. तेव्हां समाजवाद म्हटला कीं भांडवलशाही नष्ट करणे.समाजवादामध्ये जमिनदारी नष्ट करणे, हा समाजवाद मानतां कां ? तेव्हां हा अनुभव घेऊन तुम्ही याचा विचार करा. ठरावामध्ये हाच विचार मांडलेला आहे. हा विचार मांडून त्याच्या आचरणाला लागू. आपल्यापुढे अनेक कार्यक्रम आहेत. मी विकासाचा कार्यक्रम सांगितला. वेळगांव कारवार डांगचा लढा आहे. या लढ्याचा विचार आपण करणार आहोत. वेळगांव सीमा लढ्याची मुहुर्तमेढ एक नोव्हेंबरला कोल्हापूर येथे रोवली जाणार आहे. हा लढा कसा होईल त्याची चर्चा तुमच्यामध्ये येईल विचारासाठीं. आपला विचार असा कीं हा लढा चांगला व्हावा. नांव राखील असा व्हावा. आतां आपले ध्येय कायम झालेले आहे. कारण आपल्यामधला विग्रह नाहींसा झाला. सगळ्यांनी एकमुखाने बोलण्याची ताकत समितीमध्ये आलेली आहे. लढ्याच्या वेळेला ही भांडणे व्हावयाची नाहीत. लढा करावा कीं नाहीं ? केल्यास कोणी एकादा गायब होईल की नाहीं ? हिंसा होईल की नाही ? परमेश्वर कबूल करील कीं नाही ? कोणाला राग येईल किंवा नाहीं ? ब्रीदाला जागलो कीं नाही ? असें म्हणणारी पोक्त मंडळी आपल्यात होती, पण ही पोक्त मंडळी आपल्यामध्ये शिल्लक नाहीत. जरी आपली साठी उलटली तरी आपली ताकद कायम आहे. अजून पोक पडलेले नाहीं. चळवळींत उतरायची तयारी आहे. तसे आम्ही पोक्त आहोत पण आम्हाला पोक पडलेले नाहीं. सार्वत्रिक संपाला घाबरत नाही. आणि आमच्या चळवळी मध्ये गुजराथी माणसाला धक्का लागलेला नाही. अल्प संख्यांकांचे रक्षण करें कराव हा सुद्धा समितीपुढे आला नाही.

मुंबईचे कामगार सर्व जातीचे, सर्व धर्माचे, सर्व भाषेचे, मल्याळी, तेलगू, तामीळ एकामागून एक संपामध्ये उतरले आणि मुरारजीच्या मशीनगन विरुद्ध उभे राहिले. आमच्या लढायामध्ये सगळ्यानी भाग घेतला ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. याच्यामध्ये भाषेचे भांडण, लढयाचे भांडण वगैरे कांहीं नाही. आसाममध्ये काय झाले, बंगालमध्ये काय झाले, बिहार मध्ये दंगल झाली आणि ती मिटवावी लागली सरकारच्या बंदुकांना. आम्हाला वाटलें, आम्हीच दंगल

नांव भांडवलदारी समाजवाद, याचें नांव कॉंग्रेसचा समाजवाद, याचें नांव महाबळेश्वरी समाजवाद. म्हणून आमचे भांडण. तुम्हांला असे राज्य करणे जमायचे नाही. दोन तीन वर्षे राज्य तुम्हीं चालवाल. कारखाने वाढतील, संपत्ति वाढेल, पण प्रश्न असा येईल, वाढलेली संपत्ति गेली कुठे? हटा तुम्ही, आम्हीं शोधून दाखवितो. जो कामगार संपत्ति उत्पन्न करतो त्याला बरोबर ठाऊक असते, कुठे संपत्ति जाते ती. तो ती दाखवू शकतो. जो उत्पन्न करतो त्याला स्पष्ट दिसते. हा सिद्धांत आहे. म्हणून अशा रीतीने समिती चालली तर महाराष्ट्रांत समाजवाद स्थापन करूं शकेल. नाही तर आज वाद माजला आहे. मागासलेले प्रदेश असतील त्यांचा विकास करा, शंभर कोटी रुपये खर्च करा. मराठवाड्याचे म्हणायचे, आम्ही फार मागासलेले आहोत ५० कोटी रुपये द्या. विदर्भ म्हणायचा, आम्हाला ७५ कोटी रुपये पाठवा. म्हणजे खर्च सव्वाशे कोटी रुपये आणि मारामाऱ्या. त्यानी सांगायचे येथे कारखाना काढा, आणि मग मारामाऱ्या करायच्या.

भांडवलदारी कॉंपिटिशनमध्यें मागासलेले आणि पुढारलेले अशी परिस्थिति राहाणार, त्यांची कायम भांडणें राहाणार आणि राहोत. सगळ्या भांडवलदारी देशामध्ये हा अनुभव आहे. अमेरिका, इंग्लंड फ्रान्स, सर्वत्र हे तंटे आहेत, पण समाजवादी व्यवस्थेत बेकारी नसते, समाजवादी व्यवस्थेत जमिनीची अडवणूक नसते. झोपड्या पाडून त्या ठिकाणीं बिल्डिंग बांधणे, ही तरतूद नसते. समाजवाद नीट समजून घेतला पाहिजे. इंग्लंडमध्यें चांगली भांडवलदारी प्रथा. प्रत्येक गल्लीला कारखाना, ७०–८० टक्के जनता कामगार. पण समाजवाद होत नाहीं. भाडवलदारांत चुरस. मागासलेले आणि पुढारलेले. त्यांच्या मारामाऱ्या होतात. समिती काय करूं इच्छिते? समाजवाद कसा आणणार? तर जनतेचा विकास, मध्यम वर्ग, कामगार वर्ग यांचा विकास, गरीब जनतेचा विकास. जमिनदार आणि कारखानदार यांच्या कामाची सांगड घालून, भांडवलदारांचे वजन बाजूला काढून आणि कामगार, शेतकरी यांच्या हातांमध्ये सत्ता देऊन, सुंदर समाजवाद महाराष्ट्रामध्ये कसा निर्माण करायचा याचा विचार या परिषदेमध्ये केला पाहिजे. यशवंतराव महाबळेश्वरला म्हणाले कीं मला वर्गीय विग्रह मान्य आहे, वर्गीय लढा मान्य नाहीं. यशवंतरावांना वर्गीय भाषा माहित आहे म्हणून ते म्हणतात, विग्रह आहे. तो सोडवावा कसा? तर कामगार, शेतकरी,

मध्यम वर्ग, भांडवलदार, जमिनदार, ह्या सगळ्याना घेऊन, त्यांच्या बाजूला विनोबांचे पुण्य जोडून हा राज्याचा गाडा चालविणें आणि जनतेला समाजवादाप्रत नेणें. त्यांनीं गेलीं बारा वर्षे हें चालविले. पण त्यांतून भांडवलशाही निर्माण होत आहे. तेव्हां समाजवाद म्हटला कीं भांडवलशाही नष्ट करणे.समाजवादामध्ये जमिनदारी नष्ट करणे, हा समाजवाद मानतां कां? तेव्हां हा अनुभव घेऊन तुम्ही याचा विचार करा. ठरावामध्ये हाच विचार मांडलेला आहे. हा विचार मांडून त्याच्या आचरणाला लागू. आपल्यापुढे अनेक कार्यक्रम आहेत. मी विकासाचा कार्यक्रम सांगितला. बेळगांव कारवार डांगचा लढा आहे. या लढ्याचा विचार आपण करणार आहोत. बेळगांव सीमा लढ्याची मुहुर्तमेढ एक नोव्हेंबरला कोल्हापूर येथे रोवली जाणार आहे. हा लढा कसा होईल त्याची चर्चा तुमच्यामध्ये येईल विचारासाठीं. आपला विचार असा कीं हा लढा चांगला व्हावा. नांव राखील असा व्हावा. आतां आपले ध्येय कायम झालेले आहे. कारण आपल्यामधला विग्रह नाहींसा झाला. सगळ्यांनी एकमुखाने बोलण्याची ताकत समितीमध्ये आलेली आहे. लढ्याच्या वेळेला ही भांडणे व्हावयाची नाहीत. लढा करावा कीं नाहीं? केल्यास कोणी एकादा गायब होईल की नाहीं? हिंसा होईल की नाही? परमेश्वर कबूल करील कीं नाही? कोणाला राग येईल किंवा नाहीं? ब्रीदाला जागलो कीं नाही? असें म्हणणारी पोक्त मंडळीं आपल्यात होती, पण ही पोक्त मंडळी आपल्यामध्ये शिल्लक नाहीत. जरी आपली साठी उलटली तरी आपली ताकद कायम आहे. अजून पोक पडलेले नाहीं. चळवळीत उतरायची तयारी आहे. तसे आम्ही पोक्त आहोत पण आम्हाला पोक पडलेले नाहीं. सार्वत्रिक संपाला घाबरत नाही. आणि आमच्या चळवळी मध्ये गुजराथी माणसाला धक्का लागलेला नाही. अल्प संख्यांकांचे रक्षण कसें कराव हा मुद्दा समितीपुढे आला नाही.

मुंबईचे कामगार सर्व जातीचे, सर्व धर्मांचे, सर्व भाषेचे, मल्याळी, तेलगू, तामीळ एकामागून एक संपामध्ये उतरले आणि मुरारजीच्या मशीनगन विरुद्ध उभे राहिले. आमच्या लढायामध्ये सगळ्यानी भाग घेतला ही मोठ्या अभिमानाची गोष्ट आहे. याच्यामध्ये भाषेचे भांडण, लढ्याचे भांडण वगैरे कांहीं नाही. आसाममध्ये काय झाले, बंगालमध्ये काय झाले, बिहार मध्ये दंगल झाली आणि ती मिटवावी लागली सरकारच्या बंदुकांना. आम्हाला वाटलें, आम्हीच दंगल

केली. कशासाठी, तर गुजराथी मराठी वाद वाढावा म्हणून नाही. तुम्ही जो महाराष्ट्र देणार नाही म्हणत होता, त्याच्यासाठीं सामना होऊ द्या, हा अभिमान धरून आम्ही एकजुटीने लढा केला. त्यात सर्व भाषिक कामगार होते, सर्व भाषिक लोक होते. बेळगांवच्या सीमेसाठी जो लढा होणार तो फुटून जाईल म्हणून घाबरून जायचे कारण उरले नाही. कारण समितीने आता आपला जनतेचा एकमुखी आवाज उभा केला आहे. निवडणुकी येत आहेत, मुंबई-च्या कॉर्पोरेशनच्या निवडणुकी येत आहेत. लोक विचारतात काय म्हणून समितीला मते द्यावी ? मुंबईचे सरकार कोणाच्या हातात असावें ? भांडवलदारांच्या, जमिनदारांच्या हातांमध्ये असावें? कीं मेजॉरिटी करून बसले त्यांच्या हातामध्ये, आमच्यातून भांडण करून निघाले त्यांच्या हातामध्ये असावें ? म्युनिसीपालटीत समितीची मेजॉरीटी असताना आम्ही काय केले ? कामगारांचे रक्षण केलें, शिक्षणाची व्यवस्थित तरतूद केली, कामगारांच्या मागण्या तडजोड करून दिल्या, चुका झाल्या असतील, परंतु आमचा दृष्टिकोण-मध्यवर्ग, कामगार, शेतकरी यांच्या मागण्याशी आम्ही जुळते घेतो, आणि तुम्ही ? एक साधा अधिकारी आला तर तुम्हाला अडचण निर्माण होते. मुंबई सरकारने एक प्रामाणिक अधिकारी नेमला तर यांची तारांबळ उडाली, समिती अधिकारावर असतांना नालायक अधिकारी समितीला भेटले. आणि समिती अधिकारावरून गेल्यावर लायक अधिकारी आणला, तो जर आमच्या वेळेला असता तर आम्ही जास्त कामे करून दाखविली असती. मुंबई कॉर्पोरेशनच्या निवडणुका अगदी जिद्दीने लढविल्या पाहिजेत आणि त्यासाठीं आपल्यामध्ये ज्या कांहीं चुका असतील, दोष असतील, तुटी असतील त्या नाहीशा केल्या पाहिजेत. शिवाजी महाराजांचा जसा रायगड होता तसा मुंबई हा नवा रायगड आहे. हा रायगड मुंबई म्यु. कॉर्पोरेशनच्या येत्या निवडणुकीत समितीच्याच हाती राहील अशी व्यवस्था केली पाहिजे. कारण मुंबईच्या निवडणुकीचा परिणाम पुढील महाराष्ट्राच्या निवडणुकीत दिसून येणार आहे. मागासलेल्यांचा विकास, बेळगांवचा सीमा लढा, हे प्रश्न आपल्या समोर आहेत. जगांतील कित्येक राष्ट्रें आज गुलामगिरीच्या बेड्या तोडू पाहात आहेत. शंभर वर्षांपूर्वी ज्या आफ्रिका खंडांत अमेरिका, इंग्लंड, जर्मनी, ज्या माणसांची गुलाम म्हणून विक्री करीत त्या आफ्रिका खंडांतील माणसे आज जागृत होऊन राजसत्ता आपल्या हातीं

घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. भांडवलशाही आणि साम्राज्यवाद याविरुद्ध टक्कर देत आहेत. भांडवलशाही जगांत आतां कुठे जाणार? ती बुडून आपोआपच मरणार. म्हणून आपण या परिषदेत हे निर्णय घेतांना या आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करावा. क्युबामध्ये, अल्जेरियामध्ये समाजवादी प्रवृत्ति वाढत असून भांडवलशाहीला लाथा बसत आहेत. अशा घटना आज जगभर घडत आहेत. सबंध जग भांडवलशाही विरुद्ध उठत आहे. शांततेचा, सुखसमृद्धीचा, समाजवादाचा मार्ग कामगार, शेतकरी आणि मध्यमवर्ग आज अवलंबीत आहे. समाजवादाच्या बांधणीला, ज्यांत सगळ्यांचे प्रश्न कायमचे मिटतील, असा समाजवाद घडविण्यासाठीं, समितीशीं सहभागी व्हावे, हातभार लावावा, एवढी विनंती करून मी आपली रजा घेतों.

●●●

# बुद्धानें काय सांगितलें ?

*नायगांव येथील विचार–विकास व्याख्यानमालेंत ता. २ मे १९५१ रोजीं दिलेलें व्याख्यान*

कामगारभागामध्यें ही वसंत व्याख्यानमाला चालू होते आहे ही विशेष महत्त्वाची गोष्ट. आतांपर्यंत वसंत ऋतु आला कीं फक्त मध्यमवर्गाचींच डोकीं गरम व्हायचीं, बाकीचे थंड ! दादरला, अमरहिंद मंडळांत, पुण्याला, नाशिकला अशा या व्याख्यानमाला होतात. वसंतऋतूंत किर्लोस्कर मासिकावर पूर्वी तरुण-तरुणी दिसायचे, आतां त्या पानावर मरगट्ट मराठा दिसूं लागला ! तेव्हां वसंत ऋतूचा प्रादुर्भाव कामगार जगांत होऊं लागला, व्याख्यानमाला भरूं लागल्या ही गोष्ट आनंदाची आहे. ही व्याख्यानमाला फुकट ठेवण्यांत आली आहे असें चालकांनीं सांगितलें, पण कामगारवर्ग कुठचीहि चांगली गोष्ट फुकट जाऊं देत नाहीं. तो याची भरपाई केल्यावांचून राहाणार नाहीं. शिवाय या भागांत मध्यमवर्गीयहि राहातात. तेव्हां सर्वांनीं मिळून ही व्याख्यानमाला यशस्वी करून ती टिकवून धरा.

मला या व्याख्यानमालेच्या द्वितीय वर्षाचें उद्‌घाटन करण्यास सांगण्यांत आलें. तेव्हां सुरुवात माझ्याच भाषणानें होणार. म्हणून विषय काय घ्यावा, असा विचार मनांत आला. आजकाल तंट्याचा विषय चांगला गाजतो. पण गाजणारे व वाजणारे विषय सध्यां व्याख्यानमालेंत नकोत असें मला वाटतें. बाहेर मग बघूं, कोण कसा खाजवतो नी गाजवतो तें ! पण येथे तें नको.

म्हणून ' बुद्धानें काय सांगितलें ' हा विषय मी निवडला. कारण आज-

काल या विषयावर बरीच चर्चा जिकडेतिकडे चालते. शिवाय भारत सरकारनें देखील बुद्धधर्माला २५०० वर्षें झालीं म्हणून हल्लींच बुद्धतिथी पाळली–१९५६ सालीं. ब्रह्मदेशांतील कांहीं मंडळींनीं एक "संगीतिका" भरवावी असें पंडित नेहरूंना सांगितलें होतें. तेव्हां हा सरकारी समारंभ–बुद्धतिथी पाळण्याचा–पार पाडण्यांत आला. पण त्यांत कांहीं जीव नव्हता, जिवंतपणा नव्हता. शिवाय जे रोज हिंसा करतात त्यांना बुद्धजयंती पाळण्याचा काय अधिकार ?

परंतु मधल्या काळांत एक महत्वाची घटना घडली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं बुद्धधर्म स्वीकारून त्याची दीक्षा आपल्या लाखों अनुयायांना दिली. लाखोंच्या सभा भरल्या. याच नायगांवमध्यें लाखोंनीं बुद्धधर्माची दीक्षा घेतली. पूर्वी ब्राह्मण स्वच्छ व महार अमंगळ समजत. परंतु त्या दिवशीं स्वच्छतेंत त्यांनीं ब्राह्मणांना देखील लाजवलें. लाखों स्त्रियांनीं शुभ्र साड्या परिधान करून दीक्षा घेतली. त्या दिवशीं व्यापाऱ्यांच्या लाखों शुभ्र साड्या खपल्या. त्यामध्यें बुद्धानें त्याच्या काळी एका व्यापाऱ्यावर केलेल्या आपल्या वंशजांच्या उपकारांचें ऋण त्यांनीं फेडलें कीं नफा कमावला तें मला माहित नाहीं. पण ही महत्वाची घटना घडल्यामुळें—कोट्यावधी लोकांनीं भारतांत बुद्धधर्माची दीक्षा घेतल्यामुळें, सर्वजण जागे झाले. सरकार जागें झालें, आणि सगळीकडे बुद्धधर्माची चर्चा होऊं लागली.

तेव्हां मग प्रश्न असा येतो कीं बुद्धाचें म्हणणें काय ? याच्यावर मतभेद निर्माण झाले. संघ म्हणजे काय ? रिपु म्हणजे काय ? असे नानातऱ्हेचे वाद सुरू झाले. आणि कोणताहि महापुरुष निवर्तल्यानंतर त्याच्या तत्त्वज्ञानाविषयीं असेच वाद निर्माण होत असतात. बुद्धाचें निर्याण झाल्यानंतर अवघ्या ७५ वर्षांनीं त्याचा पट्टशिष्य आनंद याच्यावर बुद्धाने खरें काय सांगितले ते सांगण्याची पाळी आली. तेव्हां असे वाद होतात. शिवाय प्रत्येक खंडांत बुद्धधर्माचा इतिहास व कामगिरी निरनिराळी आहे. म्हणून एका व्याख्यानाच्या थोड्या वेळांत संपूर्णपणें हें तत्त्वज्ञान सांगतां येणार नाही. त्याला चार तास लागतील. तुम्हीं त्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करा. मी फक्त त्याला मदत म्हणून ही प्रस्तावना करीत आहें. कारण बुद्ध तत्त्वज्ञानाने हिंदुस्थानचा व आशिया खंडाचा इतिहास बदलला व त्याला पुढचा मार्ग दाखविला. तेव्हां बुद्धाचें म्हणणें काय तें समजून घेण्यासाठीं आतांचे बौद्ध पुढारी त्याविषयीं काय म्हणतात तें धूनशो

काढण्याचा मी प्रयत्न केला. डॉ. बाबासाहेबांनीं यावर एक ग्रंथ लिहिला. तो कांहीं मला मिळाला नाहीं पण त्यानीं या विषयावर दिलेल्या कांहीं व्याख्यानांचे उतारे मी वाचले. डॉक्टर बाबासाहेबांची व माझी जुनी ओळख. कांहींवेळा आमच्यांत मतैक्य झालें, कांहींवेळां मतभेद झाले. आमची अशी ही चर्चा चालत असे. बुद्धाचा धर्म सांगतांना एका ठिकाणी बुद्धाच्या तत्त्वांची कम्युनिझमचा आद्य प्रणेता मार्क्स यांच्या विचारसरणीशी डॉ. बाबासाहेबांनी तुलना केली होती. ज्यानें अनेक खंडें व्यापून नवीन समाजरचना घडवून आणली असें मार्क्सवादाचें तत्त्वज्ञान आहे. तेव्हां हा मार्क्सवाद बुद्धधर्माविषयीं काय म्हणतो ? मार्क्स व एंगल्स यांनीं सर्व धर्मांचा अभ्यास करून सांगितलें, कीं ऐतिहासिक काळांत समाजांत अस्वास्थ्य निर्माण होऊन समाजाची घडी विघडली, त्यावेळीं त्यांतून मार्ग काढीत असतांना निरनिराळ्या इतिहासकालांत तीन धर्मांचा उदय झाला. बौद्ध, ख्रिश्चन व इस्लाम. हे धर्म जेव्हां जगांत अवतरले तेव्हां जगांत क्रांतीची–फेरबदलाची परिस्थिति निर्माण झाली होती.

आतां, हिंदुधर्माची गोष्ट वेगळी आहे. त्याला कोणी संस्थापकच नाहीं. एक ग्रंथ नाहीं. वेद, संहिता, गीता, महाभारतापासून तों तुकारामाच्या गाथेपर्यंत सर्वच ग्रंथ म्हणजे हिंदूंचे धर्मग्रंथ. हिंदुधर्म तसा धीमा. त्याची वाढच निराळ्या तऱ्हेनें झालेली आहे. अगदीं प्राथमिक आदिमानवापासून तों तहत सरंजामी साम्राज्यापर्यंत होणाऱ्या अवस्थांतरांचा संग्रह म्हणजे हिंदुधर्मसंस्था. त्यांनीं जें जें नवीन निघेल तें आमचेंच म्हणून आत्मसात केलें. बुद्धालासुद्धां आपलाच ठरवून त्यांनीं त्याला अकराव्या अवतारांत बसवून टाकलें. फक्त महंमद पैगंबराला मात्र त्यांना आपल्या अवतारांत बसवतां आलें नाहीं. ती कामगिरी आपण जनसंघ, हिंदुसभा वगैरे मंडळींकडे सोपवूं. तो आपला विषय नाहीं.

दुसरें म्हणजे बुद्ध व मार्क्स यांचें एका मुख्य बाबतींत साम्य आहे. तें म्हणजे दोघांनाहि व्यक्तिगत खाजगी मालमत्तेवर आधारलेली श्रीमंती नको होती. मालमत्तेचा खाजगी संचय वा संग्रह हें समाज-आपत्तीचें मूळ असें दोघेहि मानतात. पण खाजगी मालमत्तेची मार्क्सची व्याख्या बुद्धापेक्षां निराळी होती. बुध्दाचें लक्ष संपत्तीच्या साधनाकडे जाणे शक्य नव्हतें. म्हणून त्याचा भर व्यक्तीवर जास्त. मार्क्सचें लक्ष श्रीमंतीच्या उत्पादनसाधनांवर होतें. असा फरक

होण्याचें कारण असें कीं बुध्दकाळ संपत्तिसाधनांच्या दृष्टीनें दरिद्री होता, तर मार्क्सचा काळ अफाट भांडवलदारी श्रीमंतीचा, उत्पादन वैपुल्याचा होता.

त्यामुळें दोघांचे आचारधर्महि निराळे झाले. दोघांचे समाजक्रांति किंवा परिवर्तनाचे आचारविचार निरनिराळे झाले.

अहिंसा व अपरिग्रहाच्या मार्गानें पिळणुकीचे क्रौर्य कमी करून संपत्ति-संग्रह व समाजविग्रह कमी करण्याच्या व्यक्तिगत मार्गावर बुध्दानें लक्ष केंद्रित केलें.

संपत्तीचें उत्पादन करणाऱ्या पण संपत्तिविहीन कष्टकर्त्यांनें वर्ग-संघ करून राजसत्ता ताब्यांत घ्यावी व संपत्ती उत्पादनाची सर्व साधनें समाजपुरुषाच्या मालकीची करावीत म्हणजे जीवनांतली हिंसा व लोभ हीं नष्ट होतील; शस्त्र-संन्यास, युध्दसंन्यास सर्व जगावर स्थापित होईल व वसुधैव कुटुंबकम् न्यायानें व्यक्तीचे व समाजाचे आचारविचार नियत होतील या विचारानें मार्क्सनें वर्गसंघ नी समाजक्रांतीवर लक्ष केंद्रित केलें.

अडीच हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थान कसा होता ? त्यावेळीं त्याला हिंदुस्थान असें नांव नव्हतें. बुध्दधर्म निर्माण होण्यापूर्वी भारतांतील समाजामध्यें असंतोष नांदत होता. मागासलेपणा होता. एक लोखंडी स्तंभ उभा करायला एक वर्ष लागत असे. संघटित कामगार वर्ग नव्हता. लोक टोळ्याटोळ्यांनीं राहात असत, सूत काढीत असत, शेती करीत, असा तो समाज होता. या समाजांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र असे वर्ग होते. त्यापैकीं ब्राह्मण–क्षत्रिय हे मालक असून सत्ता गाजवीत. उलट वैश्य–शूद्र हे गुलाम असून काबाडकष्ट करीत. बुध्दाच्या अगोदर १४ राज्यें होतीं. बुध्दाच्या वेळीं तीं सर्व एकवटून त्यांचीं ४ साम्राज्यें झालीं व त्यांतून कष्टकऱ्यांची पिळणूक वाढली व राज्ययंत्राच्या हिंसेला ऊत आला. ब्राह्मण–क्षत्रियांनीं सत्ता गाजवायची व शूद्र–वैश्यांची पिळवणूक करायची ही स्थिति चालू होती. राजे लोक किमया व मृगया यांच्यांत दंग असत. चैन करीत आणि मुली पळविण्याचा उद्योग करीत. उदयन राजासारखीं अशीं सुंदर राजकन्या पळविण्याची अनेक उदाहरणें त्या काळच्या संस्कृत नाटकांत आढळतात. यज्ञाच्या व राज्याच्या "लेव्ही"ने जनता पिडलेली होती; या परिस्थितीला कंटाळली होती व त्यांतून बाहेर निघायचा मार्ग शोधीत होती. यावर प्रकाश पाडणारी एक जुनी गोष्ट आहे. एका

ब्राह्मणाच्या मुलाच्या पायांवरून क्षत्रियाचा रथ गेला, तेव्हां तो विव्हळत पडला असतां एक कोल्हा त्याची विचारपूस करूं लागला. मुलगा म्हणाला, "माझ्या पायांवरुन क्षत्रियाच्या रथाचें चाक गेलें. मी निरर्थक झालो. आतां मी आत्महत्त्या करतों." हें ऐकून कोल्हा रागावून म्हणाला, "अरे, आम्हीं जनावरें! आम्हांला चार पाय आहेत. पण आम्हांला वाचा नाहीं. तूं माणूस आहेस. पाय गेले तरी तुला बोलतां येतें. एवढें असून आत्महत्त्या करतोस? माणूस म्हणून जग आणि कार्य कर!"

या गोष्टीचा बोध हाच कीं त्यावेळीं जनता कंटाळलेल्या परिस्थितींत होती. गरीब–श्रीमंत भेद होते. समाजांत असंतोष होता. लोक मार्ग शोधीत होते. **प्रज्ञापारमगीता** ग्रंथामध्यें एका बाईला बुध्दानीं उपदेश केला आहे. बाईनें बुध्दाला प्रश्न विचारला, "मनुष्य जातीला श्रमांतून व दगदगींतून मुक्त कसें होतां येईल?" बुध्दांनीं तिला निर्वाणाचा मार्ग सांगितला. निर्वाणाचा मार्ग म्हणजे काय? ग्रंथांत असें म्हटलें आहे कीं "निर्वाण स्थिति म्हणजे गेंडा कांहीं न करता चिखलांत कसा सुस्थ, विचारविकारविहीन बसतो तशी स्थिति." लेखक उत्तरेच्या बाजूचा. नेपाळच्या तराईत गेंडे पुष्कळ. त्यामुळें तें उदाहरण त्याला सुचलें असेल. पण सांगण्याचा मुख्य मुद्दा असा कीं श्रमांना, दगदगीला कंटाळून लोक स्वास्थ्याची अपेक्षा करीत होते. बुध्दानें त्यांना उठाव दिला. त्यावेळीं साधु पुष्कळ. आजमुध्दां नंदांचा एक साधुसमाज आहे! बुध्दानीं सर्व साधू पारखून घेतले. तपश्चर्या करून पाहिली, पण कांहीं उपयोग होईना. शेवटीं ही समाजपरिस्थिती बदलण्यासाठीं, न्यायाचा मार्ग दाखविण्यासाठीं त्यानें संघ बनवले. नियम तयार केले. कायदे केले. अहिंसा, दया, प्रेम करावे, संपत्तिसंचय करू नये, इत्यादि तत्त्वें घालून दिलीं. गुलामांची मुक्तता केली. दासमुक्तीचीं अनेक उदाहरणें त्यावेळच्या वाङ्मयांत सांपडतात. बुध्दाच्या जातककथा वाचा. त्यामध्यें त्यावेळच्या समाजाचें चित्र सांपडतें. शेतकऱ्यांविषयीं बुध्दाचा नेहमीं विचार चाले. त्यानें अजातशत्रूला विचारलें, "तुझ्या राज्यांत कोण कोण लोक राहातात?" त्यानें जातवार व धंदेवार नांवें सांगितलीं. पण शेतकरी विसरला. तेव्हा बुद्ध म्हणाला, "एकाला विसरलास!– शेतकऱ्याला विसरलास!" – **ललितविस्तार** ग्रंथांत देखील बुध्दाच्या शेतकऱ्यांविषयींच्या जिव्हाळ्याची, मोठेपणाची गोष्ट सांगितली आहे ती वाचा.

बुद्ध हा शाक्यमुनी वंशाचा. त्याचे लिच्छवी गण होते. त्या ठिकाणीं गणांचें राज्य होतें. राजा नव्हता. लोकशाही पद्धतीनें मतदानाची शलाका टाकून प्रमुखाची निवड होत असे. बुद्धानें याच तत्त्वाचा पुरस्कार केला. त्या गणराज्यांत श्रीमंत–गरीब, उच्चनीच भाव नाहीं. म्हणून एकदिल संघटना होती. तशी बुद्धसंघाची संघटना बुद्धानें केली. पुराणांत भीष्माला प्रश्न विचारला, "अशा अराजक गणशाही किंवा लोकशाहीमध्यें सवतासुभा निर्माण होऊन कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत न राहतां सगळ्या ठिकाणी गोंधळ माजेल का?" पण गणराज्याची लोकशाही तशी नव्हती. त्या लोकशाहीमध्यें प्रत्येकजण आपापलें काम काम करीत असतांना सर्वजण एका समाजहिताच्या सूत्रांत बांधले गेलेले असत. तेथे समाजविन्मुख संपत्तिसंग्रहाला फारसा वाव नसे. बहुमतानें सर्व चालावें - जो बहुमत मानत नाहीं, त्याला बाजूला सारण्यांत यावें अशीं गणराज्याचीं तत्त्वें बुद्धानें आपल्या संघाला लावून दिलीं व संघटकांसाठीं कांहीं नियम केले. (१) एका ठिकाणीं एकच दिवस रहा. (२) ठराविक क्षेत्रांत भिक्षा मागा. (३) एका वेळीं एक दिवसाचें अन्न भिक्षा म्हणून घ्या. जास्त नको. (४) वस्त्राचे तीन तुकडे जवळ बाळगा. (५) पावसाळ्यांत फक्त आसरा घ्या. इतरवेळीं मार्गस्थ राहून समाजकार्य करा.

असे संघ नियम घालून देऊन समाजधारणेसाठीं निःस्वार्थी भिक्षूंची एक संघटना त्यानें निर्माण केलीं. थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे हे गणराज्याच्या पद्धतीवर आधारलेले संघ म्हणजेच आजची पार्टी संघटना व भिक्षू म्हणजे फुलटाईमर्स !

अशा रीतीनें बुद्धानें समाजदुःखाला वाचा फोडून त्या दुःखाला खाजगी मालमत्तेचा मोह सोडण्याचा व निर्वाणाचा मार्ग दाखवून, गुलामगिरी नष्ट करणारी दासमुक्तीची चळवळ करून समाजामध्यें अहिंसा, दया, लोभमुक्ती, शांतता, निर्वाण इत्यादींचा प्रचार करण्यासाठीं बुद्धसंघाची निःस्वार्थी संघटना उभी केली. म्हणूनच तो धर्म गुलामगिरीग्रस्त चीन, तिबेट, ब्रह्मदेश इत्यादि ठिकाणीं पसरून त्याची वाढ झाली.

पण कालांतरानें तो धर्म राजेलोकांनीं स्वीकारला व राजमान्यतेबरोबर संघाला धन, देणग्या देणें इत्यादि प्रकार सुरू झाले. संघाच्या क्रान्तिकारक आचरणावर व लोकशाही घटनेवर निर्बंध पडले. बुद्धसंघांत संपत्तिसंचय, अनाचार,

स्वार्थ सुरू झाला. आणि या सर्वांचा संकलित परिणाम होऊन समाजपरिवर्तक धर्माची वाढ खुंटून त्याचा ऱ्हास झाला.

आज संपत्तीचा जुलूम टाळण्यासाठीं प्रत्येकानें लंगोटी नेसून राहण्याची जरूरी नाहीं, किंवा एकाच वेळेचे राशनच फक्त आणावें असा निग्रह करण्याचे कारण नाहीं. आपला शर्ट-धोतर फाडून टाकण्याऐवजीं लाखों शर्टांचे कापड ज्या ठिकाणीं तयार होतें ती गिरण कोणाची, व तिचे समाजीकरण करून खाजगी संपत्तिसंचय कसा नष्ट करावा, असा प्रश्न विचारावा.

समाजाची संपत्ति ज्या ठिकाणीं संचित झाली आहे तीं उत्पादनसाधनें आज भांडवलदारांच्या खाजगी मालकीचीं आहेत. म्हणून बुद्धाच्या शिकवणुकी-प्रमाणें समाजाच्या दु:खाचें, सर्व आपत्तीचें मूळ जी खाजगी मालमत्ता, ती ज्या भांडवलशाहीच्या मालकीची आहे ती भांडवलशाही नष्ट करण्यासांठीं बुद्ध तत्त्वाला मार्क्सवादी तत्त्वज्ञानाची जोड दिल्याशिवाय भागणार नाहीं ! हें काम केवळ मतपरिवर्तन, संन्यास किंवा निर्वाणाच्या मार्गानें होणार नाहीं. त्यासाठीं कम्युनिस्ट तत्त्वज्ञानच स्वीकारणें भाग आहे. खऱ्या बुद्धवादाचे आत्मनिष्ठ, संस्कृतिनिष्ठ, जीवन आचरायचे असेल तर मार्क्सवाद हाच मार्ग आहे ...

खाजगी मालमत्ता नष्ट करणें, मतदानावर आधारलेल्या लोकशाही पद्धतीच्या गणराज्याची स्थापना करणें, गुलामगिरी नष्ट करणें, शांतता प्रस्थापित करणें, व या सर्व कार्यासाठीं लागणारी नि:स्वार्थी अशी एकदिल संघटना उभारणें हीं बुद्धाच्या शिकवणुकीचीं मुख्य सूत्रें आहेत. अशीं समाजधारणेचीं प्रगतिकारक सूत्रें सांगण्याऱ्या बुद्धधर्माची दीक्षा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनीं आपल्या लक्षावधि अनुयायांना दिली याबद्दल मी त्यांचे आभार मानतों. हीं सूत्रें घेऊन व त्याला मार्क्सवादाची जोड देऊन, आधुनिक जमान्यांत खाजगी मालमत्ता जिच्या ताब्यांत आहे ती भांडवलशाही समाजपद्धति नष्ट करणें हेंच बुद्धजन व आपणां सर्वांसमोरील आजचें कार्य आहे. या मार्गानेंच खऱ्याखुऱ्या बुद्ध-धर्माचें " शील " प्रस्थापित होऊन समाज सुखी होईल !

# मातृभूमीच्या रक्षणासाठीं पुढें व्हा !

*चिनी आक्रमणांतून उद्भवलेल्या परिस्थितीचा विचार करण्यासाठीं अखिल भारतीय ट्रेड युनियन काँग्रेसनें तांतडीनें आपल्या जनरल कौन्सीलची बैठक बोलाविली. ही बैठक नवी दिल्ली येथें नोव्हेंबर १६–१७–१८,१९६२ रोजीं भरली. अ. भा. ट्रे. यु. काँ. चे जनरल सेक्रेटरी या नात्यानें कॉ. डांगे यांनीं 'देशांतील आणीबाणीची परिस्थिति व तीबाबत कामगारवर्गाचा कर्तव्यें' यासंबंधीं या बैठकींत जे विचार व्यक्त केले त्यांचा हा विस्तृत गोषवारा.*

आज आपण जिची चर्चा करणार आहोंत ती परिस्थिति अतिशय गंभीर आहे. देशांत राष्ट्रीय आणिबाणीची स्थिति जाहीर करण्यांत आली आहे व नेहमींचें सामाजिक, आर्थिक व राजकीय जीवन संपूर्णपणें विस्कळीत झालेलें आहे. या गोष्टीवरूनच परिस्थितीचें गांभीर्य स्पष्ट होईल.

राष्ट्रीय आणिबाणि जाहीर करण्यांत आली म्हणजे अर्थातच बरेचसे सर्वसाधारण घटनात्मक हक्कहि तात्पुरते तहकूब करण्यांत आले. एकच गोष्ट तहकूब करण्यांत आलेली नाहीं आणि ती म्हणजे लोकसभा ( पार्लमेंट ). खरें म्हणजे अशा परिस्थितींत सर्वसाधारणपणें लोकसभेचा पहिला बळी पडतो. पण आपली लोकसभा अद्याप काम करीत आहे. युद्धाची परिस्थिति असूनहि आणि राष्ट्रीय आणिबाणि जाहीर करण्यांत आली असूनसुद्धां लोकसभेचें कार्य चालू आहे. लोकसभेचें अधिवेशन झालें आणि अनेक गोष्टींचा विचारहि झाला.

आतां राष्ट्रीय आणिबाणि जाहीर केल्यामुळें कामगारवर्गावर तिचा परिणाम होणारच. राष्ट्रीय आणिबाणीशीं कामगारवर्गाचा फार निकटचा संबंध आहे. कामगारवर्गाला फार कठीण भूमिका पार पाडावी लागणार आहे. त्या भूमिकेसंबंधीं मी थोडक्यांत चर्चा करणार आहे. थोडक्यांत असें मी मुद्दामच म्हणतों. कारण निरनिराळ्या राज्यांतून तुम्हांला आलेले अनुभव व सर्व राज्यांचे अहवाल ऐकल्यावर त्यासंबंधीं सविस्तर चर्चा करायला मला अधिक आवडेल. परंतु कांहीं गोष्टी आतांच स्पष्ट झाल्या आहेत, आणि त्यावरचे माझे कांहीं विचार मी संक्षेपानें मांडतों.

राष्ट्रीय आणिबाणीचें स्वरूप काय आणि ती कशामुळें निर्माण झाली? एक कामगार संघटना या नात्यानें ह्या प्रश्नाचें उत्तर आपल्या अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसनें द्यायला पाहिजे. राजकीय पक्षांनीं ह्या प्रश्नाचें उत्तर दिलेलें आहे. पण आपणसुद्धां त्यासंबंधी आपलें मत सांगितलेंच पाहिजे. राष्ट्रीय आणिबाणीची परिस्थिति निर्माण करणाऱ्या घटनांसंबंधीं आपला दृष्टिकोन काय आहे हें अ. भा ट्रे. यु. कॉंग्रेसनें स्पष्ट करून सांगितलेंच पाहिजे.

आणि तो प्रश्न आहे भारत—चीन सरहद्दीचा, त्या सरहद्दीवर झालेल्या आक्रमणाचा, आपल्या प्रदेशाच्या एकात्मतेच्या भंगाचा, आपल्या प्रदेशावर झालेल्या आक्रमणाचा आणि जवळजवळ युद्धाची परिस्थिति निर्माण झाली त्याचा. युद्धाची अधिकृतपणें घोषणा करण्यांत आलेली नाहीं, परंतु युद्धाच्या परिस्थितींतून उद्भवणाऱ्या साऱ्या गोष्टी ह्या देशांत घडून आल्या आहेत.

ज्याला आपण चीनचें आक्रमण म्हणतो त्यामुळें ही युद्धाची परिस्थिति निर्माण झाली आहे. त्या सगळ्या चर्चेंत जायची कांहीं जरूरी आहे का? मला नाहीं वाटत अशी जरूरी आहे. अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसच्या जनरल कौन्सिलनें गेल्या वर्षीं ह्या प्रश्नावर एक निवेदन संमत केलें होतें. त्या निवेदनानंतर आजमितीपर्यंत अनेक घटना झालेल्या आहेत.

## मूलभूत प्रश्न

**प्रश्न असा आहे : ह्या आपल्या देशाला उत्तरेच्या बाजूला कांहीं सरहद्द आहे कीं नाहीं? कारण दुसरा देश—तो भांडवलदारी देश असो, समाजवादी देश असो किंवा कम्युनिस्ट देश असो—तो देश म्हणतो, "आम्हीं तुमची सरहद्द मान्य करीत नाहीं." दुसरे कुणीतरी ती सरहद्द मान्य करीत**

नाहींत म्हणून आपल्या देशाला उत्तरेला सरहद्दच नाहीं असें आपण भारतीय लोक म्हणूं शकतो कां ? असें म्हणणें विलक्षण हास्यास्पद होईल.

आपल्या देशाला स्वतःची सरहद्द नाहीं असें तुम्हीं एकदां गृहीत धरलें कीं त्याचा अर्थ काय होतो ? तुमच्यापुरती कां होईना, परंतु देशाला निश्चित सरहद्द आहे हेंच तुम्हीं मानत नसाल तर मग सरहद्द ओलांडण्याचा प्रश्नच निर्माण होत नाहीं. जर सरहद्द ओलांडली गेली नसेल तर प्रादेशिक एकात्मतेचा भंग व आक्रमण होऊं शकत नाहीं. जर प्रादेशिक एकात्मतेचा भंग झाला नसेल, तर राष्ट्रीय संरक्षणाचा प्रश्नच निर्माण होत नाहीं; आणि राष्ट्रीय आणिबाणीहि निर्माण होऊं शकत नाहीं.

आणिबाणीची परिस्थिति निर्माण व्हायचें मूलभूत कारण तुम्हांला मान्य असल्याशिवाय तुम्हीं राष्ट्रीय आणिबाणीची परिस्थिति मान्य करूं शकणार नाहीं आणि आणिबाणींतून उद्भवणाऱ्या कार्याची जबाबदारीहि स्वीकारूं शकणार नाहीं.

राष्ट्रीय आणिबाणीचें कारण भारत सरकारनें सांगितलेलें आहे एवढ्या-साठीं तें अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसनें तसेंच मान्य करावें, असें नाहीं. तुमच्यावर हल्ला झाला आहे असें तुम्हीं कबूल केल्याशिवाय संरक्षणाची आवश्यकता तुम्हांला मान्य करतां येणें शक्य नाहीं. हल्ला झाला नसेल तर संरक्षणाचा प्रश्नच कोठें येतो ? आणि जी सरहद्द हल्लेखोरांनीं ओलांडली असें आपण म्हणतो, अशी सरहद्दच मुळांत अस्तित्वांत नसेल तर आपल्यावर हल्ला झाला असेंहि तुम्हांला म्हणतां येणार नाहीं.

म्हणून अशी सरहद्दरेषा अस्तित्वांत आहे हें तुम्हांला कबूल केलेंच पाहिजे. आणि म्हणूनच सरहद्दरेषेपासून सुरुवात करून आक्रमणाचा विचार करा किंवा उलटपक्षीं विचार करा. एवढें नक्की कीं, सरहद्दरेषा आणि आक्रमण ह्या चर्चेच्या मुख्य गोष्टी होतात. तसें नसेल तर आपल्या देशाचें संरक्षण इत्यादी बाबतींतील आपल्या कर्तव्यांचा प्रश्नच निर्माण होत नाहीं, हें उघड आहे.

म्हणून कांहीं निश्चित प्राथमिक भूमिका आपल्याला मान्य असतील तरच संरक्षणकार्याची जबाबदारी स्वीकारण्याचा नंतरचा प्रश्न उत्पन्न होतो. ही भूमिका-च तुम्हांला मान्य नसेल तर औद्योगिक संधि आदिबाबतचे सर्व ठराव तुम्हांला फेटाळून लावावे लागतील व ज्यांनीं ते मान्य केले त्या पुढारीपणाला ठपका द्यावा लागेल.

कांहीं लोक म्हणतील, " राज्यकर्त्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गानें मानलेली आणिबाणी ही अपरिहार्यपणें व सक्तीनें, देशांतील कामगारवर्गाच्या दृष्टीनेंहि आणिबाणी असतेच असें नाहीं. "

खरें आहे. पण देश हा कांहीं केवळ राष्ट्रीय भांडवलदारवर्गाचा नसतो. तर तो जनतेचा व जनतेचा एक भाग या नात्यानें कामगारवर्गाचाहि असतो.

मी औद्योगिक तहाला मान्यता देतों ती कांहीं संधिसाधु धोरणांतून नाहीं. तुमच्या वर्गाची जी भूमिका आहे त्या भूमिकेची तर्कशुद्ध परिणति औद्योगिक तह स्वीकारण्याच्या भूमिकेंतच होते. कामगारवर्गाचे राष्ट्रविषयक हितसंबंध हे इतर वर्गांच्या हितसंबंधांशीं आज मिळतेजुळते आहेत, हें जर कामगारवर्ग मान्य करणार नसेल तर तुम्हीं औद्योगिक तह मान्य करूंच शकणार नाहीं.

## इतिहासावर एक नजर

१९४८ सालीं अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसच्या प्रतिनिधींनीं औद्योगिक तह मान्य केला होता व त्यावेळच्या परिस्थितींत असा तह मान्य करण्याला ज्यांचा विरोध होता अशांनीं तो मान्य करणाऱ्यांची चांगलीच पूजा बांधली होती.

वीस वर्षांपूर्वी, १९४३ सालीं, अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसला अशाच परिस्थितीला तोंड द्यावें लागलें होतें. युद्ध, युद्धप्रयत्नांना पाठिंबा, उत्पादनवाढ संप-तहकुबी वगैरे-हेच प्रश्न त्यावेळेसहि निर्माण झाले होते. अ. भा. ट्रे. यु. काँग्रेस त्याकाळीं एकजुटीची संघटना होती--म्हणजे त्या संघटनेंत कम्युनिस्टांचेंहि बहुमत नव्हतें, इतरांचेंहि बहुमत नव्हतें, व सर्व मतांचे लोक त्या संघटनेंत होते. युद्धाला पाठिंबा देणारा ठराव त्यावेळेस अ. भा. ट्रे. यु. काँग्रेस अधिकृतपणें पास करूं शकली नाहीं. कारण, अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसच्या घटनेप्रमाणें तो ठराव पास व्हायला ७५ टक्के मतदान ठरावाच्या बाजूनें व्हायला हवें होतें. आणि प्रत्यक्षांत ठरावाला फक्त ६० टक्के प्रतिनिधींचाच पाठिंबा होता. तेव्हां ह्या प्रश्नावर प्रत्येक युनियनला आपलें धोरण ठरविण्याचें स्वातंत्र्य होतें. कम्युनिस्ट नेतृत्वाखालील सर्व युनियन्सनीं युद्धप्रयत्नांना पाठिंबा दिला. इतकेंच नाहीं तर कधीं ऐकले नव्हते असे अफाट नफे भांडवलदारवर्ग त्यावेळेस कमावित असतांहि या युनियन्सनीं बोनसची मागणी धसास लावावयाचें नाकारलें.

त्यावेळीं अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसमधील कांहीं युनियन्सचें असें मत होतें कीं, " एका समाजसत्तावादी देशावर, म्हणजे सोवियत युनियनवर फॅसिझमनें ( नाझी जर्मनीनें) हल्ला केला असल्यानें सोवियत युनियनचें रक्षण करणें आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचें कर्तव्य ठरतें. " म्हणून त्या युनियन्सनीं युद्धप्रयत्नांना, उत्पादनवाढीला व संप तहकुबीला पाठिंबा दिला. ही भूमिका बरोबर होती कीं चूक होती याची चर्चा मला करावयाची नाहीं. तत्वतः ती भूमिका बरोबर होती. पण व्यवहारामध्यें तिची अंमलबजावणी चुकीची झाली. मला तुम्हांला एवढीच आठवण द्यावयाची आहे कीं युद्धाला पाठिंबा द्यावयाचा कीं नाहीं, राष्ट्रीय आणिबाणीची परिस्थिति व त्या परिस्थितींत कामगारवर्गाचीं कर्तव्यें इत्यादि प्रश्नांना तोंड द्यावयाची आपल्या ट्रेड युनियन चळवळींच्या इतिहासांत ही पहिलीच वेळ नाहीं.

त्यावेळेस साम्राज्यवादी भांडवलदारवर्गाचें राज्य आपल्या देशावर होतें. राष्ट्रीय भांडवलदारवर्ग, कामगारवर्ग--सारें राष्ट्रच त्यावेळीं त्या सरकारविरुद्ध होतें; सरकारी युद्धप्रयत्नांना विरोध करीत होतें. आज परिस्थिती बदलली आहे. राष्ट्रीय भांडवलदारवर्गाकडे सरकार आहे आणि आपला देश स्वतंत्र आहे.

## गुंतागुंतीचा प्रश्न

आज वीस वर्षांनंतर, म्हणून एका अगदीं निराळ्याच परिस्थितींत हा युद्धाचा प्रश्न आपल्यासमोर आला आहे. शिवाय एका समाजसत्तावादी देशाशींच हा झगडा निर्माण झाल्यामुळें हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे.

" त्या देशाला ( चीनला )समाजसत्तावादी म्हणणेंच चूक आहे " असें म्हणणारे कांहीं लोक असतील; आणि तसें म्हणणारे कैक आहेतहि. पण मला त्यांचें म्हणणें पटत नाहीं. तो देश समाजसत्तावादीच आहे. कारण तेथील उत्पादनसाधनांची मालकी भांडवलदारवर्गाकडे नाहीं, आणि त्या देशांत उत्पादनाचे मूलभूत हितसंबंध समाजवादीच आहेत. समाजसत्तावादी देश आक्रमण करूं शकतो काय किंवा त्यानें आक्रमण करावें काय, हा प्रश्न तो देश समाजसत्तावादी आहे कीं नाहीं या प्रश्नापासून वेगळा काढला पाहिजे.

समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेला स्वतःचा विकास करण्यासाठीं आक्रमण करण्याची आवश्यकता नसते. कारण अशा अर्थव्यवस्थेत उत्पादनसंबंध असे

कांहीं लोक म्हणतील, "राज्यकर्त्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गानें मानलेली आणिबाणी ही अपरिहार्यपणें व सक्तीनें, देशांतील कामगारवर्गाच्या दृष्टीनेंहि आणिबाणी असतेच असें नाहीं."

खरें आहे. पण देश हा कांहीं केवळ राष्ट्रीय भांडवलदारवर्गाचा नसतो. तर तो जनतेचा व जनतेचा एक भाग या नात्यानें कामगारवर्गाचाहि असतो.

मी औद्योगिक तहाला मान्यता देतों ती कांहीं संधिसाधु धोरणांतून नाहीं. तुमच्या वर्गाची जी भूमिका आहे त्या भूमिकेची तर्कशुद्ध परिणति औद्योगिक तह स्वीकारण्याच्या भूमिकेंतच होते. कामगारवर्गाचे राष्ट्रविषयक हितसंबंध हे इतर वर्गाच्या हितसंबंधांशीं आज मिळतेजुळते आहेत, हें जर कामगारवर्ग मान्य करणार नसेल तर तुम्हीं औद्योगिक तह मान्य करूंच शकणार नाहीं.

## इतिहासावर एक नजर

१९४८ सालीं अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसच्या प्रतिनिधींनीं औद्योगिक तह मान्य केला होता व त्यावेळच्या परिस्थितींत असा तह मान्य करण्याला ज्यांचा विरोध होता अशांनीं तो मान्य करणाऱ्यांची चांगलीच पूजा बांधली होती.

वीस वर्षांपूर्वी, १९४३ सालीं, अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसला अशाच परिस्थितीला तोंड द्यावें लागलें होतें. युद्ध, युद्धप्रयत्नांना पाठिंबा, उत्पादनवाढ संप–तहकुबी वगैरे–हेच प्रश्न त्यावेळेसहि निर्माण झाले होते. अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस त्याकाळीं एकजुटीची संघटना होती--म्हणजे त्या संघटनेंत कम्युनिस्टांचेंहि बहुमत नव्हतें, इतरांचेंहि बहुमत नव्हतें, व सर्व मतांचे लोक त्या संघटनेंत होते. युद्धाला पाठिंबा देणारा ठराव त्यावेळेस अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस अधिकृतपणें पास करूं शकली नाहीं. कारण, अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसच्या घटनेप्रमाणें तो ठराव पास व्हायला ७५ टक्के मतदान ठरावाच्या बाजूनें व्हायला हवें होतें. आणि प्रत्यक्षांत ठरावाला फक्त ६० टक्के प्रतिनिधींचाच पाठिंबा होता. तेव्हां ह्या प्रश्नावर प्रत्येक युनियनला आपलें धोरण ठरविण्याचें स्वातंत्र्य होतें. कम्युनिस्ट नेतृत्वाखालील सर्व युनियन्सनीं युद्धप्रयत्नांना पाठिंबा दिला. इतकेंच नाहीं तर कधीं ऐकले नव्हते असे अफाट नफे भांडवलदारवर्ग त्यावेळेस कमावित असतांहि या युनियन्सनीं बोनसची मागणी धसास लावावयाचें नाकारलें.

त्यावेळीं अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसमधील कांहीं युनियन्सचें असें मत होतें कीं, " एका समाजसत्तावादी देशावर, म्हणजे सोवियत युनियनवर फॅसिझम्नें ( नाझी जर्मनीनें) हल्ला केला असल्यानें सोवियत युनियनचें रक्षण करणें आंतरराष्ट्रीय कामगारवर्गाचें कर्तव्य ठरतें. " म्हणून त्या युनियन्सनीं युद्धप्रयत्नांना, उत्पादनवाढीला व संप तहकुबीला पाठिंबा दिला. ही भूमिका बरोबर होती कीं चूक होती याची चर्चा मला करावयाची नाहीं. तत्वतः ती भूमिका बरोबर होती. पण व्यवहारामध्यें तिची अंमलबजावणी चुकीची झाली. मला तुम्हांला एवढीच आठवण द्यावयाची आहे कीं युद्धाला पाठिंबा द्यावयाचा कीं नाहीं, राष्ट्रीय आणिबाणीची परिस्थिति व त्या परिस्थितींत कामगारवर्गाचीं कर्तव्यें इत्यादि प्रश्नांना तोंड द्यावयाची आपल्या ट्रेड युनियन चळवळीच्या इतिहासांत ही पहिलीच वेळ नाहीं.

त्यावेळेस साम्राज्यवादी भांडवलदारवर्गाचें राज्य आपल्या देशावर होतें. राष्ट्रीय भांडवलदारवर्ग, कामगारवर्ग--सारें राष्ट्रच त्यावेळीं त्या सरकारविरुद्ध होतें; सरकारी युद्धप्रयत्नांना विरोध करीत होतें. आज परिस्थिती बदलली आहे. राष्ट्रीय भांडवलदारवर्गाकडे सरकार आहे आणि आपला देश स्वतंत्र आहे.

## गुंतागुंतीचा प्रश्न

आज वीस वर्षांनंतर, म्हणून एका अगदीं निराळ्याच परिस्थितींत हा युद्धाचा प्रश्न आपल्यासमोर आला आहे. शिवाय एका समाजसत्तावादी देशाशींच हा झगडा निर्माण झाल्यामुळें हा प्रश्न आणखी गुंतागुंतीचा झाला आहे.

" त्या देशाला ( चीनला )समाजसत्तावादी म्हणणेंच चूक आहे " असें म्हणणारे कांहीं लोक असतील; आणि तसें म्हणणारे कैक आहेतहि. पण मला त्यांचें म्हणणें पटत नाहीं. तो देश समाजसत्तावादीच आहे. कारण तेथील उत्पादनसाधनांची मालकी भांडवलदारवर्गाकडे नाहीं, आणि त्या देशांत उत्पादनाचे मूलभूत हितसंबंध समाजवादीच आहेत. समाजसत्तावादी देश आक्रमण करूं शकतो काय किंवा त्यानें आक्रमण करावें काय, हा प्रश्न तो देश समाजसत्तावादी आहे कीं नाहीं या प्रश्नापासून वेगळा काढला पाहिजे.

समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेला स्वतःचा विकास करण्यासाठीं आक्रमण करण्याची आवश्यकता नसते. कारण अशा अर्थव्यवस्थेंत उत्पादनसंबंध असे

असतात कीं, त्यामुळें अरिष्ट निर्माण होत नाहीं व उत्पादन आणि त्याचा विनियोग यांतहि अडथळा येत नाहीं. भांडवलदारी उत्पादनसंबंध मात्र अरिष्टें निर्माण करतात व उत्पादन आणि त्याचा विनियोग यांतहि अडथळा निर्माण करतात. आक्रमण ही समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेची चालना देणारी शक्ती नसते. म्हणून आक्रमणाची, म्हणजे संपत्तीचा सांठा करण्यासाठीं दुसरे प्रदेश आणि लोकसंख्या गिळंकृत करण्याची, आपली अर्थव्यवस्था किंवा वर्ग समृद्ध करण्यासाठीं जिंकलेल्या लोकांना पिळून वरकड मूल्यें मिळविण्याची- यांपैकीं कांहींहि करण्याची समाजसत्तावादी अर्थव्यवस्थेला मुळीं गरजच नसते.

पण एकाद्या समाजवादी सरकारचें आक्रमण करण्याइतपत वांकडे पाऊल पडेल कीं नाहीं याबद्दल मी साशंक आहे. समाजसत्तावादी देशाचें सरकार ही एक गोष्ट आहे आणि समाजसत्तावादी अर्थव्यवस्था ही वेगळी गोष्ट आहे. पण ह्या गोष्टींची चर्चा आपल्याला आतांच करण्याची जरूरी नाहीं.

कांहीं लोकानीं आतां प्रश्न उपस्थित केला आहे तो असा : आपल्या देशांत राष्ट्रीय भांडवलदारवर्गाचे सरकार आहे. या कारणास्तव आपल्या-सारख्या देशाचा कामगारवर्ग इतर देशांतील कामगारवर्गाशीं असलेले आंतरराष्ट्रीय संबंध लक्षांत घेऊन, स्वदेशाचे संरक्षण करावयाला नकार देऊं शकतो काय ? समाजसत्तावादासाठीं झगडणाऱ्या कामगारवर्गानें देशावर आक्रमण होत आहे एवढ्यासाठीं राष्ट्रीय भांडवलदारवर्गाशीं असलेले आपले मूलभूत विरोधी संबंध बदलावे काय ?

## विकासाची दिशा

आमच्या मतें एका विशिष्ट दिशेनें आपला विकास होत होता. ह्या दिशेंत एकाएकीं बदल घडून आला. कोणता हा बदल ?

हें युद्ध सुरू होण्यापूर्वी ह्या विकासाची दिशा, पिळले जाणारे व पिळवणूक करणारे यांच्यांत जो साधारण झगडा ( संघर्ष ) होत असतो, त्या झगड्याची होती. सर्वसाधारण झगडा म्हणजे कोणत्याहि भांडवलदारी देशांत जो सुरू असतो तो ! आपला देश नुकताच स्वतंत्र झालेला असून, विकास पावणारा भांडवलदारी देश आहे. म्हणून त्याचें स्वातंत्र्य मजबूत करणें हें आपलें आर्थिक उद्दिष्ट ठरतें. स्वातंत्र्याचा पाया मजबूत करण्याचें हें कार्य

अर्थव्यवस्थेंत सरकारी व खाजगी उद्योगधंद्यांची वाढ करणें इत्यादी गोष्टींच्या पायावर होत आहे. परंतु या संपूर्ण विकासाचा रोख भांडवलशाही पुष्ट करण्याचा आहे, असें आपण अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसच्या ठरावांत म्हटलें आहे.

हा समाजसत्तावाद आहे असें आपण म्हटलें नाहीं. हा भांडवलशाहीचा विकास आहे व तिचा आणि आपला परस्परविरोध आहे. असें असलें तरी आपल्या कामगार-संघटनेनें त्याच भांडवलशाहीविषयीं विशिष्ट भूमिका घेतली. राष्ट्रीय भांडवलदारवर्गाला विशिष्ट विकासाच्या क्षेत्रांत कांहीं पाठिंबा देण्याचें आपण मान्य केलें.

कुठल्याहि शुद्ध भांडवलदारी किंवा साम्राज्यवादी राष्ट्रांत घेतां येणार नाहीं, अशी ही वैशिष्ट्यपूर्ण भूमिका आपण घेतली. साम्राज्यवादी राष्ट्रांतील कामगार-संघटनांपुढें हे असे आपल्यासारखे प्रश्न उद्भवत नाहींत. भांडवलशाहीशीं सहकार्य करण्याचा प्रश्नच तेथें निर्माण होत नाहीं. कारण तेथील भांडवलशाहीचें राष्ट्रीय स्वरूप संपुष्टांत आलेलें असतें व तीं पिळवणूक करणारी व वसाहतींना गुलामगिरींत जखडणारी साम्राज्यवादी भांडवलशाही बनलेली असते.

म्हणूनच, नवीनच स्वतंत्र झालेल्या व स्वतंत्रपणें विकास पावणाऱ्या देशांत आढळणारे हे परस्परसंबंध वेगळे असतात. अशा देशाचा विकास हा साम्राज्यवादविरोधी घटक असतो. त्या देशाच्या राष्ट्रीय भांडवलशाहीची वाढ होणें हासुद्धां साम्राज्यवादविरोधी घटक असतो. म्हणून असल्या राष्ट्रीय भांडवलशाहीशीं कामगारसंघटनांनीं विशिष्ट संबंध प्रस्थापित केले. आणि कोणत्याहि अलिप्ततावादी, नवीन स्वतंत्र झालेल्या व विकास पावणाऱ्या देशांत असेच संबंध असले पाहिजेत.

याच संबंधाचा दुसरा भाग हा कीं, तुम्हीं भांडवलशाहीचाच विकास घडवून आणित असल्यानें तो विकास स्वागतार्ह असला तरी भांडवलशाहीच्या चौकटींत कामगारवर्गाच्या हितसंबंधांचें संरक्षण करणाऱ्या कामगारसंघटना या नात्यानें, तुम्हांला भांडवलदारवर्गाच्या हल्ल्यांपासून कामगारवर्गाचें संरक्षण करावें लागतें.

स्वातंत्र्याला पाठिंबा देत असतांना, स्वातंत्र्य आणखीं दृढ करीत

असतांना, पंचवार्षिक योजनांना व उद्योगधंद्यातील सरकारी विभागाला पाठिंबा देत असतांना आपण आपल्या कामगारवर्गाचें पिळवणुकीच्या तीव्र हल्ल्यांपासून रक्षण करतों. समाजसत्तावादाच्या स्थापनेनेंच पिळवणूक नाहींशी करतां येईल. वरकड मूल्यांचा (नफा) अधिकाधिक भाग मिळविण्याआठीं भांडवलदार कामगारवर्गावर हल्ले करतात. त्यांना कमींतकमी भाग देऊन आपलें जीवनमान सुधारणें हा आपला प्रयत्न असतो. नवीनच विकास पावणाऱ्या व साम्राज्यवाद-विरोधी भूमिका अद्यापी पार पाडणाऱ्या देशांत सर्वसाधारण काळांत भांडवल-दारांचे आणि आपले संबंध हे असे असतात.

पण ह्या संबंधांत–या नवीन परिस्थितींत अचानक बदल घडून येतो. कारण सबंध राष्ट्राला ग्रासणारा एक नवीनच प्रश्न उत्पन्न झालेला असतो.

### आपल्या दृष्टिकोनांतील बदल

स्वतःपुरतेंच नव्हे तर जगामध्यें कोठेंहि युध्द नको असणारा, शांततावादी देशांच्या गोटांत असलेला, साम्राज्यवाद्यांशीं संलग्न नसलेला व भांडवलशाहीच्या रोखानें विकास पावणारा असा अर्धविकसित देश एका समाजवादी देशाबरोबर तंट्यांत गोंवला जातो. शांततामय मार्गांनीं मिटण्याऐवजीं हा तंटा भडकतो व असें स्वरूप धारण करतो कीं, त्या समाजवादी देशाच्या फौजा आपल्या देशाची सरहद्द ओलांडून आपल्या देशांत शिरतात व युध्दाची परिस्थिति निर्माण होते.

म्हणून, अशी युध्दाची परिस्थिति निर्माण झाल्यानंतर कामगारवर्गासमोर एक प्रश्न अपरिहार्यपणें उभा ठाकतो. " सबंध देश युध्दाच्या विशिष्ट परिस्थितींत असतांना राज्यकर्ता वर्ग असलेल्या राष्ट्रीय भांडवलशाहीशीं माझे संबंध काय राहातील ? " भांडवलशाही व नवी राष्ट्रीय समस्या यांबाबतचा आपला दृष्टिकोन आपल्याला नव्यानें ठरवावा लागेल.

या प्रश्नाचें उत्तर असेंच द्यावें लागेल–होय ! मालक व कामगार यांच्या नेहमींच्या वर्गसंघर्षाच्या संबंधांत आपल्याला बदल करावा लागेल.

कांहीं विशिष्ट राष्ट्रीय परिस्थितींत ह्या मूलभूत वर्गीय संबंधांत बदल करणें आवश्यक असतें ही गोष्ट अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसला तत्वतः मान्य आहे का ? ह्याचें उत्तर अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसमधील बहुसंख्य युनियन्सनीं वीस वर्षांपूर्वीच होकारार्थी देऊन ठेविलें आहे. आणि तेंहि अशा राष्ट्रीय परिस्थितींत कीं, जेव्हां

ह्या मूलभूत वर्गीय संबंधात त्यावेळीं किती मर्यादेपर्यंत बदल करावा याविषयीं गंभीर शंका निर्माण झाल्या होत्या.

आणि वर्गीय संबंधांत आवश्यक झालेले हे बदल करणें ह्यालाच औद्योगिक तह म्हणतात. भांडवलशाहीशीं असलेल्या आपल्या संबंधांत बदल करण्याची आवश्यकता आहे असें आपण एकदां मान्य केलें कीं, औद्योगिक तह हाच ह्या राजकीय भूमिकेचा औद्योगिक संबंधांमध्यें अर्थ होतो—हेंच माझ्या भूमिकेचें तर्कशास्त्र आहे.

आणि म्हणूनच आपण म्हणतों कीं, राष्ट्रीय आणिबाणीच्या, संरक्षणाच्या व युध्दसदृश अशा या परिस्थितींत अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसमधील ट्रेड युनियन्सनीं भांडवलदारवर्गाशीं असलेल्या आपल्या नेहमींच्या संबंधांत, कार्यपध्दतींत व कामगारवर्गाच्या प्रश्नांकडे पहाण्याच्या दृष्टिकोनांत तात्पुरता बदल करावा. आपण हा बदल करायचा प्रथम मान्य करूं व मग तो कसा करायचा हें ठरवूं. हा बदल आपण किती मर्यादेपर्यंत करूं शकतों ?

कांहीं लोक हा प्रश्न मांडतात तो असा : कामगारवर्गाची पिळवणूक, भांडवलदारांमधील स्पर्धा, कामगारवर्गावर लादलेलीं ओझीं व नफेबाजी–हे प्रश्न राष्ट्रीय आणिबाणीमुळें नाहींसे झाले आहेत काय ? आतां यापुढें नफा मुळींच घेणार नाहीं किंवा सर्व नफा राष्ट्राच्या मालकीचा होईल, अशी घोषणा राष्ट्रीय भांडवलदारवर्ग करतो आहे का ? नाहीं, तो तशी घोषणा करीत नाहीं. हे पिळवणूक करणारे ( भांडवलदार ) जोपर्यंत ही अट कबूल करीत नाहींत तोपर्यंत मलाहि, त्यांच्या होणाऱ्या हल्ल्यांपासून मी माझें कामगार या नात्यानें रक्षण करूं नये, ही अट मान्य नाहीं. त्यांनींसुध्दां माझ्यावर हल्ले करायचें धोरण बदललेंच पाहिजे.

## आपलें मूलभूत कार्य

पण वर्गीय संबंध बदलण्याबाबतच्या त्यांच्या व आपल्या दृष्टिकोनांत फरक आहे. बोलूनचालून भांडवलदारवर्गच तो ! पिळवणूक करणाऱ्यापेक्षां पिळल्या जाणाऱ्या वर्गाच्या दृष्टीनें राष्ट्रीय कर्तव्याचा प्रश्न हा अधिक मूलभूत व खराखुरा असतो. पिळवणूक करणाऱ्या प्रस्थापित वर्गापेक्षां कामगारवर्ग, शेतकरी व मध्यमवर्ग हे युद्धाच्या परिस्थितींत वेगळ्या तऱ्हेनें वागतात.

आपल्या देशाचें संरक्षण करण्याच्या कार्यांत आपण अटी घालीत नाहीं. कारण देश आपला, जनतेचा असतो. आपल्यापुढें असलेल्या आजच्या परिस्थितींत 'हा देश आपला आहे कीं राष्ट्रीय भांडवल्दारवर्गाचा आहे'— असा प्रश्न विचारून त्यावर आपल्या वागणुकीचा निर्णय घ्यावा, असें माझें मत नाहीं. हा देश जनतेचा आहे.

आजच्या परिस्थितींत आपल्या देशाचें संरक्षण हें केलेंच पाहिजे. कारण, इतरांना गुलाम करण्यासाठीं युद्ध करणारा तो साम्राज्यवादी देश नाहीं, तो साम्राज्यवाद्यांशीं बांधला गेलेला देश नाहीं आणि जागतिक वर्चस्व मिळविण्यासाठीं फॅसिझम्‌ची उभारणी केलेला व सर्व लोकशाही चिरडून टाकलेला तो भांडवल्दारी देशहि नाहीं. जेव्हां अशी स्थिती असते तेव्हां, राष्ट्राच्या संरक्षणाबाबतची जबाबदारी व कार्यें यांमध्यें जनतेनें भागिदारी केली पाहिजे. कारण देश तिचा असतो. आणि अशा परिस्थितींत राज्यकर्त्या भांडवलशाहीशीं कितीहि भांडण असलें तरी देशाचें रक्षण करणें हें कामगारवर्गाचें नैतिक व राजकीय कर्तव्य होऊन बसतें.

म्हणून अशा परिस्थितींत आपल्यावर जर कुणी युद्ध लादलें तर त्या युद्धाला राष्ट्रीय युद्ध मानणें हें भारतीय कामगारवर्गाचें कर्तव्य आहे. मग आपल्यावर हल्ला करणारा कोणीहि असो–तो पाकिस्तान असो अगर चीन असो, साम्राज्यवादीधार्जिणा असो अगर समाजसत्तावादी असो. ह्या परिस्थितींत देशांतील सर्व वर्गांनीं देशाचें संरक्षण केलेंच पाहिजे. आणि हें आपलें राष्ट्रीय कर्तव्य आणि जबाबदारी आम्हींसुद्धां–म्हणजे पिळला जाणारा वर्गहि मान्य करतो.

अर्थात्‌च हें सारें न्याय्य युद्धाच्या बाबतींत बरोबर आहे. सध्यां चालू असलेली लढाई ही संपूर्ण अर्थानें युद्ध आहे असें नाहीं, आणि आपलें सरकारहि तिला "युद्ध" म्हणत नाहीं. तरीपण ( सरहद्दीवरची ) संपूर्ण आघाडी भडकून पेटली आहे. अशा युद्धसदृश परिस्थितींत आम्हीं आमचें कर्तव्य मान्य करतों. कारण, हा देश आमचा आहे असें आम्हीं मानतों. त्याचें संरक्षण केलेंच पाहिजे. आपण पाठिंबा देत असलेलें सरकार हें कांहीं प्रतिक्रांतिकारी किंवा साम्राज्यशाहीधार्जिणे नाहीं आणि येथील भांडवलशाही हीसुद्धां साम्राज्यवादाला शरण गेलेली भांडवलशाही नाहीं.

आम्हीं देशाचें संरक्षण करूं असें आपण म्हणतो. कारण, आपल्या

देशाची बाजू न्याय्य आहे आणि आपल्या प्रतिपक्षाची बाजू अन्यायाची आहे.

म्हणूनच, देशाच्या संरक्षणासाठीं, भांडवलशाहीशीं असलेल्या आपल्या वर्गीय संबंधांत बदल करायला कामगारवर्ग मान्यता देतो आणि औद्योगिक तह स्वीकारतो. अर्थात् हा तह या विशिष्ट परिस्थितीपुरताच असतो.

## जबाबदाऱ्या उभयपक्षीं आहेत

असें असलें तरी, औद्योगिक तहाच्या चौकटीमध्यें राहून आपण त्यांना विचारतों, तुम्हीं नफा कमावणें बंद करणार नाहीं व भाववाढीलाहि आळा घालणार नाही म्हणून संरक्षणाची प्रमुख शक्ती या नात्यानें आम्हींसुद्धां आमच्या हिताचें रक्षण केलें पाहिजे. सरकार ही जबाबदारी मान्य करणार कीं नाहीं ? सरकारनें पिळवणूक संपूर्ण नाहींशी करावी, अशी आमची अपेक्षा नाहीं. तो समाजसत्तावाद होईल. परंतु आमचें सरकारकडे एवढेंच मागणें आहे कीं निदान त्यांनीं राष्ट्रीय भांडवलदारवर्गाला काबूंत ठेवावें आणि आमच्यामुळें राष्ट्रीय संरक्षण धोक्यांत येत असेल तर आम्हांलाहि काबूंत ठेवावें.

म्हणून राष्ट्रीय संरक्षण करण्याचें कार्य पार पाडण्यासाठींसुद्धां कामगारांच्या हिताचें एका मर्यादेपर्यंत रक्षण करणें आवश्यक आहे.

औद्योगिक तह हा एका अर्थानें "वर्गसमन्वय" आहे. पण हा वर्गसमन्वय समजूनउमजून स्वीकारलेला असतो. कारण विकास पावणारें, शांतताप्रेमी असें स्वतंत्र राष्ट्र धोक्यांत आल्यामुळें दोन्ही वर्गांपुढें एकच परिस्थिति उभी राहिलेली असते. हें आपण नीट समजून घेतलें नाहीं तर आपल्याला काम करतां येणार नाहीं आणि योग्य डावपेंचहि करतां येणार नाहींत.

भांडवलदारवर्गाचें सरकार हें भांडवलदारवर्गापेक्षां अधिक शहाणें असतें. कारण, भांडवलदार वर्गाच्या सरकारला सर्व वर्गांचे हितसंबंध समजूं शकतात, परंतु भांडवलदारवर्गाच्या प्रत्येक विभागाला फक्त आपल्या विभागाचेच हितसंबंध समजूं शकतात. म्हणून राष्ट्रीय भांडवलदारवर्गाचें सरकार कधींकधीं भांडवलदारवर्गाच्या कांहीं विभागांवर आघातहि करतें. सोन्याच्या वायदेबाजारावर सरकारनें बंदी घातली, हें आपण पाहिलेंच आहे. सट्टेबाजीविरुद्ध हमखास यश देणारी ही उपाययोजना नव्हे. परंतु त्यादृष्टीनें निदान कांहीं पावलें तरी तें टाकीत आहे.

## बँका ताब्यांत घेणें आवश्यक

भांडवलदारवर्गाच्या सरकारनें भांडवलदारवर्गाच्या कांहीं विभागांविरुद्ध उपाययोजना केली कीं, कामगारवर्गानें त्याचा फायदा घेतला पाहिजे व अशा आणखी उपाययोजनांसाठीं सरकारवर दबाव आणला पाहिजे. उदाहरणार्थ, सर्व बँका सरकारनें ताब्यांत घ्याव्या अशी आपण मागणी केली पाहिजे. बँका ताब्यांत घेऊन चलनांतील सर्व पैशांवर नियंत्रण ठेवलें व पैसा खर्च करण्याची व गुंतविण्याची दिशा यांवरहि नियंत्रण ठेवलें, तरच किंमतींवर नियंत्रण राखता येईल. एकटी रिझर्व्ह बँक ह्या सर्व गोष्टींवर नियंत्रण राखूं शकत नाहीं. बँका ताब्यांत घेणें म्हणजे त्यांचें राष्ट्रीयकरण करणें नव्हे–तर पैसा गुंतवण्यावर व वस्तूंच्या किंमतींवर राष्ट्रहिताच्या दृष्टीनें नियंत्रण ठेवतां यावें एवढ्या मर्यादित हेतूनेंच त्यांचा कारभार ताब्यांत घेणें.

त्याचप्रमाणें बँकांच्या गुप्त राखीव निधींचें संरक्षणरोख्यांत रूपांतर करा अशीहि मागणी आपण करावी.

राष्ट्रहिताला पोषक असें नियंत्रण अर्थव्यवस्थेवर ठेवतां यावें म्हणूनच कामगार संघटनांतर्फें आपण या आर्थिक क्षेत्रांशीं संबंधित सूचना करतो. आणि आमच्या वांट्याची जबाबदारी म्हणून उत्पादनाचा ओघ अप्रतिहत चालेल; अशी हमी देतों. तंट्याचे प्रश्न वगैरे निर्माण झाल्यास नेहमींच्या काळाप्रमाणें उत्पादनकार्यांत खंड पडतां कामा नये.

**पण त्यांची–दुसऱ्या बाजूची–जबाबदारी काय आहे ? कामगारांचें खरेंखुरें वेतन ( रिअल वेजीस् ) घटतां कामा नये आणि कामगार ज्यामुळें चिथावले जातील असें कोणतेहि आचरण होतां कामा नये. आम्हीं आमची जबाबदारी पार पाडतों आणि तुम्हीं तुमची जबाबदारी पार पाडा. आम्हीं मान्य केलेल्या औद्योगिक तहाच्या ठरावाचें हेंच सार आहे. त्या ठरावाला अर्थातच तुमची मंजुरी आवश्यक आहे.**

त्या ठरावाची मांडणी नेहमींच्या भांडवलदारी नोकरशाही पद्धतीनें करण्यांत आलेली आहे. त्या सभेची कार्यपद्धतीहि तशीच होती, हें मी मजूर-मंत्र्यांना लिहिलेल्या माझ्या पत्रावरून तुमच्या ध्यानांत येईल. इंटकनें आणि हिंद मजदूर सभेनें त्या परिषदेंत आपल्याबरोबर एकत्र बसायला नकार दिला. ती

परिषद बोलावण्यांत आली ती आपल्याच पुढाकारानें. मीच ह्या बाबतींत पंतप्रधानांना पत्र लिहून कळविलें होतें कीं, आघाडीवरील संरक्षणाचा अर्थ म्हणजे जनतेचें देखील संरक्षण असा झाला पाहिजे. भांडवलदारवर्गाला युद्ध म्हणजे स्वतः आणखी गबर होण्याची संधीच असते. तो त्यांचा मूलभूत नियमच आहे. पण त्यावर त्यांनीं नियंत्रण ठेवलें पाहिजे.

## त्रिपक्ष परिषद

नोव्हेंबरच्या तीन तारखेला ती त्रिपक्ष परिषद भरली. त्या परिषदेंत सद्यः परिस्थितीविषयीं भाषण करून मजूरमंत्री श्री. नंदा म्हणाले, " आपण सर्वांनीं मान्य केलेला असा हा ठराव आहे. " त्यानंतर दहा मिनिटांत परिषद आटो-पली. कुणाचींहि भाषणें झालीं नाहींत अगर उपसूचनाहि मांडल्या गेल्या नाहींत. म्हणून आमचें मत आम्हीं नोंदवून ठेविलें कीं, तत्त्वतः तो ठराव चांगला असला तरी त्याची अंमलबजावणी करतांना कमालीच्या अडचणी येतील.

पहिली अडचण अशी कीं, आमच्या प्रतिस्पर्ध्यांना राष्ट्रीय संरक्षणापेक्षांहि आमच्या अस्तित्वाबद्दल अधिक चिंता वाटते. आम्हाला नाहींसे करून टाकण्याची ही ईश्वरानें दिलेली संधी आहे, असें ते म्हणतात. आम्हीं औद्योगिक तह मान्य केला तर आम्हांला चिथावणी द्यावयाची, व अमान्य केला तर बदनाम करावयाचें असें हें धोरण आहे.

आतां दोन प्रकारच्या धरपकडी होतील. पहिला प्रकार म्हणजे विशिष्ट मतांसाठीं म्हणून होणारी धरपकड आणि दुसरा प्रकार म्हणजे, घातपात इत्यादि आरोप ठेवून ट्रेड युनियन कार्यकर्त्यांची होणारी धरपकड. देशांतील कांहीं मंडळी आपल्याला चिथावण्याचा प्रयत्न करतील. अशी चिथावणी देऊन त्यांना अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसमधील ट्रेड युनियन्स नष्ट करायच्या आहेत. ह्या प्रयत्नांत त्यांना मालकवर्गहि मदत करील.

औद्योगिक तह मान्य केल्यामुळें आपल्या अडचणी आतां वाढतील. कामगारांचे पगार, बडतर्फी इत्यादींबाबत कांहीं संरक्षक तरतूदी नसल्यामुळें, नुसती " संप करूं नका व वाटेल ती किंमत देऊन उत्पादनाचें ठरविलेलें उद्दिष्ट पूर्ण करा "—ही घोषणा फार काळ काम देईल असें वाटत नाहीं. कारण

अगदीं साधें आहे, आणि तें हें कीं यानें कामगारांवर हल्ला करावयास--त्यांची दमछाक करावयास मालक धजूं लागतील. पूर्वीच्या लढ्याबद्दल कामगारांवर सूड घेण्याचा मालकवर्गाला यानें मोह होऊं लागेल. म्हणून उत्पादन व तंट्यांचें निराकरण हें अशा पद्धतीनें करीत राहावें लागेल कीं, जेणेंकरून हा आपल्या संपूर्ण हितसंबंधांवर हल्ला नाहीं, हें कामगारवर्गाला पटेल.

**कामगारवर्गाच्या कांहीं हितसंबंधांवर या काळांत अनिष्ट परिणाम होणारच. जनतेला मुळींच झळ लागूं न देतां युद्ध लढविलें जाऊं शकणार नाहीं. पण ती झळ किती लागूं द्यावयाची यालाहि कांहींतरी मर्यादा हवी.**

हें काम आपण ढोंगीपणानें करूंया नको. आपली समजत सरळ आणि स्पष्ट असावी या मताचा मी आहे. पगारकपात मी मान्य करतों का ? नाहीं. परंतु याचा अर्थ असा नाहीं कीं, पगारासंबंधी दिलेल्या मागील संप-नोटीसा मी उद्यां हातांत घ्यावा, त्यांच्यावर चळवळ करावी आणि संप सुरू करावा.

त्याबरोबरच जादा उत्साहहि दाखवूं नये. १९४४ च्या जुन्या जमान्यांत, मागील महायुद्धाच्या काळांत पूर्वीच्या जी. आय. पी. रेल्वेच्या मुंबईतील वर्कशॉपमध्यें असेंच एक फाजील उत्साहाचें उदाहरण घडलें. त्या वर्कशॉपमधील एका सुतारानें सहा महिन्यांचें त्याचें काम अवघ्या सहा आठवड्यांत पूर्ण केलें. उत्पादन वाढविण्याच्या धोरणाची आपण इमानेइतबारें अंमलबजावणी करतोंय असें त्याला वाटलें. आपण एवढें झटपट केलेलें काम इतर खात्यांमध्यें जिरविलें जाईल कीं नाहीं आणि सबंध कारखान्याच्या उत्पादनयोजनेंत तें बरोबर बसतें कीं नाहीं–ह्याचा विचार करण्याचा त्रास त्या बिचाऱ्यानें करून घेतला नाहीं.

मी माझ्या पाठिंब्याला अटी घालीत नाहीं. मी माझी जबाबदारी, माझें कर्तव्य बिनशर्त मान्य करतों. पण त्याचबरोबर दुसऱ्यांनींहि त्यांची जबाबदारी, त्यांचें कर्तव्य मान्य करावें अशी विनंति करतों. सुदैवानें भारत सरकारनें आपली जबाबदारी अमान्य केलेली नाहीं आणि त्यापैकीं कांहीं गोष्टी मान्यहि केल्या आहेत. कामगारांच्या वास्तव पगारांत झालेल्या घटीच्या प्रश्नाकडे आम्हीं जेव्हां सरकारचें लक्ष वेधलें तेव्हां सरकारनें सांगितलें कीं, पगारासंबंधीच्या सर्वच दाव्यांचा विचार नाकारला जाणार नाहीं व नाकारला जाऊं शकणारहि नाहीं.

कालच मला बातमी मिळाली कीं, लोखंड व पोलाद धंद्यांतील वेतन-मंडळानें हंगामी निवाडा ( इंटेरिम ॲवॉर्ड ) जाहीर केला आहे. राष्ट्रीय

आणिबाणी असल्याचें कारण सांगून, कामगारांच्या मागण्यांकडे सरकार डोळे-झांक करणार नाहीं हें यावरून दिसून येतें. कांहींतरी समतोल राखण्यांत येतो, असें दिसतें.

आपल्या अधिकारांचें रक्षण करण्यासाठीं–असा समतोल निर्माण करण्यासाठीं आपण प्रयत्न करूं या. कामगारांचे वास्तव पगार ( रिअल वेजीस ) वाढतील अशी माझी अपेक्षा नाहीं. पण सध्यां आहेत ते वास्तव पगार तरी सुरक्षित ठेवण्याची उपाययोजना केली पाहिजे. म्हणून लोखंड व पोलाद धंद्यांतील पगार–समितीचा हंगामी निवाडा ही स्वागत करण्याजोगी गोष्ट आहे.

आणि मला वाटत नाहीं कीं, तो निवाडा वाईट आहे. सध्यांच्या परिस्थितींत मी म्हणेन कीं तो चांगला निवाडा आहे. परंतु कामगारांचे पगार गोठवून धरण्याचा व आपल्या दाव्यांबाबत कामगारवर्गाला हतबल करण्याचा प्रयत्न भांडवलदारवर्ग करणारच नाहीं, अशी हमी मी अर्थात्‌च देत नाहीं.

## कार्यपद्धतीचे प्रश्न

आतां आपल्या संघटनेच्या कार्यपद्धतीबाबतच्या कांहीं प्रश्नांविषयीं मी बोलतों. ह्या काळांत, आपल्या कार्यपद्धतींत पुष्कळच बदल करावा लागेल. सगळया कॉम्रेडस्‌ना माझी एक विनंति आहे कीं, जे कांहीं घडतें आहे त्याची अचूक माहिती कॉम्रेडस्‌नीं तत्परतेनें आम्हांला दिली पाहिजे. तरच आम्हीं निरनिराळया राज्यांतील केंद्रांना मदत करूं शकूं, व राज्यांतील केंद्रेंहि आम्हांला योग्य धोरण ठरविण्यांत मदत करूं शकतील. नाहींतर आपण चुकीच्या मार्गाला लागूं, व हैराण होऊं; आणि आपले विरोधक आपल्याला दुर्बल करण्याचा प्रयत्न करतील. म्हणून मध्यवर्ति केंद्र कार्यक्षम राखणें याला सगळ्यांत जास्त महत्त्व आहे. मध्यवर्ती केंद्र असें मी म्हणतों, तेव्हां अखिल भारतीय मध्यवर्ती केंद्र व प्रत्येक राज्यांतील मध्यवर्ती केंद्र–अशीं दोन्हीं माझ्या डोळ्यांपुढें असतात.

## समारोप

आजच्या संघर्षाच्या किंवा युद्धसदृश परिस्थितींत कामगारवर्गानें व ट्रेड युनियन संघटनांनीं कोणत्या धोरणांचा अवलंब करावा याचें दिग्दर्शन करण्याचा

मी प्रयत्न केला. मी पूर्वीच सांगितल्याप्रमाणें ट्रेड युनियन संघटनांना निश्चित राजकीय भूमिका घेण्याचें टाळतां येणें शक्य नाहीं. आतांपर्यंत, तुम्हांला ठाऊकच आहे, ट्रेड युनियन संघटनांनीं राजकारणांत लुडबूड करूं नये म्हणूनच प्रयत्न झाले आहेत.

ट्रेड युनियन संघटनांनीं केवळ काम व वेतन परिस्थितीपुरतेंच पहावें, अशी सरकारची व मालकांची धडपड असे. सरकारला राजकारण चाले. पण तें पंचवार्षिक योजना अंमलांत आणण्याच्या कामीं त्यांना मदत करण्यापुरतेच. या पलिकडे ट्रेड युनियन्सनीं राजकारणाच्या फंदात पडतां नये, असा त्यांचा कटाक्ष असे.

**आज परिस्थिति पालटली आहे. सर्वांच्याच शिरावर राष्ट्रीय संकटाची तलवार लटकत आहे. आपला देश दुसऱ्या देशाशीं जवळ-जवळ युद्धांतच गुंतला आहे, अशा परिस्थितींत एकंदरींत पहातां ट्रेड युनियन्सना युद्धतयारींत भाग घ्यावाच लागेल, म्हणजेच राजकारणांत भाग घ्यावा लागेल.**

युद्धतयारी म्हणजे केवळ उत्पादन नव्हे. तुमचा दृष्टिकोन, तुमची विचारसरणी, वर्गसंबंधांचें तुमचें आकलन, सरकारशीं संबंध–इत्यादि कितीतरी प्रश्नांचा विचार, ' युद्धाला पाठिंबा द्यायचा कीं विरोध करायचा ' हें ठरवितांना तुम्हांला करावा लागेल.

युद्ध ही कांहीं उत्पादन व संपाच्या प्रश्नांपुरतें लक्ष देऊन भागण्यासारखी चीज नव्हे. संप व उत्पादनाबाबतींतील आपलें धोरण युद्धाच्या प्रश्नाबाबत आमचें राजकीय धोरण कोणतें या प्रश्नाच्या उत्तरावर अवलंबून आहे. म्हणून हा प्रश्न सरळसरळ राजकीय प्रश्न बनतो.

म्हणून प्रश्न असा उपस्थित होतो कीं, आम्हीं राष्ट्रसंरक्षणाच्या प्रयत्नांना पाठिंबा देणार कीं नाहीं ?

अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस व तिच्या झेंड्याखालीं संघटित झालेला कामगार राष्ट्रसंरक्षणाची जबाबदारी उचलणार कीं नाहीं ?

देशावर आक्रमण झालेलें आहे. तें आक्रमण आपल्याला थोपविलें पाहिजे व आक्रमकांना पराभूत केलें पाहिजे असें (ठरावांत) म्हटलें आहे. यांतून उद्भवणाऱ्या युद्धाला आपण तोंड दिलेंच पाहिजे आणि या लढ्यांत कामगारवर्ग व अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस हे दोघेहि राष्ट्रसंरक्षणाचा पक्ष घेऊन उभे आहेत.

जरा आपला दृष्टिकोन नक्की करूं या. आक्रमण झालें आहे, आपल्याला देशाचें संरक्षण केलें पाहिजे, अ. भा. ट्रे. यु. काँग्रेस व कामगारवर्गानें या कार्यांत भाग घेतला पाहिजे, एक बाजू घेऊन ठाम उभे राहिलें पाहिजे—असें आपण मानतो का ? या प्रश्नाचें उत्तर स्पष्ट निःसंदिग्धपणें दिलें पाहिजे. कारण आमच्या समोर उभा ठाकलेला देश एक समाजसत्तावादी देश आहे.

तेव्हां हा प्रश्न कांहीं साधासुधा नाहीं. त्यांत खूप गुंतागुंत आहे. वैचारिक गोंधळ होणें अगदीं साहाजिक आहे. अशा परिस्थितींत कुणाच्या मनाचा गोंधळ उडाला तर ' तुझी देशभक्तीच खतम झाली ' असें म्हणून टर उडवून चालणार नाहीं. संघर्ष सुरूं होतांक्षणीच जर कोणी गडबडला, जर कुणाच्या मनांत कांहीं संशय निर्माण झाले, कांहीं प्रश्न निर्माण झाले तर ते प्रश्न वावगे आहेत असें म्हणून चालणार नाहीं. हा कांहीं ब्रिटन, जपान किंवा अमेरिकेचा हल्ल नव्हे.

## राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रीयवाद

नाहीतरी, ट्रेड युनियन्स या नात्यानें, जगांतील राष्ट्रांची आज तीन गटांत विभागणी झालेली आहे, हें आपण मानतोच. एक गट आहे समाजसत्तावादी राष्ट्रांचा; दुसरा आहे भांडवलदारी राष्ट्रांचा; पण या खेरीज नवस्वतंत्र, अलिप्तता-वादी राष्ट्रांचा तिसराहि एक गट आहे. अर्थात्‌च या राष्ट्रांमधील युद्ध व शांततेच्या प्रश्नाचा विचार संघर्ष कोणत्या राष्ट्रांमध्यें आहे व कशासाठीं आहे या प्रश्नांच्या आधारावरच करावा लागेल.

आपण आहोंत जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनला जोडलेल्या ट्रेड युनियन्सचे पुढारी. ही संस्था नेहमींच युद्ध व शांततेच्या प्रश्नाची, आंतरराष्ट्रीयत्वाच्या दृष्टीनें ट्रेड युनियन्सच्यां संबंधाची चर्चा करीत आलेली आहे; तेव्ह हे प्रश्न टाळणें आपल्याला तरी शक्य नाहीं.

ह्या प्रश्नांचीं उत्तरें देण्याची अ गण टाळाटाळ केली तर मग आपण राजकारणशून्य, वर्गदृष्टिकोनहीन लोकांच्या सदरांत जाऊन पडूं; आज एक, तर उद्यां भलतीच गोष्ट करणारे संधिसाधु ठरूं. तेव्हां आपण हे प्रश्न उपस्थित करतो ते कांहीं निव्वळ शुष्क तात्त्विक चर्चेचे विषय म्हणून करीत नाहीं. ' संप कीं संपबंदी ' हा प्रश्न, आपलें सर्वसाधारण धोरण प्रत्यक्ष वस्तुस्थितीला आपण

कसें लागूं करणार, या प्रश्नांतून निर्माण होणारा—या प्रश्नाचाच महत्त्वाचा अंगभूत भाग आहे.

म्हणून मी या बैठकीच्या अगदीं सुरुवातीलाच हा तात्विक भूमिकेचा, राजकारणाचा प्रश्न उपस्थित केला होता. कारण एक ट्रेड युनियन संघटना या नात्यानेंसुद्धां तत्त्वविचाराशिवाय आपलें चालायचें नाहीं. युद्ध व शांततेचा प्रश्न, भिन्नभिन्न समाजव्यवस्था मानणाऱ्या राष्ट्रांतील परस्परसंबंधांचा प्रश्न आणि या प्रश्नांवरील आपल्या तात्विक भूमिकेंतून निर्माण होणारा कामगारवर्गाच्या व त्यांच्या ट्रेड युनियन्सच्या कर्तव्यांचा प्रश्न—यांसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर निश्चित तात्विक भूमिका घेतल्याशिवाय आपलें चालणार नाहीं.

**तेव्हां पुन्हां एकदां थोडक्यांत सांगावयाचें झालें तर आक्रमण झालें आहे ही गोष्ट अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसला मान्य आहे. एका समाजसत्तावादी देशाकडून सर्वैव अनपेक्षित असें हें आक्रमण आहे ही गोष्ट अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसला सांगणेंच भाग आहे.**

एका समाजसत्तावादी देशानें असें का वागावें याचीं कारणें मात्र अ. भा. ट्रे. यु. काँग्रेस देऊं शकत नाहीं. ते आम्हांला माहीत नाहीं. असें त्या देशानें वागावयास नको होतें. परंतु तो तसा वागला हेंहि खरें.

पण कामगार जरूर विचारतील : 'काय हो, पण त्यांनीं असें कां करावे हें तुम्हीं लोक आम्हांला तरी सांगणार कीं नाहीं ?' 'भारतानें चीनवर हल्ला केला; म्हणून त्यांना आपलें संरक्षण करणें भाग पडलें आणि म्हणून ते आमच्यावर चालून आले' असें म्हणणारे कांहीं लोक जरूर आहेत. याचा अर्थ आक्रमण भारताकडून झालें व त्यावर प्रतिहल्ला चीनकडून झाला असा होतो. हें खोटें व दुटप्पी बोलणें झालें. प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळें सांगते.

भारताच्या बाजूनें आक्रमण झालेलें नाहीं. मी कांहीं तपशीलांत शिरूं इच्छित नाहीं. चीननें एक राजकीय चोपडें प्रसिद्ध केलें आहे. 'भारताचे पुढारी अगदीं पहिल्यापासून, म्हणजे स्वातंत्र्योत्तरच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व काळापासूनहि आक्रमक वृत्तीचे आहेत, आक्रमक आहेत' असें या चोपड्यांत म्हटलें आहे.

या चोपड्याचें नांव आहे : 'नेहरूंच्या तत्त्वज्ञानाबाबत आणखी कांहीं.'

जरूर वाचलें पाहिजे प्रत्येकानें तें! आपली भूमिका किती अचूक आहे याची मनोमन खात्री पटण्यासाठीं त्याचा चांगला उपयोग होईल. या चोपड्यांत एक विधान केलें आहे; काय तर म्हणे 'नेहरू हे अगदीं पहिल्यापासून विस्तारवादी आहेत.' हो! विस्तारवादीच म्हटले पाहिजेत—अगदीं जन्मल्या-पासून! कारण ते कधीं वाढायचे (विस्तारायचे) थांबलेच नाहींत!

या पुस्तिकेंत मला एक मोठी नवलाची गोष्ट आढळली. नेहरूंचेच उतारे घ्यायचे पण साफ वेगळें वळण देऊन!—काय तर, साऱ्या आशियावर हुकमत गाजविणारें भारत हें एक महान् सत्ताधारी राष्ट्र बनावें, असे विचार फार पूर्वीपासून त्यांच्या डोक्यांत घोळत असत म्हणे. 'भारताचा भांडवलदारवर्ग वृत्तीनें आक्रमक आहे, तो साम्राज्यवादी गोटाला जाऊन मिळालेला आहे; तऱ्हेतऱ्हेच्या साम्राज्यवाद्यांशीं त्यानें आपली सोयरीक जोडली आहे' ही आहे या चोपड्यांतील भूमिका!

समाजसत्तावादी चीनचे गाढे विद्वान शहाणेसुते पुढारी असलें कांहींतरी लिखाण लिहितील असें मला कधींच वाटलें नाहीं. हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. आणि या प्रकरणांत भारतांतील भांडवलशाहीविरुद्ध दंड थोपटून उभा आहे तो समाजवाद आहे असा विचार करून तोंडांत मिठाची गुळणी धरून, ह्या प्रश्नाला आपण बगल देऊं शकत नाहीं. भारतीय भांडवलशाही ही भांडवलशाहीच आहे, पण ती विस्तारवादी नाहीं. तिचा जन्म झाला तो साम्राज्यवादविरोधी शक्ती म्हणून. म्हणून तिचें असें चित्र रंगविणें साफ चूक, अनाठायी आहे.

भारतांत परकीय भांडवलात झालेल्या वाढीचा उल्लेख, या पुस्तिकेंत १९४८ नंतरहि भारत देश साम्राज्यवाद्यांच्या मगरमिठींत अडकलेला आहे, हें सिद्ध करण्यासाठीं पुरावा म्हणून करण्यांत आला आहे. जणूं कांहीं तदनंतर भारतांत काडीइतकाहि बदल घडून आलेला नाहीं. अशी छान पुस्तिका आहे ही. त्यांचें किती बरोबर आहे हे दाखविण्यासाठीं लिहिल्या गेलेल्या या पुस्तिकेनें आमचें किती बरोबर आहे हेंच दिसून येतें. चिनी लोकांतच एक म्हण आहे: 'कसें नसावें तें दाखवा कीं आपोआपच कसें असावें तें कळतें.' तिचाच नमुना आहे हा.

तुम्हीं कदाचित म्हणाल: आपल्या समोरील विषयाशीं याचा कांहीं

कसें लागूं करणार, या प्रश्नांतून निर्माण होणारा—या प्रश्नाचाच महत्त्वाचा अंगभूत भाग आहे.

म्हणून मी या बैठकीच्या अगदीं सुरुवातीलाच हा तात्त्विक भूमिकेचा, राजकारणाचा प्रश्न उपस्थित केला होता. कारण एक ट्रेड युनियन संघटना या नात्यानेंसुद्धां तत्त्वविचाराशिवाय आपलें चालायचें नाहीं. युद्ध व शांततेचा प्रश्न, भिन्नभिन्न समाजव्यवस्था मानणाऱ्या राष्ट्रांतील परस्परसंबंधांचा प्रश्न आणि या प्रश्नांवरील आपल्या तात्त्विक भूमिकेंतून निर्माण होणारा कामगारवर्गाच्या व त्यांच्या ट्रेड युनियन्सच्या कर्तव्यांचा प्रश्न—यांसारख्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर निश्चित तात्त्विक भूमिका घेतल्याशिवाय आपलें चालणार नाहीं.

**तेव्हां पुन्हां एकदां थोडक्यांत सांगावयाचें झालें तर आक्रमण झालें आहे ही गोष्ट अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसला मान्य आहे. एका समाजसत्तावादी देशाकडून सर्वथैव अनपेक्षित असें हें आक्रमण आहे ही गोष्ट अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसला सांगणेंच भाग आहे.**

एका समाजसत्तावादी देशानें असें कां वागावें याचीं कारणें मात्र अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस देऊं शकत नाहीं. ते आम्हांला माहीत नाहींत. असें त्या देशानें वागावयास नको होतें. परंतु तो तसा वागला हेंहि खरें.

पण कामगार जरूर विचारतील : 'काय हो, पण त्यांनीं असें कां करावे हें तुम्हीं लोक आम्हांला तरी सांगणार कीं नाहीं ?' 'भारतानें चीनवर हल्ला केला; म्हणून त्यांना आपलें संरक्षण करणें भाग पडलें आणि म्हणून ते आमच्यावर चालून आले' असें म्हणणारे कांहीं लोक जरूर आहेत. याचा अर्थ आक्रमण भारताकडून झालें व त्यावर प्रतिहल्ला चीनकडून झाला असा होतो. हें खोटें व दुटप्पी बोलणें झालें. प्रत्यक्ष वस्तुस्थिती वेगळें सांगते.

भारताच्या बाजूनें आक्रमण झालेलें नाहीं. मी कांहीं तपशीलांत शिरूं इच्छित नाहीं. चीननें एक राजकीय चोपडें प्रसिद्ध केलें आहे. 'भारताचे पुढारी अगदीं पहिल्यापासून, म्हणजे स्वातंत्र्योत्तरच नव्हे तर स्वातंत्र्यपूर्व काळापासूनहि आक्रमक वृत्तीचे आहेत, आक्रमक आहेत' असें या चोपड्यांत म्हटलें आहे.

या चोपड्याचें नांव आहे : 'नेहरूंच्या तत्त्वज्ञानाबाबत आणखी कांहीं.'

जरूर वाचलें पाहिजे प्रत्येकानें तें! आपली भूमिका किती अचूक आहे याची मनोमन खात्री पटण्यासाठीं त्याचा चांगला उपयोग होईल. या चोपड्यांत एक विधान केलें आहे; काय तर म्हणे 'नेहरू हे अगदीं पहिल्यापासून विस्तारवादी आहेत.' हो! विस्तारवादीच म्हटले पाहिजेत—अगदीं जन्मल्या-पासून! कारण ते कधीं वाढायचे ( विस्तारायचे ) थांबलेच नाहींत!

या पुस्तिकेंत मला एक मोठी नवलाची गोष्ट आढळली. नेहरूंचेच उतारे घ्यायचे पण साफ वेगळें वळण देऊन!—काय तर, साऱ्या आशियावर हुकमत गाजविणारें भारत हें एक महान् सत्ताधारी राष्ट्र बनावें, असे विचार फार पूर्वीपासून त्यांच्या डोक्यांत घोळत असत म्हणे. 'भारताचा भांडवलदारवर्ग वृत्तीनें आक्रमक आहे, तो साम्राज्यवादी गोटाला जाऊन मिळालेला आहे; तऱ्हेतऱ्हेच्या साम्राज्यवाद्यांशीं त्यानें आपली सोयरीक जोडली आहे' ही आहे या चोपड्यांतील भूमिका!

समाजसत्तावादी चीनचे गाढे विद्वान शहाणेसुर्ते पुढारी असलें कांहींतरी लिखाण लिहितील असें मला कधींच वाटलें नाहीं. हा दैवदुर्विलासच म्हटला पाहिजे. आणि या प्रकरणांत भारतांतील भांडवलशाहीविरुद्ध दंड थोपटून उभा आहे तो समाजवाद आहे असा विचार करून तोंडांत मिठाची गुळणी धरून, ह्या प्रश्नाला आपण बगल देऊं शकत नाहीं. भारतीय भांडवलशाही ही भांडवलशाहीच आहे, पण ती विस्तारवादी नाहीं. तिचा जन्म झाला तो साम्राज्यवादविरोधी शक्ती म्हणून. म्हणून तिचें असें चित्र रंगविणें साफ चूक, अनाठायी आहे.

भारतांत परकीय भांडवलात झालेल्या वाढीचा उल्लेख, या पुस्तिकेंत १९४८ नंतरहि भारत देश साम्राज्यवाद्यांच्या मगरमिठींत अडकलेला आहे, हें सिद्ध करण्यासाठीं पुरावा म्हणून करण्यांत आला आहे. जणूं कांहीं तदनंतर भारतांत काडीइतकाहि बदल घडून आलेला नाहीं. अशी छान पुस्तिका आहे ही. त्यांचें किती बरोबर आहे हे दाखविण्यासाठीं लिहिल्या गेलेल्या या पुस्तिकेनें आमचें किती बरोबर आहे हेंच दिसून येतें. चिनी लोकांतच एक म्हण आहे : 'कसें नसावें तें दाखवा कीं आपोआपच कसें असावें तें कळतें.' तिचाच नमुना आहे हा.

तुम्हीं कदाचित म्हणाल : आपल्या समोरील विषयाशीं याचा कांहीं

संबंध नाहीं. त्याचा संबंध या दृष्टीनें आहे कीं जर आपण तत्त्वनिष्ठ भूमिका घेतली नाहीं तर आपल्या ठरावांत नंतर येणाऱ्या सर्व गोष्टी निरर्थक होतील. व हें तत्त्व कोत्या दुरभिमानी राष्ट्रवादाचें नाहीं तर साम्राज्यवादविरोधी पुरोगामी राष्ट्रवादाचें आहे.

## पुरोगामी राष्ट्रवादाची भूमिका

कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीयवादाबाबत आपली भूमिका कायम राखत असतां अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस असंलग्न, स्वतंत्र देशाच्या पुरोगामी साम्राज्यवादविरोधी राष्ट्रवादाचा कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीयवादाशीं मेळ घालते.

श्रमजीवीवर्गाच्या आंतरराष्ट्रीयवादाच्या तत्वांशीं आम्हीं एकनिष्ठ राहूं, असें जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनचें म्हणणें आहे व जर अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसनें या तत्वांचा त्याग केला तर अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसचा त्याग करणें हें कामगारवर्गाचें कर्तव्य आहे.

तेव्हां आपण जें कांहीं करीत आहोंत तो संकुचित राष्ट्रवाद आहे कीं त्याला आंतरराष्ट्रीयवादाशीं कधींहि विसंगत नसलेल्या पुरोगामी राष्ट्रवादाचें अधिष्ठान आहे, याबाबत आपल्या तत्वज्ञानाच्या मर्यादा न ओलांडतां, आपल्या मनांत यत्किंचितहि संशय असतां कामा नये.

आपण कामगारवर्गाला संधिसाधुपणाची शिकवण द्यायला निघालो आहोंत असा याचा मुळींच अर्थ नाहीं. कांहीं तात्कालिक फायदा पदरांत पाडून घेण्यासाठीं, केवळ संधिसाधुपणासाठीं तुम्हीं जर हें करायला निघाला असाल तर तसें करण्यापेक्षां तसें अजिबात न केलेलेंच बरें, ही आहे माझी भूमिका! त्यापेक्षां बेकायदेशीरपणाचा दंडा परवडेल आपल्याला! आपल्या ट्रेड युनियन्सना अनेकवार बेकायदा ठरविण्यांत आलें आहे. त्याची डर कोणाला?

तेव्हां आमचा राष्ट्रवाद, आमचें राष्ट्रसंरक्षण आणि आमच्या राष्ट्रावर हल्ला झाला असतांना—मग हल्लेखोर कोणी कां असेनात—सरकारला आम्हीं देत असलेला पाठिंबा—या गोष्टी, हल्लेखोर एक समाजसत्तावादी राष्ट्र आहे याच कारणास्तव, पुरोगामी राष्ट्रवाद नव्हे असें ठरत नाहीं. याचा अर्थ

इतकाच कीं एका समाजसत्तावादी देशाच्या सरकारचें चुकलें आहे. मात्र समाजसत्तावादच चुकला असा त्याचा अर्थ मुळींच नव्हे.

समाजसत्तावादी देशाच्या सरकारच्या हातून चूक अशी घडूं शकते काय ? किती बाबतींत तें चुकूं शकतें ? याचें उत्तर 'होय, तें चुकूं शकतें.' अंतर्गत व परराष्ट्र–दोन्ही धोरणांच्या बाबत तें चुकूं शकतें. ही शक्यता नेहमींच असते. समाजसत्तावादी बनलें म्हणजे अचूकतेचें वरदान मिळालें असें नव्हे. आणि ही शक्यताच आज प्रत्यक्ष वस्तुस्थितींत उतरली आहे. साम्राज्यवादी गोटांत नसलेल्या एका देशाशीं संबंध ठेवण्याबाबत एका समाजसत्तावादी सरकारनें चूक केलेली आहे, ही वस्तुस्थिति आहे.

उद्या जर भारत सरकारनें आपलें वासन साम्राज्यवादी गोटांत टाकलें, फॅसिस्ट राजवट सुरू केली, आपलें शांततेचें व अलिप्ततावादाचें धोरण सोडून दिलें, शस्त्रास्त्रें वाढविण्याच्या आणि मुलुखगिरीच्या किंवा आक्रमक युद्धाच्या धोरणाचा अवलंब केला तर मग आमच्या राष्ट्रवादाचें पुरोगामी स्वरूप संपलें असेंच म्हणावें लागेल.

तेव्हां आज माझ्या पुरोगामी राष्ट्रवादांत चूक कांहींच नाहीं. माझें धोरण योग्यच आहे. कांहीं लोक विचारतात "उद्यां जर कांहीं घडलें, तर तुम्हीं आपलें धोरण बदलणार आहांत का ?" 'उद्यां जर कांहीं घडलें' याचा अर्थ काय ? काय घडलें तर ? 'भारतानें आपलें अलिप्ततावादाचें धोरण सोडून दिलें आहे, तो युद्धखोर गोटाला जाऊन मिळाला आहे आणि या धोरणांतून निर्माण होणारीं आवश्यक तीं सर्व पावलें त्यानें टाकलीं आहेत, असा त्याचा अर्थ होतो. परंतु अशा तऱ्हेनें कल्पनेच्य वावड्या उडविण्यांत कांहीं अर्थ नाहीं; तें अनिष्ट आहे. तो झाला दैववाद ! आज जर कशाची गरज असेल तर ती सर्व पुरोगामी शक्तींनीं एकवटून अशा गोष्टी घडूं न देण्याची आहे. हें आहे आजचें कार्य !

भारत हें आज एक पुरोगामी साम्राज्यवादविरोधी राष्ट्र आहे; या राष्ट्रांतील राष्ट्रवाद अद्यापिहि पुरोगामी साम्राज्यवादविरोधी आहे आणि शांतता व शांततामय सहजीवनाच्या पुरस्काराबाबत त्याचें धोरण आंतरराष्ट्रीयवादाचेंच धोरण आहे. या अर्थानें आमच्या राष्ट्रवादाचें आंतरराष्ट्रीयवादाशीं मिळतें-जुळतें आहे. दोन देशांतील भांडणतंटे युद्धाच्या मार्गानें सोडविण्याला विरोध करण्याचें धोरण आंतरराष्ट्रीयवादाचें धोरण आहे.

अलिप्ततावादाच्या एकूणएक भूमिका मूलतः साम्राज्यवादविरोधी भूमिका आहेत आणि म्हणून आंतरराष्ट्रीयवादाच्या भूमिका आहेत. तेव्हां या विवेचनांतून आपल्या बाबतींत आपला राष्ट्रवाद अजूनहि पुरोगामी राष्ट्रवादच आहे, आणि त्याचा आंतरराष्ट्रीयवादाशी मुळीच विरोध येत नाहीं—या दोन गोष्टी तुमच्या दृष्टोत्पत्तीस आल्या असतील.

आमच्या कामगारवर्गानें, आमच्या अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसनें आक्रमण करण्याच्या, परराष्ट्रांशीं युद्ध करण्याच्या दुष्कर्मांत आणि आपल्या जनतेवर फॅसिस्ट सत्ता लादण्याच्या कामांत आपल्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गाला पाठिंबा दिला तर त्यांना जागतिक ट्रेड युनियन फेडरेशन या जागतिक संघटनेमध्यें, कामगारवर्गाच्या आंतरराष्ट्रीय आंदोलनामध्येंच नव्हे तर समाजसत्तावादामध्येंहि स्थान उरणार नाहीं.

आमच्या भूमिका बरोबर आहेत, आणि भारतीय कामगारवर्गाचा आम्हीं सांगतों तो राष्ट्रवाद आणि आमचे टीकाकार सांगतात तो कामगारवर्गाचा आंतरराष्ट्रीयवाद यांमध्यें झुंज लावण्याचा प्रयत्न करणें आणि हे दोन वाद परस्परविरोधी आहेत असें म्हणणें जाणूनबुजून गैरसमज पसरविण्यासारखें आहे—आमच्या म्हणण्याचा संपूर्ण विपर्यास करण्यासारखें आहे.

तेव्हां तुम्हांला खरा राष्ट्रवाद व खोटा राष्ट्रवाद यांमधील फरक कामगारवर्गाला, आपल्या जनतेला समजावून द्यावा लागेल. निरोगी राष्ट्रवाद कोणता ? कोणत्या परिस्थितींत तो आंतरराष्ट्रीयवादाशीं सुसंगत ठरतो ? आमचा आजचा राष्ट्रवाद आणि आंतरराष्ट्रीयवाद यांत विरोध आहे का ?

चहूं बाजूंनीं आपल्यावर हल्ले होत आहेत. प्रतिगामी टीकाकार आपल्याला सांगतात, " जर तुम्हीं सच्चे राष्ट्रवादी असाल तर द्या की आंतरराष्ट्रीयवाद सोडून. " " जर तुम्हीं आंतरराष्ट्रीयवादी असाल तर तुम्हांला चीनचें म्हणणें, चीनला पाठिंबा देणाऱ्या प्रत्येकाचे म्हणणें मान्य करावेंच लागेल; म्हणून राष्ट्रवादाची तुमची सारी बडबड निव्वळ फसवेगिरी आहे. हा एक तुमचा डाव आहे आणि हें सारें तुम्हीं केवळ जनतेला फसविण्यासाठीं, तुरुंगवास चुकविण्यासाठीं करीत आहांत " असें त्यांचें म्हणणें आहे.

या प्रश्नाबाबत आमची भूमिका स्पष्ट पाहिजे. आम्हीं आहोत आंतरराष्ट्रीयवादी आणि आंतरराष्ट्रीयवादी या नात्यानें युद्ध व शांततेचा प्रश्न, शांततामय

सहजीवनाचा प्रश्न, नवस्वतंत्र देशांचा व अलिप्ततावादाचा प्रश्न या सर्व प्रश्नांबाबत आमच्या ठाम तात्त्विक भूमिका आहेत; या भूमिकांनुसार एखादा समाजसत्तावादी देश आज चीन वागतो आहे त्याप्रमाणें, पोथीवादी आणि पंथवादी बनू शकतो- जागतिक शांततेला धोका निर्माण करूं शकतो. जर एखाद्या देशानें असें कांहीं केलें तर मग आमच्या आंतरराष्ट्रीयवादानें त्याला विरोध केला पाहिजे.

**राष्ट्रवाद व आंतरराष्ट्रवाद यांचें संकलित आकलन करून घेतलें नाहीं तर आपण स्वतःलाच गोंधळांत पाडूं आणि असें करतांना कामगारवर्गालाहि बुडवूं. हे दोन वाद परस्परविरोधी आहेत असें मानण्याचाच अवकाश कीं आपली गती थांबलीच म्हणून समजा. मग आपण पक्के संधिसाधू बनूं.**

तुम्हीं विचाराल कीं, 'काय हो ! ही भूमिका कुणाची ? ट्रेड युनियनवादाची की एखाद्या राजकीय पक्षाची ?' जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनचे ठराव घ्या. कामगारवर्गीय आंतरराष्ट्रीयवादाच्या धोरणावर आधारलेले आणि युद्ध व शांततेच्या प्रश्नाची चर्चा करणारे ठराव घ्या.

शांततामय सहजीवन, निःशस्त्रीकरण इत्यादि प्रश्नावर जा. ट्रे. यु. फेडरेशनचें धोरण तपासू या. निःशस्त्रीकरणाच्या प्रश्नावर चीनचें धोरण काय आहे ? 'निःशस्त्रीकरण हा कांहीं आजचा आद्य महत्त्वाचा व प्रमुख प्रश्न नाहीं,' असें त्यांचें म्हणणें आहे. शांततामय सहजीवन, असंलग्न राष्ट्रांचें कार्य, या बाबतींतील जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनची भूमिका त्यांना मान्य नाहीं.

म्हणून जागतिक ट्रेड युनियन फेडरेशनला जोडलेली संघटना म्हणून, श्रमजीवि वर्गाच्या आंतरराष्ट्रवादाच्या पायावर व 'युद्ध व शांतता', 'शांततामय सहअस्तित्व', 'निःशस्त्रीकरण', 'असंलग्न देशांशीं संबंध', राष्ट्रीय भांडवलदारवर्गाच्या सत्तेखालीं असलेल्याहि नवस्वतंत्र देशांची पुरोगामी भूमिका' इत्यादि प्रश्नांवर सर्वमान्य भूमिकांप्रमाणें भूमिका घेणारी संघटना म्हणून- राष्ट्रीय भांडवलदारवर्गाच्या सरकारला आज पाठिंबा देणें माझ्या आंतरराष्ट्रवादाशीं पूर्णपणें सुसंगत आहे असें मी म्हणतों.

**तुम्हीं असेंहि विचाराल, "प्रतिगामी राष्ट्रवाद म्हणून कांहीं चीज आहे काय ?" आहे; जरूर आहे. जुलुमग्रस्त देशांचा राष्ट्रवाद आणि जुलुम करणाऱ्या देशाचा राष्ट्रवाद-दोन्ही राष्ट्रवादच; परंतु पहिला आहे पुरोगामी**

तर दुसरा आहे प्रतिगामी. स्वतंत्र होऊं इच्छिणाऱ्या वासाहतिक राष्ट्रांचा राष्ट्रवाद क्रांतिकारक, प्रगतीशील राष्ट्रवाद म्हटला पाहिजे, मग त्यांचें नेतृत्व नेहरूंकडे असो, महात्मा गांधींकडे असों कीं आणखी कुणाकडे असो.

ज्या वेळी जगांत हे दोनच प्रकार–जुलमी राष्ट्रांचा राष्ट्रवाद व जुलमग्रस्त राष्ट्रांचा राष्ट्रवाद–नांदत होते, त्यावेळची ही परिस्थिती झाली. परंतु जेव्हां एकादा जुलमग्रस्त देश स्वतंत्र होतो, भांडवलदारी राज्य स्थापन करतो; परंतु साम्राज्यवादी गोटांत मात्र जात नाहीं, तेव्हां अशा ह्या राष्ट्राचा राष्ट्रवाद कोणत्या सदरांत पडतो ? ही समस्या नवीन आहे.

हा प्रश्न जुलमांतून मुक्त झालेल्या, स्वतः जुलम न करणाऱ्या परंतु अलिप्ततावादी, स्वतंत्र, आपल्या विकासासाठीं धडपडणाऱ्या–हा विकास समाजसत्तावादाच्या दिशेनें नसेलहि कदाचित्–देशाच्या राष्ट्रवादाचा प्रश्न दुसऱ्या महायुद्धाच्या पूर्वी अस्तित्वांतहि नव्हता. या देशाच्या राष्ट्रवादाला काय म्हणायचें ?

अंतर्गत प्रश्नांबाबत आम्हीं आमच्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गाशीं लढतों. बाह्य संबंधाबाबत आमचे स्थान शांततेच्या गोटांत आहे. कामगारवर्ग या नात्यानें आमचें स्थान समाजसत्तावादी गोटांत आहे. परंतु आमचें सरकार व आमचा देश कुठल्याहि गोटांत नाहींत.

**कामगार वर्ग कधींच अलिप्ततावादी नसतो. तो सर्व जगाच्या-यांत भांडवलदारी व समाजसत्तावादी राष्ट्रें दोन्हीं आलीं–कामगारवर्गाच्या बाजूनें उभा असतो. परंतु एकाद्या देशांतील भांडवलदारवर्ग, त्यांचें सरकार आणि त्याच्या अधिपत्याखालील देश हे, आजच्या भारतप्रमाणें अलिप्ततावादी असूं शकतात.**

ट्रेड युनियन क्षेत्रांतहि अनेक वाद आहेत–पांचव्या ट्रेड युनियन कॉंग्रेसमध्यें दिसून आले तसे. आम्हीं आमचा दृष्टिकोन घेतों तो आंतरराष्ट्रीयवादाच्या आधारावर, आणि आमच्या देशाच्या सद्यः प्रश्नावर आमच्या दृष्टिकोनाला आमच्या देशाचा पुरोगामी राष्ट्रवाद मार्ग दाखवितो.

आमची राष्ट्रवादी भूमिका आमच्या आंतरराष्ट्रीयवादी भूमिकेशीं सुसंगत आहे; आणि एका मुक्त असंलग्न राष्ट्राचा कामगारवर्ग या नात्यानें आम्हीं, आमच्या प्रगतिशील राष्ट्रवादाचा आधार घेऊन आमच्या देशाच्या रक्षणकार्यांत भाग घेत आहोंत. आणि आम्हीं जें करीत आहोंत तें योग्यच आहे.

तुमचें शंकानिरसन करण्यासाठीं मला जें कांहीं सांगावयाचें होतें तें हेंच. कामगारवर्गापुढें जातांना स्वच्छ निःशंक मनानें जाऊं या.

## राष्ट्रवाद-खरा व खोटा

मग आणखी एक प्रश्न निर्माण होईल. या प्रश्नाकडे पाहण्याचा राष्ट्रीय-दुरभिमानाचा असा दृष्टिकोन असूं शकतो का ? होय. असूं शकतो, आणि ट्रेड युनियन संघटनांत आम्हांला त्याविषयीं सावधगिरी बाळगली पाहिजे. परदेशांतील जनतेविरुद्ध द्वेषभावना पेटविणें हा झाला राष्ट्रीय दुरभिमान. प्रतिगामी लोकांचे कितीहि हल्ले सोसावे लागले तरीसुद्धां दोन राष्ट्रातील जनतेंत द्वेषबुद्धि पेटविण्याचें दुष्कर्म आम्हीं कदापिहि करणार नाहीं.

मग आपण करायचें तरी काय ? प्रश्न शांततेच्या मार्गानें मिटावा म्हणून आपण प्रयत्न करीत राहिलें पाहिजे. राष्ट्रीय दुरभिमानाची भूमिका कोणती ?— ' तडजोड नको; दीर्घकालीन युद्ध हवें ' डोकें ठिकाणावर असलेले भांडवलदार राजकारणी लोकहि ही गोष्ट करीत नाहींत. पण कधींकधीं ट्रेड युनियन्समधील वेडपीर मात्र असा प्रयत्न करतातहि. एकदां तुम्हीं हा मार्ग धरलांत कीं आंतरराष्ट्रीयवादाशीं विसंगत अशा राष्ट्रवादाची कास धरावीच लागेल. म्हणून दोन देशांतील जनतेंत द्वेष माजविण्याचें टाळलेंच पाहिजे.

दुसरी गोष्ट अशी कीं ' अटीतटीची लढाई– ' म्हणजे एक तुम्हीं तरी पेकिंगला पोहोंचता किंवा ते तरी दिल्लीला पोहोंचतात.दोन्ही देशांत तडजोडीचीही मागणी आपण करावयास हवी, ही गोष्ट प्रतिगाम्यांच्या दबावापायीं, कधींकधीं आपण विसरण्याचा संभव असतो. या किंवा त्या देशाचा कायमचा निकाल लावणारें हें युद्ध नव्हे आणि दोन महान् देशांमधील दीर्घकालीन युद्ध याचा अर्थ जागतिक युद्ध असाच होतो.

म्हणूनच लष्करी दृष्ट्या अत्यंत प्रबळ असलेला सोविएत युनियनसारखा देशसुद्धां, आपण क्यूबा-प्रकरणीं पाहिलें त्याप्रमाणें, जागतिक महायुद्ध टाळण्याच्या दृष्टीनें पावलें टाकीत आहे. आतां क्यूबाच्या तडजोड प्रकरणींसुद्धां ख्रुश्चोवना विरोध करणारे तथाकथित कट्टर आंतरराष्ट्रीय क्रांतिकारक महाभाग आहेतहि. त्यांच्याशीं आम्हांला कांहींच करायचें नाहीं.

क्यूबाबाबत प्रश्न होता तो हा : अमेरिका क्यूबावर स्वारी करणार कीं

नाहीं ? अखेर ' आम्हीं क्यूबावर स्वारी करणार नाहीं ' असें आश्वासन त्यांना द्यावेंच लागलें आणि नंतरची सर्व तडजोड यामधूनच शक्य झाली.

## चीनी कामगारांबाबतची भूमिका

चीनी कामगारवर्गाबाबत आमचा दृष्टिकोन कोणता ? तो समाजसत्तावादी अर्थरचनेची बांधणी करीत आहे असाच ना ? होय, तसाच. ज्या देशांत भांडवलदारी उत्पादनसंबंध नाहींत तो देश समाजसत्तावादीच म्हटला पाहिजे.

आतां त्यांचें सरकार जें जें कांहीं करतें तें सर्वच योग्य आहे असा कांहीं त्याचा अर्थ होत नाहीं. कारण कांहीं पक्ष ' राष्ट्रीय कम्युनिस्ट ', पंथवादी इत्यादि बनू शकतात हें आम्हांला चांगलें ठाऊक आहे.

**आणि जेव्हां कांहीं पक्ष हा मार्ग स्वीकारतात तेव्हां सारें राष्ट्रच्या राष्ट्र त्या मार्गानें जाऊं लागतें, आणि मग तेथील कामगारवर्गहि तोच रस्ता पकडतो. आम्हांला आमच्या राष्ट्रवादाशीं एकनिष्ठ राहिलें पाहिजे कारण दुसऱ्या राष्ट्रानें युद्ध आणि शांततेच्या प्रश्नावर, दोन देशांतील भांडणतंटे शांततेच्या मार्गानें सोडविण्याच्या प्रश्नावर, आंतरराष्ट्रीय वादाला तिलांजलि दिली आहे.**

या प्रश्नावर आंतरराष्ट्रीयवादाच्या नांवाखालीं कांहींतरी ' कसरत ' करणें म्हणजे विचारांची निव्वळ दिवाळखोरी, तर्कशुद्ध निष्कर्ष काढण्याला नकार आहे.

तेव्हां आम्हीं युद्धतयारीला पाठिंबा देतों; आमच्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गाची बाजू घेतो...बिचकूं नका कांहीं. जितके जास्त बिचकाल तितके जास्त गोंधळांत मात्र पडाल.

पंडित नेहरू म्हणजेच सर्व कांहीं नव्हे. पेकिंग रेडिओ सांगतो त्याप्रमाणें ते भांडवलदार–जमीनदारवर्गाच्या युतीचे प्रतिनिधि नसतीलही. परंतु शासनसंस्थेचें, सरकारचें रूप कांहीं पालटलेलें नाहीं. वर्गसंबंध जसेच्या तसे कायम आहेत. परंतु आजच्या राष्ट्रीय समस्या–प्रकरणीं, राजकीय वर्गसंघर्षाचा जुना मार्ग आम्हीं बाजूला ठेवला आहे आणि त्या आघाडीवर आज तात्पुरती युद्ध–तहकुबी आहे. आणि राष्ट्रसंरक्षणाच्या प्रश्नावर, सप्टेंबरमधील परिस्थितीच्या आधारावर वाटाघाटींच्या मार्गानें तडजोड घडवून आणण्याच्या प्रश्नावर आम्हीं आमच्या राष्ट्रीय भांडवलदारवर्गाच्या खांद्याला खांदा लावून उभे आहोंत.

या एकजुटींत, या आघाडींत भांडवलदारवर्ग हा भांडवलदारवर्ग म्हणूनच वागणार कां ? होय, तसाच वागेल. त्यांच्या नेहमींच्या संकुचित दृष्टिकोनानेंच कां ? कदाचित्. परंतु भांडवलदारवर्ग सावधहि असतो.

एक ट्रेड युनियन या नात्यानें संरक्षण व उत्पादनाबाबत ज्या ज्या कामगिऱ्या आम्हांला पार पाडाव्या लागतील त्या साऱ्या आम्हीं पार पाडूं. उत्पादनांत अडथळे येतात ते दोन्ही बाजूंनीं—कामगारवर्गाकडून तसेंच भांडवलदारवर्गाकडूनहि. भांडवल्दावर्गाकडून अडथळे येतात त्याच्या मागें भरमसाट नफे कमाविणें हा हेतु असतो. कामगारवर्गाकडून अडथळे येतात, कारण त्याला संपाच्या मार्गानें स्वसंरक्षण करावयाचें असतें म्हणून. कांहींहि असलें तरी त्याचा प्रत्यक्ष परिणाम उत्पादनांत अडथळा हाच होतो.

## बिनशर्त पाठिंबा

तेव्हां कामगारवर्ग या नात्यानें सध्यांपुरता संपलढ्यांचा प्रश्न, संपलढ्यांच्या मार्गानें आमच्या वर्गीय हितसंबंधांचें संरक्षण करण्याचा प्रश्न, आम्हीं तहकूब ठेवला आहे असें आम्हीं सांगतों. कांहीं विशिष्ट प्रसंगीं असें वागणें तुम्हीं अशक्यच करून टाकलेंत तर आम्हीं तुम्हांला १४ दिवसांची नोटिस देऊं. परंतु हा नियम बनवून टाकूं नका. त्यांच्याशीं बोलून प्रश्न सोडविण्याचा आपण होऊन प्रयत्न करा.

तेव्हां युद्धतयारीला बिनशर्त पाठिंबा देण्याच्या भूमिकेंतून आम्हीं वागणार. आमचा वर्ग जनतेचें नेतृत्व करणारा वर्ग आहे. या नात्यानें जनतेच्या इतर विभागांना बरोबर घेऊन आम्हीं देशसंरक्षणाच्या कामगिऱ्यांचा व जबाबदाऱ्यांचा स्वीकार करतों.

त्यासाठीं आम्हीं कुठल्याच अटी घालीत नाहीं. स्वदेशाच्या संरक्षणाच्या कामांत काय अटी घालायच्या ? देशरक्षणाच्या कार्यांत नेहरू सरकारला माझा बिनशर्त पाठिंबा आहे. पण त्याचबरोबर कामगारांसाठीं अमुक अमुक गोष्टी केल्यानंतर युद्धतयारी जास्त चांगल्या प्रकारें करतां येईल, हें मी त्यांना जरूर सांगतों. आणि त्यांनीं संपूर्ण संपबन्दीचा ठराव लिहिलेला असला तरीसुद्धां त्यांना यापैकीं कांहीं गोष्टी मानाव्याच लागतात.

या बाबतींत उत्पादनकार्यांत आम्हीं स्वेच्छेनें कांहीं नव्या जबाबदाऱ्या

स्वीकारीत आहोंत. त्यांतील पहिली ही कीं उत्पादनांत खंड पडूं द्यावयाचा नाहीं, हें आम्हीं आपण होऊनच मानतों. परंतु उत्पादनकार्यार्थ आम्हांला आम्हीं सांगतों त्या कांहीं संरक्षक सवलती मिळाल्या पाहिजेत, असें आमचें म्हणणें आहे.

परंतु कुठल्याहि परिस्थितींत आम्हीं संपाचा अवलंब करणारच नाहीं असें आहे काय ? मी पूर्वीं म्हटल्याप्रमाणें, कधीं कधीं तसें करणें अगदीं अशक्य होऊन बसेल आणि कामगार तुमचें मुळींच ऐकणार नाहींत. अशा वेळीं सरकार व मालकांशीं आम्हांला बोलणीं करावीं लागतील आणि त्यांना बजावावें लागेल कीं ' तुम्ही जें कांहीं करतां आहांत तें चूक आहे. '

**आतां तावडतोबीनें करावयाची गोष्ट म्हणजे चालू संप—नोटिसा तहकूब करणें. आमच्या आश्वासनांच्या पूर्तीच्या क्रमांतील आमचें हें पहिलें पाऊल आहे.**

तेव्हां आम्हांला संप करावयाचे नाहींत; चालू नोटिसा तहकूब ठेवण्याचें आम्हीं स्वखुषीनें पत्करतों आणि संप टाळण्याचें आपण होऊन मान्य करतों. पण जर कां तुम्हीं संपावर संपूर्ण बंदी घातलीत, तर तें जमायचें नाहीं. आमच्या कामगारांना विरोध करण्याच्या परिस्थितींत तुम्हीं आम्हांला लोटूं पाहाल, तर त्याचा अर्थ तुमच्या खाजगी वर्गहितसंबंधांनीं प्रेरित होऊन तुम्हीं आम्हांला नष्ट करूं पहात आहांत, असाच होईल. आणि ही गोष्ट आम्हांला कधींच मान्य होणार नाहीं.

तेव्हां दोन ' खांबांच्या ' आपल्या पूर्वीच्या धोरणाचा आपल्याला फेरविचार करायला हवा.

## दो—खांबी धोरण व राष्ट्रीय संरक्षण

या दोन खांबांचें मूल्य आतां समान लेखतां येत नाहीं; ते समान पायावर उभे नाहींत. अर्थात् देशसंरक्षण व वर्गसंरक्षण यांचें जुनें सूत्र साररूपानें या अर्थानें कायम आहे कीं आज वर्गसंरक्षण देशसंरक्षणाला पूरक झालें आहे.

पूर्वीं पंचवार्षिक योजनेला मदत करणें हा एक खांब होता आणि आपल्या वर्गाचें संरक्षण करणें हा दुसरा खांब होता. आणि देशाच्या अर्थव्यवस्थेच्या उभारणीच्या कार्यामध्यें वर्गसंरक्षण हें एक महत्त्वाचें हत्यार होतें.

हा संबंध आज पालटलेला आहे. आज वर्गसंरक्षण राष्ट्रसंरक्षणाच्या अधिक

महत्वाच्या कार्याशीं एकरूप झालें आहे. आणि वर्गसंरक्षणाचें कार्य केलें जातें, त्याची काळजी घेतली जाते ती राष्ट्रसंरक्षणार्थ उत्पादन सुरळीत चालूं राहावें म्हणून. तेव्हां हा कांहीं दोन्ही स्तंभांना एकच किंवा समान महत्त्व असण्याचा प्रश्न नव्हे.

आज या दोन खांबांचें एकाच खांबांत एकीकरण झालें आहे; व तो आहे राष्ट्ररक्षणाचा, उत्पादनाचा व तें करण्यासाठीं वर्गाचें व जनतेचें हितरक्षण करण्याचा. दोघांशींहि समांतर राहणारा नव्हे, तर दोघांचीहि मूल्ये एकत्रित करणारा हा एकच खांब आतां ( आपल्या धोरणाचा आधार म्हणून ) राहील. कोणताहि एक खांब सोडून देणें हा याचा अर्थ नव्हे. दोघांचेंहि एकत्रीकरण करावयास हवें.

## संतुलित दृष्टिकोन ग्रहण करा

मग प्रश्न येतो कीं गोष्टी करायच्या तरी किती ? पहिल्या सपाट्याला आपण जें जें कांहीं केलें तें सारें योग्यच होतें. कां ? कारण आपल्यापैकीं कांहीं लोकांमध्यें पाप केल्याची भावना आहे. आपलें पाप धुवून निघावें म्हणून एकादा मनुष्य पुनः पुनः गंगास्नान करतो. कांहीं बाबतींत नेमकी हीच गोष्ट आमच्याहि बाबतींत घडते आहे.

त्यानें कांहीं बिघडत नाहीं. पण गंगास्नानाचाहि अतिरेक करूं नका. सर्वच रविवारीं काम करणें, ओव्हरटाइमवर, सगळ्याच हक्काच्या रजेवर पाणी सोडणें वगैरे असल्या गोष्टींतहि अतिरेक होतां कामा नये. खरें पहातां नोव्हेंबर ४ च्या रविवारीं काम करून त्या दिवसाचा पगार संरक्षण निधीला देऊं असें सांगणारी आमची गिरणी कामगार युनियन हीच पहिली मुंबईची युनियन होय.

आतां संरक्षण निधीला मदत देण्यासंबंधीं पाहूं या. होय. कामगारांनीं निधीला पैसे दिलेच पाहिजेत. पण मग तेथेंहि कांहीं प्रश्न निर्माण होतात. मुंबईला तोच अनुभव आला. एका रविवारीं कामगारांनीं काम केलें. नंतर इतर कांहीं लोक आले आणि ' रविवारच्या कामाचे पैसे तर झालेच, पण त्याखेरीज फंडाला आणखी वेगळी मदत द्या ' म्हणून सांगूं लागले. एक दिवस काम करून कामगारांनीं प्रत्येकीं सरासरी ५ रु. दिलेच होते. तरीहि कांहींजणांनीं वैयक्तिक देणग्या/गोळा करावयास सुरुवात केली. हें चुकीचें आहे.

तेव्हां यामध्यें कोठेंतरी समतोल पाहिजे. संरक्षण निधीची मोहीम योग्य पायावर संघटित केली पाहिजे. पहिल्या देणग्या संरक्षण निधीला मदत म्हणून दिल्यावर नंतरची मदत कामगार संरक्षण रोख्यांच्या खरेदीच्या रूपाने करतील.

रोख्यांत पैसे गुंतवणें म्हणजे जवळ शिल्लक असणें होय. कामगाराला शिल्लक टाकण्याचें सामर्थ्य असें नसतेंच. अशाहि स्थितींत तो रोख्यांत पैसे गुंतवील व हाहि एक त्यागच आहे. कांहीं लोक जर असें म्हणू लागले कीं आपल्या रोखे खरेदीचा उपयोग भाववाढीचा आपल्यावर कांहींच आघात झालेला नाहीं हें सिद्ध करण्यासाठीं केला जाईल, तर तें म्हणणें चुकीचें आहे.

एक दिवसाचें वेतन देणगी म्हणून देण्याबाबतसुद्धां थोडें तारतम्य ठेवलें पाहिजे. असे कित्येक धंदे आहेत कीं जेथें जगण्यास आवश्यक इतकाहि पगार मिळत नाहीं. कामगारवर्गाच्या अशा विभागांकडे केवळ यांत्रिक पद्धतीनें नव्हे, तर वस्तुस्थितीची जाणीव ठेवून आपण गेलें पाहिजे. इंजिनिअरिंगच्या कारखान्यामध्यें काम करणारा ७ रु. रोज मिळवणारा कामगार आणि एक रुपया रोज मिळवणारा विडी कामगार यांना एका मापानें तोलून चालणार नाहीं.

तुमचा औद्योगिक विभाग, तेथील कामगारांच्या पगाराचें मान लक्षांत घेऊन त्यानुसार तुम्हीं संरक्षण रोखे व संरक्षण निधिविषयक तुमचा दृष्टिकोन निश्चित करा. देशप्रेमाचें प्रत्यक्ष प्रमाण पैशाच्या रूपानें दाखवण्याचा प्रश्न येतो तेव्हां वास्तववादी दृष्टिकोन घ्यावा लागतो. नाहींतर आपण फक्त वाचिवीर देशभक्त ठरूं, वस्तुस्थितीला अनुसरून कार्य करायला नालायक ठरूं.

खाणीच्या धंद्यांत तर सुट्ट्यांना तिलांजलि देणें अत्यंत चुकीचें ठरेल. खाणींत काम करणें अत्यंत कष्टाचें असतें खाणींत काम करणाऱ्या कामगाराला क्वचित्च सूर्याचें दर्शन होत असतें, आणि तुम्हीं काय रविवारीसुद्धां त्याला त्या अंधाऱ्या खड्डयांत जायला सांगणार ! तेव्हां ' रविवारचें काम चालू ठेवा ' ही घोषणा घेऊन जायचें कोठें नाहीं याचें तारतम्य तुम्ही पाळलेंच पाहिजे. तीच गोष्ट वाहतुकधंद्याची; इंजिन-ड्रायव्हरला जर तुम्हीं सर्व रविवारीं काम करायला लावलेत तर अधिक अपघात होतील.

तेव्हां तत्त्वरूपानें एखादी गोष्ट मान्य केल्यानंतर व्यवहारांत त्या तत्त्वाची अंमलबजाणी करतांना निरनिराळीं धोरणें धरावीं लागतात. नाहींतर एकदोन

रविवारीं काम केल्यावर कामगार बंड करून उठतील. तुम्हीं जर हें तारतम्य ठेवलें नाहीं तर संपावर जाणारा कामगारच फक्त तुमचें नेतृत्व झुगारून देईल असें नव्हे, तर असें कांहीं झालें तर तुमचे टीकाकार देखील 'असा संप व्हावा म्हणूनच तुम्हीं कारवाया करीत होतांत' असें म्हणतील.

म्हणून काम करून किंवा पगाराच्या रूपानें संरक्षण निधीला सरळ एकदां देणगी द्या, आणि असुक अमुक युनियननें अमुक अमुक देणगी दिली अशी नोंद होऊं द्या, आणि मग त्यानंतर आपण रोख्यांना पैसे देऊं आणि त्यासाठीं जिथें शक्य असेल तिथें ज्यादा काम करूं. पण तेंहि सर्व रविवारीं नव्हे.

सर्वच सुट्ट्यांचें दान मुळींच नको. नेहमींच्या वेळेपेक्षां जास्त काम केल्याचा जादा पगारहि संपूर्ण दान देण्याला तत्त्व म्हणून मान्यता देऊं नका. सर्व कांहीं देऊन टाकण्यापासूनच सुरवात करूं नका. आपल्याला करावयाची आहे ती राष्ट्राच्या संरक्षणाची मजबुती व त्यासाठीं उत्पादनाची वाढ.

**पण तुम्हीं एका मर्यादेच्या बाहेर श्रम केले तर तुमच्या शारिरिक शक्ति नीट काम करूं शकणार नाहींत व तुम्हीं काय करीत आहांत तें सरकार वा मालक–कुणालाच कळणार नाहीं. म्हणून मी तुम्हांला सावधगिरीनें वागण्यास सांगेन. परंतु सावधगिरी म्हणजे निष्क्रियता मात्र नव्हे. प्रश्न आहे तो संतुलित दृष्टिकोन असण्याचा. आपण कसेहि वागलो तरी इंटक व इतर आपणांस चिथावणारच–हल्ला करणारच. परंतु त्यानें घाबरूं नका.**

## लोकशाही एकजुटीची नवीन संधि

एका नवीन पद्धतीनें कामगारवर्गाची एकजूट बांधण्यासाठीं आधारबिंदू म्हणून ह्या परिस्थितीचा उपयोग करतां आला पाहिजे. ह्या भूमिकेला दोन प्रकारांची एकजूट बांधावयाची आहे. पहिली म्हणजे कामगारवर्गाची जनतेच्या इतर लोकशाही विभागांशीं- शक्तींशीं एकजूट. आतांपर्यंत राजकीय लढ्यामध्यें कामगारवर्गानें लोकशाही आघाडी बांधण्याची घोषणा नेहमींच दिली आहे, पण प्रत्यक्षांत ती बांधतां आलेली नाहीं.

लोकशाही आघाडी बांधण्यांची नवी संधि प्राप्त होत आहे. त्या लोकशाही आघाडींत कामगारवर्गाच्या संघटना व पक्ष एक घटक होऊन राहतील. म्हणून आपली भूमिका म्हणजे लोकशाही आघाडी बांधण्याची एक नवीन तरफ आहे.

कांहीं लोक म्हणतील कीं कामगारवर्गाचें भांडवलदार वर्गांत विलीनीकरण करून त्याचें वेगळें अस्तित्व नष्ट करण्यासारखेंच आहे हें. मूल्यमापन निरनिराळें असूं शकते. त्यांतलें एक असें कीं आम्ही आमच्या वर्गाला वाऱ्यावर सोडून देत आहोंत. भांडवलदारवर्गांत विलीन होत आहोंत आणि अशा रीतीने वर्गीय भूमिकांचें विसर्जन करीत आहोंत. परंतु विसर्जन नव्हे तर लोकशाही आघाडी हेंच आमच्या भूमिकेंतून फळ मिळणार आहे. तथापि हा आमच्यावरचा एक आरोप झाला.

हा कांहीं विसर्जनवाद नव्हे. या एकजुटीच्या आघाडीच्या आधारानें भविष्यकाळीं आमच्या वर्गाची ताकद वाढणारच आहे. कारण आमच्या लढ्याच्या राष्ट्रीय स्वरूपामुळें या आघाडीला वाढण्याची नवीन संधि मिळणार आहे.

## मागील काळांतील फाटाफूट व राजकारण

ह्या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू आहे; ती म्हणजे कामगार वर्गाचें, ट्रेड युनियन आंदोलनाचें ऐक्य. ट्रेड युनियन आंदोलनांतील सर्व मोठमोठ्या फुटी राजकीय प्रश्नांवर घडून आलेल्या आहेत. अगदीं पहिलीवहिली फूट पडली तीहि राजकीय दृष्टिकोनाच्या पायावरच. भारतांतील ट्रेड युनियन्स पहिल्या प्रथम फुटल्या त्या कांहीं शुद्ध ट्रेड युनियन प्रश्नांवर नव्हे. ही फूट कोणी पाडली ? निःसंशय, भांडवलदारवर्गाचीच प्रेरणा या फुटीमागें होती.

पहिली फूट पडली १९२९ मध्यें नागपूर येथें. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीसंबंधीं भांडवलदारवर्गाचें धोरण व कामगारवर्गाचे धोरण–या प्रश्नावर ही फूट पडली. १९३० मध्यें दुसरी फूट पडली. पहिल्या फुटीचें बाह्य कारण होतें–रॉयल कमिशनचा आपण स्वीकार करावा कीं करूं नये ? याबाबत एन्. एम्. जोशींची भूमिका एक होती व राष्ट्रवाद्यांची व आमची दुसरी होती.

मग अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस आमच्याकडे राहिली व दुसऱ्या मताच्या लोकांनीं नॅशनल फेडरेशनची स्थापना केली. पुन्हा कलकत्ता येथें १९३० मध्यें राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीबाबतच्या दृष्टिकोनावरूनच दुसऱ्यांदा फूट पडली. मग एक लाल अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस उभी राहिली. शिवाय पूर्वीची अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस होतीच. या दोन्ही १९३६ मध्यें अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेस म्हणून परत एक झाल्या.

१९३८ मध्यें नॅशनल फेडरेशन व अ. भा. ट्रेड युनियन काँग्रेस यांचें एकत्रीकरण करण्याचें आम्हीं ठरविलें. एकत्रीकरणाचें सूत्र होते—नांव अ. भा. ट्रेड युनियन कॉंग्रेसचे व घटना नॅशनल फेडरेशनची; पदाधिकारी अर्धे अर्धे. अशा रीतीनें दुसऱ्या महायुद्धाला सुरुवात होण्याच्या अगोदर सर्व ट्रेड युनियन्सची एकजुटीची संघटना म्हणून अ. भा. ट्रे. यु. काँग्रेस परत एकदां उभी राहिली.

१९४३ मध्यें युद्धविषयक दृष्टिकोनावरून परत एकदां फूट पडण्याची भीति निर्माण झाली होती. परंतु अ. भा. ट्रे. यु. काँग्रेसनें युद्धासंबंधीं कोणताच राजकीय ठराव केला नाहीं, प्रत्येक युनियनला आपले राष्ट्रीय धोरण ठरवण्याचें स्वातंत्र्य दिलें.

नंतर १९४७ मध्यें फूट पडली. काँग्रेसवादी ट्रेड युनियन्स बाहेर पडल्या आणि त्यांनीं इंटकची स्थापना केली. ह्यानंतर लगेच हिंद मजदूर सभेची व नंतर युनायटेड ट्रेड युनियन काँग्रेसची स्थापना झाली. अशा प्रकारें राजकीय मतभेदांमुळें भारतीय कामगारवर्गाच्या संघटनांची निरनिराळ्या केंद्रांत वांटणी झाली.

मागण्यांच्या बाबतींत सर्वांचें एकमत. परंतु संप करावा कीं करूं नये या नानें राजकारण आणलें. अशा रीतीनें ट्रेड युनियन संघटनांच्या फुटीचें उगमस्थान राजकारणच बनलें.

## नवीन परिस्थितींत एकजुटीची शक्यता

**आज परिस्थिति अशी आलेली आहे कीं, निरनिराळ्या ट्रेड युनियन्समध्यें राजकीय मतभेद नाहींत. संरक्षण, उत्पादन वगैरेंच्या बाबतींत कामगारवर्ग आणि जनतेचे प्रमुख विभाग या सर्वांच्या राजकीय भूमिका समान आहेत. ज्या ठिकाणीं युद्धामुळें एकदां आमच्यांत फूट पडली त्याच ठिकाणीं एक नवीन प्रकारचें युद्ध आमच्यांत एकजूट घडवून आणीत आहे.**

पण हें कोणत्या परिस्थितींत ? अशा दुर्दैवी परिस्थितींत कीं ज्यांत एक समाजवादी देश गुंतला आहे. म्हणून जी राजकीय परिस्थिति कामगारांत फूट पाडण्यास कारणीभूत होते ती राजकीय स्थिति आज राहिलेली नाहीं. आणि अशी स्थिति राहिली नाहीं आणि हातांतील हीहि सबब गेली म्हणून तर आपले विरोधक इतके खवळून उठले आहेत. म्हणूनच ते आरडाओरड करीत सुटले

आहेत कीं तुम्हीं खरोखरी बदललेलां नाहीं, तुम्हीं दांभिक आहांत–नाटक करतां आहांत वगैरे. आणि म्हणूनच आपली भूमिका कामगारांपर्यंत जाऊं नये यासाठीं फार जोराची धडपड चालू आहे.

पण आज जेव्हां तुम्ही अ. भा. ट्रे. यु. कॉंग्रेसच्या व्यासपीठावरून असें विचारतां कीं आपल्यांत कोठें उरले आहेत राजकीय मतभेद ? तेव्हां कामगारवर्गांत राजकीय एकजूट बांधण्याची एक नवी संधीच तुम्हांला मिळते. आणि जर आपण योग्य रीतीनें वागलों व या प्रश्नाकडे योग्य डावपेंचात्मक दृष्टिकोनांतून पाहूं शकलों तर या राजकीय ऐक्यामधून ट्रेड युनियन ऐक्याकडे उडी घेणें सहज शक्य आहे. अशा रीतीनें एका नव्या पद्धतीनें ट्रेड युनियन ऐक्य बांधण्याची संधि या नव्या परिस्थितीमुळें आपल्याला मिळाली आहे.

ह्याचा अर्थ आपण इंटकचें राजकारण स्वीकारलें असा होतो का ? इंटकचें राजकारण तरी काय आहे ? ट्रेड युनियन चळवळीमध्यें इंटक हें भांडवलदारवर्गाचें अपत्य आहे असें आपण मानतों. पण कोणत्या मुद्यावर ? तत्त्वज्ञानाच्या मुद्यावर. त्यांचें म्हणणें असें कीं दोन्ही वर्गांचे हितसंबंध मिळतेजुळते झाले आहेत. वर्गसंघर्ष राष्ट्रविरोधी आहे, आपण ज्या अर्थव्यवस्थेची उभारणी करीत आहोंत ती भांडवलदारी नसून समाजसत्तावादाप्रत नेणारीच आहे, इत्यादि; आणि ते कॉंग्रेस सरकारला विनशर्त पाठिंबा देतात. परंतु आज राष्ट्रसंरक्षण, उत्पादन वगैरे सारखे सार्वत्रिक स्वरूपाचे प्रश्न विचारांत घेतां ही फूट नाहींशी करतां येण्यासारखी आहे.

## पूर्वीपेक्षां कार्य सोपें आहे

आज खालून तळांतून ट्रेड युनियन एकजूट लवकर बांधतां येईल. कारण उत्पादनासंबंधींच्या कार्यावर आपणां सर्वांचें एकमत आहे. तेव्हां तळांतील कामगारांत आज मतभेद नसावेत—फाटाफूट नसावी. म्हणूनच मूलभूत राजकीय मतभेद नाहींत अशा आजच्या परिस्थितींत तळांतून एकजूट बांधण्याचें काम सोपें झालें आहे.

इंटकला व हिंद मजदूर सभेला फाटाफूट करण्याचे प्रयत्न करणें दिवसेंदिवस कठिण होणार आहे. पूर्वींच्याच घोषणांच्या मार्गे दडून त्यांना असे प्रयत्न करावे लागतील. परंतु पूर्वींच्या त्या घोषणांना आज स्थान नाहीं. आपली

राजकीय भूमिका घेऊन औद्योगिक तहाच्या ठरावाच्या आधारानें--वस्तुनिष्ठ पायावर त्याची अंमलबजावणी करीत जितक्या शीघ्र गतीनें आपण कामाला लागूं, तितक्या लवकर इंटक व हिंद मजदूर सभेचा विरोध हतबल होईल. तेव्हां आपण हा जो ठराव पास करणार आहोंत, तो एका नव्या पातळीवर व्यापक ट्रेड युनियन एकजूट बांधण्याचा आधार बनला पाहिजे.

पुढारीपणामध्यें एकजूट घडून येणे हें आज शक्य नाहीं. परवांच्या दिवशीं त्यांनीं आपल्याबरोबर त्रिपक्ष परिषदेंत बसण्याचेंहि नाकारलें. परंतु त्यांच्या दुर्दैवानें खुद्द राष्ट्रीय भांडवलदार वर्गांत आज फूट पडली आहे. कांहीं आमचेबरोबर सहकार्य करीत आहेत. आमची भूमिका चांगली आहे असें प्रधानमंत्रीहि म्हणतात.

## समाजवादासाठीं

परंतु ट्रेड युनियन क्षेत्रांतील हे प्रतिगामी-नेहरूंनांहि झुगारण्याच्या मर्यादेपर्यंत जातील. आपल्या वैयक्तिक स्थानामुळें नेहरू आज राष्ट्रीय ऐक्याचें प्रतीक बनले आहेत. अशी व्यक्ति राष्ट्राच्या अग्रभागीं असली व एकजुटीच्या आघाडींत आपण आपलें योग्य स्थान घेतलें तर ती आघाडी भावी विकासाप्रत नेणारी एक प्रभावी शक्ति बनेल. हा भावी विकास कोणता? समाजवाद!

याच दृष्टीनें आपण या सर्व परिस्थितीकडे पाहिले पाहिजे व याच प्रकाशांत उजवीकडे अगर डावीकडे न झुकतां समतोल राखून आपण आपल्यापुढील कार्य करूं या.

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
१५८७०
निबंध
२०६६

REFBK-0015970
REFBK-0015970



......कॉ. डांगे हे व्यासपीठावर उभे राहिले कीं सर्व रंगढंग, रस व कलाकुसर त्यांच्यासमोर हजर असतात, आणि एखाद्या चित्रकाराप्रमाणें माफक व प्रमाणबद्ध असा या साऱ्या वैशिष्ट्यांचा वापर करून आपणांस पाहिजे तसें चित्र श्रोत्यांच्या मनावर उठविल्याशिवाय ते राहात नाहींत. भाषण करतांना त्यांच्या चेहऱ्यावरचें आर्जवी पण मिस्किल हास्य कधीं ढळत नाहीं. अफाट हातवाऱ्यांची जरूर त्यांना लागत नाहीं. टिपेच्या आवाजांत कधीं ते बोलत नाहीत. आणि राणाभीमदेवी संचार, संताप किंवा आवाहनें त्यांच्या वक्तृत्वांत नसतात. त्यांना टाळ्या घ्याव्या लागत नाहींत. त्या दणक्यासरशी पडतात. हंशासाठीं विदुषकी करावी न लागतां तो खदखदून प्रकट होतो. चिथावणी न देतांच त्यांचा शब्द हा हुकुमाप्रमाणें अंमलांत येतो.

वक्तृत्वानें नेतृत्व आणि नेतृत्वानें वक्तृत्व यांचा तोल साधणारा कॉ. डांग्यांसारखा सव्यसाची भारतांतही क्वचितच सांपडेल.